CC0.In Public Domain. Digitized by Sarayu T

आचार्य श्रीकुन्थुसागरविरचितम्

आचार्यश्रीशांतिसागरचरितम्

Varni Dig anasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुमेरू प्रकाशन

मराठीचा पहिला शिलालेख
श्रवणबेळगोळ इ.स. ९८१

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुमेरु प्रकाशन

श्री चावुण्डराजें करवियलें
श्री गंगराजें सुत्ताले करवियलें

मराठीचा पहिला शिलालेख
श्रवणबेळगोळ इ.स. ९८१

सुमेरु प्रकाशन
श्री चावुण्डराजें करवियलें
श्री गंगराजें सुत्ताले करवियलें
मराठीचा पहिला शिलालेख
श्रवणबेळगोळ इ.स. ९८१

सुमेरु प्रकाशन
श्री चावुण्डराजें करवियलें
श्री गंगराजें सुत्ताले करवियलें
मराठीचा पहिला शिलालेख
श्रवणबेळगोळ इ.स. ९८१

सुमेरु प्रकाशन
श्री चावुण्डराजें करवियलें
श्री गंगराजें सुत्ताले करवियलें
मराठीचा पहिला शिलालेख
श्रवणबेळगोळ इ.स. ९८१

सुमेरु प्रकाशन
श्री चावुण्डराजें करवियलें
श्री गंगराजें सुत्ताले करवियलें
मराठीचा पहिला शिलालेख
श्रवणबेळगोळ इ.स. ९८१

सुमेरु प्रकाशन
श्री चावुण्डराजें करवियलें
श्री गंगराजें सुत्ताले करवियलें
मराठीचा पहिला शिलालेख
श्रवणबेळगोळ इ.स. ९८१

सुमेरु प्रकाशन
श्री चावुण्डराजें करवियलें
श्री गंगराजें सुत्ताले करवियलें
मराठीचा पहिला शिलालेख
श्रवणबेळगोळ इ.स. ९८१

सुमेरु प्रकाशन
श्री चावुण्डराजें करवियलें
श्री गंगराजें सुत्ताले करवियलें
मराठीचा पहिला शिलालेख
श्रवणबेळगोळ इ.स. ९८१

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्रीकुन्थुसागरविरचितम्

आचार्यश्रीशान्तिसागरचरितम्

हिन्दी अनुवाद

धर्मरत्न पं. लालाराम शास्त्री

सम्पादन

प्रो. रमेशकुमार पाण्डेय

प्रस्तावना

पं. नीरज जैन

मराठी अनुवाद

डॉ.प्रा. मयूरा शहा

प्रकाशक

श्रमण जैन ग्रंथ प्रकाशन समिति, सोलापूर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- आचार्यश्रीकुन्थुसागरविरचितम्
आचार्यश्रीशान्तिसागरचरितम्

- पहिली आवृत्ती : हिंदी २००४
© प्रकाशक : भारतीय ज्ञानपीठ,
१८, इंस्टीट्यूशनल एरिया, लोदी रोड,
नयी दिल्ली-११० ००३

- हिन्दी अनुवाद : धर्मरत्न पं. लालाराम शास्त्री

- मराठी अनुवाद - प्रकाशन :
आदेश व प्रेरणा
प.पू. श्वेतपिच्छाचार्य आचार्य श्री विद्यानंद महाराज
मराठी अनुवाद : डॉ.प्रा. मयूरा शहा

- अनुवादाचे-प्रकाशनाचे विधी - दायित्व :
श्रमण जैन ग्रंथ प्रकाशन समिती, सोलापूर
द्वारा : चंद्रमोहन र. शहा
६, वर्धमान अपार्टमेंट, १०३, रेल्वेलाईन, सोलापूर-४१३००१
भ्रमणध्वनी : ९४२२३३५३००

- प्रस्तुत आवृत्ती : मराठी-दशलक्षणपर्व : सप्टेंबर २०१६

- अक्षरांकन - मुखपृष्ठ : डिझाईन अँन्ड प्रिंट, ठाणे
भ्रमणध्वनी : ९९२०४८५४३९

- मुद्रक : सायली प्रिंटर्स
डी-६, राजहंस सोसायटी,
टिळकनगर, डोंबिवली (पू.) - ४२१ २०१
दूरध्वनी : (०२५१) २४३५९८६
भ्रमणध्वनी : ९७६९१३४००३ । ९९६९४२९७४१

- किंमत : रु. ४५०-००

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मराठी जैन साहित्यात अनमोल साहित्यकृतींचे अवतरण

साहित्य हा जीवनाचा उत्प्रेरक असा आधार असतो. उत्तम साहित्य आणि त्याचे मनन-चिंतन-चर्चा श्रावक जीवनाला दिशा आणि अधिष्ठानही देत असते. जैन जीवनामध्ये गृहस्थांच्या सहा दैनंदिन क्रियांमध्ये, आवश्यक क्रियांमध्ये 'स्वाध्याय' या क्रियेचा समावेश करण्यात पूर्वाचार्यांची नितांत दूरदृष्टीच दिसून येते. त्यांची ही समाजहितैषी दृष्टीच जैन धर्म-संस्कृती आणि समाजाचे अस्तित्व, अस्मिता आणि चारित्र्य-संपन्नता टिकवून ठेवण्यात साहाय्यभूत ठरत आली आहे.

याच परंपरेचा धागा पकडून आम्ही तीन महत्त्वपूर्ण पुस्तकांच्या पुन:प्रकाशनाचा निर्णय घेतला. त्याच्या आर्थिक सहयोग संकल्पनांचे दायित्व प्रामुख्याने श्री. चंद्रमोहन शहा, सौ. उषाताई जैनेंद्रकुमार तुपकर आणि श्री श्रेणिक अन्नदाते यांनी घेतले आणि समाजानेही त्यांना भरघोस प्रतिसाद दिला. पैकी : अहिंसासम्राट - लेखक स्व. वालचंद ना. शहा आणि प.पू. श्वेतपिच्छाचार्य श्री विद्यानंद महाराज यांच्या अर्धशतक गाजत असलेल्या पिंछी आणि कमंडलू - या पुस्तकांचे मराठी रूपांतरण - यांचे प्रकाशन दिल्लीत 'कुंदकुंद भारतीमध्ये महाराजांच्याच शुभहस्ते ६ सप्टेंबर २०१६ ला संपन्न झाले.

'आचार्यश्रीशांतिसागरचरितम्' हे पुस्तक आहे आचार्य शांतिसागरांवर, त्यांच्याच संघातील त्यांचे शिष्य (आचार्य) कुंथुसागर यांनी 'संस्कृतमध्ये लिहिलेले' त्यांचे चरित्र! यात चरित्राचा भाग कमी, विहाराचा वृत्तान्त अधिक आहे. तथापि, हा विहारच शब्दश: 'क्रांतिकारक' होता. त्याने भारतीय जैन जीवनाला नवचेतना आणि स्वत्वाचे भानच केवळ दिले नाही; तर भारतभरच्या जैन समाजाला 'एकसंघ' बनविले. हीच वास्तविकता या छोट्याशा चरित्रातून प्रतिबिंबीत झाली आहे. योगायोग असा की, या संस्कृत चरित्राचा हिंदी अनुवाद श्री. नीरज जैन यांच्या प्रस्तावनेसहित प्रसिद्ध झाल्यानंतर त्याचा मराठी अनुवाद प्रकाशित करावा, असे भाव प.पू. आचार्यश्री विद्यानंद महाराजांनी व्यक्त केले

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होते. त्याची पूर्ती होण्यासाठी सुमारे अर्ध्या तपाचा काळ लोटला... अंतिमतः त्याचेही मराठीत अवतरण आता होत आहे. ही एक ऐतिहासिक घटना आहे. कारण असे की, जैनांच्या 'संस्कृत' भाषेतील साहित्याची परंपरा प्राचीन आणि समृद्ध आहे आणि ती आजही चालू राहिली आहे, हे विशेष! या 'संस्कृत शांतिसागर चरित्रापासून' कुणी विद्यमान अध्ययनशील, अभीक्ष्णज्ञानोपयोगी मुनिवर्य प्रेरणा घेऊन एखाद्या स्वतंत्र संस्कृत साहित्यकृतीची निर्मिती करतील, हीही शक्यता आहे.

या चरित्रगाथेचे मराठी रूपांतर प्रा.डॉ. मयूरा शहा यांनी उत्तम रीतीने केल्याची नोंदही इथे करणे आवश्यकच आहे. ओघवत्या भाषेत त्यांनी हा अनुवाद संपन्न केला आहे. आचार्य कुंथुसागर हे लेखक स्वतःच प्रत्यक्षदर्शी, संघात सहविहारी असल्याने त्यांच्या लेखनात वास्तविकता आणि प्रामाण्य उतरणे स्वाभाविक होते; म्हणूनच शेकडो वर्षांच्या सातत्यपूर्ण जैन परंपरांच्या नितांत हृद्य परिचयाची अनुभूती वाचकांना या पुस्तकातून होईल, असे म्हणावेसे वाटते. येथे एक गोष्ट अशी नमूद करावीशी वाटते की, संघपती शेठ, पूनमचंद घासिराम, मुंबई यांनी १९२७ साली प.पू. शांतिसागर महाराजांना उत्तर भारत विहार यात्रा करविली. सम्मेद शिखरजी यात्रा करताना सोलापूर येथील, शेठ, धर्मवीर रावजी सखाराम दोशी, यांनी संघपती म्हणून जबाबदारी स्वीकारून हजारो कि.मी. विहार प.पू. महाराजांच्या सोबत केला व संघपती परंपरा या विहारापासूनच दृढ झाली, ती आजतागायत कायम आहे.

आमच्या 'सायली प्रिंटर्स'कडे या मौलिक साहित्यकृतींची निर्मिती करण्याची जबाबदारी आली. हा एक अमृतयोग म्हणावा लागेल. आमच्या सह-संस्था सुमेरू प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या दोनशेवर विविध विषयावरील मौलिक, महत्त्वाची आणि मराठी भाषेला समृद्ध करणाऱ्या संस्थेचे प्रकाशनात सुमारे ३५ प्रकाशने जैनधर्म साहित्य-कथा इ. संबंधी आहेत. त्यात या पुस्तकांची अनमोल भर पडली आहे. धर्मप्रभावनेच्या या नितांत दूरगामी कार्यात 'सुमेरू'चे तीन विभाग कार्यरत आहेत. संपादन-विभाग, रेखांकन (डिझाइन) - अक्षरांकन विभाग आणि मुद्रण विभाग. पैकी रेखांकन-अक्षरांकन विभाग श्री. जैनेंद्रकुमार अन्नदाते आणि मुद्रण विभाग श्री. ऋषभराज अन्नदाते हे दोघेही महानुभाव धर्म-परंपरेवरील अढळ निष्ठेने सांभाळतात. म्हणूनच 'सुमेरू प्रकाशन' ही प्रकाशन संस्था मराठी साहित्यजगतात आणि मराठी जैन साहित्य जगतात नामवंत झाली आहे. कुठल्याही पुस्तकाचे मुखपृष्ठ हे त्याच्या आकर्षणाचा प्रथम घटक असतो. 'सुमेरू प्रकाशन' त्यासंदर्भात फारच दक्ष, दूरदृष्टीने आणि पुस्तकाच्या विषयाचा सखोल विचार करून, विपुल वेळ आणि प्रयोग करून अंतिमतः मुखपृष्ठ निर्मित

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करते. हे 'सुमेरू'च्या प्रकाशनांवर नजर टाकल्यास सहज लक्षात येईल. इथे वेळ आणि खर्चाचा विचार नसतो. उदाहरणच द्यायचे असल्यास प.पू. विद्यानंद महाराजांचे पुस्तक 'बाहुबलीस्स रायहानी तख्खशीला' याच्या मुखपृष्ठांचे देता येईल. जैन पुस्तकाचे इतके उच्चतम, कल्पक, अर्थगर्भ आणि विषयोचित मुखपृष्ठ जैन मराठी साहित्यात अद्वितीयच म्हणावे लागेल.

हीही आमच्या रेखांकन विभागाची किमया-निर्मिती होती. 'सुमेरू प्रकाशन' ही जैनांची प्रकाशन संस्था असल्याची तिची 'इमेज' रुजली असल्याचा अनुभव आम्ही विविध साहित्य-संमेलने, इतिहास परिषदांची अधिवेशने, जल-साहित्य संमेलनांतून घेत असतोच; महाराष्ट्रभर! आम्हासाठी ही आनंददायीच घटना आहे.

प्रस्तुत महत्त्वाच्या ऐतिहासिक जैन साहित्य प्रकाशनाच्या कार्यात श्री. चंद्रमोहन शहा यांनी जी मेहनत घेतली, आपल्या उत्तरायुष्यातला काळ असा उत्तम कार्यासाठी व्यतीत केला; त्याला तशी तोड सापडणे समृद्ध प्रकाशन संस्थांच्या तुलनेने कठीण!

आम्ही 'सुमेरू'च्या वाटचालीत ज्या ज्या विविध-शाखांद्वारे अक्षरांकन, मुद्रितशोधन, रेखांकन, मुद्रण इ. मध्ये सहयोग देणाऱ्या यच्चयावत सर्वांचे ऋणी आहोत. आज या क्षमावलीच्या दिनी दि. १६-९-२०१६ रोजी सर्व संबंधितांची आमच्याकडून कळत-नकळत झालेल्या मनोभंगाची क्षमा इच्छितो.

– श्रेणिक अन्नदाते
सदस्य : ग्रंथ प्रकाशन समिती
भ्रमणध्वनी : ९८६७५०८८१४

✧✦✧

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मनोगत

वर्ष २०१०, दिनांक २२ एप्रिल, वृषभ विहार, यमुनापार आचार्य विद्यानंद महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त आम्ही म्हणजे श्री. शरदचंद्र गांधी, अध्यक्ष गांधी नाथा रंगजी संस्था सोलापूर व श्री. श्रेणिक अन्नदाते, संपादक तीर्थंकर मासिक दर्शनासाठी दिल्ली येथे गेलो होतो. महाराजांच्या सान्निध्यात ५ दिवस स्वाध्याय व आचार्यश्री यांच्या जीवनातील अनेक आठवणी आम्हास ऐकता आल्या. याचदरम्यान महाराजांनी आम्हास आचार्य कुंथुसागरविरचित आचार्य शांतिसागर विहार चरित्र संस्कृतमधील मराठीत भाषांतर करून छापण्याचा आदेश दिला. जैन साहित्याची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली. आदेश शिरसावंद्य मानून कार्यास प्रारंभ केला. प्राध्यापक डॉ. मयूरा मोतीचंद शहा यांनी अतिशय सुंदर भावपूर्ण मराठी अनुवाद झटकन करून दिला. पण, हे कार्य पूर्ण होण्याचा योग तब्बल ६ वर्षांनी आला आहे. या दिरंगाईबद्दल आम्ही दिलगीर आहोत. या पुस्तकात आचार्यश्रींच्या चित्रमय आठवणींचा समावेश करण्याचे ठरले. त्याप्रमाणे, जैनबाधक-तीर्थंकर मासिकांमध्ये आवाहन केले. त्यास अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. महाराजांच्या आठवणींचे भांडार उपलब्ध झाले. आम्ही सर्व श्रावकश्राविकांचे अत्यंत ऋणी आहोत.

यामध्ये खालील व्यक्तींचा विशेष उल्लेख करण्यास मला अत्यंत आनंद होतो आहे. समाजातील दातारांनी अगदी मुक्तमनाने व मुक्तहस्ते या धार्मिक ग्रंथ प्रकाशन कार्यास हातभार लावला आहे.

आमच्या आवाहनास प्रतिसाद देणारे-

(१) श्री. पी.व्ही. चवरे, अंजनगाव, सुर्जी जिल्हा अकोला यांनी जैनबोधकचे जुने अंक पाठवून अतिशय मोलाची माहिती पाठवली.

स्वर्गवासी श्रीमती चारुशीला आनंदलाल दोशी व त्यांचे चिरंजीव संतोष दोशी यांनी मधुबन मळा, बार्शी येथील आचार्यश्रींच्या वास्तव्याचे फोटो दिले. श्री. अरविंद शहा वडुजकर, फलटण यांनी तेथील मंदिरातील हीरक महोत्सव व मुंबई विहाराचे दुर्मीळ फोटो मिळवून दिले. तसेच डॉ. जवाहर प्रेमचंद गांधी,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

फलटण यांनी शांतिसागर म्युझियममधील पेंटिंग्जचे फोटो दिले. सोलापूर येथे आचार्यश्रींचा १९४७-४८ मध्ये चातुर्मास झाला होता. त्या वेळी शेठ मोतीचंद रेवचंद गांधी संघपती होते. महाराजांचा मुक्काम सतत १३ महिने सोलापुरात होता. त्या वेळचे फोटो त्यांचे चिरंजीव शेठ किरण मोतीचंद गांधी यांनी दिले. तसेच आचार्यश्रींचे परमभक्त व सातत्याने सेवा करणारे शेठ गुलाबचंद सखाराम गांधी साखरवाले-सोलापूर यांचे नातू श्री. अरविंद कस्तुरचंद गांधी यांनी फोटोंचा खजिना मिळवून दिला.

शेठ अरविंद रावजी दोशी यांनी शिखरजी विहार, ब्यावर चातुर्मास व महाराजांची दोन बहुमूल्य रंगचित्रे, पेंटिंग्जचे फोटो दिले. तसेच सल्लेखनावेळचे अंत्यसंस्कारांचे दुर्मीळ फोटो-ज्यामध्ये त्यांच्या मातोश्री श्रीमती राजूबाई दोशी व त्यांच्या भाभी व भगिनी - इ. अंत्यसंस्कार करतानाचे फोटो पुरवले.

या अंत्यसंस्कारांवेळी व सल्लेखनेपासून आचार्य विद्यानंद महाराजांची कुंथलगिरी येथे उपस्थिती होती. त्या वेळी ते क्षुल्लक पार्श्वकीर्ती होते. ते एकमेव मुनी आज आहेत; ज्यांनी हा सल्लेखना सोहळा पाहिला व त्यानीच आम्हास हा अनुवादाचा आदेश दिला. आम्ही सर्वजण अत्यंत भाग्यवान आहोत.

यानिमित्त संपूर्ण महाराष्ट्र-कर्नाटक भागांतील अनेक श्रावकश्राविकांना भेटण्याची व संवाद साधण्याची संधी मिळाली नि धार्मिक कार्य करता आले, याचा आनंद वर्णनातीत आहे.

या तीन ग्रंथांचे प्रकाशन करण्याचे बहुमूल्य कर्तव्य व कार्य स्वतः आर्थिक झळ सोसूनही सुमेरु प्रकाशन संस्थेचे श्री. श्रेणिक अन्नदाते व त्यांचे चिरंजीव ऋषभराज अन्नदाते यांनी पार पाडले. त्याबाबत, त्यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. आचार्य समंतभद्र यांचा एक संदेश आठवतो -

'न धर्मो धार्मिकैर्विना.'

जय जिनेंद्र!

- चंद्रमोहन रतनचंद शहा

भ्रमणध्वनी : ९४२३३३५३००

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्राक्कथन

शुक्रवार, दि. २३ एप्रिल, २०१०च्या संध्याकाळी दिल्लीहून फोन आला की, आचार्य कुंथुसागर विरचितम् 'आचार्यश्रीशान्तिसागरचरितम्' या संस्कृत काव्यात्मक रचनेचा मराठीत अनुवाद करायचा आहे, असा आचार्यश्री विद्यानंद महाराजांचा आदेश आहे. श्री. शरदचंद्र गांधी आणि श्री. चंद्रमोहन शहा फोनवर बोलत होते. आम्ही येताना ग्रंथ घेऊन येत आहोत. आ. शांतिसागर महाराजांच्या जीवनचरित्राचा अनुवाद करायचा... मला खूपखूप आनंद झाला. आ. शांतिसागर महाराज आणि आचार्य विद्यानंद महाराज दोन्हीही अत्यंत श्रेष्ठ त्यागी, असामान्य असून परमश्रद्धेय व्यक्तिमत्त्वे! यात एका आचार्यांच्या चरित्राचा अनुवाद आणि दुसऱ्या आचार्यांचा आदेश... मी ही संधी डावलू इच्छित नव्हते; कारण ही दोन्हीही व्यक्तिमत्त्वे सदैव प्रणम्य अशीच आहेत.

फोनवर बोलून झाले खरे; पण तत्क्षणी चारित्र चक्रवर्तींचे आदर्श जीवन, त्यांचे चातुर्मास, जीवनात घडलेले अनेक प्रसंग, उपसर्ग, धर्म प्रभावना, अहिंसा धर्माचा प्रसार, जनजागृती आणि अखेर श्री सिद्धक्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखनापूर्वक समाधी साधना, बालपणात अनेक वेळा मिळालेले दर्शन, काही ठिकाणच्या चातुर्मासांत लाभलेले सान्निध्य, सल्लेखनेच्या वेळी जवळपास २० दिवसांत जवळून पाहायला मिळालेली चर्या, त्यांचा मृत्युमहोत्सव.... सर्व काही क्षणात स्मृतिपटलावर तरळून गेले. ती रचना कधी पाहीन, कधी वाचेन आणि अनुवाद करेन, असे मला होऊन गेले.

एप्रिलच्या २८ तारखेला 'शान्तिसागर चरित्रम्' माझ्या हातात आलं. मी एका दिवसातच संस्कृत श्लोकांसहित हिंदी अनुवाद वाचून काढला आणि दुसऱ्या दिवसापासून अनुवाद करायला सुरुवात केली. १६० पानांची ही रचना! अवघ्या सहा दिवसांत याचा अनुवाद करून झाला. अनुवाद करीत असता मन सारखेच भूतकाळात अवगाहन करीत होते.

वास्तविक, ग्रंथाचे बहिरंग आणि अंतरंग दोन्हीही आकर्षक असून मनाचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ठाव घेणारे आहे. पुढे काय, याची जिज्ञासा सतत टिकून राहते.

या ग्रंथात एकूण चार अध्याय आहेत. या चारही अध्यायांतून भारतवर्षात चारही दिशांना झालेल्या चारित्र–चक्रवर्तींच्या विहाराचे सुंदर वर्णन आहे. ते वाचत असता आपण प्रत्यक्ष ते दृश्य पाहात आहोत, असेच वाटते. ललित संस्कृतमध्ये काव्यात्मक स्वरूपात लिहिले गेलेले हे एकमेव चरित्र आहे. तशी आचार्यश्रींच्या जीवनावर लिहिलेली अनेक गद्यात्मक चरित्रे आहेत; पण ही रचना आगळीवेगळी आहे. यात आचार्यश्रींच्या घराण्याचे, पूर्वजांचे तसेच त्यांच्या जन्मापासूनचे सर्व वर्णन आहे. बालपणापासूनच विरागी वृत्ती, त्यागी सेवारत, स्वाध्यायाची रुची; त्यासाठी रोज कित्येक मैल चालत जाऊन स्वाध्याय करणे, धर्मग्रंथांचे शिक्षण घेणे इत्यादींचे वर्णन आहे. नंतर विधिवत क्षुल्लक, ऐलक, दिगंबर दीक्षा.. तीर्थवंदना... आणि श्रवणबेळगोळ येथे आपल्या दीक्षागुरूंनाच पुनर्दीक्षा देण्याची अभूतपूर्व घटना इत्यादी अनेक घटनांचे वर्णन आहे. भक्तसंग्रहही प्रचंड होता.

एकूण ही रचना अप्रतिम आहे. यात आ. कुंथुसागर महाराजांच्या अनुपम प्रतिभेची झलक मिळते. त्यांची विद्वत्ता, पांडित्य, गुरुविषयीची परमश्रद्धा, भक्तीची प्रचीती येते. त्यांचे संस्कृत भाषेवर असलेले प्रभुत्व जाणवल्याशिवाय राहत नाही. संस्कृत भाषेत काव्यातून गुरुचरित्र रचण्याची कल्पनाच अफलातून आहे. उत्तरार्धही लिहिला गेला असता तर ही रचना परिपूर्ण झाली असती.

वास्तविक, यात आचार्यश्रींच्या जीवनाचा बहुतांश भाग वर्णित आहे. कारण, या ग्रंथाचे रचयिता आ. कुंथुसागर हे सतत आचार्यांच्या बरोबर होते. सर्व जीवन, मुनिचर्या त्यांनी जवळून पाहिलेली. त्यामुळे विहाराचे यथार्थ चित्रण झालेले आहे. पण, वयाच्या एकावन्नाव्या वर्षी विहार करीत असता कुंथुसागराच्या पायात विषारी काटा टोचून दुखापत झाली. त्यावर, औषधोपचारही खूप केले गेले. पण, काही उपयोग झाला नाही आणि त्यांचे धरियावद (राजस्थान) मध्ये समाधिपूर्वक निधन झाले. त्यामुळे संस्कृतमधून उत्तरार्ध अक्षरांकित होऊ शकला नाही.

अनुवाद करून पूर्ण झाल्यानंतर त्यात काही उणिवा, तुटी राहू नयेत म्हणून गांधी नाथारंगजी दि. जैन बोर्डिंगचे विश्वस्त तसेच विद्यानंद सहकारी बँकेचे संस्थापक व विद्यमान अध्यक्ष श्री. शरदचंद्र गांधी, श्री. चंद्रमोहन शहा – सल्लागार महाराष्ट्र जैन इतिहास परिषद – सोलापूर, प्रा. डॉ. राजेंद्र बीडकर, बँकेचे संचालक श्री. सूर्यकांत शहा व श्री. रवींद्र कटके यांनी एकाच बैठकीत सामुदायिक वाचन केले.

चारित्र चक्रवर्तींची ही संस्कृत रचना सर्वांनी वाचावी, अशीच आहे. मला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

याचा अनुवाद करण्याची संधी आचार्य श्री विद्यानंद मुनिश्रींकडून मिळाली आणि त्यांच्याच प्रेरणात्मक मंगल आशीर्वादाने ती लवकरच अनुवादितही झाली. कोणत्या शब्दांत कृतज्ञता व्यक्त करावी, हेच समजेनासे झाले आहे. असाच अनुग्रह माझ्यावर असावा, आशीर्वाद असावेत, हीच भावना!

अनुवादिका
– प्रा. डॉ. मयूरा मोतीचंद शहा,
सोलापूर
भ्रमणध्वनी : ९४२३५८७०५४

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परमपूज्य युगपुरुष आचार्य शांतिसागर

परमपूज्य प्रात:स्मरणीय आचार्यश्री शांतिसागर महाराज एक थोर, युगप्रवर्तक आचार्य जैनांच्या आचार्य परंपरेत होऊन गेले. त्यांनी भारतभर विहार करून जिनधर्म प्रभावना तर केलीच; पण जैनांनाच त्यांची स्वत:ची 'जैन' म्हणून ओळख करविली.

त्यांच्या जीवन आणि प्रभावना-कार्यावर विविध साहित्यनिर्मितीही झाली. त्यातीलच एक कृती म्हणजे कुंथुसागर विरचित संस्कृत भाषेतील हे दुर्मीळ चरित्र!

या चरित्राचे वैशिष्ट्य असे की, त्याचे रचयिता मुनी कुंथुसागर त्यांच्या संघातच होते. आचार्यांनीच त्यांना दीक्षा दिली होती. त्यामुळे हे चरित्र प्रत्यक्षदर्शी आणि अनुभवी व्यक्तीकडून लिहिले गेले आहे. त्यांनी ४० लहान-मोठे ग्रंथ रचले आहेत. या संस्कृत चरित्राला पंडित श्री नीरज जैन यांची विस्तृत प्रस्तावना असून त्यातही आचार्यांच्या प्रभावना-कार्याची महती प्रतिपादित केली आहे.

आचार्यश्री शांतिसागर हे स्वयंसिद्ध जैनाचार्य होते. त्यांच्या पूर्वी मुनिपरंपरा जवळजवळ खंडित झालेली. आचार्यांनी ती नितांत योजनापूर्वक, आगमांच्या अभ्यासानुसार, शास्त्रोक्त पद्धतीने स्वत:च्या सर्वांगीण विचरणातून यथोचित रूपाने पुनश्च सुरू केली.

त्यांचा काळ जसा ब्रिटिश राजवटीचा तसेच संस्थानिकांच्या राजवटीचाही होता. म्हणूनच, त्यांच्या विहाराच्या वेळी काही संस्थानांत त्यांना विरोध झाला; तर काही संस्थानांतून त्यांचा विहार निर्बाध झाला.

या चरित्रात त्यांच्या विहाराची संक्षिप्त माहिती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ठिकठिकाणच्या चातुर्मासासहित दिली असून तिला जैन समाजाच्या दृष्टीने ऐतिहासिक महत्त्व आहे. त्यांचा संघ हळूहळू कसा वृद्धिंगत होत गेला, याचाही वृत्तान्त या चरित्रात आला आहे. मुनिसंघाची तीर्थवंदना आणि ती घडविणारे मुनिभक्त 'संघपती' ही संकल्पनाही त्यांच्याच विहारातून दृढतर होत गेली आणि श्रावक जीवनाला दिशादर्शक ठरली.

या छोट्याशा चरित्रातूनही आचार्यांच्या महान प्रभावना-कार्याची आणि जीवनचरित्राची उत्तम जाणीव होते. जैन समाजाची श्रद्धा, निष्ठा, मुनिवर्यांबद्दलचा नितांत आदर आणि गावागावांची ओझरती ओळखही होते. भारतंभर पसरलेल्या जैन समाजाच्या अस्तित्वाची जाणीवही यातून नकळत होते.

या संस्कृत चरित्राच्या हिंदी अनुवादावरून हा मराठी अनुवाद केला आहे. त्यामुळे ही रचना मराठी वाचकांच्या हाती पोहोचत आहे. अनुवादक डॉ.प्रा. मयूरा शहा आणि संयोजक श्रमण जैन ग्रंथ प्रकाशन समिती, सोलापूर यांना आमचे शुभाशीर्वाद!

– मुनी विद्यानंद
कुंदकुंद भारती, नवी दिल्ली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री शान्तिसागराय नमः

आचार्यश्री कुंथुसागरविरचितम्

आचार्यश्रीशान्तिसागरस्तोत्र

श्रेष्ठजातिकुलोत्पन्नो निर्ग्रन्थो दोषदूरगः ।
स्वान्तर्लीनः सदानन्दो दशधर्मपरायणः ।।१।।
स्वाध्यायध्यानधर्मेषु भव्यानां स्थितिकारकः ।
प्रभावनविधौ दक्षः सर्वेषां दुःखहारकः ।।२।।
निःशल्यो निर्मदः शान्तो जीवानां प्रतिपालकः ।
निन्दास्तुतौ वियोगे च समतारसतत्परः ।।३।।
षट्त्रिंशत्सुगुणैर्युक्तो मुनिवृन्दनमस्कृतः ।
द्रव्यक्षेत्रानुसारेण प्रायश्चित्तविधायकः ।।४।।
सदाधीरः क्षमावीरो दयालुर्भक्तवत्सलः ।
शान्तिसिन्धुर्दयामूर्तिस्तत्त्वज्ञानपरायणः ।।५।।
पूतात्मा सकलैः पूज्यः स्तुत्यात्मा योगतत्परः ।
मुनीनां श्रावकाणां च चारित्रप्रविधायकः ।।६।।
येन स्वस्य विहारेण सर्वे विघ्नाः शमीकृताः ।
अत एव सदा वन्द्य आचार्यः शान्तिसागरः ।।७।।
तस्याचार्यस्य शिष्येण कुन्थुसागरयोगिना ।
भवबीजविनाशाय स्तोत्रमेतत्कृतं मया ।।८।।
भवभीतिविनाशाय लब्धुं शान्ति सुखं तथा ।
इदं स्तोत्रं पठेन्नित्यं श्रद्धाभक्तिसमन्वितम् ।।९।।

अर्थ : जे चारित्र चक्रवर्ती शांतिसागर स्वामी श्रेष्ठ जाती आणि श्रेष्ठ कुलामध्ये उत्पन्न झाले आहेत. २४ प्रकारच्या परिग्रहांनी रहित आहेत. समस्त दोषांनी रहित आहेत. आपल्या आत्म्यात लीन आहेत. आत्म्यातून उत्पन्न होणाऱ्या आनंदामध्ये सदैव मग्न आहेत. आत्मानंदातच सदैव आहेत. उत्तम

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

क्षमा आदी दशधर्मांचे पालन करण्यामध्ये ते सदा तत्पर आहेत. भव्य जीवांना स्वाध्याय, ध्यान, धर्मामध्ये स्थिर करणारे आहेत. जैन धर्माची प्रभावना करण्यात ते अत्यंत निपुण आहेत. सर्व जीवांचे दुःख दूर करणारे आहेत. अत्यंत शांत आहेत. समस्त, सर्व जीवांचे रक्षण करणारे आहेत. निंदा-स्तुती व संयोग-वियोगामध्ये सदा समता रसात लीन राहतात. ते आचार्यांमध्ये असणाऱ्या ३६ गुणांनी सुशोभित आहेत. समस्त मुनींचा संघ ज्यांना नमस्कार करतो. ते द्रव्य-क्षेत्र-काल-भावानुसार प्रायश्चित देतात, ते धीर-वीर आहेत. जे क्षमा धारण करण्यात शूर-वीर आहेत, जे दयाळू आहेत, भक्तांवर प्रेम करणारे आहेत आणि शांतीचे समुद्र आहेत. ते दयेची मूर्ती आहेत. सर्व लोक त्यांची पूजा करतात. त्यांचा आत्मा स्तुती करण्यायोग्य आहे. ते ध्यानधारणा करण्यास सदैव तत्पर असतात. ते मुनी आणि श्रावकांचे चरित्र निरूपण करतात आणि भारतवर्षात सर्वत्र विहार करीत सदैव निर्ग्रंथ दिगंबर मुनींच्या सर्व गुणांच्या कारणाने सदैव वंदनीय आहेत. अशा शान्तिसागरांचा शिष्य मी कुंथुसागर मुनींने आपल्या जन्म-मरणरूप संसाराच्या समस्त, सर्व कारणांना नष्ट करण्यासाठी ही आचार्य शांतिसागरांची स्तुती केली आहे.

सांसारिक बंधनातून मुक्त होण्यासाठी तसेच सुख-शांतीच्या प्राप्तीसाठी या स्तोत्राचे श्रद्धा-भक्तिपूर्वक नियमित पठण करायला पाहिजे.

– मुनी कुंथुसागर
पूर्वनाम – रामचंद्र
जन्म – ऐनापूर
समाधि – धरियावद, राजस्थान

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

।। श्री गुरुवे नमः ।।

धम्मो मंगलमुक्किट्ठं अहिंसा संजमो तवो ।
देवा वि तं पणमंति, जस्स धम्मे सया मणो ।।

(जयधवल आणि प्रतिक्रमण सूत्र, पृ.२६०)

धर्म परममंगल आणि उत्कृष्ट आहे. कोणता धर्म ? अहिंसा धर्म, संयम धर्म व तपरूप धर्म! ज्या भव्यात्म्याचे मन उक्त धर्मामध्ये नेहमी तल्लीन राहते, त्याला देवतासुद्धा नमस्कार करतात.

संसारसागरामध्ये परिभ्रमण करणाऱ्या जीवांना मुक्तीचा पथ दाखवणारे, परम उत्कृष्ट मंगलरूप असा धर्म सांगणारे तीर्थंकर भगवान आता या पंचमकालामध्ये नाहीत. तेव्हा, धर्माचे स्वरूप जाणण्यासाठी श्रावक साधू–परमश्रेष्ठीच्या रूपामध्ये मुनिवरांकडेच पाहतो. तेच आम्हाला शरण्य आहेत. आम्हाला आत्मस्वरूपाच्या चिंतनाकडे प्रवृत्त करून तेच प्रशस्त पथ आलोकित करतात. आम्हाला पथ–प्रदर्शन करतात आणि स्मरण करून देतात की – "तीन लोक का नाथ तू, क्यों बन रहा अनाथ । रत्नत्रय निधि साथ ले, क्यों न होय जगनाथ ।।" म्हणून, आत्म्याचे हे आध्यात्मिक ज्ञान प्रदान करून मनःचक्षूंवर पडलेल्या अज्ञानाच्या गहन अंधकाराला दूर करणाऱ्या त्या गुरूंना मी नमस्कार करतो.

अज्ञानतिमिरान्धानां ज्ञानाञ्जनशलाकया ।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्री गुरवै नमः ।।

जैन मुनींचा (गुरूंचा) महिमा लोक–प्रसिद्ध आहे. त्यांची ज्ञान–क्षमता, वक्तृत्वशैली, लोकमान्यता आदींचे पुरावे अनेक ठिकाणी प्राप्त होत राहिले आहेत. महाज्ञानी आचार्य कुंदकुंद, आचार्य समंतभद्र, आचार्य पूज्यपाद, देवनंदी, आचार्य सिद्धसेन, आचार्य अकलंकदेव, आचार्य विद्यानंद स्वामी, आचार्य नेमिचंद सिद्धान्तचक्रवर्ती इत्यादी आचार्यांची एक यशस्वी परंपरा आहे. या परंपरेने संपूर्ण युगाला श्रामण्याच्या गौरवाने / वैभवाने प्रभावित केले आहे. एका

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रमाणानुसार (विक्रमचरित्र, ज्योतिर्विदाभरणम् १०) तर सम्राट विक्रमादित्याच्या ब्रह्म संसदेमध्येसुद्धा नग्न दिगंबर मुनींच्या उपस्थितीचा उल्लेख प्राप्त होतो आहे.

धन्वतरी–क्षपणकामरसिंह–शंकु–वेतालभट्ट–घटखर्पर–कालिदासा:।
ख्यातो वराहमिहिरो नृपते: सभायां, रत्नानि वै वररुचिर्नव विक्रमस्य ।।

धन्वतरी, क्षपणक (दिगंबर मुनी), अमरसिंह, शंकू, वेतालभट्ट, घटखर्पर, कालिदास, वराहमिहिर आणि वररुची – हे महानुभाव राजा विक्रमादित्याच्या 'ब्रह्म–संसदे' (ब्रह्म परिषद) मधील नवरत्ने म्हणून प्रसिद्ध होते. विद्वानांची मान्यता आहे की, यामध्ये 'क्षपणक' शब्द आचार्य सिद्धसेननामक दिगंबर जैन मुनींसाठी प्रयुक्त केला आहे. सम्राट विक्रमादित्याने आध्यात्मिक मार्गदर्शनासाठी त्यांना आपल्या 'ब्रह्म–संसदे'मध्ये विनयपूर्वक सामावून घेतले होते. सर्व शास्त्रींनी, विद्वानांनी तसेच कोशकारांनी 'क्षपणक' शब्दाचा अर्थ दिगंबर जैन मुनीच केला आहे.

अशा दिगंबर जैन श्रमणांची परंपरा वर्तमानकालामध्येही प्रवर्तमान आहे, सुरू आहे आणि याचे श्रेय आहे चारित्र चक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांना! एक वेळ अशी आली होती की, जेव्हा कितीतरी शतकांपर्यंत काल–प्रभावाने दिगंबर मुनींचे दर्शन दुर्लभ झाले होते. तेव्हा, आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांनीही विसाव्या शतकामध्ये या आर्ष परंपरेला पुनरुज्जीवित केले.

हा संस्कृतमधील प्रकाशित ग्रंथ चारित्र चक्रवर्ती 'आचार्यश्री शांतिसागर चरित्रम्' त्यांचेच मेधावी शिष्य आचार्यश्री कुंथुसागरजी महाराजाद्वारे विरचित आहे. ग्रंथ चार अध्यायांमध्ये विभाजित आहे. प्रत्येक अध्याय एका दिशेकडे निर्देश करीत आहे. त्याच्यामध्ये गुरुवरांद्वारे त्या दिशेकडील नगरांची, उपनगरांची, तीर्थांची यात्रा तसेच तेथे झालेल्या धर्म–प्रभावनांचा वृत्तांत आहे. प्रथम अध्याय दक्षिण–क्षेत्रांशी संबंधित आहे. ज्यामध्ये आचार्यश्रींच्या बालजीवनापासून ते वैराग्यापर्यंतचे आणि श्रमण–साधकाचे हृदयंगम वर्णन आहे. शुद्ध आत्मस्वरूपाचा शोध घेत असता एका बालसूर्यामध्ये साधनेची किरणे अधिक तेजस्वी होत गेली. क्षुल्लकापासून मुनिपद व आचार्यपदापर्यंतचा वृत्तान्त यामध्ये आहे. यामध्येच कोण्णूर (कर्नाटक) मध्ये घडलेल्या त्या घटनेचे वर्णन आहे की, जे आचार्यश्रींच्या उत्कृष्ट तपाचे प्रमाण आहे, परिचय देणारे आहे.

मुनिवर एका गुंफेमध्ये ध्यानावस्थेत होते. एका सर्पाने त्यांच्या देहाला विळखा घातला. ते मेरूसमान निश्चल ध्यानरत राहिले. नंतर, सर्प स्वत:च निघून गेला आणि योगी ध्यानमग्नच राहिले.

अशा प्रकारे दुसऱ्या अध्यायामध्ये तीर्थराज श्री सम्मेदशिखरजीच्या यात्रेचे वर्णन आहे. तेथे त्यांच्या सान्निध्यात भव्य पंच–कल्याणक प्रतिष्ठा झाली. तिसरा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अध्याय उत्तर दिशेला असलेल्या सोनागिरी वगैरे क्षेत्रांच्या वंदनेसंबंधी आहे. याच विहारात मथुरेतील भव्य रथोत्सव, दिल्लीतील चातुर्मास, श्री महावीरजी अतिशय क्षेत्र व जयपूर इत्यादींच्या यात्रेचे वर्णन आहे. चौथ्या अध्यायामध्ये पश्चिम भारतामध्ये आचार्यश्रींद्वारा धर्म प्रभावनेचा उल्लेख आहे.

अशा प्रकारे चारही दिशा आचार्यश्रींद्वारा केलेल्या धर्म प्रभावनेच्या यशाने व्याप्त आहेत. संपूर्ण यात्रेमध्ये हजारो लोकांनी व्रत-नियम ग्रहण करून आत्मकल्याणाचा मार्ग स्वीकारला. यामुळे पूर्ण देशात श्रमण-संस्कृती एका सूत्रात बांधली गेली. आचार्यश्रींचे हे जीवन जितके महान राहिले; त्याच प्रकारे त्यांचे महाप्रयाणही अत्यंत गरिमामय, वैभवशाली झाले. कुंथलगिरीमध्ये गुरुदेवांनी यमसल्लेखना घेऊन महान योग्याचा आदर्श प्रस्तुत केला.

आचार्यश्रींचे हे संपूर्ण जीवनवृत्त जर जगाला कषाय, शिथिलाचार व भौतिक प्रदूषणांपासून किंचित जरी मुक्त करू शकले; तर निश्चितच या प्रकाशनाचे सार्थक सिद्ध होईल. अखेर, कालजयी चारित्र चक्रवर्ती, पूज्य आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांच्या चरणी विनयांजली.

तीन काल के जिनवरा, तीन काल के सिद्ध ।
तीन काल के मुनिवरा, वन्दूं लोक प्रसिद्ध ।।

जोपर्यंत अशा वाग्मी श्रमणांचे गुणगान होत राहील; तोपर्यंत धर्म प्रभावना होत राहील. त्या महान योगिराज चारित्र चक्रवर्ती आचार्यश्रींची १३१ वी जन्म-जयंती (२००४) देशभरात 'संयम-वर्ष' म्हणून सिद्धान्तचक्रवर्ती आचार्यश्री विद्यानंदजी मुनिराजांच्या प्रेरणेने धर्म-प्रभावनापूर्वक साजरी केली आहे. भारतीय ज्ञानपीठ या प्रसंगी या महान आध्यात्मिक साधकाचे जीवनवृत्त प्रकाशित करीत असता स्वत:ला धन्य मानत आहे. गौरवान्वित अनुभव करीत आहे. हे प्रकाशनसुद्धा पू. आचार्यश्री विद्यानंदजी मुनिराजांच्या मंगल-आशीर्वादाचे सुफल आहे.

गुरुभक्त श्री. नीरज जैन यांनी या ग्रंथाच्या संयोजनेमध्ये काही उपयोगी सूचना दिल्या आणि प्रस्तावना लिहून ग्रंथाचे हृदय, अंतरंग स्पष्ट केले. त्यामुळे ते धन्यवादास पात्र आहेत. ग्रंथाचे संपादक प्रो. रमेशकुमार पांड्ये यांनी ग्रंथाच्या शुद्ध मुद्रणादीसाठी खूप परिश्रम घेतले. त्यांच्याविषयीही आभार प्रकट करतो.

चातुर्मास स्थापना दिवस - १ जुलै २००४, रविवार

– साहू रमेशचंद्र जैन
प्रबंध न्यासी
भारतीय ज्ञानपीठ, नवी दिल्ली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रस्तावना

युग–संस्थापक, प्रथम दिगंबर आचार्य
चारित्र चक्रवर्ती श्री शान्तिसागर महाराज

अंतिम तीर्थंकर भगवान महावीरांच्या निर्वाणानंतर केवली भगवंतांची परंपरा १०० वर्षेच चालू राहिली. त्यानंतर, ६२ वर्षांमध्ये श्रुतकेवलींची परंपरासुद्धा संपुष्टात आली. श्रुत–शास्त्र नष्ट होण्याची चिन्हे दिसू लागली; तेव्हा आमच्या काही दूरदर्शी आचार्यांनी जिनवाणीला, सूत्ररचनेच्या माध्यमातून पुस्तकारूढ, अक्षरबद्ध करण्याचा प्रयत्न केला. गिरीनगरच्या गुंफेमध्ये विराजमान श्री धरसेनाचार्य आणि त्यांचे शिष्य भूतबली–पुष्पदंत स्वामींचे या प्रयत्नामध्ये विशेष योगदान आहे, विशेष महत्त्व आहे.

या मधल्या काही अवधीमध्ये काळाच्या दुष्प्रभावाने उत्तर भारतात दिवसेंदिवस धर्मपालन करणे कठीण होत गेले. राजसत्तेकडून मिळणारी संरक्षणाची छायासुद्धा जैन धर्मावरून कमीकमी होत गेली. म्हणजेच, जैन धर्माला असणारा राज्याश्रय कमी झाला. नंद, शुंग आणि कुषाण आदी त्या वेळचे प्रभावशाली राजवंश कोणत्याही धर्माचे अनुयायी किंवा संरक्षक असतीलही, पण जैन धर्माला विरोध करणे, हा त्या सर्वांनी सर्वश्रेष्ठ धर्म मानला.

वास्तविक, उडिसा / ओरिसामध्ये महामेघवाहन ऐल सम्राट खारवेल, तसेच मगधामध्ये सम्राट चंद्रगुप्त मौर्याने महावीरांच्या लोकहितकारी धर्माची कीर्ती देशाच्या सीमेबाहेरही पसरवली. पण, त्यांच्यानंतर देशाचे वातावरण पुन्हा दूषित झाले. आपला धर्म पाळण्यासाठी लोक दुसऱ्या धर्माच्या लोकांवर तऱ्हेतऱ्हेचे अत्याचार करू लागले. धार्मिक असहिष्णुतेचा जो नंगानाच त्या काळात झाला; त्यात सर्वात जास्त हानी जैन धर्माची झाली. दिगंबर मुनींना अग्नीमध्ये फेकणे किंवा घाण्यामध्ये पिळून काढणे, हे पुण्यकार्य मानले जाऊ लागले. परंतु, जैन धर्माचा संपूर्ण नाश होऊच शकणार नव्हता. आत्मोत्थानाची ही प्राचीन संस्कृती काही नि:सत्त्व वृक्ष नाही की, जी वादळवाऱ्याच्या तडाख्याने समूळ नष्ट होईल, तुटून पडेल. ही तर दुर्वाच्या कोमल तंतूसारखी सहनशील आणि सहिष्णू संस्कृती आहे. ती संकटकाळी दबली जाते; पण कोलमडत नाही, तुटत नाही. हिची

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुळे सुकत नाहीत; कारण असे की हिला दीर्घकालापर्यंत विद्यमान राहण्याचे वरदान लाभलेले आहे.

जैन संस्कृतीचे हे सौभाग्य म्हणावे लागेल की, घनघोर संकटकाळातही तिची संकल्पशील आणि आत्मबलिदानी आचार्यांची परंपरा अविरत चालूच राहिली. याच आस्थावान आचार्यांच्या त्याग-तपस्येच्या परिणामस्वरूप ही संस्कृती इसवीसनाच्या प्रारंभिक शतकापर्यंत 'श्रुत' वेलीच्या रूपाने गुरुशिष्य परंपरेच्या माध्यमातून सुरक्षित राहिली होती. यामध्येच तिला फुले-फळे येऊ लागली होती. पूज्यश्री आचार्य कुंदकुंद, आचार्य उमास्वामी आणि समंतभद्राचार्य तसेच त्यांच्यानंतर शेकडो महामुनींनी आपली दुर्धर साधना, तीक्ष्ण बुद्धिमत्ता आणि अमीट प्रभावाने पुन्हा एकदा जिनधर्माची ध्वचा उंचउंच फडकावण्याचा गौरवपूर्ण पुरुषार्थ केला. त्या वंदनीय संतांचे सदाचरण तसेच सदुपदेशामुळे या काळात धर्मोत्थानाचे अथक प्रयत्न झाले. श्रुतसंपदेला समृद्धीकडे अग्रेसर करण्याचे सुविचारित अभियान शतकानुशतके चालत राहिले. इसवीसनाच्या पहिल्या शतकापासून ते दहाव्या शतकापर्यंतचा काळ जैन धर्मासाठी बराचसा अनुकूल काळ म्हणवला जाऊ शकतो.

भगवान महावीरांचे दिव्य अवदान, दिव्य देशना सविस्तर लिपीबद्ध करून सुरक्षित करणारे आचार्य पूज्यपाद, यतिवृषभाचार्य, अकलंकदेव, वीरसेन स्वामी, जिनसेनाचार्य, गुणभद्राचार्य, आचार्य विद्यानंदी, अमृतचंद्राचार्य तसेच जयसेनाचार्यांसारखे शेकडो दिगंबर आचार्य या काळामध्ये झाले. जैन विचारपद्धतीची विराटता, विशालता आणि वैशिष्ट्यांना रेखांकित करणाऱ्या 'धवल' ग्रंथांसहित न्याय, व्याकरण आणि सिद्धान्तांचे अनेक महान ग्रंथ या काळात रचले गेले. पुराणांची रचना झाली. वेरूळ (एलोरा), ऐहोल आणि बदामी यासारखी गुंफा-मंदिरे, खजुराहो, देवगढ, अहार यासारखी गगनचुंबी शिखरे असणारी कलात्मक जिनालये आणि कुंडलपूरचे बडेबाबा, श्रवणबेळगोळचे गोम्मटस्वामी तसेच जागोजागी शांतिनाथ आणि पार्श्वप्रभूंच्या मनोहारी विशाल मूर्तींची निर्मितीही याच काळात झाली. आमच्या श्रद्धा आणि भक्तीने, प्रत्येक शतकामध्ये अन्यांद्वारे झालेल्या विध्वंसापेक्षा निर्माणच आम्ही अधिक केले आणि याच आधारावर आम्ही जिवंत राहिलो. आमचे श्रुतशास्त्र विच्छिन्न झाले नाही आणि आमची देवायतने विद्यमान राहिली. उणीअधिक क्षतिग्रस्त होऊनही अस्तित्वात राहिली.

दहाव्या शताब्दीनंतर जैन धर्माचा प्रभाव हळूहळू कमी होऊ लागला. मोगलांच्या आगमनानंतर सर्वत्र, खासकरून उत्तर भारतामध्ये धर्माची खूपच हानी झाली आणि धार्मिक व्यक्तींना जगणेसुद्धा कठीण होत गेले. तेराव्या-चौदाव्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शतकापर्यंत पोहोचेतो उत्तर भारतामध्ये दिगंबर मुनींचा विहार फक्त पुराणकथांमध्येच शिल्लक राहिला. त्यांचे प्रत्यक्ष दर्शन दुर्लभ झाले. दक्षिणेमध्ये इकडे-तिकडे मुनींचे अस्तित्व तुरळक असल्याचे ऐकिवात होते.

भट्टारक परंपरा आणि त्यांचे योगदान

जैन धर्मावर आलेल्या या आपत्तीच्या / संकटाच्या घटनांमध्ये भट्टारकांचा वर्ग प्रभावीपणे समोर आला. दक्षिणेमध्ये तर त्यांची परंपरा होतीच; उत्तर भारतामध्येही चारपाचशे वर्षांपर्यंत जैन धर्माची सूत्रे, धुरा भट्टारकांच्या हातामध्येच होती. यामध्ये धार्मिक परंपरांचे जतन, मंदिरांची निर्मिती, मूर्तींची प्रतिष्ठा तसेच ग्रंथांचे लेखन आणि संरक्षण भट्टारकांमुळेच झाले. वीतरागी गुरूंच्या अभावामुळे भट्टारकांनी त्या विपत्कालामध्ये वीतरागतेच्या वैकल्पिक रूपामध्ये धर्मानुरागाला श्रेष्ठता दिली.

भट्टारकगण जिनशासनाच्या संरक्षणासाठी आणि प्रभावनेसाठी कृत संकल्प असायचे, तत्पर असायचे. राजा आणि प्रजेला धर्माने प्रभावित करण्यासाठी औषधी, तंत्र-मंत्र आणि चमत्कार, जो उपाय जेथे आवश्यक वाटायचा; तेथे त्या उपायांचा त्यांनी भरपूर उपयोग केला. यासाठी कोठे-कोठे साम-दाम-दंड-भेद यांचाही आधार घ्यावा लागला. वास्तविक, हे सर्व भट्टारकांनी धर्म प्रभावनेसाठी केले. यामागे त्यांचा हेतू, भाव निर्मल होता आणि जैन संस्कृतीसाठी त्यांचा समर्पण-भाव औदार्यपूर्ण होता. देश-कालाच्या प्रत्येक परिस्थितीत जैन धर्माला अनुकूल बनवण्याचे प्रचंड मनोबल, अद्भुत सामर्थ्य त्यांच्यामध्ये होते. भट्टारकांच्या द्वारे केल्या गेलेल्या जिनशासनाच्या सेवांवर जर दृष्टिपात केला तर त्यांचे साधनरूपाने केले गेलेले छोटे-मोठे प्रमाद; जे त्यांना विवशतेमुळे करावे लागले असतील, ते स्वतःच महत्त्वहीन वाटू लागतात.

आज आम्ही धार्मिक गुलामीच्या, त्या निकृष्ट कालातील परिस्थितीचे अनुमानही लावू शकत नाही, कल्पनाही करू शकत नाही. अशा प्रतिकूल, विरोधी परिस्थितीतूनही धर्माची नौका सुरक्षित ठेवून भट्टारकवर्गाने ती वर्तमानाकडे सोपवली आहे. म्हणूनच आमचे परमपूज्य आचार्य, मुनी, आर्यिकामातांनी तसेच समाजातील विद्वान आणि कर्णधारांनी भट्टारकांना सन्मानपूर्वक मान्यता दिली आहे आणि समाजाने नेहमीच त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली आहे. आज या गौरवशाली परंपरेविषयी अधूनमधून जो भ्रामक प्रचार केला जात आहे; त्यापासून समाजाने सावधान राहण्याची आवश्यकता आहे. जे लोक दिगंबर जैन समाजाच्या तीनचारशे वर्षांपूर्वीच्या धार्मिक आणि सामाजिक इतिहासाचे अध्ययन करतील; त्यांच्यासमोर भट्टारकांच्या अमूल्य कार्याचे, त्यांच्या योगदानाचे यथार्थ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चित्र स्वयंमेव, आपोआप स्पष्ट होईल.

आचार्य शांतिसागरजी महाराजांनी आपल्या ४० वर्षांच्या साधनाकाळामध्ये सदैव भट्टारकांना वात्सल्य प्रदान केले आणि स्वत: आपल्या सल्लेखनेच्या वेळी दोन-दोन भट्टारक महानुभावांना आपल्याजवळ ठेवून घेऊन आपल्या महान साधनेच्या शिखराचा परीसस्पर्श करविला. त्यांच्या पश्चातसुद्धा चारित्र चक्रवर्ती महाराजांना मुनिमार्गाचे पुनरुद्धारक आदर्श संत मानणारे सर्व पूज्य आचार्य आणि मुनी महाराज त्यांच परंपरेचे पालन करीत आहेत.

पराधीनतेचा अभिशाप

अठराव्या शतकामध्ये देश इंग्रजांच्या गुलामीमध्ये अडकला होता. परिस्थिती अधिकच कठीण-कठीणतर होत गेली. दिगंबर मुद्रेचा गौरव आणि महिमा यांचा परिचयही कोणाला राहिला नाही. दिगंबर मुनींचे नग्नावस्थेमध्ये रस्त्यावर चालणेदेखील मुश्कील झाले. कोणाही व्यक्तीला नग्नावस्थेत फिरण्याला बंदी घातली गेली. तो दंडनीय अपराध म्हणून घोषित केला गेला. दिगंबरत्वाच्या सौम्य-शांत, निर्विकार, संयमी आणि निर्भय, सिंहवृत्तीधारक साहसिक मूर्तीला, छबीला अधोरेखित करणारे कोणतेही एक उदाहरण अस्तित्वात नव्हते. एक हेही कारण होते की, दिगंबर मुनीसुद्धा फक्त नग्न किंवा अश्लील या श्रेणीमध्ये गणले जाऊ लागले आणि त्यांचा विहार प्रतिबंधित झाला. कित्येक राज्यांनीसुद्धा याच्यासाठी मन मानेल तसे कायदे बनवले.

त्या काळात उत्तर भारतात बहुतेक कोणी मुनी नव्हतेच. कदाचित, यामुळेच या घोषणेने जैन समाजाला व्यथित केले नाही. कोणी याची चिंताही केली नाही. दक्षिणेकडे कोठे-कोठे जे मुनी होते; त्यांनी त्या परिस्थितीशी जुळवून घेऊन समझोता करून आपल्या परंपरेशी जुळवून घेऊन, श्रावकांच्या संरक्षणामध्ये वन-उपवनामध्ये किंवा वनांच्या जवळपास असलेल्या लहानसहान गावात राहून कसेतरी जीवनयापन केले. ते काळ कसातरी व्यतीत करीत होते. त्यांच्या चर्येत अनेक अशा दोषांचा प्रवेश झाला होता की, त्या संतांना इच्छा नसतानासुद्धा, ते दोष अनिच्छेने विवश होऊन स्वीकारावे लागले होते.

त्या काळी समाजामध्ये धर्मशिक्षणासाठी कोणताच मार्ग, कोणताच उपाय नव्हता. ग्रंथ छापणे भयंकर पापकार्य मानले जात होते. समाजामध्ये बालविवाह आणि विजोड, अनमेळ विवाह ही वैयक्तिक सुविधा आणि अधिकाराची बाब मानली जात होती. विधवा स्त्रियांची उपेक्षा होत होती. त्यांच्यासाठी समाजामध्ये आणि परिवारामध्ये कोणतेही सन्मानपूर्ण - मानाचे स्थान नव्हते. स्त्री शिक्षणाला कदाचित सहावे पाप मानले जात होते. गृहीत मिथ्यात्वाच्या चिन्हांना घराघरांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मानाचे, सन्मानाचे स्थान होते. त्यांची पूजा होत होती. या सामाजिक विसंगतींच्या विरुद्ध आवाज उठवणारा कोणीच नव्हता. यावर चिंतन, विचार करण्यासाठी जैन समाजाच्या जातीय संघटनांचा तोपर्यंत उदय झाला नव्हता. संघटना अस्तित्वात नव्हत्या. या हानिकारक रुढींना रोखण्यासाठी, थांबवण्यासाठी कोणतीही राष्ट्रीय, सामाजिक संघटनासुद्धा त्यामुळे समोर आली नाही.

धर्मसूर्याचा उदय

अठराव्या शतकाच्या अंतिम चरणात या अंधकारमय पृष्ठभूमीवर धर्माच्या किरणावलीने मंडित एका नव्या सूर्याचा कर्नाटकामधील भोज नावाच्या गावप्रमुखाच्या घरात उदय झाला. आस्थावान आणि भाग्यशाली श्री. भीमगौडा पाटील हे एक धर्मात्मा, उदार आणि सदाचारी श्रावक होते. त्यांची धर्मपत्नी सत्यवती धार्मिक आणि उदार महिला होती. यांना दोन मुले होती. मोठ्याचे नाव देवगौडा होते आणि छोट्याचे नाव आदिगौडा होते. आपल्या तिसऱ्या मुलाच्या जन्माच्या वेळी सत्यवती आपल्या पित्याच्या घरी गेली होती. सत्यवतीच्या पित्याचे घर भोजपासून तीन मैलांवर 'येळगुळ' गावामध्ये होते. याला 'यरनाळ' असेही म्हणतात.

विक्रम संवत १९२९ (इ.स. १८७२)च्या आषाढ कृष्ण षष्ठीला सकाळच्या वेळी 'येळगुळ'मध्ये सत्यवतींनी एका भाग्यवान सुपुत्राला जन्म दिला. त्या बालकाचे नाव ठेवले होते 'सातगौडा'! इतिहासाने हे सिद्ध करून दाखवले की, या बालकाचा जन्म जैन संस्कृतीसाठीच, तिच्या अस्तित्वावर पसरलेला काळोख, अंधकार दूर करणाऱ्या सूर्योदयासमान होता. त्या दिवशी एकाच वेळी दोन सूर्य उदयमान झाले होते; एक पूर्व दिशेच्या आकाशात आणि दुसरा दक्षिणेच्या 'येळगुळ' गावामध्ये!

त्या काळी गावामध्ये कोणालाही हा अंदाज नव्हता की, बीजेच्या चंद्राप्रमाणे वाढणारा हा सातगौडा कोणी सामान्य बालक नाही. ते हे जाणत नव्हते की, त्याच्यामध्ये एक असा तेजस्वी, पुण्यशाली जीव वाढत आहे की, जो एक दिवस भगवान महावीरांचा मुनिधर्म यथानुरूप, जसाच्या तसा आपल्या जीवनात उतरवील. त्या विलुप्त होणाऱ्या जैन मुनिपरंपरेला पुनरुज्जीवित करून जैन संस्कृतीच्या इतिहासामध्ये एक नवा अध्याय जोडेल. या महापुरुषामुळे त्यांच्या गावाचे नाव अमर होईल.

सातगौडानंतर पाटील दम्पतीच्या घरी एक मुलगा कुमगौडा आणि एक कन्या कृष्णाचा जन्म झाला. आईवडिलांनी आपल्या पाचही मुलांना पापापासून दूर राहण्याचे आणि धर्मावर विश्वास ठेवण्याचे संस्कार दिले. सातगौडाला शाळेमध्ये

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चौथ्या इयत्तेपर्यंत शिकवले. एवढे शिक्षण त्या काळी गृहस्थजीवन जगण्यासाठी पुरेसे मानले जात होते. जातीच्या तत्कालीन प्रथेनुसार नऊ वर्षांच्या अल्पवयात सहा वर्षांच्या अबोध बालिकेबरोबर सातगौडाचा विवाह करून दिला गेला. अद्याप पतिगृही येण्यासाठी काही वर्षांचा अवधी होता; पण दैवयोगाने विवाहानंतर सहा महिन्यांचा आतच पितृगृहीच त्या बालिकावधूचा मृत्यू झाला. अशा प्रकारे अबोध अवस्थेतच सातगौडा जणूकाही दैवयोगाने गृहस्थीच्या, संसाराच्या रामरगड्यात, चक्रव्यूहात अडकताअडकता बचावले.

सातगौडा मोठ्या भावाबरोबर शेतात काम करीत. कापडाच्या दुकानावरही बसत. पण, या सर्वात त्यांना थोडीसुद्धा रुची नव्हती. त्यांच्या मनात रात्रंदिवस काही वेगळेच विचार चालत होते. वेगळेच मनोरथ धावत होते. त्यांच्या स्वभावावरून हे स्पष्ट दिसत होते की, पाण्याचा रहाट ओढण्यासाठी, कपड्यांचे ठाण फाडण्यासाठी त्यांचा जन्म झाला नव्हता. ते कोण्या वेगळ्याच मातीचे बनले होते.

किशोरावस्था पार करीत असता सातगौडाच्या स्वभावामध्ये उदासीनता स्पष्टच दिसत होती. धार्मिक ज्ञान मिळवण्यासाठी पोथी, शास्त्र घेऊन ते रोज आठ मैल पायी जात होते; जेथे कोणी त्यागी-व्रती असल्याचे ऐकिवात यायचे. व्रत-चारित्र्याविषयी सातगौडाची उत्सुकता त्यांना तेथे मुद्दाम खेचून नेत होती. पुराणातील वचने ऐकण्यासाठी संध्याकाळी भोजगावच्या जिनालयात ते उपस्थित असत. हा त्यांचा नित्यक्रम होता. ते आकर्षक व्यक्तिमत्त्वाचे धष्ट-पुष्ट-बलवान युवक होते. शेर-दीडशेर दूध आणि पावभर तूप सहज पचवत होते. ते खूप दयाळू होते. शक्तीचा उपयोग सेवा आणि परोपकारासाठीच करीत होते. कोणाशीही अनुचित व्यवहार ते कधीच करीत नव्हते.

जन्मजात उदासीन

तारुण्यावस्थेत जेव्हा नैसर्गिकरीत्या प्रत्येक तरुणशरीरात इंद्रियसुखाची लालसा उत्पन्न होते; तेव्हा सातगौडाच्या मनामध्ये अनासक्ती आणि वैराग्याच्या लहरी लहरत होत्या. ज्या वयामध्ये सांसारिक भोग-विलास नैसर्गिकरीत्या मानवी मनाला आकर्षित करू लागतात; त्या वयामध्ये या विलक्षण तरुणाला तीर्थंकर आणि पूर्वाचार्यांच्या तपोभूमी व निर्वाणभूमींच्या वंदनेचे आकर्षण आपल्याकडे खेचत होते.

पाटलांच्या घरामध्ये चांगले धार्मिक वातावरण होते. जे कोणी साधू भोजगावात येत; त्यांचा आहार पाटलांच्या घरी अवश्य होत असे. बोरगावचे आदिसागर महाराज नेहमीच खासकरून येत होते. ते आठ दिवसांनी आहार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घेत असत. तल्लीन होऊन तुणतुणे वाजवीत भजन म्हणत असत; तेव्हा भक्तिरसाची गंगा वाहत असे. सातगौडा त्यांची खूप सेवा करीत. परत जातेवेळी महाराजांना आपल्या खांद्यावर बसवून दूधगंगा आणि वेदगंगा या नद्या पार करवीत होते. अशा प्रकारे धार्मिक वातावरणाने १८-२० वर्षांच्या वयामध्ये सातगौडाच्या मनात दिगंबरी दीक्षेची भावना उद्भवली. दिवसेंदिवस ती वाढू लागली. त्यांनी आईला आपला विचार सांगितला. पण, आईवडिलांनी मुलाला त्या छोट्या वयात गृहत्यागाची अनुमती दिली नाही. दोघांनी आपल्या लाडक्या प्रिय पुत्राला समजावले...

"व्यापार आणि शेतीमध्ये तुमचे मन लागत नसेल, संसारामध्ये तुमची रुची नाही तर त्यासाठी तुम्हाला कोणी विवश करणार नाही. पण, आम्ही जिवंत असताना तुम्ही मुनी बनावे, याचा आम्हाला मानसिक त्रास होईल. आईवडिलांची सेवा करणेसुद्धा पुत्राचा धर्म आहे. मुनी धर्माचे पालन फारच कठीण आहे. हा एक दुर्गम मार्ग आहे. जी काही साधना करायची असेल; ती घरात राहून करा. आपल्या घरी सर्व सुविधा आहेत."

संकोची युवक सातगौडाने वडिलांच्या आज्ञेनुसार परिवारामध्ये राहूनच साधनेचा अभ्यास प्रारंभ केला. जेव्हा ते ३२ वर्षांचे होते तेव्हा पुन्हा शिखरजीला गेले. तेथे त्यांनी आजीवन तेल आणि तुपाचा त्याग केला. सर्व पक्वान्नांचा त्याग आपोआपच झाला आणि आता त्यांचे अल्प भोजनही अत्यंत साधे राहिले. हे त्यांच्या संयमी जीवनाचे पहिले पाऊल होते.

मातापित्याचा वियोग

भीमगौडा पाटलांनी ५० वर्षांच्या वयामध्ये श्रवणबेळगोळमध्ये गोमटेश्वर भगवंतासमोर आजीवन ब्रह्मचर्य व्रत धारण केले होते. फक्त एक वेळ भोजनाचा नियम घेतला होता आणि दूध, दही, तेल, मीठ व गोड पदार्थ इत्यादी सर्व रसांचा कायमचा त्याग केला होता. हळूहळू भोजनाचे प्रमाण कमी केले. एक वर्षापासून तर फक्त एक वाटी भोजन घेत होते. एक दिवस मुलांना बोलवून म्हणाले, "उपाध्यायाला बोलवा. काही दान देऊन मी समाधी घेऊ इच्छितो." त्याप्रमाणे त्याला जे द्यायचे होते ते दिले आणि काही नियम घेतले.

त्या वेळी बैठकीची गादी वेगळी केली गेली. आपल्या हाताने काही केस उपटले, लोच केला आणि धर्मध्यानात लीन झाले. सातगौडा आणि देवगौडा रात्रभर त्यांच्याजवळ बसून स्तोत्र पाठ म्हणत राहिले. पंचपरमेष्ठीचे नामस्मरण करीत, जप करीत सूर्योदयाच्या वेळी त्यांनी देहत्याग केला. तेव्हा, त्यांचे आयुष्य सुमारे ६५ वर्षांचे होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पतीचे समाधीमरण झाल्यावर सत्यवतीने आपले केस काढून टाकले. सफेद साडी परिधान केली. व्रतनियमासहित आता ती पिंछीविना आर्यिकेसारखे जीवन जगू लागली. पित्याचे असे जागरूक मरण पाहून सातगौडाचे वैराग्य आणखी तीव्र होत गेले. आता ते एकांतर उपवास करू लागले. काही दिवसांनंतर मातेचाही स्वर्गवास झाला. आईवडील दोघे निघून गेले. आता कोणी अडवणारे नव्हते म्हणून सातगौडाला संयमाच्या मार्गावर पाऊल टाकण्यास, अग्रेसर होण्यास अनुकूलता मिळाली. त्या वेळी त्यांच्या आयुष्याचे एकेचाळिसावे वर्ष चालू होते.

वास्तविक, २० वर्षांपूर्वीचा गृहत्यागासाठी वडिलांचा विरोध सातगौडासाठी वरदान सिद्ध झाला. त्यांनी दीक्षेच्या प्रतीक्षेमध्ये त्या २० वर्षांतील प्रत्येक क्षणाचा सदुपयोग केला होता. या काळामध्ये संसार, देह आणि भोगाविषयी त्यांची विरक्ती प्रतिक्षण वृद्धिंगत होत राहिली. संयम धारण करण्याची वैचारिक झटापट त्यांच्या मनाला रवीसारखी घुसळत राहिली होती.

या मध्यंतरात त्यांनी आगमातून यथार्थ मुनिमार्गाची माहिती करून घेतली होती आणि दूरदूरच्या तीर्थयात्रा करून काळ-वेळ-परिस्थितीचा अनुभव घेतला होता. जेथे कोठे दिगंबर मुनींच्या अस्तित्वाची माहिती होत होती; तेथे ते त्यांच्याकडे जाऊन त्यांची सेवा, वैयावृत्त्य इत्यादी करीत होते. सद्य:स्थितीत मुनिमार्गामध्ये ज्या विसंगतींचा समावेश झाला होता आणि त्या आर्ष मार्गामध्ये जे दोष आले होते; त्याला पाहून-ऐकून त्यांचे धर्मभीरू मन कंपित होत होते.

दक्षिण महाराष्ट्र आणि कर्नाटकात कोठेकोठे दिगंबर मुनींचे अस्तित्व होते; परंतु ते सर्व बहुतेक छोट्या गावांमध्येच निवास करीत होते. मोठ्या शहरांतून त्यांचे आवागमन होत नव्हते. संयमाच्या निर्वाहामध्ये अनेक अडचणी येत होत्या. दिगंबर मुद्रा पाहून शासनाकडून किंवा काही धर्मांध विधर्मीयांकडून उपद्रव होण्याची शक्यता होती. लोकांच्यासाठी नग्न मुनी एक अकल्पनीय आणि अपरिचित रूप होते. या कारणांमुळेही जनमानसामध्ये त्या मुद्रेविषयी सन्मानाची भावना नव्हती. रस्त्यावरून चालत असताना लोक अपशब्द बोलत आणि दगड फेकत असत किंवा उपहास करीत असत.

वास्तविक, त्या काळापर्यंत जनतेसमोर वीतरागी, अपरिग्रही, ज्ञान-ध्यान-तपलीन, अंतर्बाह्य निर्ग्रंथ साधू कोणाच्या परिचयाचे नव्हते. कोणाच्या पाहण्यात आलेच नव्हते. 'अरि-मित्र, महल-मसान, कंचन-काच, निंदा-थुतीकरण' समान मानणारा तसेच प्रिय-अप्रिय, चांगल्या-वाईट परिस्थितीमध्ये धैर्यपूर्वक, समतापूर्ण व्यवहार करणारा कोणी महात्मा न त्यांच्या दृष्टीसमोर आला होता आणि न त्यांच्या कल्पनेमध्ये कोणी असा होता. मग, अशा प्रभावविहीन लोकांमध्ये जैन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुनींचा विहार आणि सत्कार होणेही कसे शक्य होते?

ही एक समाधानाची बाब होती की, त्या पडत्या काळातसुद्धा निर्ग्रंथ मुनींनी आपल्या आचरणामध्ये असा कोणताच दोष लागू दिला नव्हता की, ज्यामुळे दिगंबर मुद्रा लांछित झाली असती किंवा ते लोकनिंदेचे पात्र बनले असते.

ते काही अपवादांना सोडून बहुतेक नग्नत्व मूलगुणाचे पालन करीत होते. कोणत्याही परिस्थितीत पदयात्रा करीत होते. वस्त्र आणि वाहनांचा उपयोग कधीच करीत नव्हते. दोन-चार-सहा दिवसांचे लागोपाठ उपवास करीत होते. आहाराची इच्छा झाली तर श्रावकांच्या घरी जाऊन दिवसातून एक वेळ उभे राहून भक्तिपूर्वक मिळालेला साधा आहार पाणिपात्रात, हातातच ग्रहण करीत होते. जे मिळेल त्याबाबत यथालाभ संतोष प्रकट करीत होते. कोणत्याही वस्तूची याचना करीत नव्हते. आरंभ-परिग्रहाच्या कार्यापासून दूर होते. आयतन, मंदिरे बांधणे किंवा संस्था चालवण्याचा मोह नव्हता. सामायिक, अस्नान, अदंतधावन आणि केशलोच इत्यादी मुनिपदाच्या क्रिया ते करीत होते. कोणत्याही मुनीबरोबर, आर्यिका किंवा श्राविका अशा कोणत्याही रूपात स्त्रीला स्थान नव्हते. उपसर्ग आणि परिषहापासून बचाव करण्यासाठी स्वत: उपाय करीत नव्हते. शरीरामध्ये रोगादींच्या वेदना होत असता ओरडत-रडत नव्हते तर समतापूर्वक ते सहन करीत होते. निश्प्रतिकार झाल्यानंतर सल्लेखनापूर्वक देहत्याग करीत होते.

ते हे सर्व करीत होते; परंतु तरीसुद्धा त्यांच्या जीवनपद्धतीचा आगमाशी पूर्ण मेळ नव्हता. त्यांच्या व्यवहारामध्ये कोठेकोठे आगमिक परंपरा किंचित खंडित होत होती.

एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, त्या काळच्या मुनींच्या चर्येत दोष पाहून त्यांच्या शिथिलतेकडे लक्ष देणे, हा आमचा येथे हेतू नाही. ही त्यांची आलोचनाही नाही. त्यांची चर्चा करीत असता श्रद्धापूर्वक आमचे मस्तक नत होत आहे. कारण, त्या मुनींना जेवढे चारित्र्याबद्दल धुमील परंपरेने माहीत होते, तसेच त्यांचे आचरणही होते. तथापि, त्या परिस्थितीमध्ये त्यांनीच दिगंबर मुनींच्या स्वरूपाला जिवंत आणि सुरक्षित ठेवले होते. त्या परंपरेला 'सर्वथा' लुप्त होण्यापासून वाचवण्याचे श्रेय त्याच माहात्म्यांना आहे. जैन इतिहासामध्ये त्यांचे हे योगदान कमी महत्त्वाचे मानले जाऊ नये. त्यांचे साहस धन्य होते आणि कर्तृत्व वंदनीय होते.

चरणानुयोगाच्या शास्त्रांमध्ये स्वच्छंद एकलविहारी आणि उद्दिष्ट आहाराला मुनिपदाच्या प्रमुख दोषांमध्ये गणले गेलेले आहे. परंतु, त्या काळच्या मुनींनी हे दोनही दोष अपरिहार्य मानून किंवा पंचम काळाची अनिवार्यता समजून स्वीकार केले होते. त्यांचे मुनिपद एक प्रकाराने उपाध्यायांच्या अधीन होते. तोच मंदिराचा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रमुख पुजारी आणि गावाचा पंडित असायचा. पंडितच मुनी आणि श्रावकांच्या मधील दुवा होता. तोच मुनिमहाराजांच्या आहारासाठी प्रथम श्रावकाचे घर निश्चित करून त्यांना तेथे घेऊन जात होता. आहारानंतर श्रावक दक्षिणेच्या रूपाने एक शिक्का / एक नाणे महाराजांच्या कमंडलूमध्ये टाकत होते. तत्कालीन प्रचलित रूढीप्रमाणे श्रावक आहारदानाचे पूरक अंग म्हणून अशी भेट देत होते. महाराज ती मुद्रा कोणाला तरी देत असत. तरीसुद्धा वीतरागी दिगंबर संतांसाठी अशा प्रकारची आगमविरुद्ध क्रिया करणे योग्य नव्हते. ती अपराधाच्या श्रेणीमध्ये गणली जात असे.

सातगौडांच्या मनामध्ये खूप दिवसांपासून मुनिदीक्षेचा भाव होता. त्यांनी तत्कालीन मुनींच्या सर्व क्रियाकलापांना पाहिले आणि निरीक्षणही केले. त्या आचरणातील तुटी त्यांना जाणवल्या. म्हणूनच मुनिदीक्षा घेऊन ते निर्दोष मुनी परंपरेला वर्तमानामध्ये पुन्हा स्थापित करण्याचे स्वप्नसुद्धा आपल्या मनामध्ये पाहत होते. ते स्वत: आपल्या जीवनावर हा प्रयोग करू इच्छित होते की, ज्यामुळे लोकांमध्ये हा आदर्श प्रस्तुत व्हावा की, शास्त्रोक्त मुनिचर्या या पंचम काळामध्येसुद्धा पाळली जाऊ शकते.

सातगौडाजींची क्षुल्लक दीक्षा

आईवडिलांच्या स्वर्गवासानंतर गृहत्यागाची सातगौडाजींची भावना तीव्र झाली. त्या वेळी त्यांच्या मनात एकच द्विधा होती. ते एक निर्णय करू शकत नव्हते. दीक्षा घेण्यासाठी कोणाला शरण जावे? कोणाला गुरू बनवावे, हा त्यांच्यापुढे प्रश्न होता. गेल्या २० वर्षांत त्यांनी बहुतेक सर्व मुनींचे दर्शन घेतले होते. त्यामध्ये कठोर तपस्या करणारे मुनीही होते. पण, आगमानुसार आचरण करणारा-करवणारा कोणीच त्यांना दिसला नव्हता. परिस्थितीशी मिळतेजुळते घेऊन सर्वांनी सदोष चर्या स्वीकारली होती. मूलगुण सुरक्षित होते तरीही उत्तरगुणांची विराधना त्या सर्वांकडून होत होती.

सातगौडांच्या मनामध्ये हे विचारचक्र चालूच होते. तेवढ्यात, भोजगावात मुनी देवेंद्रकीर्तींचे आगमन झाले. हे देवप्पास्वामी नावानेही ओळखले जात होते. त्यांच्याबरोबर एगप्पा नावाचे उपाध्याय होते. सातगौडांनी बरेच दिवस आहार देऊन आणि वैयावृत्त्य करून त्यांची सेवा केली. एगप्पा पंडिताने स्वामींविषयी त्यांना सांगितले -

''मी देवेंद्रकीर्ती महाराजांच्या तपस्येशी परिचित आहे. हे बालब्रह्मचारी आहेत. सोळाव्या वर्षी सेनगणाच्या पीठाचे ते भट्टारक झाले होते. नंतर, दोन वर्षांनी निर्ग्रंथ मुनिदीक्षा घेतली होती. एक दिवस उपवास एक दिवस आहार,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असा आजीवन नियम घेऊन ते पालन करीत आहेत.''

सातगौडांनी आपले मन स्थिर केले. त्यांनी विचार केला की, आता या वेळी मी श्रावक आहे. चर्येतील दोष दाखवले किंवा प्रचलित पद्धतीमध्ये सुधारणा करण्याविषयी सांगितले तर कोणी मुनी महाराज ते ऐकणार नाहीत. मी दीक्षा घ्यावी, हेच उचित होईल. आता तर क्षुल्लक दीक्षा मिळेल. त्या अवस्थेमध्ये अभ्यास करून मुनिदीक्षा घेईन आणि शास्त्रोक्त आचरणाचा आपल्या जीवनात अंगीकार करून साधना करीन. सांगून सुधारणा करण्यापेक्षा आगमाच्या पद्धतीप्रमाणे मुनिजीवन जगण्याने अधिक प्रभाव पडेल. कदाचित तेव्हाच मुनिमार्गातील दोष दूर होतील.

देवप्पास्वामी भोजहून विहार करून उत्तुरला पोहोचले होते. सातगौडांनी त्यांच्याकडून दीक्षा घेण्याचा संकल्प करून एके दिवशी ते उत्तुरला जाऊन पोहोचले. सातगौडांना त्यांच्या आचरणाविषयी माहीत होते; पण ते स्वत: दीक्षित होऊन स्वयंभू संत बनू इच्छित नव्हते. कारण की, आगमाची तशी आज्ञा नव्हती. त्यांनी देवेंद्रकीर्तीजींकडे दीक्षेची याचना केली.

देवेंद्रकीर्तीस्वामी सातगौडा पाटलांच्या पात्रतेविषयी संतुष्ट होते. त्यांनी सहर्ष स्वीकृती दिली आणि लवकरच क्षुल्लक दीक्षा दिलीसुद्धा. संवत १९७२ (इसवी सन १९१५) च्या ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशीला त्यांचा दीक्षा संस्कार संपन्न झाला. ही दीक्षा काय होती ? एका रूढीचे पालन करण्यासारखे कार्य होते. देवेंद्रकीर्तीजींनी आपल्या पिंछीतून काही पंख काढून छोटीशी पिंछी बनवली आणि एका तांब्याला दोरी बांधून कमंडलू बनवले होते. त्यांनी एक काम फारच चांगले केले की, क्षुल्लकजींचे नाव 'शांतिसागर' ठेवले. नवदीक्षित क्षुल्लकजींनी दीक्षा गुरूंच्या सदोष परंपरेचा स्वीकार तर केला नाही; पण जीवनभर त्यांच्याकडून प्राप्त नावाचे मात्र सार्थक केले. पुढे ४० वर्षांच्या दीक्षाकाळामध्ये त्यांनी स्व-पर कल्याणाची जशी साधना केली; ती ते शांतीचे सागर बनले नसते तर कधीच शक्य झाली नसती. ते खऱ्या अर्थाने 'शांतिसागर' बनले. हीच त्यांची गुरुदक्षिणा ठरली.

दीक्षेपूर्वी भोजगावी समाचार पाठवला नव्हता. नंतर, बातमी मिळाल्यावर बहीण आणि भाऊ उत्तुरला आले. कृष्णाने दुसऱ्या दिवशी आहार दिला आणि कुमगौडाने कोल्हापूरच्या मठातून आणून क्षुल्लकजींना पिंछी-कमंडलू दिले.

समाजाच्या त्या एकूण प्रदूषित वातावरणामध्ये त्यागी-व्रतीजनांचा निभाव लागणे कठीण होते. सातगौडांच्या क्षुल्लक बनण्याने त्यागाच्या मार्गास प्रारंभ झाला होता. लोक त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागले होते. त्यांच्या आहारादीची व्यवस्था करतेवेळीसुद्धा लोकांच्या मनामध्ये क्षुल्लकजींच्या दिनचर्येविषयी खूपच जिज्ञासा असायची. काही लोक तर या सेवा शुश्रूषेच्या निमित्ताने त्यांच्या दिनचर्येचे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निरीक्षण-परीक्षणसुद्धा करीत राहायचे. क्षुल्लकजी यावर कधी नाराज झाले नाहीत; कारण तो श्रावकांचा अधिकार होता.

आता क्षुल्लक शांतिसागरजींनी मुनींच्या शिथिल चर्येचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. देवेंद्रकीर्तीस्वामींची चर्या पण निर्दोष नव्हती. ते आहारासाठी वस्त्र पांघरून श्रावकांच्या घरी जात होते. तेथे स्नान करून, नग्न होऊन आहार घेत होते. आहार करतेवेळी घंटा वाजत राही. हेतू हा, अंतराय होण्यासारखा कोणताही आवाज आहार घेताना ऐकायला येऊ नये. शांतिसागरांना ही पद्धत मान्य नव्हती. ते उपाध्यायाबरोबर निर्धारित घरी आहारासाठी गेले नाहीत. दुसऱ्या घरी पडगाहन झाले नाही तर निराहार मंदिरात परत आले. श्रावक आहार बनवत होते; पण विधिवत पडगाहन करीत नव्हते. अशा प्रकारे चार दिवस निघून गेले. चौथ्या दिवशी गावच्या पाटलाने उपाध्यायाला बोलवून फटकारले – "साधू भुकेला राहतो, तू आहारविधी का सांगत नाहीस?" तेव्हा उपाध्यायाने पडगाहनाचा विधी सांगितला आणि पाचव्या दिवशी विधिपूर्वक क्षुल्लकजींचा आहार झाला. त्यांच्या आहाराच्या वेळी अंतरायाला कानानिराळे टाकण्यासाठी घंटानाद झाला नाही. क्षुल्लकजींनी दक्षिणेचा रुपयासुद्धा घेतला नाही.

शांतिसागरजी समतापूर्वक आपल्या साधनेमध्ये तल्लीन होते. त्यांनी उपाध्यायाला बरोबर येण्यास मनाई केली. ज्या दिवशी पडगाहन होत नव्हते; त्या दिवशी ते चूपचाप परत येऊन धर्मध्यानामध्ये निमग्न होत असत. काही श्रावकांनी त्यांना आपल्या गुरूच्या पद्धतीप्रमाणे करण्यास सांगितले; पण त्यासाठी त्यांनी स्पष्ट नकार दिला. काही काळानंतर देवेंद्रकीर्ती-गुरूंनी त्यांना सांगितले, "हा पंचम काल आहे, असे नाही चालणार! दक्षिणेचा रुपया पण घेतला पाहिजे. सर्वच घेतात. तुम्ही ठेवून घेऊ इच्छित नसाल तर येथे ठेवून देत जा."

गुरूच्या या सल्ल्याने शांतिसागरांना निराश केले. ते आताच सुधारणा करण्याविषयी काही सांगू इच्छित नव्हते. कारण की, ते जाणत होते की, शिष्याने सांगितलेले कोणता गुरू का ऐकेल? त्यांनी शांत मनाने विनयपूर्वक आपल्या दीक्षाप्रदाता मुनीला उत्तर दिले – "शास्त्रानुसार जीवन नाही घालवता आले तर मी सल्लेखना घेईन; परंतु आगमाच्या आज्ञेचे उल्लंघन कधीच करणार नाही."

त्यांनी विचार केला... जेथे दिगंबर मुनींना वस्त्र पांघरूण आपली नग्नता झाकावी लागते, रुपया-पैसा ग्रहण करावा लागतो, असे मुनिरूप मला अभिप्रेत नाही. माझे ते अभीष्ट नाही. या महाराजांवर माझा कोणताच आग्रह चालणार नाही. यांच्याजवळ राहून मलाही असेच आचरण करावे लागेल. यापेक्षा चांगले हेच की, स्वतंत्र विहार करून आपली साधना करणे श्रेयस्कर आहे. क्षुल्लकजींसमोर आता अन्य कोणताच उपाय नव्हता. त्यांनी दीक्षादाता गुरू

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देवेंद्रकीर्तीजींना नमोस्तु करून त्यांची साथ सोडून दिली आणि कोगनोळीकडे विहार केला. इ.स. १९१५ मध्ये त्यांचा पहिला चातुर्मास कोगनोळीमध्ये झाला.

कोगनोळीमध्ये कोणा पिंछीधारी गुरूंचा चातुर्मास होतो आहे, ही बातमी वायुवेगाने सर्वत्र पसरताच दूरदूरहून लोकांचे आवागमन सुरू झाले. नवदीक्षित क्षुल्लकर्जींच्या समोर येऊन लोक एका वेगळ्या प्रकारच्या सौम्य, शांत, निर्लेप गुरूच्या दर्शनाचा आनंद घेत होते. चार-पाच महिने तेथे चांगली धर्मप्रभावना होत राहिली. चातुर्मासानंतर क्षुल्लकर्जींनी कोगनोळीहून विहार केला. नंतर, ते अनुकूल स्थानांमध्ये समतापूर्वक विहार, विचरण करीत राहिले. या मधल्या काळात १९१६ मध्ये एक यात्री संघ आग्रहपूर्वक त्यांना श्री सिद्धक्षेत्र गिरनारच्या वंदनेला घेऊन गेला. या यात्रेच्या सुयोगाने त्यांना मुनिपदाकडे आणखी एक पाऊल पुढे टाकण्याची संधी मिळाली.

गिरनारमध्ये नेमिनाथ भगवंताच्या निर्वाणस्थळी पौष शुक्ल चतुर्दशी, विक्रम संवत १९७३, रविवार दिनांक ७/१/१९१७ ला त्यांनी खंडवस्त्राचाही त्याग केला. अशा प्रकारे ते कौपिनधारी ऐलक बनले. ही यात्रा आगगाडीने झाली; परंतु यात्रेहून परत आल्यावर त्यांनी आजीवन सर्व प्रकारच्या वाहनांचा त्याग केला. आता उरलेल्या आयुष्यासाठी पदयात्राच त्यांच्या विहाराचे एकमात्र साधन राहिले. अशा प्रकारे दृढ आस्था आणि पूर्ण सावधानतेसह त्यांनी पाच वर्षेपर्यंत ज्ञान-ध्यान आणि तपाचा कठोर अभ्यास केला.

मुनिदीक्षेची इच्छा पूर्ण झाली

क्षुल्लक आणि ऐलकपदावर पाच वर्षांच्या साधनेनंतर फाल्गुन शुक्ल चतुर्दशी विक्रम संवत १९७४ सन १९१८ ला यरनाळ गावामध्ये त्याच देवेंद्रकीर्तीस्वामींकडून ऐलक शांतिसागरजींनी दिगंबरी दीक्षा धारण केली. तो त्यांच्या जीवनाचा सर्वात मंगलमय दिवस होता. सुमारे २५ वर्षांच्या ध्यासानंतर त्यांची ही अभिलाषा पूर्ण झाली होती. त्यांचे अंतरंग कित्येक वर्षांपूर्वीपासून अनासक्तीच्या रसात रसमय झालेलेच होते. आज कोपीनचा त्याग करून ते आंतरबाह्य दोन्हीकडून परमदिगंबर झाले होते. आता ते '१०८ मुनिश्री शांतिसागर महाराज' बनले होते. त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता आणि बाहेर चारही दिशांना त्यांच्या जयजयकाराने आसमंत दुमदुमले होते.

चार वर्षांनंतर सन १९२३ मध्ये महाराजांनी समडोळी गावामध्ये दोन सुयोग्य दीक्षार्थींना त्यांच्या विनंतीवरून दिगंबरी दीक्षा देऊन त्यांचे मुनी वीरसागर आणि मुनी नेमिसागर असे नामाभिधान केले.

शांतिसागर महाराजांकडून या 'प्रथम दीक्षा-दान अनुष्ठाना'ला आपण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांच्याद्वारे विसाव्या शतकामध्ये मुनिमार्गाच्या पुनर्स्थापनेचे मंगलाचरण म्हणू शकतो. त्याच वेळी समडोळीमध्येच आषाढ शुक्ल चतुर्दशी, विक्रम संवत १९८९, मंगळवार दिनांक २४/७/१९२३ ला चतुर्विध संघाने आग्रहपूर्वक शांतिसागर महाराजांना आचार्यपद देऊन अलंकृत केले. कोणा दिगंबर मुनीच्या 'आचार्यपदारोहणा'चा ज्ञात इतिहासातला हा पहिला समारंभ होता.

त्या काळात देशात काही मुनिमहाराज तर विद्यमान होतेच; पण त्यात कोणी आचार्य नव्हते. कुठला एखादा संघही अस्तित्वात नव्हता. अशा प्रकारे कित्येक शतकांनंतर २४ जुलै १९२३ ला महामुनी आचार्यश्री शांतिसागर महाराजांच्या तत्त्वावधानामध्ये दिगंबर मुनिपरंपरा मुनी संघाच्या रूपामध्ये पुनःस्थापित झाली. आचार्य शांतिसागर त्या पुनरुज्जीवित मुनिपरंपरेचे प्रथम आचार्य या रूपाने प्रतिष्ठित झाले. पुढे चालून त्यांचे प्रथम दीक्षित मुनी श्री वीरसागरजी महाराज महामुनिश्री शांतिसागरजींच्या परंपरेचे प्रथम पट्टाचार्यपदावर स्थानापन्न झाले. अशा प्रकारे जैन इतिहासामध्ये समडोळीचे नाव अमर झाले. तेथे १९२३ मध्ये तीन ऐतिहासिक कार्ये संपन्न झाली होती. पूज्य शांतिसागर महाराजांना आचार्यपद प्राप्त झाले. त्यांच्या परंपरेचे प्रथम पट्टाचार्य श्री वीरसागरजींची मुनिदीक्षा झाली आणि त्याचबरोबर दिगंबर मुनिपरंपरेची पुनर्स्थापना झाली.

दीक्षागुरूंची चर्याशुद्धी

सन १९२५ मध्ये श्री तीर्थ श्रवणबेळगोळमध्ये १५ वर्षांनंतर गोमटेश्वर भगवान बाहुबली स्वामींच्या महामस्तकाभिषेक महोत्सवाचे आयोजन चालू होते. त्याप्रसंगी आचार्य शांतिसागर महाराज आपल्या संघासहित श्रवणबेळगोळला आले. तिकडे संयोगवश त्यांचे दीक्षाप्रदाता मुनिश्री देवप्पास्वामींचेही त्या उत्सवामध्ये आगमन झाले. या मंगलमिलनाने दोन्ही माहात्म्यांना असीम आनंद झाला. दोनही संतांची वात्सल्यपूर्ण भेट, कुशलमंगल विचारणे, नमोस्तु-प्रतिनमोस्तु वगैरे यथाविधी पार पडले. तेथे त्यांच्यामध्ये काही दिवसपर्यंत धर्मचर्चा होत राहिली.

त्या वेळी श्री नेमिसागरजी वर्णी श्रवणबेळगोळ जैन मठाच्या भट्टारकांच्या गादीवर विराजमान होते. वर्णीजी जैन आगम आणि सिद्धान्ताचे पारगामी विद्वान तसेच प्रभावशाली भट्टारक होते. आपल्या व्यवहारकुशलतेने त्यांनी आसपासच्या गावांमध्ये श्री क्षेत्राच्या शुभचिंतकांचा तसेच सहायकांचा मोठा समुदाय तयार केला होता. त्यांच्या कार्यकालात श्रवणबेळगोळच्या व्यवस्थेमध्ये खूप सुधारणा झाल्या होत्या. अनेक नवीन परंपरा तेथे सुरू झाल्या. प्रथम दिगंबराचार्यांच्या पावन सान्निध्यात त्यांच्या चतुर्विध संघाच्या उपस्थितीमध्ये

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महामस्तकाभिषेक सोहळा होत आहे, या विचाराने आनंद चौपट झाला होता.

मुनी देवेंद्रकीर्तीजी निश्छल, भोळे आणि सरळ संत होते. त्यांना आपल्याकडून दीक्षित शांतिसागर महाराजांना आचार्यांच्या रूपामध्ये पाहून आनंदही झाला आणि गौरवाचीसुद्धा अनुभूती आली. आचार्यश्रींची नियमित आणि कठीण चर्या पाहून देवेंद्रकीर्ती महाराजांना आपल्या शिथिल चर्येबद्दल खेद वाटला. त्यांनी आपली चूक सुधारण्याचा निर्णय केला आणि एक दिवस स्वप्रेरणेने त्यांनी शांतिसागर महाराजांना निवेदन केले :

"महाराज, आपण आगमाचे ज्ञाते आहात. माझ्या महाव्रतासंबंधी दोषांना समजावून मला मुनिमार्गाच्या निर्दोष चर्येमध्ये दीक्षित करण्याची कृपा करावी."

हा एक वरिष्ठ मुनिमहाराजांचा आपल्या दीक्षित शिष्याकडे आग्रह नव्हता. ते तर आगमानुकूल, निर्दोष चर्येचे धारक, या युगाच्या प्रथम दिगंबराचार्यांच्या चरणी आपल्या चर्येच्या समालोचनासाठी एका मुनीचे नम्र निवेदन होते. प्रशम मूर्ती, परमपूज्य आचार्यश्री शांतिसागर महाराजांनी त्यांना लगेच दीक्षा दिली नाही तर– या अश्रुतपूर्व आणि अनोख्या प्रकरणावर कित्येक दिवसपर्यंत सखोल विचार–चिंतन केले.

तसे तर देवप्पास्वामी शांतिसागर महाराजांचे क्षुल्लक–दीक्षा व मुनिदीक्षा–प्रदाता दीक्षागुरू होते. परंतु, आज तेथे दीक्षित शिष्यासमोर त्यांचा दीक्षागुरू दीक्षेसाठी उभा नव्हता. तेथे तर आगमाचे ज्ञाता आणि आगमानुसार प्रवृत्तीसाठी प्रतिबद्ध, युगसंस्थापक, महान आचार्यांच्या समोर उपस्थित होऊन एक मुनिराज आपल्या चर्येतील दोष निवारण्यासाठी त्यांची आज्ञा मागत उभे होते.

आचार्यश्रींना पिंछी देवप्पास्वामींकडून मिळाली होती. परंतु, मुनिचर्येचा मार्ग त्यांनी माता जिनवाणीच्या कृपेने प्राप्त केला होता. पूर्वाचार्यांद्वारे सांगितले गेलेले एक वाक्य 'आगम चक्खू साहू', 'शास्त्रच साधूचे नेत्र' आहेत, हे प्रतिक्षण त्यांच्या प्रज्ञेला प्रकाशित करीत होते. एकच प्रतिज्ञा आणि एकच प्रतिबद्धता त्यांना मार्गदर्शन करीत होती की, प्रत्येक परिस्थितीमध्ये आम्हाला जे काही करायचे आहे; ते आगमाच्या अनुशासनामध्ये, आगमाच्या रक्षणासाठी, आगमाच्या मर्यादेत व आगमाच्या प्रकाशामध्येच करायचे आहे.

प्रत्येक साधूला आपल्या दीक्षागुरूकडून किंवा आपल्या अनंतर पूर्व प्रचलित परंपरेकडून मार्गदर्शन मिळत असते. परंतु, शांतिसागर महराजांना हे दोन्हीही आधार मिळाले नव्हते. त्यांच्या गुरूजवळ पुरेसे आगमज्ञान नव्हते आणि समोर दिगंबर मुनींची कोणतीच निर्दोष जिवंत परंपरा नव्हती. विधर्मीयांच्या शासनामध्ये शेकडो वर्षांपासून दिगंबर मुनींचा निर्वाह होणे कठीण होतहोत कठीणतम झाले होते. ती परंपरा लुप्त होण्याच्या मार्गावर उभी होती.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचारशास्त्रामध्ये जे निर्देश दिले गेलेले होते; त्यांना जीवनात उतरवण्याचे साहस मागच्या कित्येक शतकांपासून कोणीही केलेले नव्हते. असे म्हटले जायचे की, तशा प्रकारची साधना प्राचीन कालाच्या वातावरणामध्येच होणे शक्य होते. आता देशकालाच्या परिस्थितीत खूपच बदल झाला होता. शरीराचे संहनन हीन झाले होते आणि श्रावक समुदायामध्ये कित्येक प्रकारचे वैचारिक प्रदूषण पसरले होते.

शास्त्रामध्ये हे आश्वासन अवश्य मिळत होते की, अजून दीर्घकालापर्यंत मुनींचा सद्भाव राहील, मुनिपरंपरा चालू राहील. मात्र, त्यासाठी त्या काळची आवश्यकता, त्या मार्गांचे निर्दोष आचरण व्यावहारिक स्वरूपाने निर्धारित करून ते जीवनात अंगीकारण्याची, जीवनात उतरवून दाखवण्याची गरज होती. शांतिसागर महाराजांना परंपराप्रणीत मार्गावर चालण्याची सुविधा सहज प्राप्त नव्हती. कारण, त्यांच्या जन्माच्या आधी बराच काळ ती प्राचीन परंपरा प्रदूषित झालेली होती. अशा परिस्थितीमध्ये त्यांना पिंछीची मर्यादा सांभाळत मार्गक्रमण करणे आणि दुसऱ्यांनाही चालण्यासाठी मार्गाची निर्मिती स्वतःलाच करायची होती. यासाठी जिनागमाचे एक वाक्य त्यांना साहस देत होते. 'अप्पदीवो भव', 'आपणच आपले दीपक व्हा.' एकूण सर्व परिस्थितीचा विचार केला तर आचार्य शांतिसागरजी महाराजांच्या समोर ती कठोर परीक्षेची वेळ होती. त्यावर, सखोल विचार करीत आचार्यश्रींनी आपले अनुभव आणि विवेकाच्या आधारे साहसी निर्णय घेतला.

गोमटस्वामींचा मुख्य अभिषेक दिनांक १५ मार्च १९२५ ला होणार होता. तयारी चालू होती. श्री क्षेत्राच्या परंपरेनुसार तीर्थंकर नेमिनाथस्वामींची पंचकल्याणक पूजा चालू होती. तिसऱ्या दिवशी भगवंताच्या दीक्षाकल्याणकाच्या निमित्ताने शुभमुहूर्त पाहून तेथेच आचार्यश्रींनी आपले दीक्षागुरू मुनी देवेंद्रकीर्तींना दिगंबर मुनीच्या शास्त्रोक्त चर्येचे मर्म समजावून दिले आणि त्यांना पुन्हा दिगंबरी दीक्षा देऊन चारित्र्यशुद्धीच्या पथावर मार्गस्थ केले. त्याच वेळी आचार्यश्रींनी आपल्या संघस्थ क्षुल्लक श्री देवसेनगुरूलाही दिगंबरी दीक्षा देऊन मुनिपद प्रदान केले.

दीक्षेनंतर अखेरपर्यंत देवेंद्रप्पास्वामींविषयी आचार्यश्रींचा सन्मानजनक व्यवहार तसेच छलरहित अपूर्व वात्सल्य पूर्ववत राहिले. देवेंद्रप्पास्वामींना १०५ वर्षांचे आयुष्य होते. ते शेवटपर्यंत शांतिसागर महाराजांना आपल्या मनामध्ये गुरुरूपाने विराजमान करून त्यांची भक्ती करीत राहिले.

'परस्परोपग्रहो जीवानाम्'ची उदाहरणे संसारात खूप आहेत. परंतु, 'परस्परोपग्रहो साधूनाम्'चे अशा प्रकारचे अनुपम उदाहरण गोमटेश्वर भगवंताच्या चरणाशी घडले होते. ते त्याच्या पूर्वीही कधी घडले नव्हते आणि त्यानंतरही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कधी पाहण्यात वा ऐकण्यात आले नाही. हे 'न भूतो न भविष्यती'चे एकच आगळेवेगळे, वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण होते. खेदाची गोष्ट ही आहे की, वर्तमानातील पिंछीधारी महात्म्यांमधील अधिकांश महात्मे आपल्या आदिगुरुंद्वारे दिल्या गेलेल्या या मूलमंत्राची उपेक्षा करीत आहेत. आज आमच्या पूर्ण संतांमध्ये परस्परसाधर्मी-अनुराग पाहण्यासाठी श्रावकांचे मन व डोळे उत्सुक-अधीर असतात.

गोमटेश भगवंताची मूर्ती जगातील आठवे आश्चर्य मानले जाते. त्या दिवशी विंध्यगिरीवर जगातील आठव्या आश्चर्यासमोर विसाव्या शतकातील जैन इतिहासाचे हे प्रथम आश्चर्य ज्यांनी पाहिले; त्यांच्या नेत्रांचे सार्थक झाले. हे अनुपम दृश्य पाहून दर्शक आपल्या स्वतःला धन्य मानत होते. श्रवण-बेळगोळच्या भट्टारक स्वामीजींचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यांनी उत्सव साजरा केला. या आनंदाप्रीत्यर्थ सर्व गावांमध्ये अन्न आणि मिष्टान्न वाटले गेले.

प्रथमाचार्यांचा उत्तर भारतात मंगलविहार

श्रवणबेळगोळहून विहार केल्यानंतर दोन वर्षांनी सन १९२७ मध्ये आचार्यश्रींचा चातुर्मास श्रीक्षेत्र कुंभोज बाहुबलीमध्ये झाला. तेथे प्रतापगढ़निवासी मुंबई प्रवासी सेठ पूनमचंद घासीलाल जौहरी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या आग्रहावरून आचार्य श्री शांतिसागर महाराजांनी संघसहित शाश्वत तीर्थराज सम्मेदशिखरजीच्या वंदनेचा निश्चय केला. जौहरी कुटुंबीयांनी चतुर्विध संघाला या यात्रेसाठी आमंत्रित केले आणि सर्वांच्या उत्तम व्यवस्थेची जबाबदारीही घेतली. अष्टान्हिकानंतर मार्गशीर्ष प्रतिपदा १९२७ ला एका मोठ्या समुदायाबरोबर कुंभोजहून संघाचा मंगलविहार झाला.

त्या वेळी आचार्यश्रींच्या संघामध्ये मुनिश्री वीरसागरजी, नेमिसागरजी आणि अनंतकीर्तीजी हे तीन दिगंबर साधू होते. ऐनापूर, गोकाक शियापूरचे पायसागर नामधारी तीन ऐलक महाराज होते तसेच श्री मल्लिसागर, पायसागर आणि अनंतकीर्ती क्षुल्लक होते. श्री शांतिमती, चंद्रमती आणि अनंतमती नावाच्या तीन क्षुल्लिका तसेच अनेक ब्रह्मचारी आणि ब्रह्मचारिणी भगिनीसुद्धा संघाबरोबर विहार करीत होत्या. पूजा-आराधनेसाठी भगवान जिनेंद्राच्या समवसरणाचा श्री विहारसुद्धा बरोबर होतच होता.

मुनिविहाराची स्वतंत्रता

ब्रिटिश राजवटीच्या जमान्यात दिगंबर मुनींच्या विहारात जागोजागी अडचणी, संकटे, बाधा उपस्थित होत होत्या. ही सर्वत्र असलेली परिस्थिती पाहून आणि दूरगामी विचार करून शांतिसागर महाराजांनी स्वतः अत्यंत दक्षतेने,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सावधपणे देशाटन करून आपल्या मनोबलाने आणि आपल्या तपाच्या प्रभावाने त्या सर्व बाधांचा, संकटांचा नायनाट केला. अशा प्रकारे जैनांचा देव-शास्त्र-गुरूच्या आराधनेचा हक्क सुरक्षित ठेवण्यामध्ये त्यांचे विशेष योगदान, विशेष कार्य होते. त्यांच्या सिंहवृत्तीमुळेच सर्व देशामध्ये आमच्या मुनींचा बाधारहित विहार नेहमीसाठी शक्य झाला.

वास्तविक, दक्षिणेकडून उत्तर भारताच्या धरतीवर, भूमीवर विहार करण्याचे हे अभियान म्हणजे एक प्रकारची धार्मिक दिग्विजयाची यात्रा होती. ती फारच प्रभावशाली आणि सार्थक ठरली. उत्तर भारतामध्ये दिगंबर साधूंचा विहार म्हणजे लोकांसाठी सुखद आश्चर्य होते. मुनींच्या दर्शनासाठी आणि त्यांची वाणी ऐकण्यासाठी दूरदूरवरून लोक येत होते. दर्शन घेऊन स्वतःला धन्य मानत होते आणि संघाला आपल्याकडे घेऊन जाण्यासाठी आग्रहपूर्वक निवेदनही करीत होते.

उत्तर भारतीय जैनांच्या, श्रावक-श्राविकांच्या भाग्याने आचार्यश्रींनी १९२७ ते १९३६ पर्यंत १० वर्षे उत्तरेत विहार करून दूरदूरपर्यंत धर्मप्रचार केला. कटनी, ललितपूर, मथुरा, दिल्ली, जयपूर, ब्यावर, उदयपूर, गोरल आणि प्रतापगढमध्ये त्यांचे चातुर्मास झाले. ते अपूर्व धर्मप्रभावना करणारे ठरले.

या संघाच्या विहाराच्या माध्यमातून उत्तरेतील जनतेने कित्येक पिढ्यांनंतर दिगंबर गुरूंच्या दर्शनाने आपल्या नेत्रांना धन्य केले. त्यांच्या नेत्रांचे पारणे फिटले.

त्या मंगलविहाराचे वृत्तान्त, त्या मंगलविहाराच्या बातम्या देशभर कथेसारख्या विस्तृत लिहिल्या आणि वाचल्या गेल्या. तसेच पुराणकथांसारख्या आवडीने ऐकल्या गेल्या आणि आजही ऐकल्या जातात.

चारित्रचक्रवर्ती उपाधीने अलंकृत

उत्तर भारतातून परत आल्यानंतर आचार्यश्री शांतिसागरांचा सन १९३४ चा चातुर्मास श्री क्षेत्र गजपंथामध्ये झाला. या चातुर्मासाच्या निमित्ताने गजपंथामध्ये धर्मनिष्ठ श्रावक, श्रद्धाळू भक्त आणि विद्वानांचा अभूतपूर्व समागम झाला. चहूकडे संघाच्या उत्तर भारतातील दीर्घ प्रवासाची चर्चा सुरू होती. ज्यांनी प्रत्यक्ष पाहिले त्यांच्याकडून अनेक ठिकाणांचे वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रेरक प्रसंग तेथे ऐकवले जात होते. याच चातुर्मासात चतुर्विध संघाने, संघस्थ कृतज्ञ साधूंनी आणि प्रचंड संख्येने उपस्थित, हर्षातिरेकाने भारलेल्या, भक्तिविव्हल श्रावकांनी आपले परमगुरू आचार्यश्री शांतिसागर महाराजांना 'चारित्रचक्रवर्ती' उपाधीने अलंकृत केले. या उपाधीने आचार्यश्रींचा महिमा थोडाच वाढणार होता? त्यांचा महिमा तर चारही दिशांना पसरतच चालला होता, पण हो, त्यांच्या नावाचे सान्निध्य मिळाल्याने

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ही उपाधीच धन्य झाली. गजपंथाचे आकाश चारित्रचक्रवर्ती शांतिसागर महाराजांच्या जयजयकाराने दुमदुमले.

कालाच्या प्रत्येक समस्येचे समाधान

आचार्यश्रींनी धर्म आणि समाजासमोर आलेल्या अनेक समस्यांचे समयोचित समाधान केले. हजारो भटकणाऱ्या लोकांना मार्गावर आणले आणि लाखोंच्या संख्येमध्ये जनतेला व्यसनांपासून मुक्त होण्याची प्रेरणा देऊन त्यांच्यामध्ये सदाचाराचा आणि अहिंसामय धर्माचा प्रसार केला.

जिनवाणीच्या सेवेच्या क्षेत्रात समाजाला प्रेरणा देऊन आचार्यश्रींनी षट्खंड आगमाला ताम्रपत्रावर अंकित करवून हजारो वर्षांसाठी सुरक्षित करून ठेवले.

हरिजन मंदिर प्रवेश आंदोलन तसेच संसदेमध्ये हिंदू कोड बिलाच्या विरोधासाठी जवळजवळ तीन वर्षांपर्यंत अन्नत्याग करून त्या महान आचार्यांनी हे दाखवून दिले की, भगवान महावीरांचा जैन धर्म यद्यपि मानवमात्राचा धर्म आहे; तरीसुद्धा जैन धर्म एक स्वतंत्र धर्म आहे. तो कोणत्याही धर्माची शाखा नाही. तो भारताच्या प्राचीनतम धर्मांपैकी एक स्वतंत्र असा धर्म आहे. ज्याच्याजवळ मुनी आणि श्रावक दोघांच्या आचरणाची आपापली आचारसंहिता आहे आणि आराधनेच्या आपल्या परंपरा आहेत. इतर कोणालाही त्या आर्ष परंपरांमध्ये हस्तक्षेप करण्याची अनुमती, परवानगी दिली जाऊ शकत नाही. कोणत्याही जैनेतर व्यक्ती, संस्था किंवा सत्तेला असे करण्याचा कोणताही अधिकार नाही.

दिगंबर मुनिपरंपरेसाठी आचार्य शांतिसागरजींचे सर्वात मोठे योगदान हे झाले की, त्यांनी ३७ वर्षांपर्यंत आपल्या हस्ते सुयोग्य शिष्यांना दीक्षा देऊन मुनी, आर्यिका, क्षुल्लक, ब्रह्मचारी तसेच त्यागी श्रावक–श्राविकांचा एक मोठा चतुर्विध संघ तयार केला आणि त्यांना स्वत: आपल्या अनुशासनामध्ये साधना करवून अनुशासित मुनिसंघाचे एक आदर्श उदाहरण स्थापित केले. त्यांच्या या अवदानाने, कार्याने संघाच्या संदर्भात नंतरच्या मुनिवर्यांनासुद्धा मार्गदर्शन होत राहिले आहे.

आचार्यश्रींनी स्वत: उत्कृष्ट तपःसाधना करून मुनिजीवनाची सहजता आणि व्यावहारिकता सिद्ध करून दाखवली. सुमारे १० हजार उपवास करून त्यांनी आपल्या ४० वर्षांच्या साधनाकाळातील अधिकांश भाग निराहार व्यतीत केला. त्यांचे दीक्षेपूर्वीचे उपवास तसेच नंतरचे परिषहजन्य अंतराय आदी या गणनेमध्ये धरलेले नाहीत. सन १९२९ मध्ये ललितपूर चातुर्मासामध्ये त्यांच्याकडून केले गेलेले 'सिंहविक्रीडित व्रत' या दृष्टीने अनुपम आणि कठीणतम व्रत झाले. या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्रताची प्रक्रिया फार कठीण आहे. ज्या योग्यांनी क्षुधा-तृषा आणि निद्रेला जिंकून शरीराला आपल्या अधीन केले आहे, वश केले आहे आणि ज्यांच्या मनात जीवनाविषयी किंचितही ममत्व शेष राहिले नाही, असे अनुभवी साधक मुनीच हे व्रत धारण करण्याचे साहस करू शकतात. या व्रताची प्रक्रिया संक्षिप्तपणे अशी आहे :

'सिंहविक्रीडित व्रत' घेणाऱ्या साधकाला प्रथम एका उपवासानंतर दुसऱ्या दिवशी पारणे करावे लागते. त्यानंतर, दोन उपवासांनंतर पारणे करावे लागते. अशा प्रकारे उपवासाचा एकेक दिवस वाढवत लागोपाठ १४ उपवासांच्या नंतर एक पारणेपर्यंत व्रताचा आरोहण काल असतो. त्यानंतर, उपवासाचे दिवस कमीकमी करीत, घटवत अवरोहण सुरू होते. म्हणजे, चौदा उपवासांनंतर एक पारणे करून पुन्हा १३ उपवासांनंतर एक पारणे असे क्रमशः घटवत, १२, ११, १० असे उपवासांच्या अंतराने पारणे करीत साधक शेवटी एका उपवासानंतर पारणे करून व्रत समाप्त करतो.

आचार्यश्री शांतिसागर महाराजांच्या या अत्यंत कठीण साधनेने मुनिमार्गाबद्दल श्रद्धा नसलेल्या लोकांच्या मनामध्येसुद्धा श्रद्धेचे अंकुर फुटले. श्रद्धाळू श्रावकांना चारित्र्यसाधनेसाठी प्रेरित, उत्साहित केले आणि संपूर्ण भारतामध्ये जिनधर्माची व्यापक प्रभावना झाली. या व्रताच्या साधनेने जनमानसामध्ये त्यांना 'चारित्रचक्रवर्ती' अशा अश्रुतपूर्व उपाधीच्या योग्य बनवले.

समाधिसाधना

या नश्वर पर्यायाचा अंत निकट जाणून आचार्यश्रींनी समाधिसाधनेसाठी स्वतःला तयार केले. पूर्वी १२ वर्षांचे सल्लेखना व्रत घेतले होते. वास्तविक, तसे पाहता अर्धा काळही व्यतीत झाला नव्हता; परंतु त्यांच्या इंद्रिय शैथिल्याने विशेषतः दृष्टिमंदतेची प्रारंभिक लक्षणे पाहून त्यांना चर्या दूषित होण्याची शंका वाटत होती. दोन हजार वर्षांपूर्वी आचार्य समंतभद्रस्वामींनी व्रतधारींना आपल्या व्रतांच्या रक्षणासाठी अशा स्थितीमध्ये सल्लेखनाच एकमात्र मार्ग सांगितला होता.

उपसर्गे दुर्भिक्षे जरसि रुजायां च निष्प्रतीकारे ।
धर्माय तनुविमोचनमार्या सल्लेखनामार्याः हुः ।।

– (रत्नकरंड श्रावकाचार, श्लोक १२२)

उपसर्ग किंवा दुर्भिक्षाच्या वेळी, वृद्धावस्थेत शारीरिक दुर्बलता आल्याने किंवा असाध्य रोगाने ग्रसित झाल्यामुळे धर्माच्या रक्षणासाठी देहावरचे ममत्व सोडून मृत्यूला आलिंगन देणे, यालाच सल्लेखना म्हटले आहे.

परमविवेकी आणि भव-तन-भोगांच्या विषयी उत्कृष्ट वैराग्य धारण करणारे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या युगाचे प्रथमाचार्य श्री शांतिसागरजींनी आपल्या पतनशील शारीरिक स्थितीचे अवलोकन, आकलन करून शास्त्रोक्त पद्धतीने, क्रमाने सल्लेखना घेण्याचा निर्णय घेतला. मुनिमहाराज तर दिवसात तीन वेळा सामायिकाच्या वेळी जीवनाच्या अंतिम समयी समाधिमरण साधण्याची कामना करीतच असतात. जीवनभर आचार्यश्रींचा आहार नीरस आणि अत्यंत साधा, तसा अल्पच होता. मुनिदीक्षा घेण्यापूर्वीच त्यांनी दुधाशिवाय अन्य पाच रसांचा जीवनपर्यंतचा त्याग केला होता. समाधीच्या पाच वर्षांपूर्वीपासूनच आचार्यश्रींनी सल्लेखनेची तयारी प्रारंभ केली होती. सन १९५१ मध्ये गजपंथ येथे १२ वर्षांच्या उत्कृष्ट सल्लेखनेचा नियम घेतला. नंतर, १९५२ मध्ये फलटणनगरीमध्ये आजीवनपर्यंत अन्नाचा त्याग केला.

आता ते दिवसेंदिवस बाह्य जगापासून दूर होऊन अंतर्मुखी साधनेमध्ये संलग्न, रममाण होऊ लागले होते. चातुर्मासासाठी महाराजांकडून कधीच कोणती अट नसायची. पण, सन १९५४ मध्ये जेव्हा फलटणच्या समाजाने चातुर्मास करण्याचा आग्रह केला; तेव्हा त्यांनी एक अट ठेवली होती की, 'जर आमचा चातुर्मास येथे करवायचा असेल तर समाजातील प्रत्येक स्त्री-पुरुषाला दर दिवशी काही वेळ आत्म्याचे ध्यान करण्याचा नियम घ्यावा लागेल.' हा नियम तत्काळ देण्याची आचार्याश्रींची इच्छा स्पष्ट दिसत होती. याच फलटणच्या चातुर्मासात बहुतेक त्यांनी आपला पुढचा कार्यक्रम निश्चित केला होता. देशभूषण-कुलभूषण मुनींची निर्वाणभूमी श्री क्षेत्र कुंथलगिरी या सिद्धक्षेत्राची निवड त्यांनी आपल्या समाधिसाधनेसाठी केली होती. त्यांचा पुढचा चातुर्मास कुंथलगिरी क्षेत्रावर करण्याचे निश्चित ठरले.

सल्लेखना व्रताचा स्वीकार केला

समाजाला हा वृत्तान्त समजला होता की, महाराज सल्लेखना घेण्याच्या दिशेने पुढे पाऊल टाकत आहेत. परंतु, कुंथलगिरीमध्ये १९५५ च्या चातुर्मासाची स्थापना झाली की, तत्काळ तेथे देशभरातून त्यांच्या हजारो भक्तांचे आवागमन सुरू झाले. प्रथम भाद्रपद कृष्ण एकादशी, रविवार दिनांक २४ ऑगस्ट १९५५ ला आचार्यश्रींनी सल्लेखना व्रताचा संकल्प केला. नंतर, आगमाच्या आज्ञेनुसार सल्लेखनेच्या निराकुल साधनेसाठी युगाचे प्रथमाचार्य चारित्रचक्रवर्ती महामुनी श्री शांतिसागर महाराजांनी प्रथम भाद्रपद शुक्ल सप्तमी संवत २०१२, बुधवारी आचार्यपदाचा परित्याग केला. आपला आशीर्वाद पाठवून त्यांनी आपले प्रथम दीक्षित प्रिय शिष्य ३७ वर्षांपासून साधनारत असलेले महामुनी वीरसागरजी महाराजांना त्या पदावर प्रतिष्ठित करून आपल्या परंपरेचे प्रथम पट्टाचार्य बनवले. अशा प्रकारे त्यांनी स्वतःला संघाच्या कर्तव्यापासूनसुद्धा मुक्त करून घेतले. आता ते सर्व बाजूंनी निराकुल झाले होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अखेर, आपल्या ८४ वर्षांच्या आयुष्यात त्या महान महात्म्याने आगमानुसारी विधिपूर्वक १८ सप्टेंबर १९५५ ला सल्लेखना व्रताचा स्वीकार केला. दुधाशिवाय अन्य पाचही रसांचा त्याग तर ३१ वर्षांपूर्वी आचार्यपद धारण करतेवेळीच केला होता. अन्नाचा त्याग करूनही तीन वर्षे झाली होती. आता क्रमशः सीमित पदार्थ, फळे, दूध, ताक आणि पाणी वगैरेंच्या त्यागाची प्रक्रिया प्रारंभ झाली. १४ ऑगस्टला आचार्यश्रींचा अंतिम आहार झाला. त्या दिवशी दुपारच्या वेळी त्यांनी पाण्याशिवाय अन्य सर्व खाद्य आणि पेय वस्तूंचा आजीवन त्याग करून 'यमसल्लेखना' घेतली.

२८ ऑगस्टला त्यांच्या यशदायी हातांनी संघस्थ ब्रह्मचारी भरमप्पाजींना क्षुल्लक दीक्षा प्राप्त झाली. या दीक्षेबरोबर सुमारे ३६ वर्षांपासून चालत आलेल्या आचार्यश्रींच्या 'चारित्र्यदानयज्ञा'ची जणू काही अंतिम आहुती त्यांच्या हाताने संपन्न झाली. नंतर, ४ सप्टेंबर, रविवारी चार ओंजळी पाणी ग्रहण केल्यानंतर आचार्यश्रींनी पाण्याचाही अखेरपर्यंत त्याग केला.

अस्तंगत झाला तो अनुपम सूर्य

पुढच्या १४ दिवसांपर्यंत चारित्रचक्रवर्ती महाराजांच्या निर्मल आत्म्याने त्या तपःपूत देहामध्ये निर्जल अवस्थेमध्येही सानंद निवास केला. जीवनाची सुंदर समाप्ती आणि मरणाचे सोत्साह वरण करण्याचे जे दुर्लभ दृश्य आचार्यश्रींच्या स्वर्गारोहणाच्या वेळी पाहायला मिळाले; ते त्यांच्या साधना मंदिरावर चमचमणाऱ्या स्वर्णकलशाप्रमाणे होते. जगामध्ये प्रत्येक सूर्याचा वेळेवर अस्त होणे स्वाभाविक असते, या विधानानुसार पाच आठवड्यांच्या प्रशांत समाधिसाधनेनंतर द्वितीय भाद्रपद शुक्ल द्वितीया, रविवार, १८ सप्टेंबर १९५५ ला प्रातःकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी अमृतसिद्धी योगावर महामंत्राचा जप करीतकरीत त्या वीतरागी परमगुरू महात्म्याच्या महान आत्म्याने नश्वर देहातून स्वतंत्र होऊन देवलोकाकडे प्रस्थान केले.

आचार्यश्रींच्या या दुर्लभ समाधिसाधनेच्या वेळी त्यांच्या अनेक शिष्यांसहित नांदणीचे भट्टारक श्री जिनसेन स्वामी तसेच कोल्हापूर मठाचे श्री लक्ष्मीसेन स्वामी हे भट्टारक शेवटपर्यंत त्यांच्या सेवेमध्ये तत्पर होते. लक्ष्मीसेन स्वामींनीच अंत्येष्टीच्या औपचारिकतांचे निर्देशन केले.

येथे हे विशेष प्रकारे उल्लेखनीय आहे की, चारित्रचक्रवर्ती आचार्य शांतिसागरजींनी आपल्या ४० वर्षांच्या दीर्घ साधनाकालामध्ये अनेक भट्टारकांच्या क्रियाकलापांचा, बृहत् कार्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. त्यांची सदैव भट्टारकांवर वात्सल्यदृष्टी होती आणि सल्लेखनेच्या वेळी एक नाही दोन-दोन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भट्टारक महानुभावांना आपल्याजवळ राहण्याची अनुमती दिली होती. जिनसेन स्वामीजी तर पहिल्यापासूनच त्यांच्याजवळ होते आणि सल्लेखनेच्या वेळी कोल्हापूर मठाचे श्री लक्ष्मीसेन स्वामीजी पण महाराजांच्या सेवेसाठी तेथे पोहोचले होते. अंतिम समयी त्या भट्टारकांच्या माध्यमातून आचार्यश्रींनी पूर्ण भट्टारकवर्गालाच हा आशीर्वाद दिला होता की, 'धर्माचे रक्षण करीत रहा, समाजाचे रक्षण करीत राहा आणि साधुसंतांचे रक्षण करीत राहा.'

आचार्यश्रींचा हा मंगल आशीर्वाद भट्टारक परंपरेवर असलेल्या त्यांच्या विश्वासाचे प्रमाणपत्र होते. हा केवळ आशीर्वाद नव्हता. या तीन वाक्यांमध्ये युगाच्या त्या महान संताची ही स्पष्ट आज्ञा वर्तमान भट्टारक संप्रदायाची धार्मिक आस्था, कार्यकुशलता, कौतुकास्पद कर्मठता आणि जैन-जैनेतर जनतेवरील त्यांच्या प्रभावाचे आकलन करून त्यांना दिली गेली होती. आचार्यश्रींनी भट्टारकवर्गाकडून तीच अपेक्षा केली होती. भट्टारकवर्ग शेकडो वर्षांपासून ती पूर्ण करीत आला होता. समाधानाची बाब आहे की, आचार्यश्रींच्या पश्चातही त्यांच्या परंपरेचे सर्व पूज्य आचार्य आणि मुनिजनांनी भट्टारकवर्गाविषयी तसेच वात्सल्य ठेवलेले आहे. ते सर्व त्याचे सौजन्याने पालन करीत आहेत, हे पाहून अत्यंत समाधान होते. वर्तमान भट्टारकगणसुद्धा जिनशासनाच्या सेवेसाठी कौतुकास्पद कार्य करीत असता आपल्या गौरवपूर्ण परंपरेचे यश वृद्धिंगत करीत आहेत.

चारित्रचक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागरजी अपार महिमावंत संत होते. त्यांच्या जीवनात कोणत्याच प्रकारचा पंथ-व्यामोह किंवा आग्रह नव्हता. संपूर्ण देशभरात जेथे-जेथे त्यांनी विहार केला; तेथे-तेथे परस्पर प्रेमाचा प्रसाद वितरण केला आणि धर्मोपदेशाबरोबर वात्सल्याचेही शिक्षण दिले. कोणत्याही पूजा प्रभावनेच्या पद्धतीचे कधीच खंडणमंडण केले नाही. ते तोडण्यावर नाही तर जोडण्यावर विश्वास ठेवत होते. त्यांना मान्य होते की, साधू असो वा श्रावक; जर त्यांच्यामध्ये साधर्मीयांविषयी निश्छल वात्सल्याची भावना नसेल तर त्याचे सम्यग्ज्ञान पंगू आहे. ते मोक्षमार्गासाठी कार्यकारी नाही.

आचार्यश्रींच्या समोर वीसपंथ आणि तेरापंथ दोनही समाज होते. दोन्ही पंथ त्यांना समानरूपाने वंदनीय मानत होते आणि समानरूपानेच त्यांना आशीर्वाद प्राप्त होत होता. त्यांची मान्यता होती की, हे श्रावकांचे भेद आहेत. मुनींनी यांच्या पक्ष-विपक्षात पडू नये. मुनींचा पंथ तर मोक्षपंथ आहे. तो या दोन्हींपेक्षा वर आहे, वेगळा आहे. जेव्हा सर्व वेश निघून जातात; तेव्हा दिगंबर वेश प्रकट होतो आणि जेव्हा सर्व पंथ-संप्रदायांचा पक्ष समाप्त होतो; तेव्हा मोक्षपंथाची यात्रा प्रारंभ होते. ब्यावरमध्ये चारित्रचक्रवर्ती आचार्य शांतिसागरजींनी उत्तर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भारतातील महान आचार्य श्री शांतिसागरजी 'छाणी' महाराजांबरोबर गौरवपूर्ण चातुर्मास साधना केली होती. त्या अनुपम प्रसंगाच्या वेळी दोन्ही पूज्य आचार्यांनी दोन्ही पंथांविषयी आपली सहिष्णुता स्पष्ट रूपाने व्यक्त करून सखोलतेने अधोरेखित केली.

निःस्पृह आणि अवडंबररहित साधेपणाने युक्त जीवनामध्ये आपल्या दुर्धर, कठीण तपश्चरण आणि समतासिक्त सरळ व्यवहाराने पूज्य आचार्यश्रींनी पूर्ण शतकालाच प्रभावित केले होते. त्यांचा प्रत्येक श्वास कोणा पुण्यश्लोकाप्रमाणे अर्थपूर्ण होता. १९२५ मध्ये श्रवणबेळगोळच्या यात्रेपासून १९५५ मधील सल्लेखनेच्या साधनेपर्यंतच्या ३० वर्षांच्या प्रत्येक दिवसाच्या आठवणींना घेऊन त्यांच्या महानतेवर एकेक अध्याय लिहिला जाऊ शकतो.

अद्वितीय संताचा अंतिम आशीर्वाद

आचार्यश्रींचे आशीर्वाद संक्षिप्त असायचे; पण हितकर सल्ला आणि परिपूर्ण मार्गदर्शनाने युक्त असायचे. सल्लेखना चालू असताना त्यांचा जो अंतिम उपदेश, संदेश टेप केला गेला; तो त्या दयाळू संताची एक अनमोल ठेव म्हणून आमच्याजवळ आहे. महान संताचे ते प्रेरणादायी अंतिम संबोधन आमच्या कित्येक पिढ्यांना मार्गदर्शन करू शकते. त्या संदेशातील प्रत्येक शब्दात लहानमोठ्या प्रत्येकासाठी त्यांची करुणा आणि मंगल मनीषेचा रस भरलेला आहे. ते स्वतःच स्वतःमध्ये एक परिपूर्ण शास्त्र आहेत. आम्ही जर त्यातील एक अंशसुद्धा ग्रहण करू शकलो, आचरणात आणू शकलो तरी आमचे जीवन सार्थक होऊ शकते. त्याच्या दोनच ओळी पाहा- ''बाकी सर्व सोडा, सत्य-अहिंसा पाळा. सत्यामध्ये सम्यक्त्व होते व अहिंसेमध्ये सर्व जीवांचे रक्षण होते म्हणून हा व्यवहार पाळा. त्यामुळे कल्याण होते.''

आचार्यश्रींच्या या दिव्य अवदानामुळे, कार्यामुळे आज समाधीच्या ५०-६० वर्षांनंतरही सबंध देशात त्यांची कीर्ती पसरत आहे. जैन धर्माच्या इतिहासामध्ये हे तथ्य सदैव स्वर्णाक्षरांनी अंकित राहील की :

दक्षिणेपासून ते उत्तरेपर्यंत संपूर्ण देशामध्ये जिन धर्माची ध्वजा फडकवणारे, युग संस्थापक प्रथमाचार्य, परमपूज्य, चारित्रचक्रवर्ती श्री शांतिसागर महाराज अचेलक धर्माचे शिरोमणी आराधक झाले आहेत.

विसाव्या शतकात त्यांच्यासारखा अन्य साधक झाला नाही. त्यांच्या कीर्तीचा सूर्य निःसंदेह शेकडो वर्षांपर्यंत चमकत राहील.

या ग्रंथाची भूमिका

या ग्रंथाचे रचनाकार पूज्य मुनिश्री कुंथुसागरजी यांनी श्रद्धा-भक्तिपूर्वक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ललित 'संस्कृत' भाषेत या ग्रंथाची सुंदर रचना केली. चारित्रचक्रवर्ती आचार्य शांतिसागर महाराजांकडून त्यांनी दीक्षा घेतली होती. हे आचार्य कुंथुसागर चारित्रचक्रवर्तींचे चरणानुरागी असून विशेष कृपापात्र शिष्य होते. दक्षिणेतील ऐनापूर गावात कार्तिक शुक्ल बीज, वीर संवत २४२० ला त्यांचा जन्म झाला. त्यांचे नाव रामचंद्र होते. सन १९२५ मध्ये आचार्यश्रींनी श्रवणबेळगोळमध्ये क्षुल्लक दीक्षा देऊन त्यांना संघात प्रवेश दिला होता. थोड्या अभ्यासानंतर ते ऐलक झाले आणि १९२९ मध्ये संघाच्या उत्तर भारतातील विहाराच्या वेळी सिद्धक्षेत्र सोनागिरीमध्ये चंद्रप्रभू भगवंताच्या चरणी आचार्यश्रींकडून त्यांनी दिगंबरी दीक्षा घेतली. ते मुनिश्री कुंथुसागर नावाने विख्यात झाले. दीक्षेपूर्वी रामचंद्राचे काही विशेष शिक्षण झाले नव्हते; पण त्यांच्यात धार्मिक संस्कारांची प्रबलता होती. साधनेच्या क्षेत्रात ते फारच विनम्र, परिश्रमी, ध्येयनिष्ठ साधक दिसून आले. संस्कृत व्याकरण आणि साहित्याचा त्यांनी चांगला अभ्यास केला. म्हणून, थोड्याच अवधित ते संस्कृत काव्यरचनेत निपुण झाले. ते विद्वान मुनींच्या रूपाने प्रसिद्धीस आले. त्यांनी रचलेले सुमारे ४० छोटेमोठे ग्रंथ प्रकाशित आहेत.

कुंथुसागर महाराज शीघ्रकवीप्रमाणे तत्काळ श्लोक रचत असत. संघाच्या यात्रेचे वर्णनसुद्धा सुंदर अनुष्टुप श्लोकांमध्ये गुंफून ते आपल्या डायरीत लिहीत होते. त्याच श्लोकांना संपादित करून त्यांनी प्रस्तुत ग्रंथ 'चारित्रचक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागर चरित्रम्'ची रचना केली होती. हा ग्रंथ त्यांच्या गुरूभक्तीचे प्रतीक तर आहेच; पण काव्य कुशलता आणि इतिहास कौशल्याचेही चांगले उदाहरण आहे. वाईट याचे वाटते की, मुनिश्रींच्या अवेळी आणि आकस्मिक देहावसानाने ते चरित्र 'अर्धकथानक'च होऊन राहिले. जर ते आणखी चार वर्षे संघामध्ये असते; तर चारित्रचक्रवर्तीजींच्या अखेरच्या वर्षांचेसुद्धा अधिक प्रामाणिक आणि अधिक विस्तृत विवरण आपल्याला मिळाले असते.

उत्तर महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये कुंथुसागर महाराजांना विशेष मान्यता होती. त्यांच्याकडून सदाचाराचा विशेष प्रचार झाला. अनेक राजेरजवाड्यांनीसुद्धा त्यांच्या उपदेशाने पशुबळी, मांस-मदिरा तसेच धर्माच्या नावावर होणारी हिंसा बंद केली होती. कित्येक राजघराण्यांना त्यांनी शिकारीचा त्याग करायला लावून शाकाहाराकडे वळवले होते. १९४५ मध्ये काही मुनींचे संघनायक बनून ते ईडरकडे विहार करीत असता मेवाडच्या सीमेवर आले; तेव्हा रस्त्यात कोणा विषारी कांट्याच्या संपर्काने त्यांच्या शरीरामध्ये विष पसरले गेले. धरियावदमध्ये त्यांच्यावर उपचार केला गेला. त्याचा फारच थोड्या प्रमाणात उपयोग, इलाज झाला होता. पण, तेव्हाच विषाचा प्रभाव निष्प्रतिकार जाणून त्यांनी ५१ वर्षांच्या अल्पायूमध्येच जीवनाच्या आशेचा त्याग करून वीरतापूर्वक सल्लेखना ग्रहण केली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१ जुलै १९४५ (२००१ विक्रमाब्द) ला तेथेच त्यांचे समाधिमरण झाले.

मोठ्या संख्येने जैन आणि जैनेतर जनता त्यांच्या अंत्यक्रियेच्या वेळी चितेवर श्रीफळ चढवण्यासाठी हजर होती. नदीच्या ज्या घाटावर त्यांचे अस्थिविसर्जन केले गेले; त्या स्थानावर मासेमारीच्या निषेधाप्रीत्यर्थ राजाज्ञा शिलांकित करून लावली गेली. मुनिश्रींचा स्मृतिस्तंभ बनलेली ती शिळा आजही येणाऱ्याजाणाऱ्यांना त्यांची स्मृती देत राहाते.

कृतज्ञता ज्ञापन

हे वर्ष २००३-०४ परमपूज्य प्रथमाचार्य चारित्रचक्रवर्ती श्री शांतिसागरजी महाराजांच्या जन्माचे १३१ वे वर्ष आहे. शांतिसागर महाराज विसाव्या शताब्दीचे प्रथम दिगंबर आचार्य आणि दिगंबर मुनिपरंपरेचे उन्नायक महर्षी होते. त्यांची चर्या पूर्णपणे आगमोक्त आणि निष्कलंक होती. ते वायूसमान निर्लेप आणि चंद्रासमान प्राणिमात्राला शीतलता प्रदान करणारे, या गुणांचे अद्वितीय महात्मा होते. ज्याप्रमाणे गंगेची प्रत्येक धारा हिमालयातून निघते; त्याच प्रकारे वर्तमान युगातील सर्व पूज्य दिगंबर संतांचा प्रादुर्भाव मूलतः चारित्रचक्रवर्ती आचार्य शांतिसागरजी महाराजांच्या परंपरेतून झाला आहे.

जैन इतिहासाचे असे जाज्वल्यमान नक्षत्र चारित्रचक्रवर्ती श्री शांतिसागरजी महाराजांची १३१ वी जन्म-जयंती लोकांच्या हृदयावर अंकित करणाऱ्या पावन उद्देशाने पूज्य आचार्यश्री विद्यानंदजी मुनिराजांनी हे वर्ष 'संयमोत्सव वर्ष' म्हणून साजरे करण्याची प्रेरणा गतवर्षी दिली होती. संपूर्ण देशातील समाजाने त्यांचा आदेश मस्तक नमवून स्वीकारला आणि गावागावांमध्ये महाराजांचे नाव सर्वतोमुखी होण्यासाठी समाज सक्रिय झाला. पूर्वांचलामध्ये आसाम, बंगाल, बिहार आणि ओरिसापासून उत्तर प्रदेश, दिल्ली प्रांत, राजस्थान, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळपर्यंत चारित्रचक्रवर्ती महाराजांच्या यशाला मूर्त स्वरूप देण्यासाठी तऱ्हेतऱ्हेचे आयोजन केले गेले. अन्य ठिकाणीही काही योजनांना साकार करण्याचे प्रयत्न झाले.

आचार्यश्री विद्यानंद महाराजांनी गेल्या ३० वर्षांत वेळोवेळी धर्मप्रभावनेसाठी समाजाला अनेक उपयोगी सल्ले दिले आहेत. १९७३-७४ मध्ये महावीर निर्वाण वर्षाचे आयोजन, १९८१ मध्ये गोमटेश्वर बाहुबली सहस्राब्दी स्थापना आणि महामस्तकाभिषेक महोत्सव, १९९५ मध्ये आचार्य कुंदकुंद द्विसहस्राब्दी महोत्सव आणि १९९८ मध्ये चांदनपूर महावीर प्राकट्य सहस्राब्दी महोत्सवाच्या आयोजनांना आचार्यश्रींच्या दिव्यावदानाच्या रूपाने स्मरण केले जाईल. अशा राष्ट्रीय स्तराच्या आयोजनांसाठी फक्त उपदेश देऊन किंवा मात्र प्रेरणा देऊन ते

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कधी संतुष्ट झाले नाहीत. विशेषत: प्रत्येक ठिकाणी त्यांचे साक्षात मार्गदर्शन आणि गौरवपूर्ण उपस्थितीतून मिळणाऱ्या सक्रिय सहयोगाचे या सर्व आयोजनांना सफलतेच्या शिखरापर्यंत पोहोचवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे.

आचार्यश्रींनी काही वर्षांपूर्वी १२ वर्षांचे नियम सल्लेखना व्रत ग्रहण केले आहे. आता त्याच साधनेमध्ये त्यांचा अधिकांश वेळ व्यतीत होत आहे. पण, अजून त्यांच्याकडून खूप कार्ये होणार आहेत. धर्माची प्रभावना करणारी कार्ये आणि अनेक सूचना किंवा त्यांना कार्यान्वित करण्याची प्रेरणा अजूनही आचार्यश्री विद्यानंदजी महाराजांकडून समाजाला मिळत राहावी, अशी अपेक्षा आहे. कुंदकुंद भारतीमध्ये खारवेल-भवन अस्तित्वात आले आहे. म्हणून, आता राष्ट्रीय स्तरावर खारवेल महोत्सवाला प्राथमिकता असायला हवी. आचार्यश्री या युगाचे 'प्रभावनाचार्य' आहेत. अनेक राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांच्या रूपाने राष्ट्राची सत्ता संतांच्या चरणी झुकत राहावी, असे प्रभावक दिगंबर संत एकच आहेत आणि ते आहेत मुनिश्री विद्यानंदजी महाराज!

पुण्यपुरुष प्रथमाचार्य श्री शांतिसागरजींच्या दिव्य अवदानाला रेखांकित करणाऱ्या या 'संयम-वर्षा'मध्ये त्या महामुनींच्या पावन चरणावर हे अक्षर-अर्घ्य समर्पित करण्याचे साहस मी केले आहे. या प्रयत्नात 'दक्षिणोदित धर्मसूर्या'चे रचयिता पूज्य मुनिश्री समतासागरजी, 'ऐसे थे चारित्रचक्रवर्ती'ची लेखिका पूज्य विशुद्धमती माताजी आणि 'चारित्रचक्रवर्ती' तसेच 'आध्यात्मिक ज्योती'चे यशस्वी लेखक स्व.श्री. सुमेरूचंद्र 'दिवाकर' यांच्या रचनांमुळे मला जी सहायता मिळाली आहे; त्यासाठी मी त्या सर्वांचा आभारी आहे आणि या लेखनाचे प्रेरणास्रोत पूज्य आचार्यश्री विद्यानंद महाराजांच्या चरणी कृतज्ञतापूर्वक नमन करीत आहे.

शांती सदन, सतना — संत चरणानुरागी
वीर निर्वाण संवत २०३१ — – नीरज जैन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनुक्रम

श्री गुरवे नमः – साहू रमेशचंद्र जैन १५
प्रस्तावना – श्री. नीरज जैन १८
प्रथम अध्याय ४९
द्वितीय अध्याय ६५
तृतीय अध्याय ७१
चतुर्थ अध्याय ८१
ग्रंथात प्रयुक्त विशिष्ट पारिभाषिक शब्द ८७
आचार्य शांतिसागरांचे अंतिम प्रवचन ९१
महाश्रमण आचार्यश्री शांतिसागर मुनी ९४
प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी महाराज १०५
ऐनापूरचे आचार्यश्री कुंथुसागर महाराज १०८
आचार्यश्री शांतिसागर मुनिराजांचा भट्टारक-परंपरेवरील विश्वास .. ११३
आचार्यश्री शांतिसागरांची प्रवचनशैली ११५
आचार्यश्री पायसागर महाराज ११७
निजाम स्टेट में दि.जैन मुनिविहार का स्वातंत्र्य १२५
आचार्यश्रींच्या जीवनावरील वेधक प्रसंग १३९
सन्माननीय अर्थसहयोगी १४७

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पट्टाचार्य पदासाठीचे आज्ञापत्र

श्रीसिद्धक्षेत्र कुंथलगिरी
दि. २४-८-५५

स्वस्तिश्री चारित्रचक्रवर्ती १०८ आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांच्या आज्ञेनुसार हे 'आचार्य' पदवी-प्रदान-पत्र लिहिले जात आहे.

"आम्ही प्रथम (अधिक) भाद्रपद वद्य ११ (आपल्याकडील पंचांगाप्रमाणे श्रावण वद्य ११) रविवार दि. १४-८-५५ पासून सल्लेखनाव्रत घेतले आहे. म्हणून, दिगंबर जैन धर्म आणि श्री कुन्द-कुन्दाचार्य-परंपरागत दिगंबर जैन आम्नायाचे निर्दोषपणे व अखंडरीतीने संरक्षण तथा संवर्धन करण्यासाठी आम्ही आमचे प्रथम शिष्य श्री मुनिराज वीरसागरजी यांना आशीर्वादपूर्वक आज प्रथम भाद्रपद शुक्ल ७ विक्रम संवत २०११ बुधवार रोजी प्रभातसमयी त्रियोग शुद्धिपूर्वक संतोषाने 'आचार्य'पद प्रदान करीत आहोत."

यानंतर, प.पू. आचार्य महाराजांनी पूज्य वीरसागर महाराजांना पुढीलप्रमाणे आदेश पाठविला आहे-

"हे पद ग्रहण करून तुम्ही दिगंबर जैन धर्म आणि चतुर्विध संघ यांचे आगमानुसार संरक्षण व संवर्धन करावे, अशी आमची आज्ञा आहे."

आचार्य महाराजांनी आपणास शुभाशीर्वाद कळविला आहे. इति वर्धतां जिनशासनम्।

आमचा त्रिवार नमोस्तु!

द. गेंदनमल व चंदुलाल ज्योतीचंद

याचबरोबर जयपूर येथील पंतांनाही एक पत्र आचार्य महाराजांनी लिहावयास सांगितले. ते पुढीलप्रमाणे-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्रीक्षेत्र कुंथलगिरी
दि. २४-८-५५

स्वस्तिश्री सकल दि. जैन पंचान. (श्रावक मंडळी) जयपूर, यांसी धर्मस्नेहपूर्वक जयजिनेंद्र

आज प्रभातसमयी प.पू. चारित्रचक्रवर्ती १०८ श्री शांतिसागर महाराजांनी प.पू. १०८ मुनिराज श्री वीरसागरजींना 'आचार्य'पद प्रदान केल्याची घोषणा केली आहे. या विषयाला स्पष्ट करणाऱ्या आज्ञापत्राची एक प्रत यासोबत पाठवीत आहोत. ते पत्र चतुर्विध संघाला एकत्र करून वाचून दाखवावे.

विशेष- प.पू. आचार्य महाराजांनी याबरोबर अशीही आज्ञा दिली आहे की 'आजपासून धार्मिक समाजाने त्यांना (श्री १०८ वीरसागर महाराजांना) यापुढे 'आचार्य' मानून त्यांच्या आज्ञेचे पालन करावे.'

द. गेंदनमल व चंदुलाल ज्योतीचंद

आचार्यश्रींच्या या आदेशानुसार जयपूर निवासी श्रावकगणांनी चारित्र्यशुद्धि-विधानपूर्वक मोठ्या समारोहाने दि. ८-९-५५ रोजी आचार्यश्रींकडून आलेले आज्ञापत्र व नवी पिंछी-कमंडलू ही संयमोपकरणे पूज्यश्री वीरसागर महाराजांना सादर समर्पित केली. अनेक गावोगावचे प्रमुख जैन व अन्यही धीमान व श्रीमान या महत्त्वपूर्ण समारंभासाठी त्या दिवशी जयपूरला एकत्र आले होते. सर्वांनी आचार्यश्रींच्या या निर्णयाचे व आज्ञेचे हार्दिक स्वागत केले. ज्ञान, चारित्र्य, तप, वय व धर्मप्रभावनेच्या नेतृत्वास आवश्यक असणाऱ्या इतर अनेक गोष्टी या सर्वच दृष्टीने अखिल जैन समाजाला आचार्यश्रींचा हा निर्णय ऐकून अत्यंत आनंद झाला.

पूज्यश्री वीरसागर महाराजांनी आपली लघुता प्रकट करून केवळ गुरूंची आज्ञा म्हणून दिलेल्या आचार्यपदाचा सविनय स्वीकार केला.

अनु.- जवाहीर रावजी शहा
(सन्मतीमधून साभार)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

।। श्री वीतरागाय नमः ।।

आचार्यश्रीकुंथुसागरविरचितम्

आचार्यश्रीशांतिसागरचरितम्

अथ प्रथम अध्याय

मंगलाचरण

मरुदेव्या जगन्मातुर्नाभिभूपाज्जगत्पितुः ।
धर्ममूर्तिर्दयासिन्धुर्जातश्च वृषभेश्वरः ।।

जगन्माता मरुदेवी आणि जगत्पिता राजा नाभिरायाचे पुत्र प्रथम तीर्थंकर भगवान वृषभदेव स्वामी साक्षात धर्ममूर्ती होते आणि ते दयेचे परमसागर होते.

प्रथम संधी

नमस्कृत्य जिनं शांन्तिं सूरिं श्री शान्तिसागरम् ।
वैराग्यवर्द्धकं वक्ष्ये गुरुवर्यचरित्रकम् ।।१।।

मी सोळावे तीर्थंकर भगवान शांतिनाथांना नमस्कार करून माझे दीक्षाप्रदाता गुरुवर्य आचार्यश्री शांतिसागरांना नमस्कार करतो आणि त्या पूज्य श्री गुरूंचे वैराग्य वाढवणारे जीवनचरित्र कथन करतो.

शांतिसागरयोगीन्द्र चरित्रं पापनाशकम् ।
पूतं भव्यजनानन्ददायकं बोधवर्द्धकम् ।।२।।

आचार्यश्री शांतिसागरांचे जीवनचरित्र पापांना नष्ट करणारे, अत्यंत पवित्र, भव्यजीवांना आनंद देणारे आणि सम्यग्ज्ञान वाढवणारे आहे.

असंख्यातेषु द्वीपेषु जम्बूद्वीपो वरो मतः ।
तत्रापि भरतक्षेत्रस्यार्यखण्डं मनोहरम् ।।३।।

असंख्यात द्वीपांमध्ये जंबूद्वीप श्रेष्ठ आहे. त्यातही भरतक्षेत्रातील आर्यखंड (भारतवर्ष) अत्यंत मनोहर आहे.

तत्रापि बहवो देशा धर्मकर्मपरायणाः ।
किन्तु दक्षिणदेशश्च श्रेष्ठो धर्मप्रपालकः ।।४।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्या आर्यखंडामध्ये धर्म-कर्मामध्ये तत्पर असणारे खूप देश आहेत. परंतु, धर्माचे पालन करणारा दक्षिण देश त्या सर्वांमध्ये श्रेष्ठ आहे.

भीमगौड पाटील यांचे जन्म गाव

तत्र भोजपुरं ग्रामं बेळग्रामसमीपगम् ।
सुन्दरं श्रीजिनागारं शिखरैः सद्ध्वजैरपि ।।५।।

त्या (दक्षिण देश-कर्नाटक) मध्ये बेळगावजवळ एक भोजपूर नावाचे गाव आहे. ते जिनभवनांच्या शिखरांनी तसेच श्रेष्ठ ध्वजांनी अत्यंत सुशोभित आहे.

धान्यादिशोभितैः क्षेत्रैर्वृक्षैः परमसुन्दरैः ।
उच्चैर्धरैः पयोयुक्तनदीभिश्चित्तहारकम् ।।६।।

ते भोजगाव धान्यादिकादीने सुशोभित होणाऱ्या शेतांनी, अत्यंत सुंदर वृक्षांनी, उंच-उंच पर्वतांनी आणि पाण्याने तुडुंब भरलेल्या वेदगंगा-दूधगंगा या नद्यांनी युक्त असून अत्यंत रमणीय आहे.

तस्मिन् भोजपुरेप्यस्ति शुद्धजातिश्चतुर्थिका ।
मोक्षमार्गरता नित्यं धर्मकर्मपरायणा ।।७।।

त्या भोजपूरमध्ये मोक्षमार्गावर चालणारी आणि नित्य धर्म-कर्मामध्ये तत्पर चतुर्थ (क्षत्रिय) नावाची शुद्ध जात राहते आहे.

पाटीलकुलजस्तत्र विख्यातो भुवि सुन्दरः ।
भीमगौडः सुधर्मज्ञो जिनपूजापरायणः ।।८।।

त्या चतुर्थ (क्षत्रिय) जातीमध्ये पाटील कुलोत्पन्न, दूरदूरपर्यंत प्रसिद्ध, सुंदर जिन धर्माचे ज्ञाता तसेच जिनपूजेमध्ये तत्पर श्री. भीमगौड राहत होते.

सती सत्यवती

तस्य पत्नी प्रिया जाता श्रेष्ठपुत्रप्रदा सती ।
नाम्ना सत्यवती रम्या वरभाग्यवती परा ।।९।।

त्यांच्या धर्मपत्नीचे नाव श्रीमती सत्यवती होते; जी अत्यंत प्रिय, श्रेष्ठ पुत्रांची जननी, पतिपरायणा, मनोहर आणि श्रेष्ठ सौभाग्यवती होती.

चत्वारश्च तयोः पुत्रा जातास्ते पुण्यशालिनः ।
देवगौड आदिगौडः सातगौडस्तृतीयकः ।।१०।।
कुमगौडश्चतुर्थोऽस्ति सर्वे धर्मपरायणाः ।
तेषु श्रीसातगौडाख्यो जातो नरशिरोमणिः ।।११।।

त्या दोघांना देवगौड, आदिगौड, सातगौड आणि कुमगौड नावाचे पुण्यात्मा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तसेच धार्मिक चार पुत्र झाले. या चार पुत्रांमध्येही तिसरा सातगौडानामक पुत्र मनुष्यांमध्ये शिरोमणी आहे.

जन्मभूमी अतिशय तीर्थरूप क्षेत्र

वीरे मोक्षं गते कालेऽष्टनवत्यधिके शुभे ।
त्रयोविंशतिशतेऽब्दे षष्ठ्यां जातस्तृतीयकः ।।१२।।
आषाढकृष्णपक्षे च शुभलग्ने शुभे ग्रहे ।
चरित्रनायकः श्रीमान् दयालुः सातगौडकः ।।१३।।

तीर्थंकर वर्धमान महावीर स्वामी मोक्षाला गेल्यानंतर शुभ[1] वीर संवत दोन हजार तीनशे अठ्ठ्याण्णव (२३९८) च्या आषाढ कृष्ण षष्ठीला रात्री शुभ लग्न आणि शुभ ग्रहांच्या शुभ योगामध्ये तिसरे पुत्ररत्न, जो या चरित्राचा नायक आहे, श्रीमान दयाळू सातगौडाचा जन्म झाला.[2]

वृषादिसातगौडोऽयं जातः श्रीशान्तिसागरः।
जिनधर्ममहाकाशे चन्द्रो मिथ्यात्वनाशकः।।१४।।

धर्माच्या प्रभावाने हेच सातगौड पुढे जाऊन शांतिसागर झाले; जे की मिथ्यात्वाचा नाश करणारे तसेच जैन धर्मरूपी महाआकाशात चंद्राप्रमाणे सुशोभित झाले.

बालसूर्यो यथा भाति प्राच्यामतिप्रभाव्रजः ।
सातगौडो तथा चासीद्दक्षिणेऽपि मनोहरः ।।१५।।

ज्याप्रमाणे पूर्व दिशेला उदयाला येत असता अत्यंत तेजस्वी किरणांचा समूहरूप बालसूर्य शोभून दिसतो; त्याचप्रमाणे अत्यंत मनोहर बालक सातगौड दक्षिण भारतामध्ये शोभून दिसत होता.

यथाभूत्तरुणो भानुस्तथा चरित्रनायकः ।
तापकारी रविः किन्तु शान्तः श्रीसातगौडकः ।।१६।।

दुपारच्या वेळी ज्या प्रकारे तारुण्यावस्थेला धारण करणारा सूर्य देदीप्यमान असतो; त्याचप्रमाणे आमचे चरित्रनायक सातगौडसुद्धा तारुण्यावस्थेत अत्यंत देदीप्यमान होते. अंतर फक्त एवढेच होते की, तारुण्यावस्थेत सूर्य संताप देणारा असतो; पण आमचे चरित्रनायक सातगौड अत्यंत शांत होते.

---

१. तारीख – २५.७.१८७२ ई. बुधवार
जन्म – यळगुडमध्ये आषाढ कृष्ण ६ विक्रम संवत १९२९ बुधवारी रात्री जन्म झाला होता.

२. पिता – श्री. भीमगौडा पाटील, भोज (बेळगाव) कर्नाटक
माता – सौ. सत्यवती पाटील, यळगुड (कोल्हापूर) महाराष्ट्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्मध्यानाची रुची व तल्लीनता

यजने याजने दक्षो निजात्ममार्गशोधकः ।
स्वाध्यायध्यानयुक्तश्च परोपद्रवनाशकः ।।१७।।
दीनानाथजनव्याधिर्दुःखदारिद्र्यनाशकः ।
इत्येवं गमयन्कालं धर्मराज इवाबभौ ।।१८।।

भगवान जिनेंद्र देवाची पूजा करणे – करवण्यामध्ये चतुर श्रीमान सातगौड पाटील आपल्या आत्मशोधनाच्या मार्गाचा शोध घेण्यामध्ये निमग्न राहत होते. (दररोज सकाळी ८ मैल पट्टनकुडी गावाला जाऊन श्री.पं. पार्श्वनाथ उपाध्याय यांच्याकडून संस्कृत तसेच पद्मनंदी–पंचविंशतिका, रत्नकरंड श्रावकाचार इत्यादी ग्रंथांचा अभ्यास करीत होते.) स्वाध्याय–ध्यानामध्ये तत्पर, दुसऱ्यांच्या उपद्रवांचा नाश करणारे, दीन आणि अनाथ जीवांची व्याधी, दुःख–दारिद्र्य वगैरे दूर करणारे होते. अशा प्रकारे धर्मराजाप्रमाणे कालक्रमण करीत शोभून दिसत होते.

देवेन रोधितेनापि प्रभोः पित्रा कृतस्तदा ।
विवाहः पितुराज्ञेति स्वीकृतः शिरसा वरम् ।।१९।।

यद्यपि सातगौडांनी आपल्या वडिलांना खूप विरोध केला होता तरीसुद्धा वडिलांनी त्यांचा विवाह केला. त्यांनी वडिलांची ही आज्ञा शिरसावंद्य मानली होती.

तस्यां तथापि वाञ्छैव स्वप्नेऽपि न प्रभोरभूत्।
जगद्गुरुर्भवेच्छीघ्रमिति लोकस्य चिन्तया ।।२०।।

हे सातगौड लवकरच जगद्गुरू बनले. अशा प्रकारे लोकांच्या मंगल कामनेमुळे दाम्पत्य जीवनाविषयी स्वप्नामध्येसुद्धा कधीच इच्छा झाली नव्हती.

ज्ञात्वा भार्यां गतां स्वर्गमित्ययं सातगौडकः।
निजात्मशोधको जातः स्वरसस्वादकोऽपि च ।।२१।।

पत्नीचा स्वर्गवास झाला आहे, एके दिवशी ही बातमी ऐकून सातगौड पाटील आपल्या आत्म्याच्या शोधात लागले आणि आत्म्यातून उत्पन्न आनंदरसाचे आस्वादन करू लागले.

अनादिभवभोगेभ्यो बन्धुवर्गाच्छरीरतः ।
सातगौडो विरक्तोऽभूदात्मधर्मप्रकाशकः ।।२२।।

आत्मधर्माला प्रकाशित करणारे सातगौड पाटील अनादीकालापासून चालत आलेल्या संसारापासून, भोगांपासून, बंधू–बांधवांपासून तसेच शरीरापासूनही विरक्त झाले.

दीक्षां गृह्णाम्यहं भावमिति प्रदर्शयन् विभुः ।
पित्रा निषिद्धः स्वागारे स्थितोऽतः कतिचिद्दिनम् ।।२३।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यानंतर, सातगौड पाटलांनी – 'मी आता दीक्षा घेतो' असे आपले भाव प्रकट केले; परंतु पित्याच्या निषेधामुळे ते काही दिवस आपल्या घरीच राहिले.

सत्सु प्राणेषु धर्मश्च त्याज्यो नेत्युपदिश्य च ।
पिता स्वर्गे गतः श्रीमान् भीमगौडः सुधार्मिकः ॥२४॥

परमधार्मिक श्रीमान पाटील भीमगौडांनी आपल्या अंतिम समयी आपल्या मुलांना उपदेश दिला की, 'प्राण गेला तरी हा अहिंसामय धर्म तुम्ही सोडू नका.' अशा प्रकारे उपदेश देऊन ते स्वर्गवासी झाले.

शोकाकुलान् स्वबन्धूंश्च मातरं शोकव्याकुलाम् ।
स्वोपदेशेन सम्बोध्य कृताः सर्वे निराकुलाः ॥२५॥
आपृच्छ्य सर्वान् स्वजनान् मित्रवर्गान् स्वधार्मिकान् ।
वैराग्यमूर्तीः सौम्यात्मा गुरुवासं गतस्तदा ॥२६॥

शोकाकुल सर्व बंधूंना तसेच आईला आपल्या श्रेष्ठ धर्मोपदेशाने सांत्वना करून, निराकुल करून अत्यंत शांत आणि वैराग्याची मूर्ती श्रीमान सातगौड पाटील आपल्या कुटुंबीजनांचा, मित्रवर्गाचा तसेच भावांचा निरोप घेऊन ज्ञानाराधना करण्यासाठी गुरुकुलात प्रवेश करते झाले.

उत्तूर गावात दीक्षा

चतुर्विंशतिशते चत्वारिंशदधिके शुभे ।
वीरे शिवं गते प्राप्तः श्रीदेवेन्द्रगुरोर्गृहम् ॥२७॥
ज्येष्ठशुक्लत्रयोदश्यां गृहीत्वा क्षुल्लकव्रतम् ।
गुरूपकण्ठे स्थितवान् क्षुल्लकः कतिचिद्दिनम् ॥२८॥

वीर निर्वाण शुभसंवत २४४० (दि. २५ जून १९१५ ई.) मध्ये ते पाटील सातगौड आपल्या घरातून निघून श्री देवेंद्रगुरूंच्या जवळ उत्तूर गावामध्ये पोहोचले आणि ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशीला त्यांनी क्षुल्लक (लघुमुनी) दीक्षा धारण केली. त्यानंतर, ते क्षुल्लक आपल्या गुरुसन्निध काही दिवस राहिले. (कोल्हापूरचे नगरशेठ भूपाल अण्णा जिर्गे यांनी दीक्षेच्या वेळी त्यांना कमंडलू दिले.)

पुनर्निजगुरुं नत्वापृच्छ्य संसारतारकः ।
गुरोराज्ञां समादायाचलत्ततः सुखप्रदः ॥२९॥

त्यानंतर, सर्व जीवांना सुख देणाऱ्या आणि संसारसागरातून पार करवणाऱ्या आपल्या गुरूंना वंदन करून त्या क्षुल्लकजींनी गुरूंची आज्ञा घेऊन प्रस्थान केले.

कागलमध्ये धर्मोपदेश

प्रकुर्वन् विधिना चर्यामुपसर्गं सहन् तथा ।
भव्यानां बोधनार्थं हि कागलं नगरः गतः ॥३०॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विधिपूर्वक चर्या करीत आणि वेगवेगळ्या प्रकारचे उपसर्ग सहन करीत ते क्षुल्लक भव्य जीवांना सदुपदेश देण्यासाठी कागल गावी (कोल्हापूर–महाराष्ट्र) पोहोचले.

पुरे वने सदा ध्यानं कुर्वन् सम्बोधयन् जनान् ।
द्योतयन् जिनधर्मं हि गच्छति स्म पुरश्शनैः ।।३१।।

ते क्षुल्लक (लघुमुनी) नगरात वा वनात ध्यान करीत, लोकांना उपदेश देत आणि जिनधर्माची प्रभावना करीत हळूहळू पुढे गेले.

प्रथम चातुर्मास कोगनोळीमध्ये

संघस्य पुण्यतः सोऽयं कोगनोलिपुरं गतः ।
संयमाढ्यं वरं क्षेत्रं जनान् ज्ञात्वा च धार्मिकान् ।।३२।।
वर्षायोगं च कृतवान् कदाचिन्नगरे क्वचित् ।
गुहायामाश्रमे ध्यानं कुर्वन् सम्बोधयन् स्थितः ।।३३।।

समाजाच्या पुण्यकर्माच्या उदयाने ते क्षुल्लक कोगनोळी गावामध्ये गेले. त्या गावातील संयमी तसेच धार्मिक लोकांना पाहून त्यांनी तेथेच वर्षायोग धारण केला. त्या वेळी ते कधी नगरामध्ये, गावामध्ये, कधी कोणत्या तरी गुंफेत आणि कधी वसतिकेमध्ये बसून ध्यान करीत असत. अशा प्रकारे ध्यान करीत आणि भव्य जीवांना धर्माचा उपदेश देत ते तेथेच राहू लागले.

सर्पाद्वारे उपसर्ग

कदाचिद्ध्यानमारूढं ज्ञात्वा नागेन केनचित् ।
आगत्य प्रभुदेहस्य सर्वाङ्गस्पर्शनं कृतम् ।।३४।।
स्वजन्म सफलं मत्वा स्पृष्ट्वां तं च पुनः पुनः ।
नत्वा स्मृत्वा निजस्थानं गतः सर्पः प्रसन्नधीः ।।३५।।

कोणा एका वेळी त्यांना ध्यानमग्न पाहून कोणी सापाने येऊन क्षुल्लकाच्या शरीराला विळखा घातला. अशा प्रकारे आपला जन्म सफल मानत आणि त्यांच्या शरीराला पुन:पुन्हा स्पर्श करीत त्यांना नमस्कार करून स्मरण करीतकरीत प्रसन्नचित्ताने तो साप आपल्या ठिकाणी निघून गेला.

मेरुतुल्यं गुरोश्चित्तं न चचाल मनागपि ।
ईदृशं निश्चलं ध्यानं कलौ ज्ञेयं सुदुर्लभम् ।।३६।।

परंतु, गुरुराजांचे चित्त मेरुपर्वतासमान निश्चल होते; म्हणून ते किंचित मात्रही चलायमान झाले नाहीत. असे निश्चल ध्यान या कलियुगामध्ये अत्यंत दुर्लभ आहे, हे लक्षात घ्यायला हवे, असे जाणायला हवे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बाहुबली तीर्थक्षेत्राची वंदना

मार्गे सम्बोधयन् भव्यान् श्रीबाहुबलिनस्ततः ।
वन्दनार्थं गतः कृत्वा वन्दनां क्षुल्लकः सुधीः ।।३७।।
कुर्वन् जपं तपो ध्यानं स्थितवान् कतिचिद्दिनम् ।
रम्ये भव्यजनानन्ददायके गिरिमस्तके ।।३८।।

त्यानंतर, मार्गामध्ये अनेक भव्य जीवांना उपदेश देत ते क्षुल्लक बाहुबली कुंभोज (महाराष्ट्र) तीर्थक्षेत्राची वंदना करण्यासाठी गेले तसेच वंदना करून भव्य जीवांना आनंद देणाऱ्या अशा त्या मनोहर पर्वताच्या शिखरावर जप, तप आणि ध्यान करीत काही दिवस तेथेच थांबले.

जैनग्राममध्ये चातुर्मास

ततोऽपि गतवान् धीरो जैनग्रामं शनैः शनैः ।
वर्षायोगो धृतस्तत्र क्षुल्लकेन महात्मना ।।३९।।

धीर-वीर महात्मा क्षुल्लक हळूहळू विहार करीत जैनग्राम (जैनवाडी, चिक्कोडी) मध्ये पोहोचले आणि त्यांनी तेथेच चार्तुमास-योग धारण केला.

नसलापूरमध्ये चातुर्मास

स्वात्मानं चिन्तयन् कुर्वन् स्वात्मकार्यं तपो जपम् ।
ततः सम्बोधयन् भव्यान् गतवान् नसलापुरम् ।।४०।।

आपल्या आत्मस्वरूपाचे चिंतन करीत, जप, तप तसेच आपल्या आत्म्याच्या उद्धाराचे शुभकार्य करीत आणि भव्यजीवांना मोक्षमार्गाकडे प्रवृत्त करीत ते क्षुल्लक कर्नाटकामधील नसलापूरला पोहोचले.

रम्यैर्जिनालयैर्भव्यश्रावकैश्च सुशोभितम् ।
धार्मिकं नगरं बुध्द्वा वर्षायोगो धृतस्तदा ।।४१।।

मनोहर जिनालयांनी तसेच भव्य श्रावकांनी सुशोभित ते धार्मिक नगर नसलापूर पाहून तेथेच वर्षायोग धारण केला.

मिथ्यात्वं ध्वंसयन् धीरः सम्यक्त्वं स्थापयन् विभुः ।
तपश्च विविधं कुर्वन् चातुर्मासं व्यतीतवान् ।।४२।।

सर्वांचे स्वामी आणि धीर-वीर त्या क्षुल्लकाने लोकांचे मिथ्यात्व दूर करीत, त्यांच्यामध्ये सम्यग्दर्शन स्थापित करीत आणि अनेक प्रकारचे तपश्चरण करीत चातुर्मास पूर्ण केला.

बहुभिः श्रावकैः सार्द्धं यरनालपुरं गतः ।
मार्गे सम्बोधयन् भव्यान् कुर्वन् सन्मङ्गलं भुवि ।।४३।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यानंतर, मार्गामध्ये अनेक भव्यजीवांना धर्मोपदेश देत आणि मंगलमय धर्माचा प्रसार करीत ते क्षुल्लक अनेक श्रावकांसहित विहार करीत यरनालपूर (कर्नाटक) मध्ये पोहोचले.

दिगंबर मुनिदीक्षा

चतुर्विंशतिशते षट्चत्वारिंशत्तमे शुभे ।
शिवङ्गते जिने वीरे शुभाष्टाह्निकपर्वणि ।।४४।।
फाल्गुनशुक्लपक्षे च चतुर्दश्यां महातिथौ ।
श्रीदेवेन्द्रगुरोः पार्श्वे दीक्षा जैनेश्वरी शुभा ।।४५।।
देवधर्मगुरुश्राद्धसाक्षिकं शुद्धचेतसा ।
गृहीता शुभसायाह्ने शान्तिसागरयोगिना ।।४६।।
श्रावकाः सकलास्तत्र हर्षिता वृषवर्द्धनात् ।
गीतवादित्रशब्दैश्च जपशब्दैः कृतोत्सवाः ।।४७।।

वीर निर्वाण संवत २४४६ च्या शुभ अष्टाह्निका पर्वामध्ये, फाल्गुन शुक्ल चतुर्दशीच्या महातिथी दिवशी (मार्च १९२० ई.) सायंकाळच्या शुभमुहूर्तावर त्या विरागी योगी शांतिसागर महाराजांनी आपल्या शुद्ध हृदयाने, भावनेने देव, गुरू आणि श्रावकांच्या साक्षीने आपले गुरू श्री देवेंद्रकीर्तींच्या जवळ जैनेश्वरी (निर्ग्रंथ) शुभ दीक्षा धारण केली. त्या वेळी सर्व श्रावकांनी गीत आणि वाजंत्रीसह तसेच जयजयकाराच्या मधुर शब्दांनी उत्सव साजरा केला. धर्मवृद्धी होत असल्याने ते सर्वच फारच प्रसन्न होत होते.

ऐनापुरामध्ये चातुर्मास

विशालसरसा नद्या पर्वतेन मनोहरम् ।
फलपुष्पचयैर्वृक्षैः शोभितं च जिनालयैः ।।४८।।
ऐनापुरं ततो धीरो गतः सम्बोधयन् जनान् ।
बहुभिः श्रावकैः साकं प्रविशन्नगरं शनैः ।।४९।।
जिनगौडादिभव्यानां श्रीमुनिः शान्तिसागरः ।
बालगौडादिभक्तानामनुरोधात्क्षमानिधिः ।।५०।।
सम्बोधयन् जनान् तत्र वर्षायोगे स्थितः सुधीः ।
कुर्वन् जपं तपो ध्यानं चातुर्मासं व्यतीतवान् ।।५१।।

त्यानंतर धीर-वीर, बुद्धिमान, क्षमानिधान मुनिराज शांतिसागर अनेक श्रावकांसहित ऐनापूर गावी येऊन पोहोचले; जे विशाल सरोवर, कृष्णा नदी आणि पर्वतांनी सुशोभित असून फल-पुष्पांनी सुशोभित, अनेक वृक्षांनी आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जिनालयांनी विभूषित आहे. तेथे जिनगौड आणि बालगौड आदी जिनभक्त भव्यजन राहत आहेत. त्यांच्या आग्रहावरून त्या मुनिराजांनी तेथे चातुर्मास योग धारण केला तसेच अनेक भव्यजीवांना उपदेश देत आणि जप-तप-ध्यान करीत चातुर्मास काल व्यतीत केला.

कोण्णूरनगरामध्ये नागराजाद्वारे उपसर्ग

शनैः शनैश्च सर्वत्र विहरन् तत्र देशके ।
कोण्णूरनगरं प्राप्तो भव्यलोकसुखप्रदम् ।।५२।।
तत्रत्यानां जनानां सोऽनुरोधाद्धि विशेषतः ।
धर्मबुद्ध्या च कृतवान् वर्षायोगं महामनाः ।।५३।।
मुनियोग्या गुहास्तत्र पर्वते सन्त्यनेकशः ।
तास्वेकदा च ध्यानस्थः सन्तिष्ठते सुधर्मधृत् ।।५४।।
नागराजः समागत्य बुद्ध्वा तं ग्रावखण्डकम् ।
आरुह्य च गुरोर्देहं क्रीडां चक्रे विशेषतः ।।५५।।
मुनिस्तु ध्यानसंलीनो निश्चलो ग्रावखण्डवत् ।
जीविते मरणे तुल्यः ध्यानान्नैव चचाल सः ।।५६।।
ततः स नागराजोऽपि स्पृष्ट्वा तच्चरणं प्रभोः ।
पवित्रयित्वा स्वात्मानं निजस्थाने गतस्तदा ।।५७।।

त्यानंतर, त्या मुनिराजांनी हळूहळू त्या भागात सर्वत्र विहार करीत भव्य जीवांना सुख देणाऱ्या कोण्णूरनगर (कर्नाटक) मध्ये प्रवेश केला. मुनिराज शांतिसागरांनी लोकांच्या विशेष आग्रहावरून तसेच धर्मबुद्धीने तेथेच वर्षायोग धारण केला. तेथे पर्वतावर मुनींना निवास करण्यायोग्य अनेक गुंफा आहेत. त्यामध्ये कोण्या एके दिवशी धर्म धारण करणारे ते मुनिराज ध्यान करण्यासाठी बसले. एवढ्यात, तेथे एक मोठा नाग आला. तो त्या मुनिराजांच्या शरीरावर शिळाखंड समजून चढला आणि क्रीडा करू लागला. त्या वेळी ते मुनिराज शांतिसागर ध्यानामध्ये लीन होते. पाषाणखंडाप्रमाणे निश्चल होते आणि जीवनमरणामध्ये समता धारण केल्यामुळे ते आपल्या ध्यानापासून किंचित मात्रही चलायमान झाले नाहीत. नंतर, तो नाग त्या मुनिराजांच्या चरणांना स्पर्श करून स्वतःच्या आत्म्याला पवित्र करून आपल्या ठिकाणी निघून गेला.

इत्येवं विविधं ध्यानं कुर्वन्निच्छानिरोधकम् ।
स्वात्मानं चिन्तयन् धीरः चातुर्मासं व्यतीतवान् ।।५८।।

अशा प्रकारे इच्छानिरोध तपरूपी (इच्छानिरोधस्तपः) अनेक प्रकारचे ध्यान करीत आपल्या शुद्ध आत्म्याचे चिंतन करीत त्या धीर-वीर मुनिराजांनी चातुर्मास पूर्ण केला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समडोळीमध्ये चातुर्मास व आचार्यपद

मार्गे सम्बोधयन् भव्यान् समडोलिपुरं गतः ।
चातुर्मासं च कृतवान् जनान् ज्ञात्वा सुधार्मिकान् ।।५९।।

मार्गामध्ये अनेक भव्य जीवांना उपदेश देत ते मुनिराज समडोळी (महाराष्ट्र) नावाच्या गावामध्ये पोहोचले आणि तेथील लोक धार्मिक असल्याचे पाहून तेथेच चातुर्मास योग धारण केला.

निषिद्धैर्गुरुणा दत्तमाचार्यपदमुत्तमम् ।
पण्डितैर्मुनिभिःश्राद्धैः संघैर्मत्वा सुयोग्यकम् ।।६०।।

तेथे गुरुराजांचा विरोध-नकार असतानासुद्धा पंडितांनी, मुनींनी, श्रावकांनी तसेच सर्व संघाने अत्यंत सुयोग्य मानून त्या मुनिराज शांतिसागरांना मुनी जीवनाची उत्तम, सर्वश्रेष्ठ उपाधी देऊन आचार्यपदावर प्रतिष्ठित केले.
(चतुःसंघद्वारे ८.१०.१९२४ हे पद दिले.)

ध्यानं तपो जपं कुर्वन् स्थितवान् कतिचिद्दिनम् ।
धर्मे च स्थापयन् भव्यान् चातुर्मासं व्यतीतवान् ।।६१।।

अशा प्रकारे जप-तप आणि ध्यान करीत मुनिराज काही दिवसपर्यंत समडोळीमध्ये विराजमान राहिले आणि अनेक भव्य जीवांना धर्मामध्ये स्थापित करीत त्यांनी चातुर्मास व्यतीत केला.

श्रवणबेळगुळ तीर्थयात्रा

चन्दप्पाथ सुअण्णप्पा चामण्णाश्रावकादयः ।
गोमट्टदेवयात्रार्थं कृतवन्तो निवेदनम् ।।६२।।
तत्प्रार्थनां च स्वीकृत्य चचाल शान्तिसागरः ।
स्थलेऽरण्ये गिरौ ग्रामे कुर्वन् ध्यानं सुपुण्यदम् ।।६३।।
बहुभिः श्रावकैः सार्द्धं कुर्वन् मङ्गलमुत्तमम् ।
जिनेन्द्रभक्तभव्यानां चित्तमाह्लदयन विभुः ।।६४।।
पुरं ग्रामं वनं देशमुल्लङ्घ्य सर्वपुण्यदः ।
शनैः मैसूरराज्यस्यान्तर्देशं गतवान् सुधीः ।।६५।।

त्यानंतर, गोकाक (कर्नाटक) निवासी चंदप्पा, अण्णप्पा, चामण्णा आदी श्रेष्ठ श्रावकांनी श्रवणबेळगोळच्या श्री गोमटदेवाची यात्रा करण्यासाठी आचार्य श्री शांतिसागर महाराजांना विनंती केली. अत्यंत बुद्धिमान आणि सर्व जीवांना पुण्य प्रदान करणाऱ्या आचार्य श्री शांतिसागरांनी त्यांची विनंती, प्रार्थना स्वीकार करून यात्रेसाठी प्रस्थान केले. ते आचार्य स्थळ, वन, पर्वत आणि गावामध्ये उत्तम पुण्य उत्पन्न करणारे तप आणि ध्यान करीत होते. अनेक श्रावकांसहित

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उत्तम मंगल करीत होते आणि भगवान जिनेंद्र देवांचे भक्त अशा भव्य जीवांच्या चित्ताला प्रसन्न करीत होते. अशा प्रकारे अनेक नगर, गाव, वन आणि स्थळांना पार करीत हळूहळू ते म्हैसूर राज्यामध्ये पोहोचले.

महामस्तकाभिषेक

श्रीश्रवणबेळगुळे वन्दित्वा गोम्मटप्रभुम् ।
भव्यान्सम्बोधयंस्तत्र दिनानि कतिचित्स्थितः ।।६६।।

त्या आचार्यांनी श्रीश्रवणबेळगुळ (इ.स. १९२५ फेब्रुवारी महिना) मध्ये जाऊन गोमटदेवाची वंदना केली आणि भव्यजीवांना उपदेश देत काही दिवस ते तेथेच राहिले.

भेरीनिभे गिरौ रम्ये गोम्मटेशो विराजते ।
द्विपञ्चाशत्करोतुङ्ग शान्तः परमसुन्दरः ।।६७।।
तत्सम्मुखे गिरौ भान्ति भवनानि जिनेशिनाम् ।
सुदीर्घप्रतिमाभिश्च पूतानि जिनयोगिनाम् ।।६८।।
भद्रबाहुमुनेः पादौ गुहायां स्तः सुपुण्यदौ ।
वन्दित्वा सकलान् देवान् प्राप्तपुण्यस्तदाभवत् ।।६९।।

तेथे नगाऱ्याच्या आकाराच्या मनोहर विंध्यगिरी पर्वतावर गोमटस्वामी विराजमान आहेत. ते ५२ हाथ उंच, अत्यंत शांत आणि परमसुंदर आहेत. त्यांच्यासमोरच्या पर्वतावर पापांचा नाश करणाऱ्या भ. जिनेंद्रदेवांची अनेक मंदिरे आहेत; जी मोठमोठ्या प्रतिमांनी सुसज्जित आणि पवित्र आहेत. त्याच चंद्रगिरी पर्वतावर एका गुंफेत मुनिराज श्रुतकेवली भद्रबाहू स्वामींचे पुण्य उत्पन्न करणारे चरण विराजमान आहेत. आचार्यश्रींनी त्या सर्वांची वंदना करून महान पुण्य प्राप्त केले.

दक्षिण काशी – मूडबिद्री यात्रा

ततोऽचलन्मूडबिद्रीयात्रार्थं करुणालयः ।
ईर्यासमितिसंशुद्ध्या रक्षन् जीवान् बहूंस्तदा ।।७०।।

त्यानंतर, अत्यंत दयाळू असे आचार्यश्री ईर्यापथ समितीचे पालन करीत, अत्यंत शुद्धिपूर्वक जीवांचे रक्षण करीत (एप्रिल १९२५ ई.) मूडबिद्रीच्या यात्रेसाठी निघाले. त्या वेळी आचार्यश्रींच्या संघात ६ मुनी, ४ ऐलक, ४ क्षुल्लक होते.

विशालैः सुन्दरै रम्यैः शृङ्गध्वजविराजितैः ।
सद्रत्नप्रतिमापूतैः सिद्धान्तग्रन्थशोभितैः।।७१।।
जिनालयैरनेकैश्च भूषितं जनरञ्जकम् ।
शनैः शनैश्च सम्प्राप्तो मूडबिद्र्याख्यपत्तनम् ।।७२।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ते मुनिराज हळूहळू विहार करीत मूडबिद्रीनगरामध्ये पोहोचले. ते मूडबिद्रीनगर लोकांना प्रसन्न करणारे आणि अनेक जिनभवनांनी सुशोभित आहे. ते जिनमंदिर खूप विशाल, अत्यंत सुंदर, अतीव मनोहर आणि आपल्या शिखरावर ध्वजांनी सुशोभित, उत्तमोत्तम रत्नांच्या प्रतिमांनी पवित्र आणि सिद्धान्त ग्रंथांनी शोभित आहे.

परमागम धवल ग्रंथांचा स्वाध्याय

सर्वान् जिनालयान् नत्वा नत्वा सत्प्रतिमाः शुभाः ।
सिद्धान्तप्राभृतं श्रुत्वा नत्वा स्तुत्वा प्रपूज्य च ।।७३।।
धर्मोपदेशं कुर्वन् स स्वाध्यायं च जपं तपः ।
भव्यानाह्लादयन् सूरिर्दिनानि कतिचित्स्थितः ।।७४।।

आचार्य त्या सर्व जिनालयांत, सर्व शुभ रत्न प्रतिमांना नमस्कार करून सिद्धान्त प्राभृत ग्रंथांचे (ताडपत्रीय धवला, जयधवला व महाधवला) श्रवण करून तसेच नमस्कार आणि स्तुतिपूजा करून धर्मोपदेश तसेच (धवला परमागमाचा मार्च व एप्रिल १९२५ दोन महिनेपर्यंत) स्वाध्याय-जप-तप करीत आणि भव्यजीवांना प्रसन्न करीत काही दिवसपर्यंत तेथे राहिले.

बेळगावची यात्रा

ततोऽचलत्सूरिराजो बेळग्रामं प्रसन्नधीः ।
मुनिभिः श्रावकैः सार्द्धं समितीः परिपालयन् ।।७५।।

त्यानंतर, निर्मल बुद्धी धारण करणारे ते आचार्यश्री अनेक मुनी आणि श्रावकांबरोबर समितींचे पालन करीत बेळगावकडे निघाले.

भवे न वर्तते सौख्यं दर्शयन्निति सज्जनान् ।
त्यजन्तु कोषं मानं च मायां लोभं मदस्मरम् ।।७६।।
आत्मनः शत्रवश्चैते स्वशान्त्योपदिशन्निति ।
मठं स्वाध्यायशालां च स्थापयन् धर्महेतवे ।।७७।।
कारयन्मङ्गलं मार्गे प्राप्तवान् ग्रामवेळकम् ।
तत्रोत्सवः कृतः सर्वैर्गायद्भिर्मधुरं जनैः ।।७८।।
तपश्च विविधं कुर्वन् स्वात्मानं चिन्तयन् तथा ।
धर्मप्रभावनां ध्यानं दिनानि कतिचित्स्थितः ।।७९।।

'संसारात सुख नाही' या तथ्यावर आचार्यश्री सरळचित्त श्रावकांमध्ये श्रद्धा निर्माण करीत होते. तसेच 'क्रोध, मान, माया, लोभ, मद आणि काम हे सोडा, हे आत्म्याचे शत्रू आहेत, या गोष्टींचा उपदेश ते आपल्या शांत मुखमुद्रेने देत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होते. धर्मासाठी त्यांनी मार्गात कितीतरी पाठशाळांची स्थापना करविली आणि कितीतरी ठिकाणी मंगल धर्मोत्सव करविले. अशा प्रकारे विहार करीतकरीत ते बेळगावला पोहोचले. तेथील सर्व लोकांनी मंजूळ गाणी गाऊन उत्सव साजरा केला. ते आचार्यश्री अनेक प्रकारचे तपश्चरण करीत, आपल्या आत्म्याचे चिंतन करीत, धर्माची प्रभावना करीत आणि ध्यान करीत काही दिवस तेथेच राहिले.

कुंभोजनगरामध्ये चातुर्मास

धर्ममुद्योतयन्मार्गे कुम्भोजनगरं प्रति ।
अचलब्दोधयन् भव्यान् शान्तितोयं हि पाययन् ।।८०।।
जयशब्दं प्रकुर्वद्भिर्मधुरं मङ्गलध्वनिम् ।
राजलोकैः प्रजावर्गैः श्रीपाटीलजनैर्वरैः ।।८१।।
मुनिभिः श्रावकैर्भव्यैर्नगरं प्राविशत्समम् ।
दादागौडादिमुख्यानां विनयाच्छान्तिसागरः ।।८२।।
वर्षायोगं च धृतवान् ससंघेन मुद्रा तदा ।
तपश्च विविधं कुर्वन् वर्षायोगं व्यतीतवान् ।।८३।।

त्यानंतर, मार्गामध्ये धर्मप्रचार करीत, भव्य जीवांना उपदेश देत आणि शांतिरूपी अमृतपान करवीत, ते आचार्य श्री कुंभोज गावाला निघून गेले. जयजयकार आणि मधुर मंगलध्वनी करीत राजे लोक, श्रेष्ठ लोक आणि प्रजेसमवेत पाटील इत्यादी श्रेष्ठ व्यक्ती तसेच भव्य श्रावक आणि मुनींसमवेत आचार्यश्री शांतिसागरांनी कुंभोज गावात प्रवेश केला. दादागौड वगैरे प्रमुख लोकांची विनंती, प्रार्थना स्वीकारून आचार्य महाराजांनी संघासहित तेथेच मोठ्या आनंदाने वर्षायोग धारण केला. तसेच अनेक प्रकारे तपश्चरण करीत तो वर्षायोग समाप्त केला.

नांदणी गावात चातुर्मास

ततोऽचलत् शुभे मार्गे बोधयन् श्रावकान् मुदा ।
नांदणीनगरं प्राप्तः मुनिभिः श्रावकैः समम् ।।८४।।
देवेन्द्रदेवगौडादिभक्तांना हि विशेषतः ।
नेर्दश्रावकमुख्यानां विनयात्कृतवान् तदा ।।८५।।
वर्षायोगं गुरुर्धीमानाचार्यः शान्तिसागरः ।
ध्यानं जपं तपः कुर्वन् स्थितवान्पालयन्व्रतम् ।।८६।।
धर्मे च स्थापयन्भव्यान् तत्संस्कारं च कारयन् ।
स्वात्मबोधं सदा कुर्वन् चातुर्मास व्यतीतवान् ।।८७।।

त्यानंतर, ते तेथूनही निघाले. मार्गात अनेक श्रावकांना आनंदपूर्वक उपदेश

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देत अनेक मुनी आणि श्रावकांसह नांदणी गावामध्ये पोहोचले. तेथे देवेंद्र, देवगौड, नर्दे वगैरे मुख्य-मुख्य श्रावकांनी विशेष विनंती केली; म्हणून अत्यंत दयाळू, विचारवान आचार्यश्री शांतिसागर महाराजांनी तेथेच वर्षायोग धारण केला.

जप, तप, ध्यान करीत तसेच व्रतांचे पालन करीत ते आचार्यश्री संघसहित तेथेच विराजमान झाले. तेथे त्यांनी अनेक भव्यजीवांना धर्मामध्ये स्थापित केले, अनेक भव्यजीवांना धार्मिक संस्कारांचा उपदेश दिला आणि स्वतः आपल्या आत्मज्ञानाला दृढ केले. अशा प्रकारे त्यांनी तो चातुर्मास नांदणीमध्ये सानंद संपन्न केला.

कुंथलगिरी सिद्धक्षेत्राची यात्रा

वंशस्थलगिरेः स्वामी यात्रार्थं श्रावकैर्वरैः ।
चचाल मुनिभिः साकं स्वधर्मे स्थापयन् जनान् ।।८८।।

त्यानंतर, शांतिसागर स्वामी मार्गामध्ये अनेक भव्यजीवांना जिनधर्मामध्ये स्थापन करीत, अनेक धर्मात्मा श्रावकांना तसेच अनेक मुनींना बरोबर घेऊन श्री कुंथलगिरीच्या यात्रेला निघाले.

वने स्थले गिरौ कुर्वन् धर्मध्यानञ्च मङ्गलम् ।
मिथ्यात्वं ध्वंसयन्धीरः सम्यक्त्वं स्थापयंस्तथा ।।८९।।
नद्यद्रिपुरमुल्लङ्घ्य प्राप्तस्तत्र दयानिधिः ।
कुलभूषणमानम्य नत्वा श्रीदेशभूषणम् ।।९०।।
बभूव कृतकृत्यश्च पूतः संघश्चतुर्विधः ।
स्वात्मानं चिन्तयन्कुर्वन् भवहारि तपो जपम् ।।९१।।
स्वरसं पाययन् धीरः पिबन्नात्मामृतं रसम् ।
पुनस्ततोऽचलत्स्वामी सम्बोध्य श्रावकांस्ततः ।।९२।।

आचार्यश्री शांतिसागर स्वामी वनामध्ये, स्थलामध्ये आणि पर्वतांवर धर्मध्यान करीत, आनंद मंगल करीत, मिथ्यात्वाचा नाश करीत आणि सम्यग्दर्शनाची स्थापना करीत जात होते. अशा प्रकारे दयानिधी धीर-वीर ते आचार्य नदी, पर्वत आणि नगरांना पार करत कुंथलगिरी पर्वतावर पोहोचले. तेथे त्यांनी चतुर्विध संघासहित भगवान कुलभूषण आणि भगवान देशभूषणांना नमस्कार केला.

अशा प्रकारे ते चारही-चतुर्विध-समस्त श्रावकांना उपदेश देऊन आपल्या आत्म्याचे चिंतन करीत जन्ममरणरूप संसाराचा नाश करणारे जप आणि तपश्चरण करीत आत्मामृत रसाचे स्वयं पान करीत तसेच अन्य भव्य जीवांनाही आत्मामृत रसाचे पान करवीत ते पुढे निघाले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सोलापूरकडे मंगल विहार

सखारामात्मजश्रेष्ठि – रावजीप्रार्थनावशात् ।
विरहन् मार्गदेशेषु प्राप्तः शोलापूरं सुधीः ।।९३।।

हे प्रबुद्ध आचार्यश्री मार्गात येणाऱ्या प्रदेशांमध्ये विहार करीत शेठ रावजी सखाराम दोशीजींची विनंती स्वीकार करून सोलापूरला आले.

तत्रोत्सवः कृतो लोकैः भव्यमण्डपमध्यगः ।
श्रुत्वा सूर्युपदेशं च प्रसन्नाः श्रावकास्तथा ।।९४।।

तेथील लोकांनी एक भव्य उत्सव मंडप बनवला आणि त्यामध्ये विराजित, आसनस्थ आचार्य महाराजांचा उपदेश ऐकून तेथील सर्व श्रावक प्रसन्न झाले.

स्थापयन् जिनधर्मे च जीवान् हितमितप्रियम् ।
कृपानिधिर्वदन्नित्यं दिनानि कतिचित्स्थितः ।।९५।।

कृपानिधी आचार्य अनेक जीवांना जिन धर्मामध्ये स्थापन करीत तसेच सदैव हित–मित आणि प्रिय वचन बोलत काही दिवस सोलापुरात राहिले.

लघुबाहुबली पर्वतावर वर्षायोग

ततोऽपि विहरन्स्वामी मार्गे सम्बोधयज्जनान् ।
लघुबाहुबलिं प्राप्तः पर्वतं मुनिभिः समम् ।।९६।।
कल्लप्पाशास्त्रिणा तत्र निर्मिताः सुन्दरा गुहाः ।
तद्भक्तिवशतः सूरिः धर्मप्रीत्या स्थितस्तदा ।।९७।।
रम्यं जिनालयं बुद्ध्वा स्थानं धर्मस्य साधकम् ।
वर्षायोगो धृतस्तेन कुर्वता ध्यानमुत्तमम् ।।९८।।
नाशयित्वा महामोहं कृत्वा पुण्यस्य संचयम् ।
व्यतीतः पुण्यदस्तत्र वर्षायोगो महात्मना ।।९९।।

त्यानंतर, त्या मुनिराजांनी अनेक मुनींसहित सोलापूरहून विहार केला. मार्गामध्ये भव्य जीवांना उपदेश देत ते कुंभोजमध्ये बाहुबली पर्वतावर पोहोचले. तेथे पं. कल्लप्पा शास्त्रींनी फारच छान गुंफा बनवल्या आहेत. त्यांच्या भक्तीने प्रेरित होऊन, वश होऊन तसेच धर्मप्रेमाच्या वशीभूत होऊन पूज्य आचार्यश्री तेथे थांबले. तेथे त्यांनी मनोहर, सुंदर जिनमंदिर पाहून तसेच ते स्थान धर्मसाधनेस उपयुक्त समजून तेथे वर्षायोग चातुर्मास धारण केला. त्या महात्म्याने तेथे उत्तम ध्यान, महामोहाचा नाश आणि महापुण्याचा संचय केला. अशा प्रकारे पुनीत, पवित्र भावनांना उत्पन्न करणारा कुंभोज–बाहुबलीचा वर्षायोग समाप्त केला.

जीवास्तदुपदेशेन बभूवुः भुवि धार्मिकाः ।
सञ्जाता व्रतिनः केचित्केचिद्धर्मप्रभावकाः ।।१००।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वर्णिनः क्षुल्लकाः केचित्केचिद्दर्शनशुद्धकाः ।
दयालुः गुरुभक्तश्च नीतिज्ञो वीरसागरः ।।१०१।।
क्षमानिधिस्तपस्वी च योगी श्रीनेमिसागरः ।
दृढव्रती द्वितीयोऽपि शान्तिदो नमिसागरः ।।१०२।।
एते त्रयोऽनगाराश्च सञ्जाता धर्मवर्द्धकाः ।
एवं दक्षिणे महती जाता धर्मप्रभावना ।।१०३।।

आचार्य शांतिसागरांच्या उपदेशाने या संसारामध्ये कितीतरी लोक धार्मिक, कितीतरी व्रती, कित्येक धर्मप्रभावना करणारे, कित्येक ब्रह्मचारी, कित्येक क्षुल्लक आणि कितीतरी दृढ श्रद्धा धारण करणारे होऊन गेले. त्यामध्ये तीन दिगंबर मुनी झाले. त्यापैकी अत्यंत दयावान, गुरुभक्त आणि नीती जाणणारे वीरसागर मुनिमहाराज, क्षमानिधी योगी आणि तपस्वी श्री नेमिसागरजी तसेच शांती देणारे दृढव्रती दुसरे नमिसागर मुनी आहेत. हे तिघेही मुनिधर्म वाढवणारे आहेत. अशा प्रकारे आचार्यश्री शांतिसागरांच्या निमित्ताने दक्षिण देशामध्ये धर्माची महान प्रभावना झाली.

इति दक्षिणादिक् अध्यायः

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

।। श्री वीतरागाय नमः ।।

आचार्यश्रीकुंथुसागरविरचितम्

आचार्यश्रीशांतिसागरचरितम्

अथ द्वितीयः संधि
द्वितीय अध्याय

सिद्धक्षेत्र सम्मेदशिखरजीची यात्रा

पूनमचन्द्रस्य पुत्रो घासीलालो महामनाः ।
दाडिमचन्द्रस्यत्पुत्रो गेंदमल्लो द्वितीयकः ।। १०४ ।।
तृतीयो मोतीलालश्च सस्त्रीकाश्च सपुत्रकाः ।
शान्तिसागरसूरेश्च वन्दनार्थं समागताः ।। १०५ ।।
वन्दित्वा शुभभावेन परमोत्साहनिर्भरः ।
प्रार्थयामास स श्रेष्ठी यात्रार्थं शान्तिसागरम् ।। १०६ ।।
सम्मेदशैलयात्रार्थं गन्तुकामः ससंघकः ।
भवन्तोऽपि दयां कृत्वागच्छन्तु मयका सह ।। १०७ ।।
तत्प्रार्थनावशात्सूरीर्मत्वा धर्मप्रभावनाम् ।
अचलत्तेन सार्द्धं हि कायोत्सर्गं विधाय वै ।। १०८ ।।

कुंभोज-बाहुबलीच्या चातुर्मासामध्ये प्रतापगढ निवासी, मुंबई प्रवासी, रत्न व्यवसायी, धर्मप्रेमी श्रावक शेठ पूनमचंद्रचे सुपुत्र घासीलाल व त्यांचे अनेक भाऊ शेठ दाडिमचंद्र, गेंदमल, मोतीलाल वगैरे सपरिवार, मुले, नातवंडे, कुटुंबातील स्त्रियांना बरोबर घेऊन आचार्यश्री शांतिसागर महाराजांच्या दर्शनार्थ कुंभोजला आले. तेथे शेठ घासीलाल यांनी शुभभावांसहित उत्साहसहित आचार्यश्री शांतिसागर महाराजांची वंदना करून तीर्थयात्रेसाठी विनंती करीत निवेदन केले-

"हे स्वामिन, आम्ही आपला परिवार आणि अन्य साधर्मी बांधवांसहित श्रीसम्मेदशिखरजीची वंदना करू इच्छितो. आमची विनंती आहे की, कृपा करून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या यात्रेमध्ये धर्माची प्रभावना व शाश्वत तीर्थराजाची वंदना करण्यासाठी आपणही संघसहित मंगल विहार करण्याची कृपा करावी.”

शेठ घासीलालजींची विनंती ऐकून त्यांच्याबरोबर विहार करण्याची यात्रेची अनुकूलता व धर्मप्रभावनेच्या दृष्टीने त्या कृपाळू आचार्यश्रींनी त्याला स्वीकृती दिली. त्यानंतर, एका मंगल शुभवेळी शुभयोग पाहून कायोत्सर्ग करून आचार्यश्रींनी त्या यात्री संघाबरोबर शाश्वत तीर्थराज सम्मेदाचलाच्या दिशेने विहार केला.

शास्त्री नन्दनलालोऽपि वन्दनार्थं समागतः ।
वन्दित्वा सह संघेनाचलच्च गुरुभक्तये ।। १०९ ।।

तेथे पं. नंदलालजीसुद्धा वंदनेसाठी आले होते. ते आचार्य महाराजांची वंदना करून संघाबरोबर गुरुभक्तीचा लाभ घेण्यासाठी यात्री संघामध्ये सामील झाले.

सांगलीनगरमध्ये धर्मप्रभावना

जनान् प्रबोधयन् मार्गे प्राप्तः सांगलिपत्तनम् ।
राजलोकैः प्रजावर्गैः श्रेष्ठिभिः श्रावकैस्तथा ।। ११० ।।
सुस्वागतं कृतं सर्वैः संघस्य च जगद्गुरोः ।
प्रतिघस्रं गुरुर्भव्यान् पाययन् वचनामृतम् ।। १११ ।।
संघेन सह संघश्रीः दिनानि कतिचित्स्थितः ।
पुण्यशाली नरेन्द्रोऽपि राजलोकैः समं तदा ।। ११२ ।।
श्रुत्वा जगद्गुरोः कीर्तिं वन्दनार्थं समागतः ।
नत्वा मस्तकमानम्य श्रुत्वा सद्गुरुदेशनाम् ।। ११३ ।।
गृहीत्वा धर्मलाभं स धर्ममूर्तिः गृहं गतः ।
धर्ममुद्योतयन्नेवमचलत्पुरतो गुरुः ।। ११४ ।।

ते प्रतापी आचार्य मार्गामध्ये लोकांना उपदेश देत संघसहित सांगलीनगरात पोहोचले. तेथे राज्याचे अधिकारी, प्रजानन, व्यापारी आणि सर्व श्रावकांनी मिळून जगद्गुरू आचार्यश्रींचे आणि त्यांच्या संघाचे मोठे भव्य स्वागत केले.

संघनायक आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांनी रोज धर्मानुरागी बांधवांना धर्मामृत पान करीत संघासहित काही दिवस तेथेच वास्तव्य केले. तेथील राजा पुण्यवान होता. ते आचार्यांची कीर्ती ऐकून आपल्या लोकांसमवेत त्यांची वंदना करण्यासाठी आले आणि मस्तक नमवून सर्व संघाला त्यांनी नमस्कार केला. धर्मलाभ घेऊन धर्ममूर्ती ते नरेश आचार्य महाराजांचा उपदेश ऐकून परत गेले. अशा प्रकारे जिनधर्माची प्रभावना करीत संघ पुढे निघाला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मिरज राज्यामध्ये धर्मप्रभावना

क्रमात् मिरजराज्ये संयातः सम्बोधयञ्जनान् ।
तत्रापि श्रावकैर्मुख्यैः राजलोकैर्वणिग्वरैः ।। ११५ ।।
स्वागतं शान्तिसिन्धोश्च यथायोग्यं कृतं गुरोः ।
वन्दनार्थं नरेन्द्रोप्यागतः कृत्वा च वन्दनाम् ।। ११६ ।।
धर्मामृतं गुरोः पीत्वा पार्श्वे स्थित्वा स्वयं नृपः ।
श्रुत्वा सदुपदेशं च निर्विकाराद्गुरोर्मुखात् ।। ११७ ।।
हर्षाद्याचितवान् भूपश्चाशीर्वादं गुरोस्तदा ।
गुरुः प्रवचनसारं स्वाध्यायार्थं ददौ मुदा ।। ११८ ।।

त्यानंतर, ते आचार्यश्री मार्गामध्ये लोकांना उपदेश देत अनुक्रमे विहार करीतकरीत मिरज राज्यात पोहोचले. तेथेही प्रमुख श्रावकांनी, राज्याच्या अधिकाऱ्यांनी आणि सर्व व्यापाऱ्यांनी आचार्यश्री महाराजांचे तसेच भव्य स्वागत केले की, जसे गुरूचे केले जाते. आचार्य महाराजांची वंदना करण्यासाठी मिरजचे महाराजही आले होते. त्यांनी आचार्य महाराजांची वंदना केली आणि त्यांच्याजवळ बसून धर्मामृतपानही केले. निर्विकार गुरूच्या मुखातून श्रेष्ठ उपदेश ऐकून महाराज अत्यंत हर्षित, आनंदित झाले. नंतर, त्यांनी गुरुमहाराजांचा आशीर्वाद मागितला. गुरुमहाराजांनी आचार्य कुंदकुंद विरचित 'प्रवचनसार'नामक ग्रंथ आशीर्वादस्वरूप महाराजांना दिला.

आळंदनगरामध्ये धर्मप्रभावना

धर्मं प्रवर्द्धयन् सूरिस्ततो गत्वा क्रमाच्छनैः ।
आलन्दनगरं प्राप्तः निजामनृपशासितम् ।। ११९ ।।

हे आचार्य धर्मवृद्धी करीत हळूहळू विहार करीत क्रमशः निजाम राजाच्या द्वारे शासित आळंदनगरात पोहोचले.

धर्मध्यानं सदा कुर्वन् मङ्गलम् कारयन् वरम् ।
जयशब्दं प्रकुर्वद्भिः श्रावकैर्मङ्गलध्वनिम् ।। १२० ।।
राजलोकैर्वणिग्वर्यैः प्राविशन्नगरं मुदा ।
भव्यान् सम्बोध्य संस्थाप्य स्वधर्मे च ततोऽचलत् ।। १२१ ।।

मार्गामध्ये आचार्य नेहमी धर्मध्यान करीत आणि धर्मोत्सवही करवीत होते. आळंदनगरात पोहोचल्यानंतर मंगलध्वनी आणि जयजयकार करीत श्रावकांनी राजपुरुष आणि व्यापाऱ्यांसहित मोठ्या आनंदाने नगरामध्ये प्रवेश करविला. त्यानंतर, तेथे धर्मानुरागी जनांना उपदेश देऊन आणि त्यांना धर्मामध्ये स्थापन करून तेथून पुढे विहार केला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नागपूरमध्ये धर्मोपदेश

मार्गे विरोधमूलानि गुरुरुन्मूल्य मूलतः ।
प्रसारयन् दयाधर्मं शान्तिं सर्वत्र कारयन् ।। १२२ ।।
सुधर्ममङ्गलं कुर्वन् प्राप्तो नागपुरं शनैः ।
अपूर्वं स्वागतं तत्र निखिलैः श्रावकैः कृतम् ।। १२३ ।।

ते आचार्यश्री मार्गात लोकांमध्ये होणाऱ्या वैर-विरोधाला समूळ नष्ट करीत, दयाधर्माची वृद्धी करीत, सर्वत्र शांतीचे राज्य स्थापन करीत आणि श्रेष्ठ दयामय जिनधर्माची मंगलमय प्रभावना करीत विहार करीत होते. अशा प्रकारे हळूहळू विहार करीत ते नागपूरनगरामध्ये पोहोचले. तेथील समस्त श्रावकांनी आणि जनतेने मिळून आचार्य महाराजांचे अपूर्व स्वागत केले.

पाययन् धर्मपीयूषं दिनानि कतिचिद्गुरुः ।
स्थितस्तदुपदेशेन त्यक्तं क्षुद्रजलं जनैः ।। १२४ ।।

आचार्यश्री धर्मामृत पान करवीत काही दिवस नागपूरमध्ये वास्तव्यास राहिले. त्यांच्या उपदेशाने खूप लोकांनी अशुद्ध जलाचा त्याग केला.

प्राच्यां दक्षिणतस्तेषां विहारः शान्तिदोऽभवत् ।
मार्गे तदुपदेशेन बभूवुर्धार्मिका जनाः ।। १२५ ।।
मोचयन् मदिरापानं जीवानां मांसभक्षणम् ।
स्वात्मवत्प्राणिनो रक्षन् शान्तिदः शान्तिसागरः ।। १२६ ।।
उल्लङ्घ्य ग्रामान्नद्यद्रीन्नगरं पुरपत्तनम् ।
प्राप्तः सम्मेदशैलं स संघेन सह तारकः ।। १२७ ।।

आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांच्या संघाचा दक्षिणेकडून पूर्व दिशेकडे होणारा तो विहार जीवांना अत्यंत शांती देणारा झाला. मार्गामध्ये त्यांच्या उपदेशांनी अनेक लोकांनी धर्मसंमत आचरण ग्रहण केले. सर्वांना शांती देणारे आचार्यश्री शांतिसागर महाराज मार्गामध्ये लोकांना मद्यपान त्याग करवीत होते. मांसभक्षणाचा त्याग करवीत आणि आपल्या आत्मसमानच समस्त प्राण्यांच्या संरक्षणाचा उपदेश देत विहार करीत होते. अशा प्रकारे संसारसागरातून पार करणारे ते आचार्यश्री अनेक गावे, नद्या, पर्वत आणि पूरपत्तनांना पार करीत संघसहित सम्मेदशिखरजीला पोहोचले.

पंचकल्याणक प्रतिष्ठा

श्रेष्ठिना संघभक्तेन प्रतिष्ठा कारिता तदा ।
उत्सवैर्विविधैः सार्द्धं वाद्यैर्योग्यैर्मनोहरैः ।। १२८ ।।
श्रेष्ठिनः पण्डिताः सर्वे त्यागिनो मुनयस्तदा ।
आगता दर्शनार्थं हि प्रायो लक्षाधिका नराः ।। १२९ ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तैस्समं वन्दनां कृत्वा कृत्वा तान् मोक्षगामिनः ।
सर्वान्स्थापयद्धर्मे दयालुः शान्तिसागरः ।। १३० ।।
पूज्यक्षेत्रे जगद्वन्द्ये दिनानि च कतिचित्स्थितः ।
ततः प्रयाणं कृतवान् सम्मेदशिखरात्प्रभुः ।। १३१ ।।

त्या वेळी संघ भक्त – शिरोमणी शेठ घासीलालजींनी सम्मेदाचलाच्या पायथ्याशी मधुवन गावामध्ये 'पंचकल्याण प्रतिष्ठा'विषयी आराधना करविली. या आयोजनेमध्ये अनेक प्रकारचे उत्सव केले गेले होते. अनेक प्रकारची वाजंत्री वाजवली गेली होती.या वेळी या दिगंबर मुनिसंघाचे दर्शन करण्यासाठी सगळीकडून श्रीमंत, विद्वान, त्यागी आणि अनेक श्वेतांबर मुनीही आले होते. या पंचकल्याण महोत्सवाच्या वेळी मधुवनामध्ये सव्वा लाख लोक एकत्र आले होते.

आचार्य शांतिसागर महाराजांनी ससंघ त्या सर्वांसोबत सम्मेदशिखरजीची वंदना केली. त्या सर्वांना मोक्षमार्गाला लावणाऱ्या अहिंसामय धर्माचा उपदेश देऊन त्यांना धर्ममार्गामध्ये स्थापित केले. अशा प्रकारे जगद्वंद्य अशा पूज्य पर्वत सम्मेदशिखरजीच्या जवळ काही दिवस राहिल्यानंतर आचार्यश्रींच्या संघाचा तेथून विहार झाला.

वाराणसी आणि प्रयागमध्ये धर्मोपदेश व कटनीमध्ये चातुर्मास

स्वधर्मे स्थापयन् भव्यान् भवभीतिं विनाशयन्
जनानां नाशयन्क्लेशं पालयन् समितीः पराः ।। १३२ ।।
काशीप्रयागदेशे च दिनानि कतिचित्स्थितः ।
संघेन सह तत्रस्थान् भव्यान् सम्बोध्य श्रावकान् ।। १३३ ।।
ततोऽचलत्स्वसंघेन प्राप्तश्च कटनीपुरम् ।
लोके दिगम्बरत्वस्य महत्त्वं दर्शयन् विभुः ।। १३४ ।।

मार्गामध्ये ते भव्यजीवांना दयामय धर्मामध्ये स्थापन करीत जात होते. लोकांना संसारासंबंधी भयांपासून दूर करीत, त्यांचे दुःख दूर करीत आणि श्रेष्ठ समितींचे पालन करीत जात होते. अशा प्रकारे विहार करीतकरीत ते संघासह काशी आणि प्रयागमध्ये पोहोचले. तेथे काही दिवस वास्तव्य केले आणि तेथील भव्य श्रावकांना धर्मोपदेश दिला. त्यानंतर, आपल्या संघासहित पुन्हा तेथून निघाले आणि जगभरात दिगंबर व्रताचे महत्त्व प्रस्थापित करीत कटनी भागात पोहोचले.

कन्हैयालालमुख्यानां जगन्मोहनशास्त्रिणाम् ।
तथा टोडरमल्लानां विशेषप्रार्थनावशात् ।। १३५ ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्ञात्वा धर्मानुकूलं हि क्षेत्रं योग्यं तथा जनान् ।
वर्षायोगो धृतस्तत्र जिनधर्मप्रवर्द्धकः ।। १३६ ।।

तेथे श्री शेठ कन्हैयालाल, टोडरमल्ल इत्यादि मुख्य श्रावकांच्या तसेच पंडित जगन्मोहनलाल शास्त्रींच्या विनंतीवरून ते क्षेत्र धर्मानुकूल आणि तेथील श्रावकांना सुयोग्य समजून आचार्य महाराजांनी कटनी नगरीमध्ये संघासह जिनधर्माची महिमा वाढणारा चातुर्मास वर्षायोग धारण केला.

घासीलालो दयामूर्तिः संघभक्तशिरोमणिः ।
गेंदमल्लादिभिः पुत्रैः त्रिभिः परमधार्मिकैः ।। १३७ ।।
धर्मपत्न्यादिभिः सार्द्धं कुटम्बसहितैस्तदा ।
विनयेन सुभक्त्यैव गुरुं नत्वा पुनः पुनः ।। १३८ ।।
बहुभिः श्रावकैः सार्द्धं गतवान् स्वपुरं प्रति ।
श्रीरावजीसखारामो धर्मवीरो दयानिधिः ।। १३९ ।।
राजीमत्या स्वपत्न्या च दाक्षिणात्यसुधार्मिकैः ।
बहुभिः श्रावकैः सार्द्धं गतवान् स्वपुरं प्रति ।। १४० ।।

संघभक्त – शिरोमणी उदारमना शेठ घासीलालजी, गेंदमलजी आदी आपले तीन धार्मिक पुत्र, पुत्रवधू, सुना आणि सर्व कुटुंब अनेक श्रावकांसहित कटनीपर्यंत बरोबर राहिले. कटनीला पोहोचल्यानंतर त्यांनी भक्तिपूर्वक, अत्यंत विनयाने पुन:पुन्हा आचार्य महाराजांना नमन, वंदन केले. सर्व संघाप्रति विनय प्रकट केला आणि आपल्या परिवारासहित मुंबईला परत आले. दयानिधी धर्मवीर शेठ रावजी सखाराम दोशी–सोलापूर आपली धर्मपत्नी सौ. राजुबाई (राजीमती) आणि दक्षिणेतील अनेक भव्य श्रावकांसहित आले होते. तेही कटनीहून परत आले.

इति पूर्वदिशा अध्यायः

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

॥ श्री वीतरागाय नमः ॥

आचार्यश्रीकुंथुसागरविरचितम्

आचार्यश्रीशांतिसागरचरितम्

अथ तृतीयः संधी

तृतीय अध्याय

धर्मध्यानं धर्मचर्चां पण्डितैः धार्मिकैः सह ।
स्वाध्यायं प्रत्यहं कुर्वन् वर्षायोगं व्यतीतवान् ॥ १४१ ॥

आचार्यांनी कटनीमध्ये अनेक पंडित आणि धार्मिकांबरोबर धर्मचर्चा आणि दरदिवशी स्वाध्याय करीत धर्मध्यानपूर्वक वर्षायोग चातुर्मास व्यतीत केला.

ललितपूरमध्ये चातुर्मास

ततोऽचलत्ससंघेन विहरन् शान्तिसागरः ।
धर्ममुद्योतयन् तत्र देशे बुन्देलखण्डके ॥ १४२ ॥
क्रमात् प्राप्तः ससंघश्च ललितं ललितं पुरम् ।
मिलित्वा श्रावकैः श्रेष्ठैः कृतस्तत्रोत्सवो महान् ॥ १४३ ॥
धर्मयोग्यं शुभं क्षेत्रं श्रावकान् धर्मवत्सलान् ।
दृष्ट्वा तेन सुसंघेन वर्षायोगो धृतस्तदा ॥ १४४ ॥

त्यानंतर, आचार्यश्री शांतिसागर आपल्या संघासहित बुंदेलखंड क्षेत्रामध्ये विहार आणि धर्मप्रचार करीत अनुक्रमाने विहार करीत संघासहित सुंदर अशा ललितपूरनगरात पोहोचले. तेथे सर्व श्रावकांनी मिळून मोठा उत्सव साजरा केला. आचार्य महाराजांनी पाहिले, हे क्षेत्र शुभ आहे आणि धर्मसाधनेस योग्य आहे तसेच येथील लोक धर्मप्रेमी आहेत. म्हणून, त्यांनी तेथेच वर्षायोग धारण केला.

सरस्तटे गिरौ रम्ये श्मशाने जिनमन्दिरे ।
ध्यानं जपं तपः कुर्वन् वर्षायोगं व्यतीतवान् ॥ १४५ ॥

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सरोवराच्या किनारी, मनोहर पर्वतांवर, स्मशानभूमीमध्ये आणि जिन मंदिरामध्ये जप, तप आणि ध्यान करीत त्यांनी वर्षायोग समाप्त केला.

सिद्धक्षेत्र – सोनागिरीची यात्रा

ततोऽचलत्पुरः स्वामी तोषयन् भव्यश्रावकान् ।
प्रसारयन् दयाधर्मं नामयन् नरनायकान् ।। १४६ ।।
घनेऽरण्ये नदीतीरे व्याप्ते च पशुभिर्वने ।
अध्ययनं स्तवनं ध्यानं कुर्वन् पाठं सुपुण्यदम् ।। १४७ ।।
भूरिराज्यं पुरं ग्राममुल्लङ्घ्य शान्तिसागरः ।
सिद्धक्षेत्रं सदापूतं प्राप्तः स्वर्णगिरिं विभुः ।। १४८ ।।

त्यानंतर, ते शांतिसागर स्वामी भव्य श्रावकांना संतुष्ट करून दयाधर्माचा प्रसार करीत आणि अनेक राजांचा नमस्कार स्वीकार करीत पुढे निघाले. आचार्यश्री घनदाट वनात, नदीकिनारी आणि पशूंचे वास्तव्य असलेल्या वनामध्ये अध्ययन, अरिहंत देवांची स्तुती, ध्यान आणि पुण्य वाढवणारे पाठ इत्यादी शुभकर्म संपन्न करीत अनेक राज्ये, नगरे आणि गावांना पार करीत सदा पवित्र अशा सोनागिरी सिद्धक्षेत्रावर पोहोचले.

दिगंबर मुनिदीक्षा

वन्दित्वा तच्छुभं क्षेत्रं निखिलांश्च जिनालयान् ।
चतुर्विंशतिशतेऽशब्दे षट्पञ्जाशत्तमे शुभे ।। १४९ ।।
मार्गशीर्षे शुभे मासे पौर्णिमायां शुभे दिने ।
मोक्षं गते जिने वीरे चत्वारो मुनयस्तदा ।। १५० ।।
प्रभाते दीक्षितास्तत्र शान्तिसागरयोगिना ।
तेषां नामानि वर्ण्यन्ते दीक्षितानां यथाक्रमम् ।। १५१ ।।

आचार्य महाराजांनी त्या शुभक्षेत्राची तसेच सर्व जिनालयांची वंदना केली. नंतर, २४५६ वीर निर्वाण संवतमध्ये मार्गशीर्ष या शुभ महिन्यामध्ये पौर्णिमेच्या शुभ दिवशी प्रातःकाळी आचार्य श्री शांतिसागरांनी चार ऐलकांना श्री जैनेश्वरी दीक्षा दिली. पुढे त्या दीक्षित मुनींची नावे क्रमानुसार सांगत आहे.

चन्द्रसागरयोगीन्द्रः धर्ममूर्तिः प्रभाववान् ।
विचक्षणो दयामूर्तिर्मुनिः श्रीपार्श्वसागरः ।। १५२ ।।
चतुर्विंशतिपूज्यानां स्तुतिकर्ता प्रसन्नधीः ।
ग्रन्थस्यास्य प्रणेताऽहं तृतीयः कुन्थुसागरः ।। १५३ ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ध्यानोपवासदक्षश्च तपस्वी नमिसागरः ।
चत्वारो मुनयश्चैते दीक्षितास्तत्र सूरिणा ।। १५४ ।।

धर्ममूर्ती आणि प्रभावशाली योगिराज चंद्रसागर दीक्षित झाले. दयेची मूर्ती आणि सर्वात विचक्षण श्री पार्श्वसागर मुनी दीक्षित झाले. चतुर्विंशती तीर्थंकर स्तुतीची रचना करणारे प्रसन्नचित्त आणि या ग्रंथाचा रचियता मी कुंथुसागर तिसरे तसेच ध्यान, उपवास करण्यामध्ये अत्यंत चतुर असे नमिसागर चौथे मुनी दीक्षित झाले. अशा प्रकारे त्या सोनागिरी पर्वतावर आचार्य महाराजांनी आम्हा चार ऐलकांना जैनेश्वरी दीक्षा देऊन मुनी बनवले होते.

क्षुल्लकोऽजितकीर्तिश्च विरक्तस्तत्र दीक्षितः ।
मुनयः क्षुल्लकाः सर्वे वीतरागाः दयालवः ।। १५५ ।।

विरक्त झालेले अजितकीर्तीसुद्धा तेथेच दीक्षित झाले होते. अशा प्रकारे दीक्षित झालेले ते सर्व मुनी आणि क्षुल्लक वैरागी आणि दयाळू होते.

ग्वालियर, मोरेना व राजाखेडामध्ये धर्मोपदेश

ततः सम्बोधयन् मार्गे विहरन् तत्र देशके ।
ग्वाल्येरनगरं प्राप्तः दिनानि कतिचित्स्थितः ।। १५६ ।।

नंतर त्या भागात, देशात विहार करीत आणि मार्गामध्ये जनतेला उपदेश देत पूज्य आचार्यश्री ग्वालियर महानगरात पोहोचले आणि काही दिवस तेथेच राहिले.

प्रार्थनावशतो यातो मक्खनलालशास्त्रिणः ।
मोरेनानगरं श्रीमानुपदेष्टुं च धार्मिकान् ।। १५७ ।।

मक्खनलाल शास्त्रींच्या प्रार्थनेमुळे, विनंतीमुळे ते आचार्यश्री धार्मिकांना उपदेश देण्यासाठी मोरेनानगरला आले.

स्थित्वा कतिदिनं तत्र राजाखेडापुरं गतः ।
सहतेस्माखिलैः सार्द्धमुपसर्गं द्विजादिजम् ।। १५८ ।।

मोरेनामध्ये काही दिवस राहून आचार्यश्री राजाखेडाला गेले. तेथे त्यांनी सर्व संघासह द्विजादिकांद्वारे केला गेलेला घोर उपसर्ग सहन केला.

श्री जम्बूस्वामी निर्वाण तीर्थ मथुरेमध्ये चातुर्मास

ततोऽचलत्समित्या हि धर्ममुद्योतयन् पथि ।
ग्रामं पुरं समुल्लङ्घ्य मथुरायां समागतः ।। १५९ ।।
श्रीजम्बुस्वामिनं नत्वा सिद्धभूमिं सुसिद्धिदाम् ।
तत्क्षेत्रं परमं रम्यं ध्यानयोग्यं निरीक्ष्य च ।। १६० ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वर्षायोगो धृतस्तत्र जगत्पूज्येन योगिना ।
वने चोपवने ध्यानं कदाचिज्जिनमन्दिरे ।। १६१ ।।
प्रभुपार्श्वे श्मशाने च कदाचिन्नगरे वरे ।
एवं ध्यानं सदा कुर्वन् वर्षायोगं व्यतीतवान् ।। १६२ ।।

आचार्यश्री ईर्या समितीपूर्वक मोरेनाहून विहार करून मार्गामध्ये धर्मप्रचार करीत नगरे तसेच गावांना पार करीत मथुरानगरीत आले. तेथे त्यांनी जम्बूस्वामींची स्तुती, वंदना केली आणि सर्वांना सिद्धी देणाऱ्या सिद्धभूमीला नमस्कार केला. त्यानंतर, ते क्षेत्र परममनोहर आणि ध्यानाला योग्य पाहून त्या जगत्पूज्य योगिराजाने तेथेच वर्षायोग धारण केला. आचार्यश्री कधी वनात, बागेत, कधी जिन मंदिरात, भगवंताजवळ, कधी स्मशानात तर कधी श्रेष्ठ नगरामध्ये ध्यान करीत असत. अशा प्रकारे नित्य ध्यानाराधना करीत त्यांनी वर्षायोग पूर्ण केला.

मथुरेमध्ये रथयात्रा महोत्सव

उपवासाधिकास्तत्र कृताः संघेन सूरिणा ।
रथोत्सवो जिनेशानां चिरकालेन नाभवत् ।। १६३ ।।
महिम्ना शान्तिसिन्धोश्च सर्वत्र चलितः पुरे ।
एवं धर्ममहोद्योतं कृत्वाऽचलत्ततः पुरः ।। १६४ ।।

मथुरेमध्ये चातुर्मासात आचार्य महाराजांनी संघासहित खूप उपवास केले. धर्मद्वेषी लोकांच्या विरोधामुळे मथुरानगरीत भगवान जिनेंद्र देवांचा रथोत्सव बऱ्याच दिवसांत झाला नव्हता. तोसुद्धा घोरोपसर्गविजयी आचार्याश्री शांतिसागरजी महाराजांच्या महिम्यामुळे सर्व नगरामध्ये फिरून आला. अशा प्रकारे धर्माची मोठी प्रभावना करीत ते आचार्यश्री पुढे निघाले.

ईर्यासमितिभावेन शुद्धं मार्गं विलोकयन् ।
अनेकग्रामनगरेषु बोधयन् श्रावकान् मुदा ।। १६५ ।।
उपसर्गं सहन् धीरः स्वात्मानं चिन्तयन् तदा ।
चचाल स्थापयन् भव्यान् जिनधर्मे सुखप्रदे ।। १६६ ।।

ते धीर – वीर आचार्यश्री ईर्या समितीच्या प्रासुक मार्गाला पाहत अनेक गावांतून, नगरांमधून श्रावकांना आनंदपूर्वक उपदेश देत. उपसर्गांवर विजय प्राप्त करीत, आपल्या आत्म्याचे चिंतन करीत आणि सुख देणाऱ्या जिनधर्मामध्ये अनेक भव्यांना स्थापन करीत पुढे जात.

अलीगढ़मध्ये क्षुल्लक दीक्षा

अलीगढ़पुरे रम्ये नन्दनलालशास्त्रिणे ।
ज्ञानसागरमाख्याय वितीर्णं क्षुल्लकव्रतम् ।। १६७ ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मार्गामध्ये अलीगढनामक सुंदर, मनोहर नगरामध्ये आचार्यश्रींनी पंडित श्री नंदनलाल शास्त्रींना क्षुल्लक दीक्षा प्रदान केली. दीक्षेनंतर त्यांचे नाव ज्ञानसागर ठेवले गेले.

दिल्लीमध्ये चातुर्मास

श्रीमहबूबसिंहस्य श्रीलालारामशास्त्रिण: ।
प्रार्थनात: समायात इन्द्रप्रस्थं महापुरम् ।। १६८ ।।

आचार्यश्री लाला महबूबसिंह आणि पंडित लालाराम शास्त्रीच्या विनंतीवरून देशाची राजधानी इंद्रप्रस्थ (दिल्ली) महानगरामध्ये पोहोचले.

गच्छतो यतमानस्य श्रीगुरोश्च शनैः शनैः ।
इन्द्रप्रस्थं महादूरं जातं गव्यूतिमात्रकम् ।। १६९ ।।

आचार्यश्री हळूहळू यत्नाचारपूर्वक चालत होते आणि दिल्ली तर फार दूर होती; तरीसुद्धा तिकडे जाण्याचा निर्धार झाल्यानंतर त्यांच्यासाठी दोन कोसाइतकी जवळ झाली.

जिनराजसुभक्तानां शान्तिसागरसेविनाम् ।
श्रद्धानां स्वात्ममग्नानां मोक्षोऽपि निकटायते ।। १७० ।।

जे श्रावक जिनराजाचे श्रेष्ठ भक्त आहेत तसेच दिगंबर आचार्यश्री शांतिसागर महाराजांसारख्या वीतरागी संताची सेवा करत आहेत आणि आपल्या आत्म्यात सदैव लीन राहतात; त्यांच्यासाठी मोक्षसुद्धा अगदी जवळ होतो.

बहुभिः श्रावकैः सार्द्धं राजलोकैर्वरैर्नरैः ।
जयशब्दं प्रकुर्वद्भिर्वाद्यैश्च विविधैर्ध्वनिम् ।। १७१ ।।
अभवाम वयं धन्या अद्यैवमिति धार्मिकैः ।
वदद्भिः प्रमुखैर्भव्यैः प्राविशद्दिल्लिपत्तनम् ।। १७२ ।।

अनेक श्रावक तसेच उत्तम राजपुरुषांसहित जयजयकार करीत तसेच अनेक प्रकारच्या वाद्यांच्या गजरात 'आज आम्ही लोक धन्य झालो' असे म्हणत अनेक प्रमुख धर्मात्मा भक्तांबरोबर आचार्यश्रींनी दिल्लीनगरामध्ये प्रवेश केला.

सर्वेषां भावनां ज्ञात्वा धार्मिकाणां शुभात्मनाम् ।
वर्षायोग: कृतस्तत्र संघेन गुरुणा सह ।। १७३ ।।

शुभ आत्म्याला धारण करणाऱ्या समस्त धर्मात्मा पुरुषांच्या भावनांना जाणून आचार्य महाराजांनी समस्त संघासहित राजधानी दिल्लीमध्येच चातुर्मास धारण केला.

जिनालयेषु सर्वेषु स्थित्वा सम्बोध्य धार्मिकान् ।
ध्यानं जपं[१] तप: कुर्वन् वर्षायोगं व्यतीतवान् ।। १७४ ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिल्लीच्या सर्व जिनालयांमध्ये जाऊन आचार्य महाराजांनी धर्मानुरागी सर्व लोकांना उपदेश दिला. अशा प्रकारे जप, तप आणि ध्यान करीत समस्त संघाने तो चिरस्मरणीय महिमावंत वर्षायोग समाप्त केला.

श्री महावीरजी अतिशय क्षेत्राची वंदना

ततोऽचलन्महावीरक्षेत्रं परमसुन्दरम् ।
तत्र प्राप्य नुतस्तेन वर्द्धमानो महाप्रभुः ।। १७५ ।।

त्यानंतर, त्यांनी संघासहित परमसुंदर महावीरजी अतिशय क्षेत्राकडे विहार केला आणि तेथे पोहोचल्यावर चाँदनपूर महावीर भगवान वर्धमान महाप्रभूंना नमस्कार करून पुनःपुन्हा त्यांची स्तुती केली.

नरेन्द्रा बहवो मार्गे वचनं शिवदं प्रितम् ।
आकर्ण्य शान्तिसिन्धोश्च नेमुस्तच्चरणद्वयम् ।। १७६ ।।

मार्गामध्ये बरेचसे राजे लोक त्यांच्या दर्शनासाठी आले आणि आचार्यश्री शांतिसागर महाराजांच्या कल्याणकारी प्रिय वचनांना ऐकून त्यांनी आचार्य महाराजांच्या चरणकमलांना नमस्कार केला.

त्यक्त्वा तदुपदेशेन मद्यं मांसमभक्ष्यकम् ।
बभूवुर्धार्मिका लोकाः दर्शनेन तपस्विनः ।। १७७ ।।

आचार्य महाराजांच्या उपदेशाने आणि संघातील त्या सर्व महातपस्वी मुनिराजांच्या दर्शनाने बरेचसे लोक मद्य, मासं इत्यादीचा त्याग करून धार्मिक आचरण करण्यास उद्युक्त झाले. धार्मिक बनले.

जयपूरमध्ये चातुर्मास

गोपीलाल फतेलाल जमुनालाल धर्मिणः ।
प्रार्थनावशतः श्रीमानिन्द्रलालस्य शास्त्रिणः ।। १७८ ।।
कोटतुल्यैर्महापूतैः सुन्दरैः कतिचिच्छतैः ।
जिनालयैर्महारम्यं हट्टैर्हर्म्यैर्मनोहरम् ।। १७९ ।।
चचाल जयपुरं सूरिर्यज्जैनानां महापुरम् ।
सद्ध्वजैस्तोरणै रम्यैः शालाभिश्च विराजितम् ।। १८० ।।

---

१. 'जकारो जन्मविच्छेदः पकारो पापनाशनम् ।
तस्माज्जप इति प्रोक्तः जन्मपापविनाशकः ।।

जप शब्दामध्ये जो 'ज' कार आहे तो जन्माचा नाश करण्याचा अर्थी आहे. तसेच 'प' कार 'पापनाश' या अर्थासाठी प्रयुक्त आहे. अशा प्रकारे 'जप' शब्दाचा अर्थ जन्म आणि पापाचा नाश करणारा असे सांगितले आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यानंतर शेठ गोपीलाल, श्री फतेहलाल, श्री जमुनालाल आणि पं. इंद्रलाल शास्त्री आदी प्रमुख जनांच्या प्रार्थनेमुळे, विनंतीमुळे आचार्यश्रींनी संघसहित जयपूरकडे प्रस्थान केले. जयपूरनगर किल्ल्यासमान, महापवित्र शेकडो सुंदर चैत्यालयांनी मनोहरयुक्त, बाजार-घरांनी रम्य, श्रेष्ठ ध्वजा, मनोहर तोरणे आणि अनेक शाळांनी शोभिवंत आहे, तसेच जैनांचे सर्वात मोठे शहर आहे.

बहुभिः श्रावकैः सार्द्धं नरैः राज्याधिकारिभिः ।
जयपुरं प्राविशत्सूरिः संघेन सह योगिराट् ।। १८१ ।।

अनेक श्रावकांसमवेत अनेक राज्यांच्या अधिकारी लोकांसह त्या महामुनी आचार्यश्री शांतिसागर महाराजांनी आपल्या समस्त संघासहित जयपूरनगरात प्रवेश केला.

त्यक्त्वा तदुपदेशेन तदाविलं जलं नराः ।
बभूवुर्बहवो धन्या गुणज्ञा व्रतधारिणः ।। १८२ ।।
धर्मसंवर्द्धकं क्षेत्रं जनान् ज्ञात्वा सुधार्मिकान् ।
वर्षायोगो धृतस्तत्र संघेन गुरुणा सह ।। १८३ ।।

त्यांच्या उपदेशाने अशुद्ध जलाचा त्याग करून बरेचसे लोक धन्य झाले, गुणज्ञ बनले आणि अनेक जण तर व्रती बनले. आचार्य महाराजांनी ते क्षेत्र धर्मवृद्धीकर आणि तेथील लोकांना धार्मिक समजून तेथेच संघसहित चातुर्मास, वर्षायोग धारण केला.

मोक्षदं शान्तिदं कुर्वन् क्षमापूर्णं महातपः ।
चातुर्मासं समाप्यैवं ततोपि पुरतोऽचलत् ।। १८४ ।।

तेथेच मोक्ष व शांती देणारे आणि क्षमेने परिपूर्ण तपश्चरण करीत आचार्यश्रींनी चातुर्मास पूर्ण करून पुढे विहार केला.

ब्यावरनगरामध्ये चातुर्मास

विहरन् तत्र सर्वत्र धर्ममुद्योतयन् सदा ।
उपसर्ग सहन् धीरः भव्यान् सन्तोषयन् मुदा ।। १८५ ।।
विरोधं विघ्नसंघातं भेदयन् बोधयन् जनान् ।
सर्वत्र मङ्गलं कुर्वन् सुखशान्तिं प्रसारयन् ।। १८६ ।।
सम्प्राप्तः सर्वसंघेन नवीननगरं वरम् ।
बहुभिः श्रावकैः सार्द्धं प्राविशन्नगरं मुदा ।। १८७ ।।

त्यानंतर, त्या राजपुताना प्रदेशात सर्वत्र विहार करीत, सदैव धर्मोपदेश देत, कधीमधी उपसर्ग सहन करीत, भव्य जीवांना आनंदासह संतुष्ट करीत, विरोध आणि विघ्नसमूहाचा नाश करीत, लोकांना धर्मोपदेश देत आणि सर्वत्र आनंद

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मंगल करीत, सुख-शांती पसरवीत ते धीर-वीर आचार्यश्री आपल्या समस्त संघाबरोबर धर्मभावनेने पुनीत असे नवे नगर ब्यावरमध्ये पोहोचले. अनेक श्रावकांसहित आनंदपूर्वक त्या संघाने नगरामध्ये प्रवेश केला.

धर्मवीरस्य विदुषः चम्पालालस्य श्रेष्ठिनः ।
मोतीलालादिसर्वेषां पुत्राणां तत्र श्रेष्ठिनः ।। १८८ ।।
प्रार्थनावशतस्तत्र ज्ञात्वा क्षेत्रं शुभं मुदा ।
वर्षायोगः समारब्धः ससंघेन च सूरिणा ।। १८९ ।।
छाणीस्थेन ससंघेन शान्तिसागरसूरिणा ।
गुरुवर्यस्य च पार्श्वे वर्षायोगो धृतस्तदा ।। १९० ।।

ब्यावरनगरामध्ये अत्यंत विद्वान, धर्मवीर शेठ चंपालाल रानीवालाच्या विनंतीवरून आणि त्यांच्या मोतीलाल आदी सर्व पुत्रांच्या प्रार्थनेवरून तसेच ते क्षेत्र शुभ समजून आचार्यश्री शांतिसागर महाराजांनी आपल्या समस्त संघासहित आनंदपूर्वक वर्षायोग धारण केला. त्याच गुरूवर आचार्यश्री शांतिसागरांजवळ त्याच नगरात छाणीनिवासी आचार्य श्री शांतिसागरांनीही आपल्या संघासहित वर्षायोग धारणा केला. अशा प्रकारे शताब्दीतील दोनदोन महान दिगंबर आचार्य आणि मुनींचा - त्यागींचा एकत्र चातुर्मासाचा दुर्लभ योग मिळाल्यामुळे ब्यावरनगरी धन्य झाली.

स्वाध्यायं कुर्वता तत्र धर्मध्यानं सुदुर्लभम् ।
भव्याः सम्बोधितास्तेन वर्षायोगो व्यतीतयत ।। १९१ ।।

तेथेच स्वाध्यायसहित अत्यंत दुर्लभ धर्मध्यान करीत आणि दररोज भव्यजीवांना उपदेश देत दोनही संघांनी वर्षायोग व्यतीत केला.

प्रतापगढमध्ये पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव

चतुर्विंशतिशतेऽब्दे षष्ट्याधिके महाशुभे ।
मोक्षं गते जिने वीरे फाल्गुने शुक्लपक्षके ।। १९२ ।।
प्रतिष्ठा जिनबिम्बानां घासीलालेन श्रेष्ठिना ।
कारिता शुभभावेन प्रतापगढ़पत्तने ।। १९३ ।।

वीर निर्वाण संवत २४६०, फाल्गुन शुक्ल पक्षामध्ये शेठ घासीलाल यांनी आपल्या प्रतापगढनगरामध्ये मोठ्या शुभभावनांनी जिनमूर्तींची प्रतिष्ठा करविली.

विहरन् तत्र देशेषु सूरिः श्रीशान्तिसागरः ।
भव्यानुपदिशन् प्राप्तः प्रतापगढपत्तनम् ।। १९४ ।।
प्रार्थनावशतस्तत्र संघभक्तस्य श्रेष्ठिनः ।
दृष्ट्वा महोत्सवं सूरिरहानि कानिचित्स्थितः ।। १९५ ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ब्यावरहून निघून त्या देशात विहार करीत आणि भव्य जीवांना उपदेश देत ते आचार्यश्री शांतिसागर संघभक्त - शिरोमणी शेठ घासीलाल यांच्या विनंतीवरून मूर्ती प्रतिष्ठा महोत्सवाची श्रीवृद्धी करीत काही दिवस प्रतापगढनगरामध्येच राहिले.

तदा द्वौ दीक्षितौ साधू गुरुवर्येण शान्तिदौ ।
वर्णयामि तयोर्नाम पापहारि यथाक्रमम् ।।१९६ ।।
प्रथमश्च दयामूर्तिरादिसागरनामकः ।
मम विद्यागुरुर्धीरः सुधर्मसागरोऽपरः ।। १९७ ।।
मनोहरः सुबुद्धिश्चविद्याया ध्वंसकारकः ।
तद्भ्रातरोऽपि विद्वांसः सरस्वत्याः सुतोपमाः ।। १९८ ।।

प्रतापगढमध्ये त्या वेळी आचार्यश्री शांतिसागरांनी दोन क्षुल्लकांना जैनेश्वरी दीक्षा दिली. पापनाश करणाऱ्या त्या दोन मुनिराजांची नावे मी क्रमशः सांगत आहे.

पहिल्या मुनीचे नाव दयामूर्ती श्री आदिसागर आहे आणि दुसरे धीरवीर मुनिराज, माझे-कुंथुसागर मुनींचे विद्यागुरू श्री सुधर्मसागर आहे. हे सुधर्मसागर फारच मनोज्ञ, अविद्येचा नाश करणारे तसेच बुद्धिमान आहेत. त्यांचे बंधूही सरस्वतीच्या पुत्राप्रमाणे विद्वान आहेत.

वर्णी सालिगरामश्च क्षुल्लकव्रतमाददे ।
सुनाम्नाऽजितकीर्तिश्च प्रसिद्धो गुणवानभूत् ।। १९९ ।।
एवं महोत्सवं दृष्ट्वा तत्रत्योऽपि प्रजापतिः ।
श्रेष्ठीति नगरस्यैव दत्तं तच्छ्रेष्ठिने पदम् ।। २०० ।।
न हिंसां कारयिष्यामि निजे कुत्रापि देशके ।
प्रतिज्ञां धृतवान् भूपः सूरिदर्शनतः सुधीः ।।२०१ ।।

ब्रह्मचारी सालिगरामने क्षुल्लक व्रत धारण केले आणि गुणवान अजितकीर्ती नावाने प्रसिद्ध झाले.

तेथील राजाने संघभक्त शिरोमणीने केलेला तो महोत्सव पाहून त्या श्रेष्ठीला नगरशेठचे पद बहाल केले. तसेच त्या बुद्धिमान राजाने आचार्यश्री शांतिसागर महाराजांचे दर्शन करून 'मी माझ्या राज्यात हिंसा होऊ देणार नाही' अशी प्रतिज्ञा धारण केली.

आगतान् सकलान् भव्यान् प्रतिष्ठामङ्गलोत्सवे ।
सम्बोध्य करुणासिन्धुराचार्यश्च ततोऽचलत् ।। २०२ ।।

त्या प्रतिष्ठा मंगलोत्सवात जे भव्यजीव आले होते; त्या सर्वांना यथायोग्य उपदेश देऊन ते दयाळू आचार्यश्री पुढे विहार करून गेले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उदयपूर (राजस्थान) मध्ये चातुर्मास

मार्गे प्रबोधयन् भव्यान् मिथ्याभ्रान्तिं विनाशयन् ।
सर्वत्र सञ्चरन् देशे कुर्वन् स विविधं तपः ।। २०३ ।।
तथोदयपुरं प्राप्तः पालयंश्च महाव्रतम् ।
तत्र लखमीचन्द्रश्च छोगालालस्य धर्मिणः ।। २०४ ।।
मोतीलालस्य भव्यस्य चाँदमल्लगुलाबयोः ।
प्रार्थनावशतो धीमान् पुरं दृष्ट्वा सुधार्मिकम् ।। २०५ ।।
सरोभिः पर्वतैः रम्यं ध्यानयोग्यं तपस्विनाम् ।
करोति स्म ससंघोऽसौ वर्षायोगं महामुनिः ।। २०६ ।।

मार्गामध्ये भव्य जीवांना उपदेश देत, त्यांच्या मिथ्याभ्रांती दूर करीत, अनेक गावे आणि नगरांतून विहार करीत, अनेक प्रकारचे तपश्चरण करीत आणि महाव्रतांचे निर्दोष पालन करीत ते आचार्य उदयपूरला पोहोचले. उदयपूरचे शेठ श्री. लखमीचंद, श्री. छोगालाल, श्री. मोतीलाल, श्री. चांदमल, श्री. गुलाबचंद आदी प्रमुख धार्मिक जनांच्या प्रार्थनेवरून त्या बुद्धिमान महामुनी आचार्यश्रींनी उदयपूरनगरामध्ये धर्मात्मा लोकांना पाहून, ते नगर सरोवर आणि पर्वतांनी मनोहर तसेच तपस्वींसाठी ध्यानयोग्य पाहून संघासहित वर्षायोग तेथे धारण केला.

राजवर्गैः सदा पूज्यः कुर्वन् धर्मोपदेशनाम् ।
स संघेन तदा सूरिर्वर्षायोगं व्यतीतवान् ।। २०७ ।।

धुलेवनगरात धर्मोपदेश

तत्र प्राप्य स संघेन धुलेवनगरं प्रति ।
भूयो भूयः प्रणम्याथ देवं स्तुत्वा ततोऽचलत् ।। २०८ ।।

राजवर्गाद्वारे सदा पूज्य अशा त्या आचार्य महाराजांनी धर्मोपदेश देत, आपल्या सर्व संघासहित उदयपूरमध्ये आनंदसहित वर्षायोग व्यतीत केला. तेथून ते संघासहित धुलेवनगरीत पोहोचून भगवान वृषभदेवांना पुनःपुन्हा नमस्कार करून त्यांची स्तुती करीत अन्यत्र विहार करते झाले.

इति उत्तरदिशा अध्याय पूर्णः

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

।। श्री वीतरागाय नमः ।।

आचार्यश्रीकुंथुसागरविरचितम्

आचार्यश्रीशांतिसागरचरितम्

अथ चतुर्थ अध्यायः
चतुर्थ अध्याय

दिनानि कतिचित्स्थित्वा सूरिर्धर्मोपदेशकः ।
कालीदासवकीलस्य केवलल्लूधर्मिणः ।। २०९ ।।
मगनलालनाथस्य प्रार्थनावशतस्तदा ।
दयासिन्धुर्जगद्वन्द्य ईडरं प्रति सोऽगमत् ।। २१० ।।

जगद्वन्द्य, करुणेचे सागर आणि धर्मोपदेशक महामुनी पूज्य आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांनी काही दिवस राहून श्री. कालिदास वकील, श्री. केवलभाई, श्री. लल्लूभाई, श्री. मगनलाल, श्री. नाथ आदी धर्मात्मा बंधूंच्या प्रार्थनेमुळे, विनंतीमुळे ईडरकडे प्रस्थान केले.

गोरल (गुजरात) मध्ये चातुर्मास

भव्यान् प्रमुदितान् कुर्वञ्जिनधर्मं प्रभावयन् ।
नामयन् राजलोकांश्च तन्वन् धर्मोपदेशनाम् ।। २११ ।।
स्वात्मानं चिन्तयन् सूरिः दया धर्मं प्रपालयन् ।
गोरलं नगरं प्राप्तः स संघेन क्रमात् मुदा ।। २१२ ।।

भव्य जीवांना प्रसन्न करीत, जिनधर्माची प्रभावना करीत, राजा आणि राजपुरुषांकडून नमस्कार घेत, धर्मोपदेश देत, आपल्या आत्म्याचे चिंतन करीत आणि दयाधर्माचे पालन करीत आचार्यश्री येथून निघून आनंदाने गोरलनगरामध्ये पोहोचले.

दृष्ट्वा रम्यतरं क्षेत्रं चैकान्तं निरुपद्रवम् ।
सूरिणा गुरुवर्येण वर्षायोगो धृतस्तदा ।। २१३ ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यशोधरेण भव्येन नेमिसागरयोगिना ।

द्वाभ्यां हि ब्रह्मचारिभ्यां क्षुल्लकेन समं तदा ।। २१४ ।।

त्या गोरल क्षेत्राला मनोहर, एकान्त आणि उपद्रवरहित पाहून गुरुवर्य आचार्यश्रींनी मुनी नेमिसागर, क्षुल्लक भव्यसागर तसेच यशोधर आणि अन्य दोन ब्रह्मचाऱ्यांबरोबर गोरलमध्येच वर्षायोग धारण केला.

शान्तिदं विविधं ध्यानं प्रकुर्वन् मोक्षदं तपः ।

गोरले पत्तने धीरः स्थितवान् बोधयन् जनान् ।। २१५ ।।

शांती देणारे, अनेक प्रकारचे ध्यान तसेच मोक्ष प्रदान करणारे तपश्चरण करीत ते महामुनी जीवांना उपदेश देत गोरलनगरामध्ये थांबले.

गोरलात्पञ्चक्रोशं हि दूरमीडरपत्तनम् ।

ध्यानयोग्यं शुभं क्षेत्रं पर्वतैरपि वेष्टितम् ।। २१६ ।।

तत्र गत्वा ससंघेन वर्षायोगं सुपुण्यदम् ।

कुर्विति स्वामिवर्येणाज्ञापितो धर्मसागरः ।। २१७ ।।

आचार्यवर्य श्री शांतिसागर महाराजांनी मुनिश्री सुधर्मसागरांना आज्ञा दिली की, गोरलपासून पाच कोस दूर शुभध्यानासाठी योग्य आणि पर्वतांनी वेष्टित ईडर नगर आहे. तुम्ही संघसहित तेथे जाऊन पुण्य वाढणारा वर्षायोग धारण करा.

तदाज्ञां शिरसा धृत्वा सुधर्मोऽपि दयानिधीः ।

शेषसंघं समादाय प्राप्त ईडरपत्तनम् ।। २१८ ।।

दयानिधी मुनिश्री सुधर्मसागरजींनी आचार्य महाराजांची आज्ञा शिरोधार्ह मानून शेष संघाबरोबर ईडरनगरामध्ये प्रवेश केला.

सुधर्मसागरस्यान्ते क्षुल्लकाः पञ्चवर्णिताः

ऐलकोऽपि च धर्मज्ञो मुनयोऽपि त्रयो मताः ।। २१९ ।।

वीरसागरनामान्य आदिसागरनामभाक् ।

कुन्थुसागरनामाहमेते च मुनयो मता : ।। २२० ।।

सुमतिसागरो भव्यो य आर्यव्रतभूषणः ।

पार्श्वकीर्तिश्चन्द्रकीर्तिर्गुणज्ञोऽजितकीर्तिकः ।। २२१ ।।

शुभचन्द्रो नेमिसिन्धुश्च क्षुल्लकाः पञ्चकीर्तिताः ।

सर्वैःसाकं तदाऽचार्यो वर्षायोगं गृहीतवान् ।। २२२ ।।

ईडरच्या त्या रमणीय चातुर्मासामध्ये आम्ही सर्व प्रथमच आचार्य महाराजांपासून वेगळे राहून साधना करीत होतो. वरिष्ठ मुनिश्री सुधर्मसागर महाराजांबरोबर आम्ही तीन मुनी श्री वीरसागरजी महाराज, मी – मुनी कुंथुसागर स्वतः आणि तिसरे मुनिश्री आदिसागरजी महाराज होतो. श्री सुमतीसागरजींनी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ऐलकांची व्रते घेतली होती. पाच क्षुल्लक महाराज- श्री पार्श्वकीर्तीजी, श्री चंद्रकीर्तीजी, श्री अजितकीर्तीजी, श्री शुभचंद्रजी आणि श्री नेमिसागरजीसुद्धा आमच्याबरोबर होते. आम्ही सर्वांनी साधर्मी वात्सल्याने धर्माची प्रभावना करीत गुरुवर आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांच्या मंगल आशीर्वादाच्या बळावर मोठ्या आनंदाने तो चातुर्मास व्यतीत केला. ईडर आणि आजूबाजूच्या धर्मानुरागी श्रावकांनीही या चातुर्मासामध्ये खूप धर्मलाभ घेतला.

इतश्चाचार्यवर्येणार्हद्दासक्षुल्लको मुदा ।
दीक्षिता: सुमतिश्चाथ जिनमतिश्च क्षुल्लिके ।। २२३ ।।

तिकडे गोरलमध्ये चातुर्मास साधना करीत असलेल्या पूज्य आचार्य महाराजांच्या कृपाळू करकमलांनी अर्हद्दासला क्षुल्लक दीक्षा प्राप्त झाली तसेच जिनमतीजी आणि सुमतिमतीजी या दोन क्षुल्लिका संघामध्ये दीक्षित झाल्या.

इत्येवं बोधयन् भव्यान् चातुर्मासं व्यतीतवान् ।
स्वर्गमोक्षदो हि पूज्यो गुरुवर्य: क्षमानिधि: ।। २२४ ।।

अशा प्रकारे भव्य जीवांच्या चित्तामध्ये आपल्या सदुपदेशाच्या माध्यमातून स्वर्गसंपदेनंतर मोक्षलक्ष्मीची योग्यता जागवणाऱ्या परमपूज्य क्षमानिधी गुरुवर्यांनी गोरलनगरचा ऐतिहासिक चातुर्मास व्यतीत केला.

तारंगा सिद्धक्षेत्राची यात्रा

सर्वसंघं समादाय आचार्य: शान्तिसागर: ।
तारंगासिद्धिभूमिं च वन्दनार्थं ततोऽचलत् ।। २२५ ।।

त्यानंतर, आचार्यश्री शांतिसागर स्वामींनी सर्व संघ घेऊन तारंगा सिद्धभूमीची वंदना करण्यासाठी प्रस्थान केले.

षड्भिस्तपस्विभि:सार्द्धं तावद्भि: क्षुल्लकै: समम् ।
सार्द्धं च क्षुल्लिकाभ्यां हि बहुभिर्ब्रह्मचारिभि: ।। २२६ ।।
श्रावकैर्द्विसहस्रैश्च कुर्वद्भिश्च जयध्वनिम् ।
भूधरं कम्पयन् प्राप्त: सिद्धक्षेत्रं महामुनि: ।। २२७ ।।

त्या महान आचार्यांनी सहा तपस्वी मुनिराज, सहा क्षुल्लक, दोन क्षुल्लिका आणि अनेक ब्रह्मचारीसमवेत भूधरांना कंपित करणारा जयजयकार करणाऱ्या दोन हजार श्रावकांसहित सिद्धक्षेत्र श्री तारंगाजीमध्ये प्रवेश केला.

मुनित्रयाची वंदना

वन्दित्वा वरदत्तं च तथा सागरदत्तकम् ।
वराङ्गं सिद्धक्षेत्रं च कृतकृत्योऽभवत्तदा ।। २२८ ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तारंगा सिद्धक्षेत्रावर सर्वांनी मोक्षगामी वरदत्त, सागरदत्त आणि वरांग नावाच्या महामुनींना तसेच पूज्य सिद्धभूमीलाही नमन केले. अशा प्रकारे वंदना करून पूर्ण संघ कृतकृत्य झाला.

ध्यानं तपो जपं कुर्वन् स्वात्मानं चिन्तयन् गिरौ ।
संघेन सह संघश्रीः दिनानि कतिचित्स्थितः ।। २२९ ।।

त्या पर्वतावर ध्यान, तप, जप करीत आपल्या आत्म्याचे चिंतन करीत ते संघाधिपती संघासहित काही दिवस तेथे विराजमान राहिले.

शान्तिसागरसूरेश्च बान्धवा अपि धार्मिकाः ।
तेषां व्रतानि वक्ष्येऽहं गृहीतानि मुदा च तैः ।। २३० ।।

पूज्य आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांचे सागार अवस्थेतील बंधुगणसुद्धा धर्मानुरागी आहेत. त्यांनी आनंद आणि उत्साहपूर्वक जी व्रते ग्रहण केली; ते मी येथे सांगतो.

ज्यायांश्च देवगौडाख्यो बन्धुर्धर्मपरायणः ।
त्यक्त्वा मोहं कुटुम्बं चागृहीच्च क्षुल्लकव्रतम् ।। २३१ ।।

आचार्यश्रींचे सर्वात ज्येष्ठ भाऊ (भ्राता) देवगौडा फारच धार्मिक आहेत. त्यांनी कुटुंबाचा मोह सोडून क्षुल्लकाची व्रते धारण केली.

शुद्धव्रतस्य तस्यास्ति नाम सन्मतिसागरः ।
द्वितीयः आदिगौडाख्यः सच्छ्रावकशिरोमणिः ।। २३२ ।।

व्रतांचे निर्दोष निरतिचार पालन करणाऱ्या त्या क्षुल्लकजींचे नाव सन्मतिसागर ठेवले गेले. दुसऱ्या मोठ्या भावाचे नाव आदिगौड आहे. त्यांनी श्रावकाची व्रते धारण केली आहेत आणि ते श्रावकशिरोमणी म्हणून ओळखले जातात.

चतुर्थः कुमगौडाख्यो विरक्तो भवभोगतः ।
मोहं विहाय मोक्षार्थी ब्रह्मचारी वरोऽभवत् ।। २३३ ।।

चौथा छोटा भाऊ कुमगौड आहे. तो संसार व भोगांपासून विरक्त आहे. मोक्षप्राप्तीचा इच्छुक आहे. मोक्षाकांक्षी आहे. तोसुद्धा गृहस्थीचा मोह सोडून श्रेष्ठ ब्रह्मचारी झाला आहे.

तृतीयः सातगौडाख्यो जगच्चूडामणिर्जिनः ।
ममात्मसुखदाता च सूरिः श्रीशान्तिसागरः ।। २३४ ।।

तिसरा भाऊ सातगौड! तेच नित्य वंदनीय महामुनी आहेत; जे जगाचे चूडामणी, मोहरूपी शत्रूला जिंकणारे आणि माझ्या आत्म्याला सुख देणारे आचार्यश्री शांतिसागर महाराजांच्या नावाने प्रसिद्ध आहेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यद्वारे दीक्षितांची गणना

चन्द्रमत्यार्यिका जाता गुरुवर्येण दीक्षिता ।
अन्येषां दीक्षितानां च गणना क्रियतेऽधुना ॥ २३५ ॥

आचार्यश्री शांतिसागर महाराजांनी चंद्रमतीला आर्यिका दीक्षा दिली होती आणि ज्यांना ज्यांना आचार्यश्रीजींनी दीक्षा दिली आहे; त्यांची फक्त गणनाच केली जात आहे.

वन्द्येनाचार्यवर्येण शान्तिसागरयोगिना ।
दशैव मुनयः पूताः पूज्यपादेन दीक्षिताः ॥ २३६ ॥

ज्यांचे चरणकमल पूज्य आहेत आणि जे सर्वांद्वारे वंदनीय आहेत, अशा आचार्यश्री शांतिसागर महामुनींनी पवित्र १० भव्यांना दिगंबरी दीक्षा देऊन मुनी बनवले.

क्षुल्लका गुरुवर्येण पञ्चदशैव दीक्षिताः ।
क्षुल्लिका दीक्षिताः सप्त त्रिंशद्धि ब्रह्मचारिणः ॥ २३७ ॥

आचार्य महाराजांनी १५ क्षुल्लकांना आणि सात क्षुल्लिकांना दीक्षा दिली तसेच ३० मुमुक्षूंना ब्रह्मचर्य व्रत दिले.

व्रतिनः पुरुषाः षष्टिः त्रिनवतिर्व्रतीः स्त्रियः ।
दीक्षिता ब्रह्मचारिण्यः पञ्चविंशतिर्धीमता ॥ २३८ ॥

त्या बुद्धिमान आचार्यश्रींनी ६० पुरुष, ९३ स्त्रियांना अणुव्रत दिले आणि २५ श्राविकांना ब्रह्मचारिणी बनवले.

पञ्चमप्रतिमायुक्ता जाताः पञ्च स्त्रियो वराः ।
प्रथमप्रतिमायुक्ताः सञ्जाता बहवो नराः ॥ २३९ ॥

आचार्यश्रींनी पाच श्रेष्ठ स्त्रियांना पाचव्या प्रतिमेचे व्रत दिले तसेच बऱ्याच पुरुषांना पहिली प्रतिमा देऊन अनुशासनबद्ध करून व्रती बनवले.

श्राद्धेभ्यः पञ्चलक्षेभ्यः ददौ यज्ञोपवीतकम् ।
विशेषव्रतयुक्तेन सार्द्धं मूलगुणेन हि ॥ २४० ॥

आचार्य महाराजांनी सुमारे पाच लाख श्रावकांना विशेष व्रत तसेच मूलगुणांसहित यज्ञोपवीत दिले.

आचार्यश्री शांतिसागरांचे पवित्र कूळ

यस्मिन्कुले समुत्पन्नास्तीर्थेशा धर्मनायकाः ।
तस्मिन्नेव कुले पूते शुभं जन्म महात्मनः ॥ २४१ ॥

ज्या कुळामध्ये धर्माचे स्वामी तीर्थंकर उत्पन्न झाले; त्याच पवित्र कुळात महात्मा शांतिसागरांचा शुभजन्म झाला.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हे क्षमावीर! हे धीर! कृपाब्धे करुणानिधे ।
शक्तः शक्रोप्यशक्तोस्ति वक्तुं तव चरित्रकम् ।। २४२ ।।
मम विद्याविहीनस्य मन्दबुद्धेः कथैव का ।
तथापि तव भक्त्यैव रचितं केवलं मया ।। २४३ ।।
श्रीमन् तवैव शिष्येण कुन्थुसागरयोगिना ।
वर्णितं त्वच्चरित्रं च सम्भूयात्स्वर्गमोक्षदम् ।। २४४ ।।

हे क्षमा धारण करणाऱ्यांमध्ये वीर, हे धीर, हे कृपासिंधू, हे करुणानिधी! सामर्थ्यवान शक्र (इंद्र) सुद्धा आपले चरित्र सांगण्यास असमर्थ आहे; मग विद्यारहित आणि मंदबुद्धी मी, तर माझे सामर्थ्य कसे असणार ? तरीसुद्धा हे श्रीमान ! आपलाच शिष्य मी कुंथुसागर मुनींनी केवळ आपल्या भक्तिवशात आपले चरित्र वर्णन केले. आपले चरित्र स्वर्ग-मोक्ष प्रदान करणारे होवो.

जयतु जयतु देवः शान्तिसिन्धुर्महात्मा ।
सुरनरमुनिपूज्यः राजलोकैः सुसेव्यः ।
मम दुरितनिहन्ता कुन्थुसिन्धोर्गुरुर्यः ।
भवतु शिवनिमग्नो भव्यकल्याणदाता ।। २४५ ।।

जे देव, मनुष्य आणि मुनींद्वारे पूज्य आहेत, राजेलोक ज्यांची सेवा करतात, जे माझ्या (कुंथुसागरांच्या) पापांचा नाश करणारे आहेत तसेच माझे (कुंथुसागर) मुनीचे दीक्षाप्रदाता गुरू आहेत, जे भव्य जीवांचे सदा कल्याण करणारे आहेत, असे महात्मा शांतिसागर आचार्य सदा जयवंत होवोत आणि एक दिवस मोक्षसुखामध्ये निमग्न होवोत.

इति पश्चिमादिशा अध्याय

ग्रंथकर्ता – प्रशस्ती

चतुर्विंशतिशतेऽब्दे द्विषष्ट्याधिक – वत्सरे ।
वीरे मोक्षं गते पूर्णे कार्तिके चेडरे पुरे ।। २४६ ।।
शान्तिसागरशिष्येण कुन्थुसागरयोगिना ।
सम्भवस्वामिचैत्ये श्रीचरित्रं लिखितं शुभम् ।। २४७ ।।

भगवान तीर्थंकर महावीर वर्धमान मोक्षाला गेल्यानंतर दोन हजार चारशे बासष्टाव्या (२४६२) वर्षामध्ये कार्तिक शुक्ल पौर्णिमेदिवशी ईडरनगरात श्री संभवनाथ जिनालयामध्ये आचार्यश्री शांतिसागर महाराजांचे शिष्य कुंथुसागर मुनींनी हे पवित्र चरित्र लिहून पूर्ण केले.

समाप्तोऽयं ग्रंथः ।

ग्रंथ समाप्त ।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रस्तुत ग्रंथामध्ये प्रयुक्त विशिष्ट पारिभाषिक शब्द

१. क्षुल्लक – आत्मविकासाच्या ११ प्रतिमा (लघुमुनी)
२. वर्षायोग – चातुर्मासासाठी प्रयुक्त पर्यायवाची शब्द
३. जप – वैखरी जप, उपांशू जप, मानसादी जप
४. तप – इच्छानिरोधस्तपः । ध्यानं स्यादप्रमत्तके (शास्त्रसार समुच्चय १४८)
५. ध्यान – ज्ञानध्यानतपोरक्तः । एकाग्रचिंतानिरोधोध्यानम् ।
६. मिथ्यात्व – जीवादी तत्त्वांचे विपरीत श्रद्धान
७. सम्यक्त्व – जीवादी तत्त्वांचे सम्यक् श्रद्धान
८. श्रावक – धर्मात्मा, विवेकसंपन्न सद्गृहस्थ
९. चातुर्मास – वर्षायोगासाठी प्रयुक्त पर्यायवाची शब्द
१०. प्रवचनसार – आचार्य कुंदकुंद रचित एक महान ग्रंथ
११. उपसर्ग – देव, मनुष्य, तिर्यंच किंवा प्रकृतीद्वारे केले गेलेले उपद्रव.

चारित्र्यचक्रवर्ती आचार्यश्री शांतिसागरजींच्या चातुर्मासाची सूची

क्र.	वर्ष	स्थान
१	१९१५	कोगनोळी
२	१९१६	कुंभोज
३	१९१७	जैनवाडी, चिक्कोडी
४	१९१८	समडोळी (क्षुल्लक अवस्थेमध्ये)
५	१९१९	नसलापूर (ऐलक अवस्थेमध्ये)
६	१९२०	कोगनोळी
७	१९२१	नसलापूर
८	१९२२	ऐनापूर
९	१९२३	कोन्नूर (सर्प उपसर्ग)
१०	१९२४	समडोळी (आचार्यपद)
११	१९२५	कुंभोज (श्रवणबेळगोळ यात्रा)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१२	१९२६	नांदणी
१३	१९२७	बाहुबली (महाराष्ट्र)
१४	१९२८	कटनी
१५	१९२९	ललितपूर
१६	१९३०	मथुरा
१७	१९३१	दिल्ली
१८	१९३२	जयपूर
१९	१९३३	ब्यावर
२०	१९३४	उदयपूर
२१	१९३५	गोरल
२२	१९३६	प्रतापगढ
२३	१९३७	गजपंथ (चारित्रचक्रवर्ती पद धारण केले)
२४	१९३८	बारामती
२५	१९३९	पावागढ
२६	१९४०	गोरल
२७	१९४१	अकलूज
२८	१९४२	कोरोची
२९	१९४३	डिग्रज
३०	१९४४	कुंथलगिरी
३१	१९४५	फलटण
३२	१९४६	कवलाना
३३	१९४७	सोलापूर
३४	१९४८	फलटण
३५	१९४९	कवलाना
३६	१९५०	गजपंथ
३७	१९५१	बारामती
३८	१९५२	लोणंद
३९	१९५३	कुंथलगिरी
४०	१९५४	फलटण
४१	१९५५	कुंथलगिरी (समाधी)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महाश्रमण आचार्यश्री शांतिसागर मुनींचे हस्ताक्षर

"समयसार" के अनन्य प्रभावक
चारित्रचक्रवर्ती प्रात:स्मरणीय
आचार्य श्री शांतिसागर जी मुनिराज
के करकमलों से लिखित "समयसार" की कुछ पंक्तियाँ


श्रीमत्कुन्द कुन्दाचार्यविरचितः।
समयसारः।
वंदित्वा सर्वसिद्धान् ध्रुवामचलामनौपम्यां गतिं प्राप्तान्।
वक्ष्यामि समयप्राभृतमिदं अहो श्रुतकेवलिभणितम्॥१॥
जीवः चरित्रदर्शनज्ञानस्थितः तं हि स्वसमयं जानीहि।
पुद्गलकर्मप्रदेशस्थितं च तं जानीहि परसमयम्॥२॥
एकत्वनिश्चयगतः समयः सर्वत्र सुंदरो लोके।
बंधकथैकत्वे तेन विसंवादिनी भवति॥३॥
श्रुतपरिचितानुभूता सर्वस्यापि कामभोगबंधकथा।
एकत्वस्योपलंभः केवलं न सुलभो विभक्तस्य॥४॥

दीक्षा के तृतीय-वर्ष में पं.वंशीधर जी सोलापुरवालों से स्वाध्याय-क्रम में "समयसार" का स्वाध्याय करने पर अपनी हस्तलिपि में आचार्यश्री ने ये पंक्तियाँ लिखी थी। इनसे पूज्य आचार्यश्री का "समयसार" के प्रति अनन्य निष्ठा ज्ञापित होती है।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परमपूज्य आचार्य शांतिसागर महाराजांचे
अंतिम मंगल प्रवचन

ॐ जिनाय नमः, ॐ सिद्धाय नमः, ॐ अर्ह सिद्धाय नमः ।

भरत ऐरावत क्षेत्रस्थ भूत-भविष्य-वर्तमान, तीस चौवीसों भगवान् नमोः नमः । सीमंधरादि वीस विहरमान तीर्थंकर भगवान नमो नमः । ऋषभादि महावीरपर्यंत १४५२ गणधरदेवेभ्ये: नमो नमः । ६४ ऋद्धिधारी मुनीश्वराय नमो नमः । अंतकृत केवली मुनिश्वराय नमो नमः । प्रत्येक तीर्थंकर वेळी दहादहा घोरोपसर्ग विजयी मुनिश्वराय नमो नमः ।

११ अंग १४ पूर्व शास्त्र महासमुद्र आहे. त्यांचे वर्णन करणारे आज कोणी केवली नाहीत, कोणी श्रुतकेवली नाहीत. आमच्यासारखे क्षुद्र काय वर्णन करणार? आत्म्याचे कल्याण करणारी जिनवाणी सरस्वती श्रुतदेवी आहे. अनंत समुद्राइतकी आहे. तर, त्या जिनवाणीमध्ये सांगितल्याप्रमाणे जिनधर्म हा जो कोणी जीव धारण करील; त्या जीवाचे कल्याण अवश्य होईल. त्यापैकी, एक अक्षर - 'ॐ' हे एकच अक्षर जो धारण करतो; त्या जीवाचे कल्याण अवश्य होते. या ॐ अर्थात पंच णमोकार मंत्राच्या स्मरणाने सम्मेदशिखरजीवर भांडण करणारे दोन वानर स्वर्गाला गेले. सुदर्शन श्रेष्ठी याच्या स्मरणाने मोक्षाला गेला. सप्त व्यसनधारी अंजन चोर मोक्षाला गेला. हे तर सोडा! नीच जातीचा कुत्रा जीवंधर कुमाराच्या उपदेशाने सद्गतीला गेला. इतका महिमा जिनधर्माचा आहे. परंतु, कोणी धारण करीत नाही. जैन होऊनसुद्धा जिनधर्मावर विश्वास नाही. अनंतकालापासून जीव व पुद्गल शरीर हे दोन्ही भिन्न आहेत, हे सर्व जग जाणते. परंतु, विश्वास नाही. पुद्गलालाच जीव व जीवाला पुद्गल मानत आला आहे. दोन्हींचे गुणधर्म अलग आहेत. हे दोन्ही अलगअलग आहेत. जीव पुद्गल आहे का? का पुद्गल जीव आहे ? पुद्गल तर जड आहे. स्पर्श, रस, वर्ण, गंध हे त्याचे गुण आहेत. ज्ञानदर्शन अर्थात चेतना हे जीवाचे लक्षण आहे. आपण तर जीव आहोत. जीवाचा पक्ष घेतला तर पुद्गलाचा घात होतो. पुद्गलाचा पक्ष घेतला तर जीवाचा घात होतो. परंतु, मोक्षाला जाणारा जीव हा एकटाच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे. पुद्गल नाही. जीवाचे कल्याण करणे, अनंत सुखाला पोहोचविणे आपले काम आहे. परंतु, हे मोहनीय कर्माने जग सगळे भुलून गेले आहे. दर्शन मोहनीय कर्म सम्यक्त्वाचा घात करते. चारित्र्य मोहनीय कर्म चारित्र्याचा घात करते; तर आपण काय केले पाहिजे? सुख प्राप्त करण्याकरिता आपण काय केले पाहिजे? दर्शन मोहनीय कर्माचा क्षय करण्याकरिता 'सम्यक्त्व' धारण केले पाहिजे आणि चारित्र महनीय कर्माचा क्षय करण्याकरिता 'संयम' धारण करावा, हा आमचा उपदेश व आदेश आहे.

अनंतकालापासून जीव मिथ्याकर्माच्या योगाने संसारामध्ये फिरत आहे; तर मिथ्याकर्माचा नाश केला पाहिजे. सम्यक्त्व धारण केले पाहिजे. तर, सम्यक्त्व काय आहे, याचे समग्र वर्णन कुंदकुंदाचार्यांनी समयसार, नियमसार, प्रवचनसार, पंचास्तिकायादी ग्रंथांमध्ये केलेले आहे. पण, यांच्यावर श्रद्धा ठेवतो कोण? तर, आपला आत्मा, कल्याण करून घेणारा जीव श्रद्धा ठेवून सुख कशाने होईल याचा अनुभव घेतो. असेच संसारामध्ये फिरावयाचेच असेल तर अनादिकालापासून फिरत आलाच आहे, उपाय नाही. तर, सुख प्राप्त करण्याकरिता आपण काय केले पाहिजे ? दर्शन मोहनीय कर्माचा क्षय केला पाहिजे. दर्शन मोहनीय कर्माचा क्षय आत्मचिंतनानेच होतो. दान-पूजा केली तर पुण्यबंध होतो. तीर्थयात्रा केली तर पुण्यबंध होतो. हर एक धर्माचे काम पुण्यबंधाचे कारण आहे. परंतु, केवलज्ञान होण्याला, अनंत कर्माची निर्जरा होण्याला आत्मचिंतन हेच साधन आहे. ते आत्मचिंतन २४ घंटेपैकी ६ घडी उत्कृष्ट, ४ घडी मध्यम, २ घडी जघन्य; निदान १०-१५ मिनिटे, आमचे म्हणणे ५ मिनिटे आत्मचिंतन करावे. आत्मचिंतनाशिवाय 'सम्यक्त्व' प्राप्त होत नाही. संसारबंध तुटत नाहीत. जन्म - जरा - मरण सुटत नाही. सम्यक्त्वाशिवाय दर्शन मोहनीय कर्माचा क्षय होत नाही. सम्यक्त्व होऊन ६६ सागरांपर्यंत हा जीव राहील; तर चारित्र - मोहनीय कर्माचा क्षय करण्याकरिता संयमच धारण केला पाहिजे. संयमाशिवाय चारित्र मोहनीय कर्माचा क्षय होत नाही. तर कसेही असो, हर एक जीवाने संयम धारण केला पाहिजे. म्हणून भिऊ नका, भिऊ नका ! संयम धारण करण्यास भिऊ नका. कपड्यात संयम नाही. कपड्यात सातवे गुणस्थान नाही, सातव्या गुणस्थानाशिवाय आत्मानुभव नाही. आत्मानुभवाशिवाय कर्मनिर्जरा नाही. कर्मनिर्जरेशिवाय केवलज्ञान नाही. केवलज्ञानाशिवाय मोक्ष नाही. म्हणून भिऊ नका ! संयम धारण करण्यास भिऊ नका. ॐ सिद्धाय नमः।

सविकल्पसमाधी-निर्विकल्पसमाधी असे दोन भेद आहेत. सविकल्प-समाधी कपड्यामध्ये गृहस्थाला होते. कपड्यामध्ये निर्विकल्पसमाधी नाही. निर्विकल्पसमाधी साधल्याशिवाय वास्तविक सम्यक्त्व नाही. (निश्चय सम्यक्त्व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

– निश्चयनयांच्या अपेक्षेने शुद्धात्म ध्यानाची स्थिरता होत नाही.) शुद्धात्मानुभवा-शिवाय वास्तविक सम्यक्त्व नाही. व्यवहार सम्यक्त्व खरे नाही. हे साधन आहे. फल येण्यास फूल जसे कारण आहे; तसे व्यवहार सम्यक्त्व कारण आहे, असे कुंदकुंद स्वामींनी समयसारात सांगितलेले आहे. निर्विकल्पसमाधी मुनिपद धारण केल्यावरच होते. सातव्या गुणस्थानापासून बाराव्या गुणस्थानात पूर्ण होते. तेराव्या गुणस्थानात केवलज्ञान होते, असा नियम आहे. शास्त्रामध्ये सांगितले आहे. म्हणून भिऊ नका, भिऊ नका ! काय तर संयम धारण करा याच्याशिवाय कल्याण होणार नाही. पुद्गल आणि जीव भिन्नभिन्न, हे सर्व जण सामान्यपणे समजतात. खरे समजले नाही. खरे समजले असते तर भाऊ, बंधू, माता, पिता आपले म्हणून समजले नसते. हा सगळा पुद्गलाचा संबंध आहे. जीवाचा कोणी नाही रे बाबा ! कोणी नाही. जीव अकेला आहे. अकेला आहे, त्याचा कोणी नाही. एकटाच फिरतो आहे. मोक्षालाही एकटाच जाणार आहे. देवपूजा, गुरुपास्ती, स्वाध्याय, संयम, तप व दान या सहा गृहस्थांच्या क्रिया आहेत. असी, मषी, कृषी, शिल्प, वाणिज्य व विद्या या सहा विद्यांपासून होणाऱ्या पापांचा या सहा क्रियांनी क्षय होतो. त्याच्याने इंद्रियसुख मिळते, पण मोक्ष मिळत नाही. पुण्य प्राप्त होते. पंचपापांचा त्याग केल्यापासून पंचेंद्रियसुख मिळते; पण मोक्ष मिळत नाही. संपत्ती, संतती, वैभव, राज्यपद, इंद्रपद पुण्याने मिळते; पण मोक्ष फक्त आत्मचिंतनानेच मिळतो. नय, शास्त्र, अनुभव या तिन्हींचा मेळ घालून पाहावा. मोक्ष कशाने मिळतो? मोक्ष फक्त आत्मचिंतनानेच मिळतो, ही भगवंताची वाणी आहे. या वाणीचा एक शब्द ऐकला तर चढून मोक्षाला जातो. तर, ही वाणी कोणती आहे, तर 'आत्मचिंतन'! बाकी काही केलं तर पुण्यबंध पडतो. मोक्ष मिळण्यास 'आत्मचिंतनच' कारण आहे. हे कार्य करायलाच पाहिजे.

सारांश: धर्मस्य मूलं दया! जिन धर्माचे मूळ सत्य-अहिंसा आहे. आपण सगळे तोंडाने म्हणतो. स्वयंपाक – जेवण... स्वयंपाक-जेवण फक्त तोंडाने म्हटल्याने पोट भरते का ? क्रिया केल्याशिवाय, जेवल्याशिवाय पोट भरत नाही. क्रियेमध्ये आणलं पाहिजे. बाकी सर्व सोडा. सत्य, अहिंसा पाळा. सत्यामध्ये सम्यक्त्व होते आणि अहिंसेमध्ये सर्व जीवांचे रक्षण होते. म्हणून, हा व्यवहार पाळा. त्यामुळे कल्याण होते. आता पुरे ...

श्री प. पू. योगींद्र चूडामणी धर्मसाम्राज्यनायक समाधिसम्राट १०८ चारित्र्यचक्रवर्ती आचार्यवर्य श्री शांतिसागरजी महाराज यांचा यमसल्लेखनेच्या २६ व्या दिवशी अंतिम आदेश. दि. ८.९.१९५५

स्थान – सिद्धक्षेत्र कुंथलगिरी, ता. भूम, जि. उस्मानाबाद.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महाश्रमण आचार्यश्री शांतिसागर मुनी

– आचार्यश्री विद्यानंद मुनिराज

ॐ नमः।

महानुभावांनो! आचार्य शांतिसागरजी विसाव्या शतकातील संपूर्ण श्रमण–परंपरेमध्ये सर्वश्रेष्ठ आचार्य होते. मला स्वतःला १३ वर्षे त्यांच्या सान्निध्यात राहण्याचे सौभाग्य लाभले होते. दक्षिण भारतात 'बेळगाव' नावाचा एक जिल्हा आहे. या जिल्ह्याविषयी असे म्हटले जाते की, तिथे दिगंबर साधू नेहमीच असतात आणि तेथे साधू बनण्याची परंपरा कधीही खंडित झाली नाही. १५० वर्षांपूर्वी सिद्धप्पा स्वामी नावाचे एक थोर तपस्वी साधू तेथे होऊन गेले आणि त्यांचे जीवनचरित्र उज्जैनच्या एका विद्वान गृहस्थांनी काव्यबद्ध केले आहे. त्याच सिद्धप्पा स्वामी परंपरेत आचार्य आदिसागर मुनिराज होऊन गेले. त्या आदिसागर मुनींचे शिष्य रत्नप्पा स्वामी मुनी होते. त्यांच्याच परंपरेत आचार्य शांतिसागरजी मुनिराज होऊन गेले. या रत्नप्पा स्वामी मुनिराजांबरोबरसुद्धा मी सात दिवस राहिलो. दक्षिण भारताच्या परंपरेतील हे सर्व मुनिराज महान तपस्वी होते. आदिसागर मुनिराज आठवड्यातून फक्त एक दिवस कोणत्या तरी एका पदार्थाचा आहार घेत असत. बाकीच्या दिवशी उपवास करीत.

आचार्य शांतिसागर मुनिराजांचे जन्मनाव सातगोंडा पाटील हे होते. त्या काळच्या प्रथेनुसार त्यांच्या वयाच्या नवव्या वर्षी एका सहा वर्षीय बालिकेशी त्यांचा विवाह झाला होता. लग्नानंतर सहासात महिन्यांतच ज्या मुलीशी त्यांचा विवाह झाला होता; ती प्लेगच्या साथीत मरण पावली आणि त्यांना कल्पनासुद्धा नव्हती की, बालपणी कधीतरी आपला विवाह झाला होता. आपल्याला माहीतच आहे की, पूर्वी बालविवाहाची प्रथा होती आणि ही प्रथा राजस्थानमधील काही ग्रामीण भागांत आजही प्रचलित आहे. अशा रीतीने वैवाहिक जीवनाशी अपरिचित सातगोंडा पाटील वैराग्यप्रधान मनोवृत्तीचे होते. त्यांना हा संस्कार त्यांचे थोरले बंधू वर्धमानसागर मुनींकडून मिळाला. वर्धमानसागर मुनिराजसुद्धा महान, उग्र तपस्वी होते. त्यांनी वयाच्या पंचाण्णवव्या वर्षी समाधिमरणपूर्वक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

देहत्याग केला. अशा वैराग्याच्या संस्कारांनी ओतप्रोत अशा कुलातील सर्वात थोरले वर्धमानसागरजी यांचे धाकटे बंधू श्री. सातगोंडा पाटील एका पंचकल्याणक-पूजेत सामील होण्यासाठी गेले. त्या महोत्सवात पूज्य देवेंद्रकीर्ती मुनिराजांचे पावन सान्निध्य होते. त्यांच्या चरणी सातगोंडा पाटलांनी प्रार्थना केली की, 'हे मुनिश्रेष्ठ! माझे मन संसारापासून पूर्ण विरक्त झाले आहे; तरी आपण मला मुनिदीक्षा देण्याची कृपा करावी.' त्यांची प्रार्थना ऐकून मुनिराज देवेंद्रकीर्ती म्हणाले,

'आपण आपल्या परिवारातील एखाद्या वडीलधाऱ्या व्यक्तीला बोलावून आणले; तर मी आपल्या विनंतीचा विचार करू शकेन.' मुनिराजांचे वचन ऐकून सातगोंडा पाटील रातोरात पायी चालत जाऊन आपल्या गावी पोहोचले व आपल्या थोरल्या बंधूंना बैलगाडीतून घेऊन आले. तेव्हा, त्यांच्या थोरल्या बंधूंनी मुनिराज देवेंद्रकीर्ती यांना विनंती केली की, 'हे मुनिवर! माझे बंधू सातगोंडा यांचे मन बालपणापासूनच संसारापासून विरक्त असल्यामुळे जर ते दीक्षा घेऊ इच्छित असतील; तर आमची काहीच हरकत नाही.' घरच्या लोकांचे या गोष्टीला अनुमोदन आहे, हे जाणून मुनिराज देवेंद्रकीर्तीजी सातगोंडा पाटील यांना म्हणाले,

'आपण आधी 'क्षुल्लकदीक्षा' ग्रहण करावी आणि अभ्यास करून परिपक्व झाल्यानंतरच मुनिदीक्षा घ्यावी.' अशा रीतीने सातगोंडा पाटलांनी मुनिराज देवेंद्रकीर्तीजींकडून क्षुल्लकदीक्षा ग्रहण केली. क्षुल्लकदीक्षेच्या नंतर चार वर्षे विशेषज्ञ विद्वानांच्या सान्निध्यात राहून ते गोम्मटसार, मूलाचार आदी शास्त्रांचे अध्ययन करीत राहिले.

एकदा समडोली गावच्या श्रावकांबरोबर ते गिरनारच्या यात्रेला गेले. गिरनार पर्वतावर चढत असताना जोरदार वाऱ्यामुळे त्यांचे धोतर उडून गेले आणि त्यांच्या अंगावर लंगोट तेवढा राहिला. ही घटना म्हणजे आपल्या भावी जीवनाचा शुभसंकेतच आहे, असे त्यांना वाटले आणि 'ऐलक' अवस्थेतच राहण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली. शिवाय, त्यांनी केशलोच करायलाही सुरुवात केली. अशा रीतीने दोन वर्षांपर्यंत ते ऐलक अवस्थेत साधना करीत राहिले. तेव्हा कुठे त्यांनी मुनिदीक्षेचा अंगीकार केला.

अशा रीतीने क्रमाक्रमाने साधनेचा विकास करीत ते मुनी अवस्थेपर्यंत पोहोचले. त्यांची मुनी बनण्याची लक्षणे सांकेतिक रूपाने त्यांच्या आईला तेव्हाच कळून चुकली होती; जेव्हा ते आपल्या आईच्या गर्भात होते. त्या वेळी त्यांच्या आईला १००८ कमलपुष्पे चढवून भगवंताची पूजा करण्याचे भाव झाले. त्यांच्या या इच्छेची पूर्तता करण्यासाठी त्यांचे सासरे (अर्थात, सातगोंडा पाटलांचे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आजोबा) कोल्हापूर येथे गेले आणि तेथील विशाल सरोवरातून १००८ कमलपुष्पे खरेदी करून, ती बैलगाडीत लादून घेऊन आले. तेव्हा, त्यांच्या आईचे डोहाळे पूर्ण झाले. गर्भस्थ शिशूचे संस्कार आईच्या डोहाळ्यांतून प्रकट होतात, अशी भारताची परंपरागत मान्यता आहे. 'महापुराण'मध्ये आचार्य जिनसेनांनी लिहून ठेवले आहे की, 'भरत चक्रवर्ती जेव्हा आपल्या मातेच्या गर्भात होते; तेव्हा त्यांच्या मातेला स्वप्नात एक मोठी आणि चमकदार तलवार दिसली की, जिच्यात त्यांच्या मातेचा चेहरा झळकत होता.' आचार्य जिनसेनांनी याला 'असिदर्पण' दर्शन असे म्हटले आहे आणि याचा परिणाम म्हणून भरत हा चक्रवर्ती होईल, हे सूचित केले आहे.

बालक सातगोंडा चौथ्या इयत्तेत शिकत होते. त्या काळी मुलांना जास्त शिक्षण देण्याची परिपाठी नव्हती. त्यांच्या मामांचे सराफी दुकान होते; म्हणून सराफीचे काम शिकण्यासाठी त्यांना तेथे पाठविण्यात आले. त्यांना या कामाची काहीच माहिती नव्हती. एकदा त्यांचे मामा माल खरेदीसाठी शहरात गेले होते आणि सातगोंडा दुकानात बसले होते. एवढ्यात, एक माणूस दुकानात येऊन म्हणाला,

'मालक, हा दागिना गहाण टाकायचा आहे.' त्यांनी तो दगिना पैसे देऊन घेतला. दुसऱ्या दिवशी पोलीस आले आणि 'हा माल चोरीचा आहे' असे म्हणून त्यांनी तो दागिना जप्त करून नेला. 'तुला धंद्यातलं काही कळत नाही. एखाद्या दिवशी तू मलाही अडकवशील' असे म्हणून मामांनी सातगोंडाला परत शेतीवाडीत गुंतवले. शेतात पाखरे यायची. 'ती पाणी पिण्यास कुठं बरं जातील' असा विचार करून ते त्यांना पाणी पिण्यासाठी पाण्याचे भांडे भरून ठेवायचे. त्यामुळे त्यांना शेतीपासूनही दूर ठेवण्यात आले.

त्यांच्या जीवन-चरित्रात असं लिहिलं आहे की, 'जो सांसारिक कार्यात अयशस्वी होतो; तोच साधू बनू शकतो. जे पैसे कमविण्यात, व्यापार-उद्योगात यशस्वी होतात; ते साधू बनू शकत नाहीत.' अशा अनेक घटना त्यांच्या जीवनात आढळतात.

नंतर, जेव्हा ते दुसऱ्यांदा मुनिराजांपाशी मुनिदीक्षेसाठी गेले; तेव्हा त्यांनी त्यांना मुनिदीक्षा दिली- अर्थात चार वर्षे क्षुल्लक अवस्थेत आणि दोनतीन वर्षे ऐलक अवस्थेत म्हणजेच सहासात वर्षांनंतर!

मुनी-अवस्थेत असताना ते एकदा कुंदगोळ येथे गेले. या ठिकाणी भद्रबाहू आचार्यांच्या ७२० गुंफा आहेत. हे ठिकाण आमच्या जन्मस्थानापासून ४५ किमी अंतरावर आहे. तिकडे दोन ठिकाणी श्रुतकेवली भद्रबाहूंच्या दोन गुंफा आहेत- एक तेरदाळ पहाडावर आणि एक कुंदगोळ येथे! ते एकटेच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



२० व्या शतकातील पहिले दिगंबर जैनमुनी
प्रथमाचार्य चारित्र चक्रवर्ती
आचार्यश्री १०८ शांतिसागर महाराज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्व.आचार्य श्री शांतीसागर जीवन चित्रावली

वंशवृक्ष

श्री शांतीसागर मुनी महाराज यांचे

ता. १२.९.३१



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्री शांतिसागर महाराजांची शांत व तेजस भावमुद्रा
छायाचित्र : शेठ अरविंद रावजी दोशी, मुंबई

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



संकलन : शेठ अरविंद रावजी दोशी, मंबई
पिंपळ पानावरील पेंटींग – सिंधी कलाकार, उल्हासनगर कॅम्प

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. चारित्र चक्रवर्ती
आचार्यश्री १०८ शांतिसागर महाराज
यांचे चरणकमल आणि हाताचे ठसे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. चारित्र चक्रवर्ती आचार्यश्री १०८ शांतिसागर महाराज यांचे फलटण चंद्रप्रभू जैन मंदिर येथील पिंच्छी-कमंडलू आणि हस्तलिखीत





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्री
शांतिसागर
महाराज
यांची
चरणचिन्हे :
कुंथलगिरी



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri





प. पू. चारित्र चक्रवर्ती आचार्यश्री १०८
शांतिसागर महाराज यांचे
फलटण मंदिरातील पूर्णाकृती व
बसलेली प्रतिमा आणि ताम्रपट



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्री शांतिसागर महाराज यांचा भारतभर
क्रांतिकारक प्रभावना विहार नकाशा (सन १९२७-१९४२)



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



क्रांतिकारक प्रभावना विहार सुरुवात १९२७, कुंभोज, जि. कोल्हापूर

संघपती शेठ पुनमचंद घासीराम झव्हेरी, मुंबई
सुपुत्र – श्री दाडीमचंद झव्हेरी, श्री गेंदनमल झव्हेरी, श्री मोतिलाल झव्हेरी

सौजन्य : श्रीमती गुणमाला बेन झव्हेरी, सुपुत्री – शेठ पुनमचंद घासीराम झव्हेरी
श्रीमती संगिता बेन, स्नुषा मुंबई



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



शेठ धर्मवीर रावजी सखाराम व सौ. राजुबाई दोशी
महाराजांना आहार देतानाचे प्रसिध्द तैलचित्र – सोलापूर (१९३४–३५)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्री समवेत श्रीक्षेत्र सम्मेद शिखरजी
पहडावर – शेठ धर्मवीर रावजी सखाराम दोशी व सौ राजुबाई दोशी (१९२८)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्री
शांतिसागर महाराज
यांच्या विविध भावमुद्रा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

।। श्री वीतरागाय नमः।।



दिगंबर जैनाचार्यांची पुनर्स्थापित परंपरा

गुरु – शिष्य परंपरा

गुरु – शिष्य परंपरा

आचार्य श्री पायसागर

आचार्य श्री जयकिर्ती

आचार्य श्री देशभूषण

आचार्य श्री समंतभद्र व श्री विद्यानंदजी


आचार्य श्री विद्यानंदजी

आचार्य श्री देशभूषण व श्री विद्यानंदजी

आचार्यश्री श्रुतसागरजी ऐलाचार्य प्रज्ञसागर आचार्य श्री विद्यानंदजी

संकलक – चंद्रमोहन शहा, सोलापूर (९४२३३३५३००)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्री शांतिसागर महाराज यांच्या वॉल हँगिंग (पेंटींग) सोबत
प. पू. आचार्यश्री श्वेतपिच्छाचार्य विद्यानंद मुनी



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्रींचे हॅन्डलूमवर तयार केलेले वॉल हँगिंग – तैलचित्र
कलाकार : श्रीनिवास जिंदम, सोलापूर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्रींचे हॅन्डलूमवर तयार केलेले वॉल हँगिंग – तैलचित्र
तैलचित्रासोबत चंद्रमोहन शहा – कुन्दकुन्द भारती, नवी दिल्ली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुजरात प्रांत – ईडर संस्थानमधील गोरल ग्राम येथील १९३५ मधील
चातुर्मासामधील आचार्यश्रींचे छायाचित्र (चंद्रमोहन र. शहा यांच्या पूर्वजांचे गाव)



प. पू. आचार्यश्रींचे
विहार क्षणचित्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्रींचा
केशलोच

आचार्यश्री आहारासाठी
जाताना

आचार्यश्री आहारासाठी
जाताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री फलटण येथील श्री माणिकचंद वीरचंद गांधी यांच्या घरी आहारार्थ आले असताना

आचार्यश्री आहाराच्यावेळी

आचार्यश्री पूजेच्या वेळेस

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



हिरक महोत्सवाचे
फोटो निरीक्षण करताना
आचार्यश्री.
फोटो दाखविताना
श्री. तलकचंद वेणीचंद
शहा, वकील–फलटण

जिनवाणी धवलाचे
ताम्रपट सादर करताना,
फलटण

आचार्यश्रींना
गुरुभक्त शेठ चंदुलाल
ज्योतिचंद शहा, बारामती
यांच्याकडून धवलराज
ताम्रपट ग्रंथ अर्पण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi



फलटण येथील
मानस्तंभ पूजन
करताना आचार्यश्री

फलटण- सौ. जडुबाई
मलुकचंद दोशी व
सौ. फुलुबाई जीवराज
दोशी यांच्या दशलक्षण
उपवासानिमित्त
निघालेल्या
पालखीसमवेत



धवलराज ताम्रपट
ग्रंथांची हत्तीवरून
मिरवणूक

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्री श्री ग्रंथराज धवल ग्रंथांच्या प्रकाशनावेळी



आचार्यश्री श्री ग्रंथराज धवल ग्रंथांचा स्वाध्याय करतेवेळी



आचार्यश्री श्रावकगण यांना उपदेश करताना, फलटण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्री त्यांचे शिष्य
नेमिसागर महाराज
यांच्या सोबत,
फलटण

आचार्यश्री ससंघ एका
कार्यक्रमादरम्यान,
फलटण





आचार्यश्रीं सोबत
पं. सुमेरूचंद्र दिवाकर –
चारित्र चक्रवर्ती ग्रंथाचे
लेखक व परमभक्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री एका विहारात श्रावकांशी विचार–विनिमय करताना

हरिजन मंदिर प्रवेश – एक ऐतिहासिक संघर्ष : केस जिंकल्यावर शेठ चंदुकाका सराफ यांच्याकडून दोन वर्षानंतर आहार घेताना, बारामती





श्री १००८ चंद्रप्रभू दि. जैन मंदिर, फलटण येथे ग्रंथ भांडारासाठी जागा पाहताना आचार्यश्री,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्रींचा सोलापूरात विहार – सिध्दचक्र विधान प्रसंगाचे छायाचित्र

शेठ गोविंदजी रावजी दोशी हिरक महोत्सव प्रसंगी भाषण करताना





सौ. कुमुदिनी गोविंदजी दोशी, जैन बोधक च्या संपादिका–हिरक महोत्सव प्रसंगी भाषण करताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्रींचा सोलापूरात विहार – शेठ गुलाबचंद सखाराम गांधी, नातवासह अरविंद कस्तुरचंद गांधी
१९४८ जैन बोर्डिंग चातुर्मास



१९४८ जैन बोर्डिंग संघपती शेठ मोतीचंद रेवचंद गांधी व परिवार मोतीचंद रावजी शहा, आळंदकर
सौ. मैनाबाई हिराचंद, सौ. चंपाबाई माणिकचंद मेहता, सौ. चतुराबाई जिवराज ताराचंद शहा, सोलापूर



संघपती मो. रे. गांधी सौ. राजुबाई जवाहर, चंद्रगुप्त, मैनाबाई, रतनबाई किरण गांधी व सौ. प्रभावती सुभाष शहा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्रींचा
सोलापूरात विहार -
शेठ गुलाबचंद
सखाराम, शेठ
मोतीचंद रेवचंद,
सौ. राजुबाई
मो. गांधी परिवार
आहार देताना -
जैन बोर्डिंग सोलापूर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संघपती मोतीचंद रेवचंद गांधी
आचार्यश्रीं सोबत



आदिनाथ जैन मंदिर, शुक्रवारपेठ, सोलापूर
येथील छायाचित्र

प. पू. आचार्यश्री शांतिसागर महाराज समवेत, सन १९४८ जैन बोर्डिंग सोलापूर
सौ. सखुबाई सखाराम शहा, श्री. सखाराम देवचंद शहा,
श्री. रावसाहेब शहा, श्री. वालचंद शहा आणि श्री. रतनचंद शहा, निंबर्गीकर परिवार



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्रींचा सोलापूरात विहार – जैन बोर्डिंग सोलापूर येथील छायाचित्रे (१९४७-४८)



...ी शेठ मोतीचंद ...चंद गांधी यांचा सत्कार



शेठ गुलाबचंद सखाराम गांधी, सोलापूर केशलोच प्रसंगी (१९४७-४८)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्रींचा
सोलापूरात विहार -
गांधी नाथा रंगजी
दि. जैन बोर्डिंग परिसर,
शेठ गुलाबचंद सखाराम
गांधी (१९४७-४८)

प. पू. आचार्यश्रींचे
विहार क्षणचित्र



सेठ चंदुलाल
प. पू. आचार्यश्रींना
आहार देताना,
बारामती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्री विहाराच्या वेळी
श्री आनंदलाल छगनलाल दोशी व
श्री प्रेमचंद दोशी



श्रीक्षेत्र कुंथलगिरीकडे विहार...
मधुबन मळा, बार्शी, १९५२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्री
एका केशलोच
समारंभात
पं. सुमेरूचंद्र दिवाकर
यांचा सत्कार करताना

प. पू. आचार्यश्रींचे
शिष्य आचार्यश्री
पायसागर समवेत



प. पू. आचार्यश्री
पायसागर ससंघ
(१९५०-५१)



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्रींचा शिष्यवर्ग व आचार्यश्री पायसागर ससंघ

प. पू. आचार्यश्री एका विहारांत



प. पू. आचार्यश्री एका विहारांत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्रींची विहारातील क्षणचित्रे – उत्तर भारत

कारंजा येथील मुनी भक्त श्री धन्नुसा चवरे व परिवार श्री क्षेत्र गजपंथ येथे (१९५२)

प. पू. आचार्यश्रींचे शिष्य, आचार्यश्री कुंथुसागर एका समारंभ प्रसंगी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्रींची विहारातील क्षणचित्रे – उत्तर भारत

प. पू. आचार्यश्री
सिध्दचक्र विधान
पुजेच्या वेळी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri





प. पू. आचार्यश्रींची विहारातील क्षणचित्रे

पद्मश्री पं. सुमतीबाई शहा, श्राविकाश्रम - सोलापूर आचार्यश्रींचा आशीर्वाद घेताना - फलटण (१९५२)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



श्री क्षेत्र बाहुबली, कुंभोज - कोल्हापूर
प. पू. आचार्यश्री - ज्ञानतपस्वी आचार्य श्री समंतभद्र यांना भगवान बाहुबली यांची मूर्ति स्थापन करण्याबाबत आदेश देतानाचा एक विलक्षण प्रसंग (१९५२)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्री
श्रेष्ठींसमवेत
विहारात
- उत्तर भारत

प. पू. आचार्यश्रींचे
दर्शन घेताना
सरशेठ हुकुमचंद,
इंदौर



प. पू. आचार्यश्रींचे
दर्शन घेताना
अजमेरचे सुवर्णमंदिर
निर्माता शेठ
भागचंदजी सोनी
(१९३३-३४)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्रीं सोबत
शेठ गोविंदजी रावजी
दोशी व शेठ गुलाबचंद
सखाराम गांधी,
सोलापूर

प. पू. आचार्यश्री
श्रेष्ठींसमवेत
विहारात
उत्तर भारत





प. पू. आचार्यश्री दहीगांव येथील
रथयात्रे समवेत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्री १९२७ अक्कलकोट येथील [illegible]
समवेत – नगरशेठ रामचंद कस्तुरचंद [illegible]

प. पू. आचार्यश्री उत्तर भारत विहाराच्या सुरुवातीस १९२७ मध्ये
शेठ माणिकचंद मोतिचंद शहा आळंदकर – आहार देताना, लातूर





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्रींना आहार देताना श्री गंगाराम कामचंद दोशी परिवार, फलटण





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्रींना मुग्यांचा उपसर्ग

प. पू. आचार्यश्री शांतिसागर महाराज यांचा पूर्वाश्रमीचा परिवार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्री
विहाराच्या वेळी
आर्यिका अजितमती
माता समवेत



प. पू. आचार्यश्री
एका केशलोच समारंभ
प्रसंगी

फलटण येथील हिरक
महोत्सव प्रसंगी
प. पू. आचार्यश्रींच्या
कार्यक्रमात भाषण
करताना कर्मवीर
भाऊराव पाटील

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प. पू. आचार्यश्री
प्रवचन क्षणी

धर्मवीर शेठ रावजी
सखाराम दोशी,
व शेठ पुनमचंद
घासीराम
ब्यावर (राजस्थान)
चातुर्मास १९३३

प. पू. आचार्यश्री
ससंघ ब्यावर
(राजस्थान)
चातुर्मास १९३३



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्रींचा मुंबई विहार (१९४२-४३)

सौजन्य : शेठ श्री अरविंद रुपचंद शहा, वडुजकर, फलटण



मुंबई, हायकोर्ट समोर

व्ही.टी. स्टेशन मुंबई समोर



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्रींचा मुंबई विहार (१९४२-४३)

सौजन्य : शेठ श्री अरविंद रुपचंद शहा, वडुजकर, फलटण

प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई समोर

फिरोजशहा पुतळ्याजवळ ध्यानस्थ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्रींचा मुंबई विहार (१९४२-४३)

सौजन्य : शेठ श्री अरविंद रुपचंद शहा, वडुजकर, फलटण



मुंबईत एका पुतळ्याजवळ

लोकमान्य टिळक
पुतळ्याजवळ, मुंबई



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्रींचा मुंबई विहार (१९४२-४३)

सौजन्य : शेठ श्री अरविंद रुपचंद शहा, वडुजकर, फलटण

मुंबई विद्यापीठ : राजाबाई टॉवर समोर

चर्चगेट, मुंबई समोर



छायाचित्रे : प्रसिध्द फोटोग्राफर श्री झारापकर, गिरगांव, मुंबई

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्रींची पेटींग्स् – सौजन्य डॉ. जवाहर प्रेमचंद गांधी, फलटण
आचार्य शांतिसागर म्युझियम, फलटण



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्रींची पेटींग्स् – सौजन्य डॉ. जवाहर प्रेमचंद गांधी, फलटण
आचार्य शांतिसागर म्युझियम, फलटण





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. आचार्यश्रींची पेटींग्स् - सौजन्य डॉ. जवाहर प्रेमचंद गांधी, फलटण
आचार्य शांतिसागर म्युझियम, फलटण





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



शेठ आनंदलाल छगनलाल दोशी, माढेकर, प्रेमचंद जी. दोशी, माढेकर यांच्या मळ्यात



श्रीक्षेत्र कुंथलगिरीकडे विहार...
मधुबन मळा, बार्शी, १९५२

मधुबन मळा, बार्शी, श्री. चंद्रमोहन शहा आचार्यश्री ची ध्यानगुंफा



मधुबन मळा, बार्शी, श्री. संतोष आनंदलाल दोशी, माढेकर



सौजन्य : श्री. संतोष आ. दोशी व स्व. चारुशीला आ. दोशी, बार्शी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखना प्रसंगी (१९५५)

प. पू. आचार्यश्री
पूजा प्रसंगी



अंतिम उपदेश
रेकॉर्डिंग



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखना प्रसंगी (१९५५)

पंडित सुमेरूचंद्र दिवाकर,
मोतीलाल शहा, परांडेकर

प. पू. आचार्यश्री
दर्शनार्थ जाताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखना प्रसंगी (१९५५)



श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे
मुख्य मंदिरात ध्यानस्थ

प. पू. आचार्यश्री आत्मचिंतन व
मनन करताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखना प्रसंगी (१९५५)



मुख्य मंदिरात दर्शन घेताना १८ ऑगस्ट १९५५

प. पू. आचार्यश्री मानपत्र भेट कार्यक्रमात



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखना प्रसंगी (१९५५)

प. पू. आचार्यश्री
सल्लेखनेआधी
काही क्षण

प. पू. आचार्यश्रींनी
पूर्ण दिवस आणि रात्र
या ध्यानमुद्रेत
घालविली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखना प्रसंगी (१९५५)

प. पू. आचार्यश्रींचे श्रावकांना दर्शन



चार दिवसांनंतर जल ग्रहण

सल्लेखना प्रसंगी – संघपती शेठ गेंदनमलजी, मुंबई

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखना प्रसंगी (१९५५)



प. पू. आचार्यश्री
शांतिसागर महाराज
यांच्या निर्वाण
यात्रेच्यावेळी
(कुंथलगिरी)
क्षुल्लक पार्श्वकीर्ति
(आचार्यश्री विद्यानंद)



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखना प्रसंगी (१९५५)

प. पू. आचार्यश्रींचा अंत्यसंस्कार विधी – दुग्धाभिषेक
हस्ते : सौ. कुमुदिनी गोविंद दोशी व सौ. ब्रम्हा पोपटलाल शहा

प. पू. आचार्यश्रींचा अंत्यसंस्कार विधी वेळेस जमलेला जनसमुदाय



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री क्षेत्र कुंथलगिरी येथे सल्लेखना प्रसंगी (१९५५)



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रंथ प्रकाशन समिती

श्री. विक्रम रावजी शहा
इंदापूर
संपर्क : ९९२२५२४९२३

श्री. विशाल बाहुबली मेहता
ग्रामपंचायत सदस्य मोडनिंब
संपर्क : ९९२१२२२५५५

डॉ. शरयू शरद शहा
मुंबई
संपर्क : ९६१९०२३३३०

सौ. उषा तुपकर
सोलापूर
संपर्क : ९८९०८४६०२१

डॉ. सरिता नलिन कोठाडिया
सोलापूर
संपर्क : ९८२२३४७१०७

श्री. श्रेणिक अन्नदाते
डोंबिवली
संपर्क : ९८६७५०८८१४

श्री. चंद्रमोहन रतनचंद शहा
सोलापूर
संपर्क : ९४२३३३५३००

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चातुर्मासासाठी तेथे गेले. त्या काळी त्या भागात आचार्य भद्रबाहूंचा चातुर्मास झाला होता. त्यामुळे आज तेथे धार्मिक लोकांची संख्या मोठी आहे. तेथे काही व्यापारी लोकही होते. ते पूर्वीपासूनच स्वाध्याय वगैरे करीत असत. लोक त्यांच्या सान्निध्यात पूजापाठ, आहारदान वगैरे करीत असत. विद्वान मंडळीही येऊ लागली. कीर्तनकार, भजनी मंडळे आली. प्रवचने होऊ लागली. असेच एकदा एक साप घाबरून त्यांच्या पायाजवळून निघून पाटावर येऊन बसला. *(तो साप त्यांच्या गळ्यावर अथवा शरीरावर चढला नव्हता.)* रोज गंधोदक घेण्यासाठी दोन श्रेष्ठी येत असत. हे दृश्य पाहून ते खूप घाबरले. महाराजांनी 'गडबड-गोंधळ करू नका' असे सांगितले. इतर भक्तांनी येऊन त्या सापाला पकडले व जंगलात सोडून दिले. ती गुंफा बदलावी म्हणून अनेकांनी आग्रह धरला; पण महाराज म्हणाले की,

'नाही, आम्ही येथेच राहणार!' त्याच जागी मी आणि महाराजांनी एक चातुर्मास केला होता. त्या वेळी मी क्षुल्लक अवस्थेत होतो (तेव्हा हळूहळू त्यांच्या ज्ञानविज्ञानाची प्रगती झाली.). तेथे दोन साधक- वीरसागर महाराज आणि चंद्रसागर महाराज मुनी बनले. जे गृहस्थाश्रमात होते आणि श्रवणबेळगोळच्या यात्रेला चालले होते. महाराजांचे नाव ऐकून ते तेथे आले. ते लोक शास्त्र वाचत, स्वाध्याय करत आणि त्यांना ज्ञानही होते. ते महाराजांना म्हणाले,

'महाराज! आपण मासोपवासी आहात काय?'

महाराजांनी उत्तर दिले,

'नाही, आम्ही मासोपवासी नाही आहोत.' 'मग, आपण अमुकअमुक पर्वतावर भयानक जागी साधना करता काय?' त्यांनी विचारले. महाराज म्हणाले, 'नाही.' 'मग, आम्ही आपणास साधू कसे मानावे?' ते दोन साधक म्हणाले. त्यावर, महाराज म्हणाले, 'मी कधी म्हणालो की, आपण मला साधू माना?' थोड्या वेळाने महाराजांना वाटले की, हे दोन्ही साधक भरकटतील. समोरच्या आंब्याच्या झाडाकडे बोट दाखवून महाराजांनी त्यांना सांगितले,

'त्या झाडाचे दोन आंबे घेऊन या.'

साधक म्हणाले,

'आता आंबे कसे मिळतील? आंब्याच्या मोसमातच आंबे मिळू शकतील.' तेव्हा मुनिराज म्हणाले, 'आपण मासोपवास वगैरेंच्या ज्या गोष्टी करत आहात; त्या चतुर्थ काळच्या मुनींमध्ये असतील. या वेळी तर असणार नाहीत; कारण हा पंचमकाल आहे.' हे ऐकून त्या दोन्ही साधकांनी त्यांना साष्टांग नमस्कार केला आणि त्यांच्या सान्निध्यात राहून अध्ययन करून ते हळूहळू ऐलक बनले.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याच नगरीत एक दिगंबर जैन गृहस्थ एका मोठ्या नाटक कंपनीत होते. त्यांना वैराग्य प्राप्त झाले आणि तेही क्षुल्लक, ऐलक, मुनी बनले. ते पायसागर मुनी या नावाने प्रसिद्ध झाले. आणखीन एक दिगंबर जैन श्रावक आचार्य शांतिसागर मुनिमहाराजांच्या श्रवणबेळगोळच्या यात्रेत सामील झाले. तेही कुंथुसागर मुनी या नावाने प्रसिद्ध झाले. याचप्रमाणे नमिसागर, नेमिसागर असे मिळून सात मुनिराज त्यांच्याबरोबर होते. ते खूप पारखून मगच दीक्षा देत असत. त्यांच्या सर्व शिष्यांनी स्वतःही खूप नाव कमवले व आपल्या गुरूंचेही नाव उज्ज्वल केले.

श्रवणबेळगोळच्या यात्रेतील एक प्रसंग सांगितलाच पाहिजे असा आहे. यात्रेच्या मार्गात एका गावी शैवांचा एक मठ लागला. तेथील गुरू (मठाधीश) लाल गालिच्यावरून चालत आणि पालखीतून विहार करत. जेव्हा त्यांना समजले की, 'एक दिगंबर साधू आले आहेत'; तेव्हा ते अनवाणी पायांनी चालत त्यांच्याकडे गेले. हे पाहून त्यांच्या समाजातील लोकम्हणाले, 'असे कसे जात आहात?' त्यावर ते म्हणाले, 'ते तर परमगुणी साधू आहेत. गेलं तर पाहिजे. आपल्या गावी आले आहेत; तर त्यांना भेटून त्यांच्यापासून काहीतरी ज्ञान प्राप्त करू.' त्यांनी आचार्य शांतिसागरजी मुनिराजांना निमंत्रण दिले की, 'आमच्या मठात आपले प्रवचन झाले पाहिजे.' तेव्हा, महाराज आपल्या प्रवचनातून 'मिथ्यात्व' शब्दाच्या अनेक व्याख्या करीत राहिले. मठाधीशांनी विचारले, 'महाराज, आपण वारंवार मिथ्यात्व, मिथ्यात्व म्हणत आहात; पण मिथ्यात्व म्हणजे नेमके काय?'

महाराज म्हणाले, 'अरे, हे शरीर आपले मानणे, हेही मिथ्यात्वच आहे. हेही कधी ना कधी सोडावेच लागेल.' ते मठाधीश महाराजांच्या प्रवचनाने इतके प्रभावित झाले की, त्यांनी महाराजांना साष्टांग नमस्कार केला. ते म्हणाले, 'महाराज, आजपर्यंत ही गोष्ट आम्हाला कोणीही सांगितली नाही व कोणत्याही शास्त्रात वाचायला मिळाली नाही की, हे शरीर आपलं मानणेसुद्धा मिथ्यात्व आहे व त्यावरचा मोह सोडला पाहिजे.' अशा रीतीने ते महाराजांचे परमशिष्य बनले.

तेथून आचार्यश्री श्रवणबेळगोळला निघाले; तेव्हा तेथून तीन किलोमीटर अंतरावरच्या गावातील जैन समाज तेथे आला व म्हणू लागला की, 'आपण नग्नावस्थेत आमच्या गावात येऊ नका.' महाराज म्हणाले, 'आम्ही तर बाहुबलीच्या मूर्तीच्या दर्शनासाठी पहाडावर जाणार आहोत.'

आचार्यश्री तेथे गेले व राहिले. त्या वेळी म्हैसूरचे महाराज कृष्णराज बडेर हे होते. त्यांना जेव्हा समजले की, आपल्या राज्यात दक्षिण कर्नाटकातून एक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

थोर तपस्वी आले आहेत. तेव्हा, ते आपल्या लवाजम्यासह रथात बसून सर्व वैभवानिशी तेथे आले आणि एका मोठ्या थाळीत श्रीफल, फुल, पुष्पमाळ, बदाम, सुपारी, खडीसाखर आदी वस्तू ठेवून साष्टांग नमस्कारपूर्वक त्यांचे स्वागत केले. महाराज आल्याचे पाहून जैन समाजातील लोकसुद्धा आले. महाराज आचार्यश्रींना म्हणाले, 'मुनिराज! आपण आमच्या राज्यात शुभागमन केले; आम्ही कृतार्थ झालो. आम्ही आपले हार्दिक स्वागत करतो. आपण महान तपस्वी आहात. आमची प्रजा सुखी होवो, असा आशीर्वाद द्यावा.' तेव्हा, तेथे उभे असलेले जैन समाजातील लोक म्हणू लागले की, 'महाराज, हे आमचे गुरू आहेत.'याच लोकांनी आधी गावात येण्यास मनाई केली होती, आता तेच आपल्या राजाशी आचार्यश्रींचा परिचय करून देऊ लागले होते.

गुरू-संस्था नसल्यामुळे समाजाची फार मोठी हानी होते, हे आपण जाणतातच. दक्षिणेत अनेक चमत्कारांमुळे लोक आपल्या मंदिरात अनेक मिथ्या देवीदेवतांच्या मूर्ती आणून ठेवतात. रागी-द्वेषी देवीदेवतांची पूजा करतात. आचार्य शांतिसागरजी दररोज आहार घेण्यापूर्वी गाडी भरभरून त्या मूर्ती मंदिरातून काढून टाकावयास लावत व मगच आहार घेत असत. लोक म्हणू लागले की, 'या देवता आहेत, यांना नदीत कसे टाकता येईल?' आचार्यश्री त्यांना म्हणाले, 'आतापर्यंत अज्ञानाने आम्ही आपली पूजा केली, आता आम्हाला ज्ञान झाले आहे; म्हणून यापुढे आम्ही वीतराग भगवंताची पूजा करणार आहोत, असे म्हणून या मूर्ती नदीत विसर्जित करा. परंतु, त्यांचा तिरस्कार करू नका.'

याचप्रमाणे, आचार्य शांतिसागर महाराजांनी मृत्युभोजही बंद करावयास लावले. त्या काळी मृत्यूनंतर मृत्युभोज देण्याची परिपाठी होती. समाजाला कर्ज काढून का होईना; मृत्यूनंतर भोजन घालावे लागत असे. लोक हट्टाने बसून जेवण करून निघून जात. आजसुद्धा काही ठिकाणी ही प्रथा चालू आहे. कुटुंबातील व्यक्तीचे निधन झाले आहे. लोकांची रडारड चालू आहे. लोक ऊर बडवीत आक्रोश करीत आहेत व अशा परिस्थितीत समाजातील लोकांना जेवण घाला म्हणजे मृताच्या आत्म्याला शांती मिळते, अशी लोकांमध्ये मिथ्या मान्यता होती. ही मृत्यु-भोजनाची प्रथा कुंथुसागर महाराजांनी गुजरातेत बंद पाडली. राजस्थानमध्ये ब्रह्मचारी शीतलप्रसादजींनी ही प्रथा बंद पाडण्याच्या कामी प्रशंसनीय सहयोग दिला. त्यांनी केलेले कार्य आपण १० जन्मांतसुद्धा करू शकणार नाही. ते फार मोठे विद्वान होते. त्यांनी इंग्रजीत-हिंदीत पुस्तके लिहिली, खूप प्रचार केला आणि तीर्थक्षेत्रे शोधून काढली. ते श्रीलंकेत गेले. अनेक ग्रंथ गोळा करून त्यांनी त्यांचा अभ्यास करून जैन धर्माचा प्रचार केला.

आचार्य शांतिसागर पाच-सात साधूंबरोबर प्रवास करीतकरीत 'समडोळी'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या गावी पोहोचले. तिथे त्यांना 'आचार्य' पदवी दिली गेली. त्यानंतर, ते कुंभोज येथे बाहुबली डोंगरावर चातुर्मास करीत राहिले.

मुंबईचे सेठ पूनमचंद घासीराम, मुंबई 'संघपती' यांचा हिऱ्यामोत्यांचा फार मोठा व्यापार होता. त्यांनी आ. शांतिसागर महाराजांविषयी संपूर्ण माहिती मागवली. मग, त्यांनी स्वतः महाराजांपाशी जाऊन प्रार्थना केली की, 'महाराज, आपल्याबरोबर ससंघ सम्मेदशिखरजीची यात्रा करण्याची माझी फार इच्छा आहे. आपण परवानगी द्यावी.' (तोपर्यंत महाराजांची सम्मेदशिखरजीची यात्रा झालेली नव्हती.) आ. शांतिसागरजी म्हणाले, 'या घडीला तरी आम्ही काही सांगू शकणार नाही. परंतु, चातुर्मास संपल्यावर आम्ही आपल्याला याबाबत कळवू. आमचेही भाव शिखरजीची यात्रा करावी असे आहेत.'

घासीराम 'संघपती' यात्रेच्या तयारीला लागले. बैलगाडीत सर्व सामान ठेवून यात्रेला निघाले. वाटेत 'सांगली' येथे सांगलीच्या राजेसाहेबांनी त्यांचे भव्य स्वागत केले. 'मिरज' संस्थानात गेले; तर तेथेही मिरजच्या राजेसाहेबांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. त्यांनी खडीसाखर, सुपारी, श्रीफळ आदी वस्तू महाराजांना अर्पण केल्या. ते म्हणाले, 'मुनिवर, हा प्रसाद आहे. याला हात लावून आपल्या हाताने प्रसाद द्या.' आचार्यश्री म्हणाले, 'मी याला प्रसाद मानत नाही.' पण, राजेसाहेब म्हणाले, 'काहीतरी प्रसाद द्या, महाराज!' तेव्हा, आचार्यश्रींनी हिंदीत छापलेला 'ज्ञानार्णव' नावाचा एक छोटासा ग्रंथ त्यांना प्रसाद म्हणून दिला. हा ग्रंथ वाचून राजेसाहेबांनी आपला राज्यभार आपल्या मुलावर सोपवला. धोतर-उपरणेसारखा साधा वेश धारण करून एका खोलीत ध्यान करीत त्यांनी देहत्याग केला.

अशा रीतीने अनेक संस्थानांत महाराजांचे भव्य स्वागत होत राहिले आणि यात्रा पुढे चालत राहिली. विहार करीत ते हैदराबादला गेले. तेथील नवाबाने सर्व अधिकारीवर्गाला तारेने संदेश पाठवला की, 'आमचे गुरू महाराज यात्रेला निघाले आहेत. त्यांना यात्रेत कोठेही कसलाही त्रास किंवा अडथळा होता कामा नये.' अशा प्रकारे त्यांची यात्रा निर्विघ्नपणे पार पडली. सम्मेदशिखरजीला पोहोचल्यावर पंचकल्याणक, पूजा आदी पार पडले.

सम्मेदशिखरजीनंतर ते ललितपूरला आले आणि त्यांनी तेथे चातुर्मास केला. मग त्यांनी बडौत, दिल्ली येथेही चातुर्मास केले. त्याचप्रमाणे मथुरा आणि जयपूर येथेही त्यांचा चातुर्मास झाला. याप्रमाणे ते देशभर ४२ वर्षांपर्यंत मुनी-अवस्थेत राहून चातुर्मास करीत राहिले. अनेक उपसर्गही झाले. राजाखेडा येथे उपद्रवी लोक भाला, तलवार घेऊन आले आणि 'येथून यांना पळवून लावा' अशी घोषणा देऊ लागले. आ. शांतिसागर तर क्षत्रिय होतेच. सर्वांना खोलीत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बसण्यास सांगून ते दरवाजात ध्यानस्थ बसले. ते लोकांना म्हणाले, 'माझं जे काही व्हायचं ते होऊ दे; पण आपण सगळे खोलीत बसा.' आक्रमणकारी लोक जेव्हा आले; तेव्हा अचानक आकाश भयानक अशा काळ्या ढगांनी व्यापिले गेले. प्रचंड वादळ सुटले आणि रस्ताही दिसेनासा झाला.

त्याच वेळी कुणीतरी सूचना दिली आणि पोलिसांनी आक्रमणकाऱ्यांना पकडून महाराजांच्या समक्ष उभे केले. महाराज म्हणाले, 'बाबांनो, आम्हाला यांच्यापासून काहीच त्रास झालेला नाही. यांना सोडून द्या. आम्ही यांना क्षमा करतो.'

पोलीस अधिकारी सांगू लागले, 'महाराज, हे लोक आपल्याला त्रास देऊ इच्छितात. यांना आपण क्षमा कशी काय करू शकता?'

महाराज म्हणाले, 'आम्ही मुनी आहोत. क्षमा हा आमचा धर्म आहे. आम्ही कोणाबद्दलही आमच्या मनात वाईट विचार आणत नाही.'

तेव्हा, पोलीस अधिकारी म्हणाले, 'तर मग आपण आपला क्षमा धर्म नाही सोडणार?' महाराज म्हणाले, 'मुळीच नाही.'

तो अधिकारी म्हणाला, 'क्षमा धर्माचे पालन हे आपले कर्तव्य असेल; तर मी मॅजिस्ट्रेट आहे. शिक्षा करणे, हे माझे कर्तव्य आहे- हा माझा धर्म आहे. मी माझा धर्म कसा सोडू?' पोलीस अधिकाऱ्याने त्यांना एका वर्षाची शिक्षा ठोठावली. सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, आ. शांतिसागरजी महाराजांनी भारतात खूप विहार केला. ब्यावर (राजस्थान) येथेसुद्धा त्यांचे प्रचंड स्वागत झाले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते अतिशय शांतस्वभावी होते. कधी कोणावर ते रागावले नाहीत. मी माझ्या जन्मगावी प्रत्यक्ष पाहिले आहे की, एक ब्रह्मचारी त्यांना उलटसुलट प्रश्न विचारू लागला; तेव्हा ते मौन धरून बसले. काही उत्तर दिले नाही त्यांनी!

'धवला ग्रंथ' तर आपल्याला माहीतच आहे. जेव्हा त्या ग्रंथाची प्रतिलिपी तयार झाली; तेव्हा ए.एन. उपाध्ये, हिरालाल जैन आणि इतर काही मोठमोठे विद्वान उपस्थित होते. गजपती शास्त्रीजींकडून त्याची प्रतिलिपी बनविली गेली आणि महाराजांनी तो ग्रंथ छापवून घेतला.

आचार्यश्रींच्या सल्लेखनेच्या वेळी मी कुंथलगिरी पहाडावर त्यांच्याबरोबर राहिलो. तेथे अनेक श्रावक दर्शनासाठी येत राहायचे. अमावस्येच्या दिवशी महाराज जेव्हा सल्लेखना घेऊ लागले; तेव्हा सर्व जण म्हणाले की, 'महाराज, आज अमावस्या आहे.' त्यावर महाराज तत्काळ म्हणाले की, 'भ. महावीरांचासुद्धा निर्वाण दिन अमावस्याच आहे की! मरणासाठी तिथी, मिती थोडीच असते.' त्यांनी शेवटी सल्लेखना घेतली. सल्लेखना घेतल्यानंतर १८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिवसांपर्यंत ते फक्त पाणी घेत राहिले आणि मग १८ दिवसांनंतर त्यांनी पाण्याचाही त्याग केला. अंगात शक्ती होती; तोपर्यंत ते शेजारच्या मंदिरात जाऊन दर्शन करीत, जाप देत, गंधोदक घेत. अशा प्रकारे सल्लेखना घेतल्यावर जेव्हा त्यांनी आचार्यपदही सोडून दिले; तेव्हा लोक सांगू लागले की, 'आचार्यपद यांना द्या, त्यांना द्या,' त्यावर महाराज म्हणाले, 'जोपर्यंत माझी बुद्धी सक्षम आहे; तोपर्यंत मला सल्ला देऊ नका. जेव्हा ती काम करणार नाही; तेव्हा सल्ला द्या.' ते म्हणाले, 'वीरसागर माझे पहिले दीक्षित शिष्य आहेत. ते सध्या संघ चालवत आहेत. अजूनही त्यांनी आचार्यपद स्वीकारले नाही आणि अत्यंत शांतस्वभावी आहेत. म्हणून, मी त्यांना आचार्यपद देत आहे.' एवढे बोलून आपले दोन शिष्य–संघपती आणि चंदुलाल सराफ यांना दोघांकडून सह्या करवून घेऊन त्यांनी आचार्यपद दिले.

एकदा एक श्रीमंत शेठ महाराजांपाशी येऊन म्हणाले, 'महाराज, माझी दान देण्याची इच्छा आहे.' महाराज गालातल्या गालात हसू लागले. तेव्हा शेठजींनी विचारले, 'काय झालं महाराज? आपण का हसत आहात?' महाराज म्हणाले, 'धन कमवताना मला विचारलं होतं काय? आणि दान कुठे द्यावं आणि कुठे देऊ नये, एवढीही बुद्धी तुमच्याजवळ नाही काय? मला नका विचारू. कमवायचं माहीत आहे पण दान कुठे द्यावे, हे माहीत नाही तुम्हाला?'

कुंभोज–बाहुबलीचे समंतभद्रजी महाराज हे त्यांचेच शिष्य होते. त्यांच्या गुरुकुलामधून लाख–दीड लाख विद्यार्थी शिकून बाहेर पडले आणि त्यांचे शिष्य तर अतिशय आदर्श निघाले.

फलटणला त्यांचा चातुर्मास असतानाचा एक प्रसंग– अहमदाबादहून एक शेठ आले, महाराजांच्या दर्शनाला! तेथे आणखीन काही विद्वान मंडळी बसली होती. शेठ म्हणाले, 'महाराज, या काळात जर मोक्षप्राप्ती होत नसेल; तर साधू बनण्याचा काय फायदा? हे साधू बनणे आम्हाला तर बरे वाटत नाही.'

महाराज म्हणाले, 'आपण कशाचा व्यापार करता?'

शेठजी म्हणाले की, 'मी पाचूंचा व्यापार करतो.' त्यावर महाराजांनी विचारले, 'पाचूच्या खाणीतून पाचू काढायचा असतो; तेव्हा आधी काय खणता?' 'माती...' शेठजींनी उत्तर दिले.

तेव्हा आचार्यश्री म्हणाले, 'अरे, तीर्थंकराचा मार्ग आहे; आधी दगड निघतो तर निघू दे. नंतर, कधी ना कधी तीर्थंकराचा मार्ग निघेलच. तो मार्ग का बंद करता?' सांगायचे तात्पर्य काय, तर आचार्यश्री अशाच युक्तीने उत्तर देत असत व प्रत्येक प्रश्नाचे उत्तर अतिशय मानसशास्त्रीय असे. ते कधीही हठाग्रही बनले नाहीत. जिथे जशी परिपाठी होती; त्या परिपाठीतही गुरफटून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गेले नाहीत. सतत समयसार, प्रवचनसार, मूलाचार या ग्रंथांचा त्रिकाल स्वाध्याय चालत असे. त्यांनी आपल्या जीवनात हजारो उपवास केले. जेव्हा आपल्या मंदिरावर आक्रमण होऊ लागले; तेव्हा त्यांनी उपवास केले. खटला चालू झाला. न्यायाधीशांनी निकाल दिला की, 'ट्रस्टींच्या परवानगीशिवाय कोणीही कोणत्याही मंदिरात घुसू शकत नाही.' आज परिस्थिती अशी आहे की, आपण मंदिरे सांभाळू शकत नाही. किती मूर्ती चोरीला गेल्या. आम्ही कोणाचेही धर्मपरिवर्तन करू इच्छित नाही; परंतु आपल्याला आपल्या आदर्शांचे रक्षण करणे आवश्यक आहे. आचार्य शांतिसागर महाराजांनी ४२ चातुर्मास केले. जिथेजिथे त्यांनी चातुर्मास केले; तिथेतिथे कोणती ना कोणती मोठी क्रांती झाली.

अनेक विद्वान सल्लेखनेच्या वेळी कुंथलगिरीस येऊन पोहोचले. दररोज एक विद्वान महाराजांसमोर प्रवचन करीत असे.

पं. जगन्मोहनलालजी शास्त्री महाराजांजवळ आले व त्यांनी प्रार्थना केली की, 'महाराज, आजवर आम्ही आपल्या छत्रछायेत राहिलो व काही समस्या उद्भवली की, आम्ही आपल्याला विचारून आमच्या शंका निरसन करून घेत होतो. आता यापुढे आम्ही कुणाच्या छत्रछायेत राहावे?' महाराज म्हणाले, 'मी कशाच्या छत्रछायेत आहे?' पंडितजी म्हणाले,

'आपण तर धर्माच्या छत्रछायेत आहात.' तेव्हा महाराज म्हणाले, 'मग तुम्हीसुद्धा धर्माच्या छत्रछायेत राहा. माझ्यासारख्या किती लोकांच्या छत्रछायेत फिरत राहाल? आपले कल्याण आपण स्वतः करा.' महाराज समयसाराचे अभ्यासू व थोर अध्यात्मवादी होते. व्यवहारनयाने छत्रछाया माना; पण निश्चयनयाने तर आपल्याला आपले आत्मकल्याण स्वतःच करावे लागेल.

आचार्यश्री अध्यात्म, तत्त्वज्ञानाचे जाणकार होते. ते अतिशय स्वाध्यायशील होते. 'धवला'सारख्या ग्रंथाचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. या काळात त्यांनी कर्मठतेपूर्वक ३६ दिवसांची सल्लेखना घेतली. अनेकांनी नाना प्रकारांनी सल्ला दिला. परंतु, ते काहीच बोलले नाहीत. दृष्टी मंद झाली. चालताना त्रास होऊ लागला. या साऱ्यांचा विचार करून त्यांनी सल्लेखना घेतली होती आणि ३६ दिवसांनंतर सूर्योदय होत असताना त्यांनी देहत्याग केला. त्या वेळी मी आणि इतर पाचसहा लोक आत होतो.

कुंथलगिरी हे सिद्धक्षेत्र आहे आणि शास्त्रातही लिहिले आहे की द्रव्य, क्षेत्र काल, भाव यांचा विचार करून एखाद्या ठिकाणी सल्लेखना घ्यावी की, ज्या ठिकाणी मिथ्यादृष्टींचा उपद्रव होणार नाही आणि कोणीही सल्लेखनेला ही आत्महत्या आहे, असा प्रचार करणार नाही. जगात मिथ्यादृष्टी लोक नाना प्रकारांनी उपद्रव करीत राहतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आज मी एवढेच सांगेन की, आचार्य शांतिसागर महाराजांच्या या १३१ व्या जन्मजयंती महोत्सवाप्रसंगी, संयम-वर्षाप्रसंगी आपण त्यांचे स्मरण करावे. त्यांच्याविषयी कृतज्ञता प्रकट करावी. 'नहिकृतमुपकारं साधवो विस्मरन्ति।' त्यांनी केलेले उपकार आपण विसरू शकत नाही. आज आचार्य शांतिसागरजींच्या १३१ व्या जन्मजयंती महोत्सवाच्या निमित्ताने आपण संकल्प करावा की; आम्ही दररोज मंदिरात जाऊ, पूजाप्रक्षाल करू, तीर्थयात्रा करू, स्वाध्याय करू, वैय्यावृत्ति करू, आहारदान देऊ. यामुळे आपला समाज संघटित आणि जिवंत राहील.

अनुवाद : धन्यकुमार जैनी, सोलापूर
('जैनबोधक'मधून साभार)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रथमाचार्य श्री शांतिसागरजी महाराज

–श्वेतपिच्छाचार्यश्री विद्यानंद मुनिराज

ॐ नमः।

महानुभावांनो, प्रथमाचार्य शांतिसागरजी महाराजांच्या जीवनातील घटनाः

ही गोष्ट १०० वर्षांपूर्वीची आहे. जेव्हा शांतिसागर महाराजांच्या घरी मुनिमहाराज यायचे तेव्हा त्यांची आजी चौका लावून त्या मुनिमहाराजांना आहार द्यायची. तेव्हा शांतिसागर महाराजांवरसुद्धा बालपणी त्या सर्वांना पाहून मुनिधर्माचे संस्कार होत राहिले. शेवटी, त्यांना वैराग्य प्राप्त झाले. ते विरक्त राहत असत. एके दिवशी त्यांच्या मनात दीक्षा घेण्याची प्रबळ भावना झाली; तेव्हा त्यांचे वडील त्यांना म्हणाले, "आमच्या समोर तू दीक्षा घेऊ नकोस." मग आई म्हणाली, "माझ्या समोरही दीक्षा घेऊ नकोस." त्या काळी लोक आपल्या आई–वडिलांची आज्ञा पाळणारे होते, ते त्यांचे म्हणणे कधीही टाळत नसत. त्यामुळे जेव्हा त्यांच्या आईवडिलांचा देहान्त झाला तेव्हा ते आपली बहीण कृष्णा हिला आपल्याबरोबर घेऊन स्तवनिधी क्षेत्रावर गेले. ते आपल्या बहिणीला म्हणाले, "मी इथेच राहीन, तू घरी परत जा." ते तर दरपंधरा दिवसांनी स्तवनिधीची यात्रा करत होते. त्यामुळे बहीण घरी परतली. जवळच १०–१५ किलोमीटर अंतरावर एका गावात देवेंद्रकीर्ती नावाचे मुनिमहाराज आले होते. तिथे पंचकल्याणक पूजा होती. त्या ठिकाणी शांतिसागर महाराजांनी आपल्याला दीक्षा द्यावी, अशी त्यांना विनंती केली. तेव्हा देवेंद्रकीर्ती महाराज त्यांना म्हणाले, "जर तुमच्या घरी कोणी वडीलधारी व्यक्ती असेल, तर त्या व्यक्तीला बरोबर घेऊन या. त्यांच्या परवानगीशिवाय मी दीक्षा देऊ शकत नाही." तेव्हा ते पायी चालत आपल्या गावाला गेले आणि त्यांनी आपल्या मोठ्या भावाला सांगितले की, "मी दीक्षा घेऊ इच्छितो. आपण माझ्याबरोबर चला." मोठे भाऊ देवेंद्रकीर्ती मुनिराजांना म्हणाले, "महाराज, बालपणापासूनच हे विरक्त वृत्तीने राहत आले आहेत. घरातही हे साधूसारखेच राहतात. त्यामुळे आपण यांना दीक्षा देऊ शकता." अशी परवानगी मिळाल्यावर त्यांची दीक्षा झाली. त्यानंतर, शांतिसागर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महाराज क्षुल्लक अवस्थेत विहार करत राहिले, अभ्यास करत राहिले, शास्त्र वाचन राहिले. जेव्हा ते समडोळी येथे होते; तेव्हा गिरनारची यात्रा करावी, अशी त्यांना इच्छा झाली. गिरनारच्या यात्रेवर गेले असता तिथे त्यांनी ऐल्लक दीक्षा घेतली. ऐल्लक दीक्षा घेतल्यानंतर एका वर्षाने त्यांनी देवेंद्रकीर्ती महाराजांकडून यरनाळ येथे पंचकल्याणक महोत्सवात मुनिदीक्षा घेतली. तिथून ते जिथे श्रुतकेवली भद्रबाहू आचार्यांच्या गुंफा होत्या, तिथे गेले. तिथे तर फक्त जंगल आणि पर्वतच आहे. आम्हीसुद्धा तिथे महावीरकीर्ती महाराजांबरोबर चातुर्मास केला आहे. तिथे ७२० गुंफा आहेत. तिथल्या शिलालेखांत असे लिहिले आहे की, भद्रबाहूंच्या काळात श्रावक लोक तेथील पाच साधूंना पडघावून घेऊन येत असत आणि त्यांना आहार देत असत. आजसुद्धा त्या ठिकाणी भद्रबाहू गुंफांचा बोर्ड सरकारतर्फे लावलेला आहे. उत्तर भारत आणि दक्षिण भारतातील लोक शांतिसागर महाराजांचे नाव ऐकून त्यांच्याकडे येत असत. विद्वान पंडित लोकदेखील त्यांच्या दर्शनासाठी येत.

ब्यावरला जेव्हा महाराजांचे आगमन झाले; तेव्हा तिथे चंपालाल रामस्वरूप नावाचे एक सद्गृहस्थ होते. ते जैन समाजाचे एक थोर नेते होते. त्या काळी भारतात सर्वत्र जैन समाजाचे फार मोठे लोक होते. सातसात घोडे जुंपलेल्या बग्गीतून फिरणारे लोक होते. याच लोकांमुळे श्रावकांमध्ये खूप धर्मभावना होत असे. समाचारपत्रांतून मुनींचे वर्णन, जीवन-चरित्र प्रसिद्ध होत होते. तिथूनच शांतिसागर महाराज प्रसिद्धीच्या झोतात आले. चातुर्मासानंतर महाराज गावागावांतून शहराशहरांतून विहार करत राहिले. हजारो लोक पूजाविधी शिकले. कारण, त्या काळी अष्टद्रव्यांनी पूजा कशी केली जाते व तिचा विधी कसा आहे, याचे लोकांना ज्ञान नव्हते. परंतु, हळूहळू लोक पूजा व स्तुती-स्तोत्रही म्हणू लागले.

मुंबईचे शेठ माणिकचंद हिराचंद झवेरी यांची कन्या सुरतेला आपल्या सासरी गेली; तेव्हा तिथे ती भक्तामर स्तोत्र वाचू लागली. ते पाहून तिची सासू तिला मारहाण करू लागली आणि म्हणाली, "शास्त्र वाचून तुला विधवा बनायची इच्छा आहे काय? स्त्रिया शास्त्र वाचन नसतात." इतके अज्ञान होते. डॉ. राधाकृष्णन जेव्हा इंग्रजी शिकू लागले; तेव्हा घरच्या बुजुर्ग मंडळींनी त्यांना मारहाण केली होती. अज्ञान इतके होते की, स्त्रिया त्या काळी ना वाचू शकत होत्या ना लिहू शकत होत्या. याचप्रमाणे श्रीमती शरयू दफ्तरींच्या आत्याला शिक्षणासाठी जेव्हा शाळेत पाठवण्यात आले; तेव्हा 'तुम्ही तुमच्या कन्येला शाळेत पाठवलेच कसे?' असे म्हणून मंदिरात पंचांनी पंचायत करून तिच्या घरच्या मंडळीवर बहिष्कार टाकला. याचप्रमाणे मृत्युभोजची परिपाठी होती.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महानुभावांनो, या साऱ्या वाईट रुढी आचार्य शांतिसागर महाराजांच्या विहारामुळे दूर झाल्या. पूजापाठ, अभिषेक आदी धार्मिक कार्य लोक विधिवत करू लागले. चंद्रसागर मुनिमहाराज सुजानगंज, लाडनू, मारवाड आदी भागांत विहार करत राहिले. तेथील लोकही व्रती बनले, प्रतिमाधारी बनले. अशा रीतीने या युगात साधू-संस्थेची सुरुवात आ. शांतिसागर महाराजांनी केली. आचार्यश्री शांतिसागर महाराजांनी १९१८ साली क्षुल्लक दीक्षा घेतली होती. मग, १९१९ साली मुनिदीक्षा घेतली. त्यानंतर ते चारित्रचक्रवर्ती बनले. शेवटी कुंथलगिरीला त्यांनी सल्लेखना घेतली; त्या वेळी आम्हीही तिथे होतो. १८ दिवसांपर्यंत तर ते फक्त पाणीच घेत राहिले आणि १८ दिवसांनंतर पाण्याचाही त्याग केला. ३५-३६ दिवसांत त्यांची सल्लेखना पूर्ण झाली. त्यांच्या माध्यमातून लोकांना एका महान शांतिपूर्वक सल्लेखनेचे दर्शन घडले.

महानुभावांनो! सांगायचे तात्पर्य, गणेशप्रसादजी वर्णी, आचार्यश्री शांतिसागर महाराज यांच्यासारखे साधू आणि काही संस्था यांनी देशासाठी व समाजासाठी अशा प्रकारची अनेक धार्मिक व सामाजिक कार्ये केली आहेत. शांतिसागर महाराजांचे शिष्य पायसागर महाराज यांनी महाराष्ट्र व कर्नाटकातील ४० मंदिरांचा जीर्णोद्धार करायला लावून तेथे पंचकल्याणक करविले. उत्तर प्रदेशात नमिसागर महाराज मेरठ, हस्तिनापूर, दिल्ली, बडौत आदी ठिकाणी चातुर्मास करत राहिले आणि तेथे मोठी धर्म-प्रभावना केली.

आचार्यश्री शांतिसागर महाराज की जय। आपणा सर्वांना शुभाशीर्वाद!

– अनुवाद : धन्यकुमार जैनी, सोलापूर
('जैनबोधक'मधून साभार)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्य शांतिसागरांचे चरित्र संस्कृत भाषेत लिहिणारे-

ऐनापूरचे आचार्यश्री कुंथुसागर महाराज

आचार्य कुंथुसागर महाराजांच्या ज्ञान-चारित्र-तपाने प्रभावित होऊन डुंगरपूर येथील श्रीमन्महारावल पाठशाळेचे प्रधानाचार्य पं. गणेश शर्मा यांनी 'श्री कुंथुसागराभिनंदनम्' नामक संस्कृत काव्याची १९४२ साली रचना करून ती संस्कृत साहित्यकृती डुंगरपूर (राजस्थान) चे राजा महारावल श्रीमान लक्ष्मणसिंहाच्या मुख्य उपस्थितीत पूज्य आचार्यश्रींना अर्पण केली. जातीभेदातीत होऊन संस्कृत पंडितांच्या हृदयसिंहासनावर आचार्यश्री कसे विराजमान झालेले होते, हे या ब्राह्मण विद्वानाद्वारे रचित पुस्तकावरून लक्षात येते. ते सुरुवातीलाच म्हणतात :

ॐ सत्यं शिवं सुन्दरमात्मनः प्रियं
ध्यायंश्चिदानंद घनं निरजनं।।
स्वरूपमन्तर्हृदि शांतमुज्ज्वलं।
जयत्यसौ श्री मुनि कुंथुसागरः ।।

अर्थात ॐ नित्यशुद्ध-बुद्ध-मुक्त स्वभावयुक्त व केवळ अनुगम्य अशा परब्रह्म परमात्म्याच्या सत्य, शिव आणि सुंदर, सच्चिदानंदघन, सगुण-निर्गुण व प्रशांत उज्ज्वल स्वरूपाचे अंतःकरणपूर्वक व सदासर्वदा ध्यान करत राहणारे मुनिवर आचार्य श्री कुंथुसागर महाराजांचा जय असो.

विसाव्या शतकात चारित्रचक्रवर्ती आ. शांतिसागर महाराजांनी आपल्या चारित्र्य, जप-तप-स्वाध्यायाच्या बळावर दिगंबर जैन परंपरेला पुनरुज्जीवित केले. या परंपरेस सक्षमतेने पुढे नेणाऱ्या मुनिवर्यांना शिक्षित-दीक्षित केले. अशाच परंपरेतील एक श्रेष्ठ प्रभावी मुनी स्व.आ. कुंथुसागर महाराज होत. आ. कुंथुसागर महाराजांनी दीक्षोपरान्त स्याद्वादसाधनेने ज्ञानाराधना, प्रवचन व साहित्यरचनेच्या माध्यमांतून सर्वधर्मीयांमध्ये मोठी धर्मभावना केली. 'ज्ञानीमुनी' म्हणून त्यांची ख्याती होती. आचार्य शातिसागर महाराजांच्या संघात १९२५ ते १९३५ पर्यंत राहून शास्त्राध्यायन, स्वाध्याय करून - दीक्षा घेऊन अभीक्ष्ण ज्ञानोपयोगमूलक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आत्मसाधनाही केली. आचार्यश्रींवरील असीम भक्तीमुळेच मुनी कुंथुसागरांनी प्रथमतः 'आचार्यश्री शांतिसागर चरित्रम्'ची संस्कृत भाषेत रचना केली. गुरूंच्या हयातीतच रचित प्रथम चरित्रकृती म्हणून तिला ऐतिहासिक महत्त्व आहे.

मूलतः बेळगाव (कर्नाटक) जिल्ह्यातील ऐनापूर या छोट्या गावचे पू. कुंथुसागरजी प्रभावी तपस्वी होते. १९२५ सालच्या श्रवणबेळगोळ महामस्तकाभिषेकाप्रसंगी श्रीक्षेत्रात त्यांनी आ. शांतिसागर महाराजांकडून क्षुल्लक दीक्षा घेतली. चार वर्षांनंतर श्रीक्षेत्र कुंभोज-बाहुबली येथे आचार्यश्रींकडून ऐलक दीक्षा घेतली. आ. शांतिसागर महाराजांच्या संघात क्षु. ज्ञानसागर (पं. सुंदरलाल शास्त्री) नावाचे विद्वान व संयमी साधक होते. पुढे तेच आचार्य सुधर्मसागर झाले. संघस्थ सर्व साधू त्यांच्याकडूनच अध्यात्मशिक्षण घेत होते. त्यांच्याकडेच ऐलक पार्श्वकीर्ती (मुनी कुंथुसागर) महाराजांनी संस्कृत भाषा, व्याकरण, सिद्धान्त, न्याय इ.चे अध्ययन केले. संस्कृतमध्ये अनेक ग्रंथांची रचनाही केल्या. वक्तृत्वकलेत विद्यानंद प्रवचन देण्यात निष्णात झाले. त्यानंतर, श्री सोनागिरी क्षेत्र येथे आ. शांतिसागर महाराजांकडून जैनेश्वरी दीक्षा घेतली. पुढे वी.नि. २४६५ अर्थात १९३८ साली श्री तारंगा सिद्धक्षेत्र येथे मुनी, आर्यिका तसेच गुजरात, दक्षिण भारत, मालवा व मेवाड येथून आलेल्या सुमारे १२ हजार श्रावकश्राविका, भक्तजन व अनेक राजा-महाराजांच्या उपस्थितीत यांची विद्वत्ता व उत्तम चारित्र्याचे फलस्वरूप त्यांना 'आचार्य'पदाने भूषवण्यात आले. ते आचार्य कुंथुसागर झाले.

आचार्य कुंथुसागर महाराजांनी अनेक ठिकाणी विहार करून धर्मजागृती केली. विशेषतः गुजरात प्रांतात अनेक ठिकाणी आचार्यश्रींच्या प्रेरणेने धार्मिक संस्था, विद्यालये, ग्रंथालये इ. स्थापित झाली. गुजरात प्रांतातील लिंबोदरा, पिंडदरा, डुंगरपूर, बांसवाडा, तलवाडा, विजयनगर, ईडर, सुदासना, टिंबा, अलुआ, माणिकपूर, मोहनपूर, बडासन, पेथापूर, आरान, देलवाडा इ. छोट्यामोठ्या संस्थानांचे संस्थानाधिपती पूज्यश्रींचे शिष्य बनले.

आचार्यश्रींचा जन्मदिवस आपल्या राज्यात ते 'अहिंसा दिन' म्हणून साजरा करीत. त्या दिवशी संस्थानात सुटी जाहीर करत. बडोद्याच्या न्यायमंदिरात तर एकदा दिवाणसाहेब सर श्री कृष्णम्माचारी यांच्या उपस्थितीत हजारो संख्येने उपस्थित असलेल्या जनतेसमोर आचार्यश्रींचे झालेले प्रवचन सर्वश्रुत आहे. परिणामतः हजारो जैनेतर लोकांनी मद्य-मांस-मधूचा त्याग केलेला होता. सुदासना संस्थानाचे प्रजावत्सल राजकुमार रणजितसिंह आचार्यश्री जिथेजिथे विहार करीत; तिथेतिथे जायचे व त्यांची सेवा करीत अनेक दिवस त्यांच्या सान्निध्यात राहायचेही. संस्थानाला जाणे अपरिहार्य झाले तरच ते जायचे. पण, परतताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांच्या डोळ्यांत पाणी यायचे. गुजरातेतील आचार्यश्रींची धर्मप्रभावना-जागृती भूतो न भविष्यती अशी होती. उल्लेखनीय म्हणजे एकदा संपूर्ण देशात दुष्काळाची छाया होती. पण, पूज्यश्रींच्या मंगल विहारामुळे गुजरातेत मात्र सुभीक्ष होते.

एका कवीने म्हटले आहे-

पद्मिनी राजहंसश्च, निर्ग्रंथाश्च तपोधनाः ।
यं देशमपसर्पन्ति, दुर्भिक्षं तत्र नो भवेत् ।।

अर्थात पद्मिनी स्त्री, राजहंस, निर्ग्रंथ मुनी, तपस्वीजनांचा जेथे वावर असतो; तेथे दुष्काळाची शक्यताच नाही. गुजरातेत छोट्याछोट्या गावांमध्ये विहार करून पूज्यश्रींनी लोकांना धर्मप्रवृत्त केले. तेथील जैन-जैनेतरांच्या तोंडी "साधू हो तो ऐसा हो" अशा प्रकारचे उद्‌गार असायचे.

अनेक साधू-साध्वींनी पूज्यश्रींच्या संघात राहून आत्मकल्याण साधले. प.पू. मुनिराज आदिसागर महाराज, मुनी अजितसागर, आर्यिका धर्ममती, आर्यिका विमलमती, क्षु. सीमंधर महाराज, क्षु. ज्ञानमती, ब्र. विद्याधर, ब्र. जिनदास, ब्र. विमलदास, ब्र. ऋषभदास, ब्र. शांतिमती, ब्र. अजितमती इ. संघस्थ साधूंची नावे विशेष उल्लेखनीय आहेत.

आचार्य कुंथुसागर महाराजांनी विश्वकल्याणासाठी प्रभावी उपदेश देण्याबरोबरच ग्रंथरचनेच्या माध्यमातून विश्वहिताचा संदेशही जगासमोर ठेवला. त्यांची ग्रंथरचनेची शैली अत्यंत सरळ व सुंदर होती. सर्वांना समजेल, अशा सोप्या संस्कृत भाषेत होती. 'सार्वधर्मसार' ग्रंथात ते म्हणतात- 'जयतु जयतु चेडयं संस्कृता वीरवाणी' आहे, देववाणी आहे. कारण, या भाषेत अनेक धर्मग्रंथांना विशेष प्रतिष्ठा मिळाली आहे. जगामध्ये सदाकाल ही जयशाली होवो, अशी शुभभावना व्यक्त करायचे.

आचार्यश्रींची ग्रंथसंपदा पाहा- चतुर्विंशति जिनस्तुति, शांतिसागर चरित्र, बोधामृतसार, निजात्मशुद्धि भावना, मोक्षमार्ग प्रदीप, ज्ञानामृतसार, लघुबोधामृत-सार, (गुजराती, हिंदी, मराठी, कन्नड) स्वरूपदर्शनसूर्य, नरेशधर्मदर्पण, लघुसुधर्मोपदेशामृत, मोक्षमार्गप्रदीप, मुनिधर्मप्रदीप, सुवर्णसूत्र, भावत्रयफलप्रदर्शी, मनोनिग्रहमंत्र, लघुशांतिसुधासिंधू इ. ४० ग्रंथ त्यांनी लिहिले. कर्नाटकाच्या ग्रामीण भागातील ऐनापूरच्या अक्षराभ्यास नसलेल्या एका सदाचारी व्यक्तीने गुरूंच्या मार्गदर्शनाखाली संस्कृत भाषा, दर्शन इ.मधील उच्चतम पारंगतता मिळवणे, ही ऐतिहासिक बाब ठरते, हे निःसंदेह! इतकेच नव्हे, तर आचार्यश्रींनी बायबल, कुराण, भागवत, दुर्गा सप्तशती, व्यासपुराण, मनुस्मृती, नीतिवाक्यामृत, वेद इ. ग्रंथ आणि तुलसीदास, कबीर, पौलन रसूल इत्यादींचे ग्रंथ याप्रमाणे अनेक धर्मग्रंथ व रचनांचे सांगोपांग अध्ययन केले. याची उत्तम फलश्रुती-साक्ष

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांनी लिहिलेल्या 'सार्वधर्मसार' या समृद्ध ग्रंथातून दिसून येते. सदर ग्रंथ विश्वधर्म, विश्वशांती व बंधुत्वाचा परिचायक ठरलेला आहे.

आचार्य कुंथुसागर महाराजांची ग्रंथसमृद्धी व त्यांच्या साहित्यमूल्याचे महत्त्व जाणून सोलापूरचे विद्यावाचस्पती स्व. वर्धमान पार्श्वनाथ शास्त्री यांनी आचार्य कुंथुसागर ग्रंथमालेची स्थापना केली. आचार्यश्रींच्या समग्र ग्रंथांचे प्रकाशन-संपादन-भावार्थकथन करून १९३९ साली 'श्री १०८ आचार्य कुंथुसागर पूजन' सारखे ग्रंथ पं. लालाराम शास्त्री व आनंददास वैद्य इ.नी लिहिले. सदर ग्रंथ अजितकुमार शास्त्री यांनी अकलंक प्रेस, मुलतान सिटी येथून प्रकाशित केला. सदर ग्रंथ केवळ पूजाविषयक नसून मुनिसंघाच्या अनेक बाबींवर प्रकाश टाकणारा आहे.

आचार्य कुंथुसागर महाराजांच्या संघातील घोर तपस्वी नमिसागरजी, क्षु. जयकीर्ती, मल्लिसागर, ब्र. विद्याधर इ.संबंधी विशेष उल्लेख या ग्रंथात सापडतो. मुलतान सिटी सध्या पाकिस्तान येथील पंजाब प्रांतात आहे. येथील जैन मंदिरामध्ये एका जैन मुनींच्या चरणपादुका-चरणचिन्ह असल्याचेही आढळून येते. ती 'चरणपादुका' (चरण-चिन्ह) आचार्य कुंथुसागरजींची तर नाही ना? मुलतान सिटीपर्यंत आचार्यश्रींचा भक्तवृंद पसरलेला होता, याची साक्ष सदर ग्रंथ देतो.

गुजरात, सौराष्ट्र, राजस्थान इ. प्रांतांमध्ये व्यापक धर्मप्रचाराची पताका फडकवणाऱ्या आचार्यश्रींनी धरियावद येथे १ जुलै १९४५ रोजी वयाच्या ५१ व्या वर्षी समाधिमरण साधले. त्यांच्या अंतिम यात्रेत भारताच्या कानाकोपऱ्यांतून हजारोंच्या संख्येने भक्तजन सहभागी झाले होते. आचार्यश्रींच्या समाधिस्थळी मनोरम स्मारकाची रचना केलेली आहे. अस्थिविसर्जन करण्यात आलेल्या नदीच्या परिसरात आजही मासे पकडण्यास बंदी घालण्यात आली आहे.

आचार्यश्रींच्या ग्रंथांचे महत्त्व ओळखून श्रवणबेळगोळचे मठाधीश स्वस्तिश्री चारुकीर्ती भट्टारक महास्वामी यांनी 'ऐनापूरच्या आचार्य श्री कुंथुसागर महाराजांच्या समग्र कृती' या नावाने दोन खंडांत (११०० पाने) कन्नड भाषेत भाषांतरित करवून नुकतेच प्रकाशित केले आहे.

आ. कुंथुसागर महाराजांच्या ऐनापूर या जन्मस्थळी असलेल्या त्यांच्या पूर्वाश्रमीच्या जुन्या घरात त्यांच्या चरणपादुकांची स्थापना ग्रामस्थ व परिसरीय श्रावकजनांनी केली आहे. शिवाय, वरच्या मजल्यावर समवशरण व ग्रंथभांडाराची रचनाही केली आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे सदर स्मारकाचे लोकार्पण आ. शांतिसागर महाराजांच्या परंपरेतील पंचम पट्टाधीश आचार्यश्री वर्धमानसागरजींच्या शुभहस्ते करण्यात आले आहे, ही ऐतिहासिक बाब आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रवचन व साहित्यकृतींच्या माध्यमातून समकालीन जैन-जैनेतर समाजाला जागृत करणाऱ्या आचार्यश्रींच्या रचना आजही तितक्याच समर्थपणे कालोचित, प्रासंगिक व प्रभावी आहेत. आचार्यश्रींच्या व्यक्तित्व व कृतित्वावर मोठ्या प्रमाणात संशोधन होणे गरजेचे वाटते. आपल्या कृतित्वाने अमर झालेल्या आचार्यांच्या चरणी शतशः नमन!

– डॉ. सुजाता सुभाष शास्त्री, सोलापूर
भ्रमणध्वनी : ९९७०२१०६७२
दूरध्वनी : (०२१७) २६००४०१

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री शांतिसागर मुनिराजांचा भट्टारक-परंपरेवरील विश्वास

परमपूज्य आचार्यश्री शांतिसागरजी महाराजांनी आपल्या जीवनकाळात भट्टारक परंपरेला महत्त्वपूर्ण स्थान दिले. आचार्य शांतिसागर महाराजांचे दीक्षादाता देवप्पा स्वामी स्वत: भट्टारकपदावर राहिले होते आणि हा संयोग किंवा विश्वासच म्हणावा लागेल की, आचार्यश्रींच्या समाधीसमयी त्यांच्याजवळ सतत सेवेत दोन भट्टारक होते. आचार्यश्रींनी इंगिनी-मरण-संन्यास स्वीकारला होता. या संकल्पात इतरांकडून सेवा करून घेण्याचा त्याग असतो. म्हणून, ते इतरांकडून सेवा स्वीकारत नसत. परंतु, महाराजश्रींप्रति आपली भक्ती प्रकट करण्यासाठी आणि त्यांच्या सल्लेखनेचे साक्षी बनून प्रेरणा घेण्याच्या उद्देशाने भट्टारक आचार्यश्रींकडे आले होते. आचार्यश्रींच्या सल्लेखनेचा हा परमपावन सहवास भट्टारकांना प्राप्त झाला होता आणि आचार्यश्रींनीही ते स्वीकारले होते. शेवटच्या क्षणीसुद्धा भट्टारकांना आशीर्वाद देताना- भविष्यासाठी धर्म, समाज आणि साधुसंतांची रक्षा करण्याची आज्ञा त्यांना दिली होती.

(-पं. सुमेरचंद दिवाकर - आध्यात्मिक ज्योती, पृष्ठ ३५)

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे आचार्यश्रींनंतरसुद्धा त्यांच्या पट्टपरंपरेतील सर्व त्यागींनी भट्टारकांचा तो सन्मान कायम राखला आहे. आचार्यश्री देशभूषण, आचार्यश्री विद्यानंदजी यांनी आचार्यश्री शांतिसागर महाराजांचा संदेश उचलून धरला. सर्व भट्टारकांना यथायोग्य मानसन्मान संपूर्ण भारतात मिळवून दिला आहे. भट्टारकदेखील आचार्यश्रींच्या आज्ञेचे पालन करून जिनशासनाचा प्रचार-प्रसार आजतागायत करत आहेत.

आचार्यश्री भट्टारक परंपरेकडे सन्मानाच्या दृष्टीनेच पाहत होते. भट्टारक परंपरेला व भट्टारकांच्या महान सेवेला आचार्यश्री जैन संस्कृतीचे महत्त्वाचे अंग मानत होते. भट्टारकांनीदेखील यथाशक्ती आपल्या व्रतांचे रक्षण करत जैन सिद्धान्तांच्या संरक्षण व प्रचाराच्या दिशेत उल्लेखनीय सेवा दिली आहे. समाजाचा एखादा महत्त्वपूर्ण घटक समाजरक्षणासाठी आपले जीवन अर्पण करत असेल

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तर त्याचा यथायोग्य उल्लेख झालाच पाहिजे. जिन धर्मरक्षणाचे भट्टारक–परंपरेचे कार्य इतिहासातील, जैन इतिहासातील स्वर्णमयी पाने आहेत.

आचार्य शांतिसागर महाराजांनी या परंपरेचा यथायोग्य सन्मान केला; त्यांच्यावर विश्वास दाखविला व त्यांना योग्य कार्यदिशा दिली.

आचार्यश्री शांतिसागर महाराज की जय!

– डॉ. महावीर प्रभाचंद्र शास्त्री
भ्रमणध्वनी : ९४२२४५७५८२
('जैनबोधक'मधून साभार)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री शांतिसागरांची प्रवचनशैली

ब्रिटिशांच्या शासनकाळात जैन समाजात धर्मासंबंधी एक प्रकारची उदासीनता, निष्क्रियता निर्माण झाली होती. निराशेच्या व अज्ञानाच्या अंधारात जैन समाज चाचपडत होता. अंधाराने घेरलेल्या धार्मिक क्षितिजावर कालांतराने, सद्भाग्याने एका तेजस्वी ज्ञानसूर्याचा उदय झाला. तो सूर्य म्हणजेच आचार्य शांतिसागर महाराज! पूज्य आचार्यश्रींचे निर्मळ विशुद्ध आचरण व कठोर तप:साधना यामुळे प्रत्येक जण नतमस्तक होतो. तपोनिधी शांतिसागरांचे तेज शब्दांच्या पलीकडचेच होते. त्यांची प्रवचनशैलीसुद्धा सुबोध, सहज अशी असे.

फलटणचे वकील श्री. तलकचंद शाह यांनी महाराजांना विचारले, महाराज काही तीर्थंकर असे झाले आहेत की, जे भोगमार्गावरून कालक्रमण करताकरता अचानक विरक्तीच्या मार्गाला लागले आणि ते मुक्तही झाले. दुसऱ्या लोकांनी असे केले तर तेही मुक्त होतील का? महाराज उत्तरले- कल्पना करा, दुधारी तलवार मुठीच्या आधाराने उभी केली आहे. त्या तलवारीच्या टोकावर फळे ठेवली आहेत. जवळ एक पोपट आहे. शेकडो मुंग्यापण आहेत. पोपट उडतउडत येतो. पटकन खाली येऊन फळ चोचीत घेऊन उडून जातो. तो फळ खातो. पण, मुंग्या असे करू शकणार नाहीत. उंदरासारखा थोडा वजनदार प्राणी तिथे असला तरी तोही ते फळ खाऊ शकणार नाही. तसे प्रयत्न केले तर दुधारी पात्यावरून चढताना त्याचे आयुष्यच संपेल. तलवारीच्या धारदार पात्यावरून फक्त मुंग्याच चढू शकतात व फलापर्यंत पोहोचू शकतात. मुंग्यांसारख्या हलक्या जीवानाच ते शक्य आहे. हे समजलं तर तुम्हाला तुमच्या प्रश्नाचे उत्तर मिळाले म्हणून समजा! तीर्थंकर अवधिज्ञान प्राप्त झालेले दिव्य जीव आयुष्याच्या शेवटापर्यंत भोग भोगत राहिले व अकस्मात मुनिव्रत धारण करून मुक्तही झाले. पण, सगळेच असे करू शकत नाहीत. सामान्य भोगी आहे उंदरासारखा! तलवारीच्या पात्यावरून चालण्याची कल्पनाही तो सहन करू शकत नाही. त्याने आधी त्यागाचा मार्ग स्वीकारून, कठोर व्रत नियमांचे पालन करीत कर्मांचे ओझे कमी करायला पाहिजे. कर्मांची निर्जरा करून मुंगीसारखा हलका झाला की, मग तो मोक्षरूपी तलवारीच्या पात्यावर पाय ठेवू शकतो; अन्यथा नाहीच.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तीर्थंकर पोपटासारखे, सामान्य संसारी माणसे उंदरासारखी आणि साधू मुंगीसारखे आहेत. हलके, कर्माच्या वजनातून–भारातून मुक्त झालेले!

तीर्थंकरांनी आयुष्याच्या शेवटी विरक्त जीवन स्वीकारले आणि ते मोक्षास गेले तरी हे वर्णन त्यांच्या असंख्यात काळाच्या जीवनाच्या शेवटच्या भागाचे होते. त्या आधीच्या त्यांच्या अगणित जन्मांतील कर्मांचा क्षय त्यांनी अथक प्रयत्नांनी केला. शेवटी, त्यांच्या भाग्याचा जो उदय झाला; त्याला त्यांचे संपूर्ण जीवन समजणे चुकीचे आहे. म्हणून, जीवनाच्या काही काळातच त्यांनी वैराग्य धारण केले, असे समजू नका.

सद्गृहस्थाच्या प्रश्नाची ही दुसरी बाजू महाराजांनी अशी उजेडात आणली व सर्वांना विचार करण्यास भाग पाडले. अशी होती महाराजांची प्रवचनशैली!

– सौ. उषा तुपकर, सोलापूर
भ्रमणध्वनी : ९८९०८४६०२१
('जैनबोधक'मधून साभार)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री पायसागर महाराज

१०८ आचार्यश्री पायसागर महाराजांचे दर्शन घेण्यासाठी आम्ही कोल्हापूरहून स्तवनिधीला गेलो. आचार्यश्रींच्या काही आठवणी सांगण्याची त्यांना विनंती केली.

आचार्यश्रींचे वैशिष्ट्य

श्री पायसागर महाराज म्हणाले, "आचार्य महाराजांनी माझ्यावर आपल्या कृपेचा असीम वर्षाव केला आहे. त्यांच्या आत्मीयतेमुळे आमचा उद्धार झाला. त्यांचं एक वैशिष्ट्य होतं की, ते दुसऱ्या ज्ञानी तपस्वी व्यक्तीचा योग्य मान ठेवत असत. एकदा मी त्यांचे दर्शन करण्यासाठी दहिगावाजवळ गेलो. मी भक्तीनं आणि नम्रपणानं त्यांना वंदन केलं. त्यांची प्रतिवंदना केली. मी म्हटलं, "महाराज, मी प्रतिवंदन करण्यास लायक नाही."

महाराज म्हणाले, "पायसागर, गप्प बैस. कोण म्हणतं तू योग्य नाहीस? मी तुझं अंतरंग जाणतो."

"महाराजांचे हे अपरंपार वात्सल्य बघून माझ्या मनातलं शल्य दूर झालं. गुरुवरांचा माझ्यावर अगाध विश्वास होता.

खरे प्रायश्चित्त

मी म्हटलं, "गेल्या कित्येक वर्षांपासून गुरुदेव आपलं दर्शन मिळालं नाही. मी आत्मशुद्धी करण्याकरिता आपल्या चरणांशी आलो आहे. मी स्वतःला दोषी मानतो. मी अज्ञानी आहे गुरुदेव! आपण मला प्रायश्चित्त द्यावं."

महाराज म्हणाले, "पायसागर, असं बोलायचं नाही. आम्हाला सगळं माहीत आहे. तुला प्रायश्चित्त द्यायची जरुरी नाही. दोष समाजाचा आहे. तू अज्ञानी नाहीस. कोण म्हणतंय तू अयोग्य आहेस? मी तुला कसलंच प्रायश्चित्त देणार नाही. प्रायश्चित्त न विसरणं हेच मोठं प्रायश्चित्त आहे."

आचार्यश्रींची शिकवण

जेव्हा आचार्य महाराजांचा शेवटचा निरोप घेतला, तेव्हा महाराज म्हणाले, "पायसागर, फार हुशारीनं राहा. स्वस्वरूपात जागा राहा."

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ते म्हणाले, ''जगाला काय म्हणायचे ते म्हणू दे. तू योग्य निद्रेत लीन राहा.''

जीवन उद्धाराचं अलौकिक उदाहरण

पायसागरांचे एक जवळचे स्नेही होते. त्यांनी सांगितलं, पूर्वी हेच महाशय जैन धर्माची निंदा करायचे. ते म्हणायचे, ''मुनी पशूसारखं नागवं हिंडतात. दगडाच्या मूर्तीवर दूध घालणं हा महामूर्खपणा आहे. जैन लोक अडाणी आहेत.''

त्यांना मिथ्या तपस्वी व्हायचं होतं; पण आचार्य श्रींच्या दर्शनानं त्यांचं जीवन फार बदलून गेलं. जीवनाला विलक्षण कलाटणी मिळाली. अशा जबरदस्त परिवर्तनाचं पायसागरांसारखं उदाहरण मिळणं अवघड आहे.

मनस्वी कलावंत

पूर्वी पायसागरांनी कन्नड भाषेत गायलेल्या रसमय गीतांचा अर्थ कळत नसतानाही कोल्हापूरचे शाहू महाराज रात्ररात्र त्यांच्या स्वरलहरीत रंगून जायचे. त्यांच्या संगीतात अजब जादू होती. खरोखरीच त्या वेळी ते मोहाच्या माहात्म्याचा प्रसार करीत होते. तेच पायसागर साधू होऊन जैन धर्माच्या माहात्म्याचा अलौकिक प्रसार करू लागले. त्यांचं अंधारलेलं आयुष्य आध्यात्मिक ज्योतीच्या प्रकाशानं झगमगू लागलं. पायसागरांचं दिगंबर मुनीचं रूप पाहून त्यांच्या पूर्वायुष्याशी तुलना करणारा आश्चर्यसागरात बुडून जातो, हीच का ती व्यक्ती, जी पूर्वी सूट, बूट, टाय घालून तोंडाने सिगारेटचा दूर सोडत आंग्लाळलेली होती, आज मुनी होऊन धर्मोपदेश देत आहे. पहिल्यापासून त्यांना अध्यात्माची आवड होती, एवढं मात्र खरं.

महान कलाकार

पायसागर महाराज महान कलाकार होते. ते मुनी झाल्यावर त्यांच्यातील पूर्वीची अभिनयाची कला मोक्षमार्गाच्या अभिनेत्याच्या रूपात प्रकट होत असे. प्रवचन देताना ते हातवाऱ्यांनी, चेहऱ्यावरच्या भावांनी पदार्थांचं निरूपण करायचे; तेव्हा श्रोते अगदी शांत बसून त्या उपदेशामृताचे प्राशन करीत असत. अगदी मंत्रमुग्ध होऊन जायचे. म्हणतात ना 'मूळ स्वभाव जाईना', या म्हणीप्रमाणे त्यांच्यात एक वेगळीच प्रतिभा होती. आता त्यांचे सगळे आचारविचार वीतराग भाव प्रकट करणारे झाले आणि तत्त्वाच प्रतिपादन करताना त्याला अनुरूप असा अभिनय ते करायचे.

रंगभूमीवरील अभिजात नटसम्राट

मुनी आदिसागरांनी सांगितलं की, पायसागरांचे पूर्वायुष्य अजब होतं. त्यांची अभिनयक्षमता अलौकिक होती. रंगमंचावर ते नुसते इकडून तिकडे गेले; तरी प्रेक्षकांची हसूनहसून मुरकुंडी वळायची.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पत्रातील महत्त्वाचे सुविचार

त्यांची पत्रं म्हणजे सुविचारांचा संग्रह! त्यातील काही भाग इथं देत आहे.

१) चांगल्या विद्वानांच्या भांडणामुळं दुःख वृद्धिंगत होतं आणि वाईट विद्वानांच्या संघटनेमुळे पापकलह वगैरे वृद्धिंगत होऊन देशाचं अहित होतं.

२) पावसाळ्यात फुलांवर भरपूर पाणी टाकण्यापेक्षा उन्हाळ्यात थोडंसं पाणी शिंपडणं जास्त महत्त्वाचं आहे.

३) आजच्या जघन्यकाळात सद्धर्माचं पालन करणं, ही फार मोठी गोष्ट आहे.

४) श्रीमंताचं दान एवढं महत्त्वाचं नाही; जेवढं दारिद्र्यातील थोडंसं दान गौरवास्पद आहे.

५) मोठमोठ्या लोकांनी जिनेंद्र भगवंताच्या पवित्र धर्माचा त्याग केला आहे. जैन थोडे आहेत. सम्यक्त्वी त्यापेक्षा कमी आहेत. त्यामुळे आम्ही संख्येच्या दृष्टीनं दरिद्री झालो आहोत. अशा परिस्थितीत या धर्मवृक्षाला वात्सल्याने एक तांब्याभर पाणी जरी घातलं तरी ते महत्त्वाचं ठरेल.

आचार्यपदाचा त्याग

१०८ पूज्य पायसागरांनी अशक्तपणामुळे आपले आचार्यपद १०८ मुनी अनंतकीर्ती यांना प्रदान केले.

आनंदाश्रूंच्या धारा

बऱ्याचदा पायसागर महाराज प्रवचन देतादेता आत्मरंगात गुंग व्हायचे. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाचे अश्रू वाहायचे. श्रोते आनंदरसात तल्लीन होऊन त्यांच्याही डोळ्यांत आनंदाश्रू येत असत. असा असामान्य वक्ता कुठंच पाहिला नाही.

आत्मनिंदा

पूर्वीच्या व्यसनाधीनतेमुळे त्यांचा देह रोगजर्जर झाला होता. ते म्हणायचे, "मी जी कर्मं केली आहेत; त्याचं फळ मला भोगावंच लागेल. त्याच्यावर काही औषध नाही."

पापनाशाचा उपाय

"पापनाशाचा एकच उपाय आहे; तो म्हणजे आत्मस्वरूपाचं चिंतन करणे, ज्योतिस्वरूप जिनेंद्राची भक्ती करणे आणि आपल्या स्वरूपात लीन होणे."

"सूर्योदय झाल्यावर अंधार दूर होतो; तसं जिनेंद्राचे नामस्मरण आणि आत्मदेवाचा प्रकाश यामुळे मोहाचा आणि दुःखाचा अंधःकार नष्ट होतो. नेहमी जागरूक राहून आत्मकल्याणाचा पुरुषार्थ करीत राहिलं पाहिजे."

मृत्यूची चाहूल

पायसागर महाराज म्हणाले, माझा काळ आता जवळ आला आहे. मी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केव्हा जाईन; ते तुम्हाला कळणारही नाही. झालंही तसंच. सकाळी ते अध्यात्मरसिक मुनिवर ध्यानास बसले. ध्यानात अगदी लीन झाले. ७.३० वाजता लोकांनी पाहिलं की, ते विद्वान आध्यात्मिक योगी पायसागर महाराज स्वर्गवासी झाले. पक्षी पिंजऱ्यातून उडून गेला. खरोखर, त्यांनी आपल्या लोहमय जीवनाचं सोनं करून अलौकिक पद प्राप्त केलं.

आचार्यश्रींविषयीचे उद्गार

आचार्यश्रींविषयी त्यांच्या मनात अपरंपार भक्तिभाव होता. ते म्हणायचे, "माझे गुरू सोडून गेले. मला अंधकारातून प्रकाशाचा मार्ग दाखविणारे निघून गेले. माझ्या आत्म्याला जाणणारे सोडून गेले. माझे धर्मपिता गेले. मलाही त्यांच्या मार्गावरून जायचं आहे." आचार्यश्रींच्या सल्लेखनेची आठवण म्हणून त्यांनी त्याच दिवसापासून गव्हाचा त्याग केला. त्यानंतर, ते जंगलात जाऊन राहिले. शहर-गावात त्यांचा निवास पाच दिवसांपेक्षा जास्त नसे. त्यांचे परिणाम अतिशय निर्मळ झाले होते.

आत्म्याची प्रभावना

ते म्हणायचे, "आतापर्यंत मी बाह्य प्रभावना खूप केली. त्यात काही सुख नाही. मला माझ्या आत्म्याची खरी प्रभावना करायची आहे. आत्म्याची प्रभावना रत्नत्रयाने होते. त्यासाठी मी या पहाडावर आलो आहे. आता मला एकान्तात राहू द्या."

आत्म्याचे कुटुंब

माझ्या आत्म्याच्या कुटुंबीयांसमवेत मला एकान्तात राहायचं आहे. शील, संयम, दया, दर्शन, ज्ञान, चरित्र, वीर्य हे सारे माझे कुटुंबीय आहेत. मला त्यांच्यात रमायचं आहे. मला त्यांच्याशीच क्रीडा करायची आहे. त्यातूनच, खऱ्या अमृताचा रसास्वाद मिळेल. मला कर्मबंधनात अडकायचं नाही."

आत्मिक गुणांची दिवाळी

आता माझ्या आत्मगुणांची दिवाळी मी साजरी करणार आणि कर्मांची होळी करणार. कर्मांचा नाश करण्याचा अटळ आणि अचल निश्चय मी केला आहे.

आळंद येथे त्यांचा चातुर्मास गावात न होता गावाबाहेर झाला होता. पूर्वी त्यांचा आहार झाल्यावर श्रावक बेंडबाजे लावून आपला भव्य आनंद व्यक्त करायचे. प्रभावना करायचे. पायसागर महाराजांनी हे सगळं बंद करायला लावलं. आचार्य श्रींच्या सल्लेखनेनंतर त्यांच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल घडून आला. ते आता आत्मशुद्धीच्या मार्गावर वेगाने आगेकूच करत आहेत, असं दिसू लागले. त्यांचं मन वीतरागतेच्या रसास्वादात सतत तल्लीन होत असे.

सल्लेखनेची तयारी म्हणून त्यांनी आहारात ज्वारीची आंबील घ्यायला सुरुवात

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केली. दूध, दही, साखर सगळ्यांचा त्याग केला. शरीराची रुग्णावस्था बघून त्यांनी तुपाचा मात्र त्याग केला नाही. असा क्रम १५ महिने होता. ते म्हणाले, ‘‘आता मला माझ्या जीवनाचा एकेक क्षण न् क्षण समाधीच्या साधनेत घालवायचा आहे.

शंकेचे आगळेच निरसन

त्यांच्याशी तत्त्वचर्चा करताना वेगळ्याच आनंदाची अनुभूती येत असे. जैन धर्माच्या अनुपम रहस्यांची चर्चा होत असे. एकदा कुणीतरी विचारलं, ‘‘महाराज, एखाद्यानं निर्ग्रंथ दीक्षा घेऊन एखादं करू नये ते काम केलं; तर त्याला आहार द्यावा का?’’

ते म्हणाले, ‘‘शास्त्रात सांगितलं आहे, दोन घास भोजनासाठी कशाला त्या साधूची परीक्षा करायची? भुक्तिमात्र प्रदाने तु का परीक्षा तपस्विनाम्?’’ आहार तर त्याला दिलाच पाहिजे. ‘‘कर्माच्या उदयामुळं प्रमादी होऊन बिचारा आगमाविरुद्ध वागत आहे. त्याचा तिरस्कार करू नये आणि सन्मान करू नये. अशा व्यक्तीची भक्ती करू नये.’’

आपल्या सल्लेखनेविषयी

आपल्या सल्लेखनेच्या संदर्भात ते म्हणत, ‘‘माझी परलोकाची यात्रा सल्लेखनेसहित होईल आणि त्याचा कुणाला पत्ता लागणार नाही. मी माझ्या अंतरंगात पूर्वसावधान आहे. त्यांचे हे शब्द अक्षरशः खरे ठरले. आश्विन वद्य अमावस्येला सन १९५८ मध्ये ते स्वर्गवासी झाले.

आत्मजागृती आणि परिणामांच्या शुद्धीसाठी ते आत्म्याचं प्रबोधन करीत असत. मंत्राचं आणि शास्त्रवचनाचं सदैव पठण करीत असत. शांतीच्या अविरत सुखाचा भंग होऊ नये म्हणून ते शिष्यांनासुद्धा जवळ फिरकू देत नसत.

आत्मयोग्याची अपूर्व आत्ममग्नता

त्यांची आत्मलीनता, आत्मविचार आणि तत्त्वचिंतन सगळं अद्भुत होतं. चालताचालता ते मध्येच थांबायचे, ध्यानात उभे राहायचे. कधीकधी ते शौचक्रियेसाठी निघायचे. पण, रस्त्यात थांबायचे. ते आत्मध्यानात दंग आहेत असं दिसायचं.

एखाद्या दरिद्री व्यक्तीला चिंतामणी रत्न मिळालं; तर तो त्या रत्नाकडे प्रेमानं, आदरानं आणि ममतेने पुनःपुन्हा पाहतो, हर्षभरीत होतो, तसे ते आत्मयोगी पायसागर महाराज जगातले ते अनुपम आत्मवैभव मिळाल्यामुळं पाहिजे तिथं, पाहिजे तेव्हा, पाहिजे तसं त्याचं वरचेवर दर्शन घ्यायचे, खूश व्हायचे. समाधीपूर्वक बाह्यदर्शन करणाऱ्या योग्यासारखी त्यांची अवस्था झाली होती. विषयभोगाची आसरता त्यांनी जरुरीपेक्षा जास्त अनुभवली होती. त्यामुळं त्यांचं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मन विषयसुखांपासून पूर्ण विरक्त झालं होतं.

अखंड आत्मचिंतन

आत्मचिंतनात ते इतके गुंगून जात की, त्यांना वेळेचेसुद्धा भान राहत नसे. कधीकधी आहाराची वेळ टळून गेली तरी ते ध्यानातच लीन असायचे. त्यांच्या कुटीच्या खिडकीतून त्यांना सांगावं लागायचं, "आपल्या आहाराची वेळ झाली आहे."

पूर्वीचे व्यसनी नाटककार रामचंद्र गोकांककर कुठे आणि हे आत्ममग्न पायसागर महाराज कुठे? राहू आणि चंद्राची तुलना होऊ शकत नाही, तसं त्यांचे पूर्वायुष्य आणि वर्तमान जीवन यात यत्किंचितही साम्य नव्हतं. तप, स्वाध्याय आणि ध्यान यामुळं त्यांचं जीवन सुवर्णासारखं झळाळू लागलं.

अलौकिक योगी

लोकांच्या लक्षात त्यांची ही इंद्रियातीत दशा येणार नाही; पण कधीकधी आहार घेताघेता ते एकदम थांबून शांत उभे राहायचे, आम्ही हे प्रत्यक्ष पाहिलंय. तेव्हा त्यांना सांगावं लागायचं, "महाराज, आपल्याला आहार घ्यायचाय!" मग भानावर यायचे.

आदेश

आहाराच्या वेळी गडबड झाली की, आहार झाल्यावर म्हणायचे, "तुम्ही माझ्या आत्मचिंतनात व्यत्यय का आणता? थोडंसं खायला घालून माझी आत्मलीनता का भंग करता? तुम्हाला शांतता ठेवायची नसेल तर मला तुमच्या आहाराची जरुरी नाही. मला आत्मकल्याण करायचे आहे. मी शरीराचा गुलाम नाही. मी कशाला त्याची गुलामी करू?"

माझे वैभव

त्यांचे भाऊ चंदप्पा जिनप्पा डोंगरे त्यांच्याजवळ आले व त्यांच्या स्वास्थ्याची फिकीर करत म्हणाले, "आता जास्त बोलायचं नाही. शरीराकडे लक्ष द्यायचं. मौन घ्या. आता दुसऱ्यांना उपदेश देण्याची शक्ती आपल्या शरीरात राहिली नाही."

पायसागर महाराज म्हणाले, "किती विचित्र बोलताय तुम्ही. सगळी कामं सोडून पैसा कमावण्यासाठी तुम्हीही मेहनत करताच ना! गिऱ्हाईक आल्यावर देहाचीसुद्धा फिकीर करत नाही. माझासुद्धा व्यापार आहे. भव्यजीवांचं कल्याण करणं, ही माझी विक्री आहे. त्यांना मोक्षमार्गाला लावणं, हीच माझी कमाई आहे. माझी ठेव आहे. मला माझं दुकान बंद करायला का सांगता? मी मोक्षाचा उपदेश देणं बंद करणार नाही. डोळे बंद व्हायला लागले तरी वीतराग सर्वज्ञाची चर्चा करतच राहणार. जिनवाणीरूपी संजीवनी सर्व संकटांचा व व्याधींचा नाश

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करते. मंगलकारी भगवंताची चर्चा माझ्या भावी जीवनाचे रसायन आहे. त्यामुळे माझा आत्मा पुष्ट होतो. मी तुमच्या व्यापारात व्यत्यय आणत नाही. तुम्ही माझ्या व्यापारात व्यत्यय का आणता? तुम्ही माझ्या भानगडीत पडू नका.''

स्वउपकार

आपलं आचार्यपद अनंतकीर्ती महाराजांना देऊन ते आता साधू परमेष्ठी झाले होते. त्यांनी शिष्यांना सांगून टाकलं की, ''तुम्ही आपलं आत्मकल्याण करा. आता मी तुम्हाला वेळ देऊ शकत नाही. मी माझी आत्मसाधना सोडू शकत नाही.''

'परोपकृतिमुत्सृज्य स्वोपकारपरो भव' अर्थात, परोपकार सोडून आता आत्महिताला लागा, या आगमाच्या आदेशाचं पालन ते करीत होते.

माझा देव माझ्याजवळच आहे

ते म्हणत असत, ''इतके दिवस परोपकार केला, उपदेश दिला, धर्मप्रभावना केली. आता मला दुसरीकडे जायचंय. माझी तयारी करायचीय. तुमची काळजी करायला मला वेळ नाही. समजावण्यासारखं काय राहिलंय? तुम्ही स्वतः समर्थ आहात. तुम्हीही ज्ञानाचा प्रकाश मिळवा. बाहेरच्या प्रकाशाची जरुरी नाही. निदान, मला तरी आता बाह्य प्रकाशाची जरुरी नाही. माझ्याजवळ माझे वैभव आहे, माझा खजिना आहे, माझं जीवनसर्वस्व आहे. माझा देव माझ्याजवळ आहे.''

स्वास्थ्य वृत्त

कधी लोक विचारायचे, ''महाराज, आपली प्रकृती कशी आहे?''

ते म्हणाले, ''अरे! या चिररुग्ण शरीराची कहाणी काय विचारता? माझ्या आत्म्याच्या स्वास्थ्याची, त्याच्या खुशालीची, आनंदाची चौकशी करा. मी ठीक आहे. निरोगी आहे. आनंदात आहे. शरीर रोगी असो वा निरोगी, माझा चैतन्यमयी आत्मा त्याची चिंता कशाला करेल? शरीर शरीर आहे, पुद्गल आहे. ते आपल्या स्वभावाप्रमाणे परिवर्तनाचा खेळ दाखवते. मी आत्मा आहे. या देहाचा चाकर नाही. मी माझ्या स्वरूपाचा स्वामी आहे. या रोगट देहाची गुलामगिरी का करायची?''

आत्मध्यान हेच औषध

त्यांची अंतर्मुखता दिवसेंदिवस वाढत चालली होती. त्यातच मग्न होऊन ते म्हणाले, ''मी सगळ्या औषधपाण्याचा त्याग केलाय. माझ्या अंतर्बाह्य सगळ्या रोगाचं औषध आहे, आत्मध्यान! त्या औषधानं आत्म्याचं पोषण होतं आणि पूर्वबद्ध पापपुण्यकर्मांचा क्षय होऊन आत्मा चिरंतन, शाश्वत स्वास्थ्य प्राप्त करतो. अनिवाशी निरामय आरोग्य प्राप्त करतो.''

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुरूवर्यांची पावन स्मृती

आचार्य महाराजांवर पायसागर महाराजांची फार भक्ती होती. त्यांच्या गुरूंच्या उपकाराची त्यांना फार जाणीव होती. ते म्हणत, "मी केवढं पाप केलं? कुठली व्यसनं मी केली नाहीत? माझ्यासारखा महापापी कुठं गेला असता कोण जाणे! पापाचा सागर असल्यानं मी अधोगतीच्या गर्तेत गेलो असतो. माझ्या गुरूंनी मला पायसागर बनवून माझा उद्धार केला." असं म्हणताम्हणता त्यांचे डोळे भरून यायचे.

खऱ्या गुरूची खरी भक्ती

त्यांच्या मनात गुरूंविषयी खरी भक्ती होती. खऱ्या गुरूंची भक्ती होती. खऱ्या गुरूंची खरी भक्ती! ते जसे त्यांचे गुरू 'ॐ सिद्धाय नमः' म्हणतम्हणत स्वर्गवासी झाले, तसे धार्मिक क्षेत्रावरील पवित्र वातावरणात, आत्मचिंतन करतकरत, ते मनस्वी साधूही स्वर्गवासी झाले. पायसागर महाराज हे अध्यात्मरसाने तुडुंब भरलेला क्षीरोदधी होता. त्यांचे जीवन अलौकिक होते. उज्ज्वल होते. ते असामान्य आणि लोकोत्तर संतशिरोमणी होते.

(चारित्र चक्रवर्ती (मराठी) :
लेखक - पं.सुमेरूचंद्र दिवाकर मधून साभार)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तत्कालीन निजामस्टेटमध्ये दिगंबर जैन मुनी–विहारावर बंदी घालण्यात आली. त्या संदर्भातील घटनांचा वृत्तांत

निजाम स्टेट में दिगंबर जैन मुनिविहार का स्वातंत्र्य

लेखक – वालचंद कोठारी बी.ए.एल.एल.बी. वकील (गुलबर्गा)

(१) दिगंबर जैनधर्म के आस्तित्व के लिए दिगंबर मुनीयोंका वास्तव्य और विहार बहुत जरूरी है। शास्त्रोक्त नियमानुसार मुनिधर्म पालन करने वाले दिगंबर जैन साधु अबतक भारतवर्षमें मौजूद है। दिगंबर जैन धर्मका रक्षण और पालन जरूर होगा।

दिगंबर मुनि दिगंबर जैनधर्मके मूर्तिमंत उदाहरण (Living Examples) है। मूर्तिपूजा और देवदर्शन का जो हेतु शास्त्रोमें बतलाया गया है उसकी सिद्धि मुनि दर्शन और गुरुजासे होती है। श्रावक–श्राविका व मुनि व अर्जिका ऐसा चतुः संघ जैन धर्ममें बतलाया गया है। गृहस्थ और गृहिणीके संबंधी नियम सागारधर्मामृतमें और मुनी व अर्जिका संबंधी नियम अनागार धर्मग्रंथ में पाये जाते है। गृहस्थ धर्म पालन के लिए ग्यारह प्रतिमाये–श्रेणियां बतलाई गई हैं। और उसके बाद मुनिधर्म, वे ही साधु स्वीकार कर सकते हैं, जिन्होंने सतत अभ्यास और अंतरंग व बहिरंग तपश्चर्या से कषाय मंदता व इंद्रियनिग्रह प्राप्त किया हो। जैन साधुओंका दिगंबरत्व यह पंचेंद्रियोंके विषयोंसे पराङ्मुख होकर आत्मोन्नति के लिए उद्युक्त होने का निदर्शक है।

परधर्मावलंबी नग्नसाधु ब्राह्मणोंमें हमारे पूज्य दिगंबर साधु के समान नजर आते हैं तो भी उनकी अंतरंगशुद्धि और उनका आचार हमारे जैनमुनियोंके समान न होनेसे वह त्याज्य हैं और हमारे लिए आदरणीय नहीं हैं। जैनधर्म में यह पद अत्यंत आदर्श व कठिन है। भारतवर्ष में इस पंचमकाल में बहुत अल्प संख्या में दि. जैन साधु पाये जाते हैं। इस अमूल्य रत्न को हर कोई धारण नहीं कर सकता। उपलब्ध रिपोर्टके अनुसार कुल हिंदुस्थान में ऐसे दि. जैन मुनियों की संख्या अंदाजा ३५ से अधिक नहीं है।

(२) गृहस्थोंको प्रतिदिन षट्कर्मों के पालन की जो धर्माज्ञा है उन में गुरूपास्ति

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अर्थात् दिगंबर मुनि और दूसरे जैन साधुओं की पूजा व आहार देना भी एक कर्तव्य हर गृहस्थका है। इस दैनिक कर्म के पालन करने के लिए जरूरी है कि मुनिधर्म का रक्षण हो और जैन मुनि अबाधित विहार करते रहें।

जैनसाधुओं का यह हक है कि वे तमाम कपडे (लंगोटी भी) छोड दे और गृहस्थियों का भी यह हक है कि वे ऐसी परिस्थिति निर्माण करे, जिस में उन के पूज्य साधु दिगंबर धर्मानुसार रह सकें और धर्मोपदेशार्थ विहार करनेमें उन को हर राज्य और हुकूमत में स्वातंत्र्य प्राप्त हो। दिगंबर मुनियों के विहार में कहां किसी तरह की बंदी नहीं होनी चाहिए। इस प्राचीन रिवाज और धार्मिकप्रथा को दुनिया की कोई हुकुमत या सल्तनत बंद नहीं कर सकती, और न तोड सकती है- अगर किसी प्रांत में या राज्य में दिगंबरमुनि विहार रोका गया या उस में ऐसी पाबंदियां लगाई जिसका नतीजा यह हो कि मुनिविहार स्वतंत्रता से नही हो सकता तो हर दिगंबर जैनों का कर्तव्य है कि हर प्रयत्न कर के ऐसी रुकावटों को हटा दे। अगर विधायक साधनों से (Constitutional means) यह मिलने की उमीद न हो तो 'सत्याग्रह' का अवलंब करना चाहिए। यह हमारा धार्मिक हक्क है इस से हम वंचित नहीं हो सकते। मोक्ष प्राप्ति के अनेक साधनों में दिगंबरत्व प्रमुख साधन है।

(३) शांतिसागर आचार्य संघ और उस की वजहसे जैन जनता में जागृति

प्राचीन इतिहासावलोकन से यह बात सिद्ध होती है कि भारतवर्ष में जैनियों की संख्या करोडों में थी, और जैन मुनि, साधु व त्यागी भी हजारों की संख्या में विहार करते थे। कोई तीर्थोंकि वर्णन में यह लिखा हुआ है कि लाखोंकी तादादमें मुनि वहां मुक्त हुए। लेकिन परिस्थित्यनुसार व परधर्मी राज्य शासन की वजहसे जैनियोंकी संख्या बहुत घट गई और जैन मुनियोंका दर्शन व विहार बहुत कम हो गया। इस पंचमकालमें मुनिधर्म पालन करनेवाले महात्मा विरले ही नजर आते हैं। लेकिन इस जमाने में भी श्री शांतिसागर आचार्य जैसे महान् त्यागी व तपस्वी मुनि उत्कृष्टतासे मुनिधर्म पालन करते हुए मौजूद है। जिनको देखकर हर एक जैन बांधव का मन प्रसन्न होता है और मुनिधर्म क्या है और उसका क्या फल है इसका मूर्तिमंत दाखला मिलता है।

श्री शांतिसागर आचार्य के शुद्ध व पवित्राचरणसे, आत्मोन्नति चाहनेवाले भव्य आत्माओंको धर्मश्रेणी चढनेका मार्ग मिल गया और थोडे धर्मात्माओने मुनिदीक्षा भी आचार्य महाराज के पास ग्रहण की। जब आचार्य महाराजने अपने संघमें सुयोग्य त्यागी और तपस्वी जमा हुए देखा तो आचार्य महाराजने अपने संघके साथ श्री सम्मेदशिखरजी यात्रा करनेका निश्चय किया और दानशूर शेट श्री घासीराम पूनमचंद मुंबईनिवासीने आचार्य संघको तीर्थयात्रा करानेकी जिम्मेदारी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वयंस्फूर्तिसे स्वीकार ली। उद्दिष्ट तीर्थयात्रा श्री आचार्य संघने की। गत दश वर्षतक आचार्य संघने उत्तर हिंदुस्थानके प्रायः सब प्रांतोंमें और अनेक देशी रियासतोंमें विहार किया। हिंदुस्थानकी राजधानी नई देहली (New Delhi) में भी श्री आचार्य महाराज का चातुर्मास हुआ। अनेक प्रकारकी धर्मप्रभावना हुई। इसका तमाम वृत्तांत जैनबोधक और दूसरे जैन अखबारों में प्रसिद्ध हो चुका है। उसको दुहरानेकी जरूरत नहीं। उद्दिष्ट तीर्थयात्राके निमित्तसे श्री आचार्य संघका निजाम स्टेट में से जो विहार हुआ था उसका रिपोर्ट जैनबोधक में यथासमय में प्रसिद्ध हो चुका है।

(४) **'निजामस्टेट में मुनिविहार'**: अब आचार्यसंघ तीर्थयात्रानिमित्त निजाम प्रांतमेंसे विहार करनेवाले है यह मालूम हुआ तो आलंदनिवासी स्वर्गीय शेठ माणिकचंद मोतीचंद शहा और मैंने एक दरखास्त निजाम सरकार के धर्मखाताके नाजिम के पास (महकमें निजामत उमुर मजहबी सरकार आली) तारीख १ दय १३३७ फ. (इ.स. १९२८) में दी थी, और उस पर हुकुम ता. २१ दय १३३७ फ. को मिला और चंद शर्तों के साथ दिगंबर मुनिविहारकी इजाजत मिली और इस हुकुमकी आधारपर आचार्य महाराज का संघ आलंद, लातुर, बीड, नांदेड आदि जिलेसे विहार करता हुआ कुशलतासे गुजरा। मार्ग में कोई तकलीफ न हो इस लिए गुलबर्गे के पोलिस सुपरिंटेंडेंट् मौलवी महम्मद जलालुद्दीनसाहेब ने दो जवानोंको दिगंबर मुनियोके साथ देने का हुकुम ता. ३ बहमन १३३७ फ. को दिया है। इसके पांच साल बाद श्रीनंदसागर मुनि और श्री जयसागरजी मुनि जिला रायचूर बीदर और हैद्राबाद में से विहार किए उस वक्त भी पहिले हुकुमके माफिक तारीख ११ अमरदाद १३४२ फ. और ता. २८ अमरदाद १३४३फ. मुनिविहारकी मंजूरी मिली। इसकी नकले भी परिशिष्टमें दी गई हैं।

सवासाल पहिले जब श्री कुलभूषण, देशभूषण मुनिमहाराज म्हैसूरसे विहार करते हुए रायचूर, गुलबर्गा और आळंद को आए तो गुलबर्गा कलेक्टर साहेबने जो हुकुम दिया उसका मुरासला पोलिस सुपरिंटेंडेंटकी तरफसे मेरे नाम ता. २२ फरवरी १३४७ फ. को दिया गया और उसमें हुकुम दिया गया कि श्री देशभूषण साधु इस शर्तपर आबादी में विरहजा (नग्न) निकल सकते हैं कि कपडेका एक पर्दा साधु मजकूरके अतराफ इत तरह कायम रहे कि बिरहन्न (नग्नत्व) पोशिदा हो जाए और आलः में भी इसी पर अम्मलपैरा होना होगा'' इस हुकुम की नक्कल परिशिष्ट में दी गई है- इस हुकुम की पाबंदी गुलबर्गा और आलंद में नहीं की गई और मुक्कामी जैन जनता के सहयोग से दि. मुनि महाराज का विहार निर्विघ्न पार पडा।

उस के बाद ''कपडे का पर्दा रखने की नयी शर्त'' बरखास्त करने की

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गरज से एक अर्जी गुलबर्गा के कलेक्टर सा. के पास पेश की गई, तो कलेक्टर सा. (मौलवी सय्यद मोहियोद्दीन अहमद रजवी एच्.सी.एस्.) ने धर्मखाते को नयी शर्त बरखास्त करने की सिफारिश की और क्या तसफिया होता है इस की हम मार्ग प्रतिक्षा करते रहे।

(५) ''दिगंबर मुनि विहार बंदी का निजाम सरकार का फर्मान और जैन जनता ने उस के खिलाफ आंदोलन (Agitation) मचानेपर दिगंबर मुनिविहार को पूर्ववत् स्वतंत्रता'' ता. ७ जून १९३८ ईसवी (ता. १ शहरेवर १३४७ फ.) को हुजुर निजाम का फर्मान हुआ कि ''निजाम स्टेट में नग्न साधुवों को फिरने की इजाजत देना मुनासिब नहीं है। अलबत्ता अगर वह एक मुक्काम से दुसरे मुक्काम पर जाना चाहे तो रात में १२ बजे से ४ बजे तक जा सकते हैं।''

इस फर्मान की इत्तिला मुरसला नि. २६५० ता. ४ शहरेवर १३४७ फ. से सब रियासत में दी गई उस की नक्कल भी परिशिष्ट में दी जाती है। इस फर्मान के निकालने के बाद निजाम स्टेट के ही नहीं बल्कि ब्रिटिश हिंदुस्थान और दुसरी तमाम देशी रियासतों के दिगंबर जैन जनता में बहुत जोरशोर के साथ आंदोलन हुआ। हजारों तार व अर्जियां निजाम सरकार के सब श्रेष्ठ अधिकारियों के नाम भेजे गए। निजाम प्रांतीय जैन सभा की तरफ से जैन शिष्टमंडल Deputation ले आनेकी इजाजत धर्मखाते के प्रधान से चाही गई और अखबारात में बहुत चर्चा शुरू हुई। धर्मखाता के प्रधानसे मेरे नाम जवाब ता. २८ मेहर १३४७ फ, को आया कि दिगंबर जैनीयोंका डेप्युटेशन हैद्राबादमें लाया जाए।

ता. ९ आबान १३४७ फ. (ता. १४ सप्टेंबर १९३८) के रोज हैद्राबादमें बाबे हुकुमतमें (Council Hall) दि. जैनीयोंका डेप्युटेशन ले जाने का तय किया। निजाम प्रांतीय जैन सभाकी तरफ से प्रायः सब धर्मबंधु और विद्वान व शास्त्री व पंडित लोगोंको मालूम कराया गया। पंडित सुमेरचंद्रजी दिवाकर बी.ए.एल.एल.बी. वकील, सिवनी (मध्यप्रांत), पंडित मख्खनलालजी शास्त्री न्यायालंकार मारेनोनिवासी और श्री विद्यावाचस्पति पं. वर्धमान पार्श्वनाथ शास्त्री न्यायतीर्थ शोलापूरनिवासी आदि धर्मज्ञ और निजाम प्रांत के प्रमुख जैन लोग एक दिन पहिले हैद्राबाद में जमा हुए। एक अंग्रेजी अर्जी सविस्तर तय्यार की गई और उसके साथ सब धार्मिक, ऐतिहासिक व दीगर रियासतोंके इजाजत के दाखले जोडे गए, और निम्न लिखे हुए छे मेंबरोंका डेन्युटेशन कौन्सिल हालमें ता. १४ सप्टेंबर १९३८ दिन के २-४५ को मिला। अर्जीकी नक्कल इसके साथ दी गई है। इस अर्जीको तैयार करने में उपर्युक्त तीनों धार्मिक विद्वानोकी बहुत मदत मिली। इसके लिये उनको हम हार्दिक धन्यवाद देते हैं।

डेप्युटेशनमें निम्न लिखित सज्जन शामिल हुए।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१. फुलचंद रामचंद गांधी बी.ए.एल.एल.बी. वकील, मु. उस्मानाबाद
२. वालचंद कोठारी बी.ए.एल.एल.बी. वकील मु. गुलबर्गा
३. श्री माणिकचंद पहाडे वकील मु. औरंगाबाद
४. श्री हिराचंद अमीचंद गांधी मु. उस्मानाबाद
५. श्री जिवराज हिराचंद शहा मु. आळंद
६. श्री सत्करण सेठी जैन मु. वरंगल

सरकार की तरफसे एक्झिक्युटिव कौन्सिलके तीन मिनिस्टर हाजर थे-

१ नवाब मिर्जा मारजंग बहादुर बी.ए.एल.एल.बी. सदरुल मुहाम उमर मजहबी अदालत (Ecc'esiastical & Judiciate Minister)

२ मि. क्रॉफ्टन साहेब (Revenue Police Minister)

३ राजा शामलाल बहादुर (Minister : Public Works Department)

तीनों प्रधानोंने डेप्युटेशन के कथन और अंग्रेजी अर्जीको शांतचित्तसे सुन लिया और ये सुनकर ऐसे दिगंबर जैन मुनीयोंकी संख्या इस वक्त हिंदुस्तान में पचाससे कम है सुनकर, जानकर उनके दिलकी शंका दूर हो गई और उन्होंने साफ दिलसे कहा कि ऐसे नग्न साधु हजारोंकी संख्यामें होते है ऐसा उनका ख्याल था। लेकिन अब उनको मालूम हुआ कि बडी कडी तपश्चर्याके बाद और इंद्रियनिग्रह सेही उच्च दशाके पवित्राचरणके साधुओंकोही दिगंबर मुनिदीक्षा दी जा सकती है और इनका आचार पालन बहुत ही कठिनव्रत है। प्रधानत्रयको खुशी हुई और दिगंबरमुनिविहार का महत्त्व मालूम पडा और उन्होंने कौन्सिल में तहरीक करके आला हजरत (निजाम) के पास बंदी उठाने संबंधी शिफारस करने का वचन दिया। कौन्सिलने तीनों प्रधानों की रायको मंजूर कर लिया और उनके सिफारिश पर आला हजरत (निजामसाहेब) ने फर्मान ता. ९ रमजान स. १३५७ हिजरी (ता. २ नोव्हेंबर १९३८ इ.) निकल कर जैन दिगंबर मुनिविहार बंदी को बरखास्त किया। और निजामस्टेटके सब अधिकारियों के नाम हुकुम जारी किया गया है। मेरे नाम कलेक्टर गुबलर्गाने फर्मान और निजाम सरकारके हुकुमकी जो नक्कल भेजी है उसकी नक्कल परिशिष्ट में दी गई है।

